UNIVERSAL
LIBRARY
OU_192275
UNIVERSAL
LIBRARY

# प रा म र्श

( खंड १ ला )

[ निवडक वाङ्मयविषयक लेखांचा संग्रह ]

लेखक

विष्णु बापूजी आंबेकर, एम्. ए.

१९३८

किंमत १॥ रुपया

प्रकाशकः—जनार्दन शंकर मेढेकर
९६ प्रभातरोड, पुणें ४.

## पुढील पुस्तकें.

( १ ) हरि नारायण आपटे—( वाङ्मयसमीक्षण. )

( २ ) परामर्श—( खंड २ रा. )

( ३ ) भावचित्रें ( लघुकथासंग्रह. ) ( भाग १ ला. )—
दुसरी आवृत्ति.

( ४ ) भावचित्रें—( लघुकथासंग्रह ) ( भाग २ रा. )

मुद्रक—गोपाळ बळवंत जोशी,
आनंद मुद्रणालय, १९६ । ४६
सदाशिव पेठ. पुणें



विष्णु बापूजी आंबेकर

[कोहिनूर आर्ट प्रेस, पुणें २]

# लेखांचा क्रम.


| नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रस्तावना | |
| ( १ ) इतिहास व ऐतिहासिक कादंबरी. | १ |
| कार्यकारणभावाचें निदान–भाष्यांत मतभेद होतो–इतिहासकालांतील साक्षात् शिक्षणपद्धति–दस्तऐवज दत्त म्हणून उठतात. लेकुरवाळ्यांच्या मेळ्यांत अविवाहितावस्थेचें खूळ— | |
| ( २ ) प. वा. हरि नारायण आपटे. कादंबरी–लेखनाची मीमांसा | १३ |
| कलावंत आणि प्रचारक–जोडे पुसतात व आनंद मानतात–स्त्री मालमत्ता गणली गेली–धर्मग्रंथांचा कानमंत्र धुळीला मिळाला–कादंबरींतील वर्णनांचें द्विविध कार्य–रहस्यमय प्रसंगांची गुंफण– | |
| ( ३ ) आपटेकृत " मी ". कांहीं आक्षेपांचा विचार. | २७ |
| सर्व कादंबरीसृष्टीला व्यापणारें भविष्यसूचन–जिव्हाळा प्रेमांत नाहीं– | |
| ( ४ ) मुक्तात्मा. | ३३ |
| बुद्धीची कुशाग्रता विध्वंसक ठरली–कुटाळांची कुचाळी ! मांसाहाराचा निषेध– पार्करांनीं शेलेला प्रेमतुष्टि दिली ! | |
| ( ५ ) अटकेपार. | ४१ |
| लग्नें सुखाचीं झालीं असतीं, पण–नवऱ्याचें घर कायमचें सोडलें–विरोधकहि प्रामाणिक असतात–दाखल्यांचें हृदयस्पर्शित्व– | |
| ( ६ ) लघुकथेचें शारीरशास्त्र. | ५० |
| वर्ण्य वस्तूंशीं तन्मय झालें पाहिजे–लघुकथा ही डायरी नव्हे– | |

परदेशी आयात नको–जीवंत पात्रांची निर्मिति हवी–परमोत्कर्षाची पकड–प्रस्तावनेला अर्धचंद्र–

**( ७ ) लघुकथालेखक हरिभाऊ आपटे.** ६१

विनोदात्मक कथांचीं सूत्रें–प्रसंगनिष्ठ विनोद जास्त खुलतो–मंगलाष्टकें नाहींत–आत्महत्याहि नाहीं–वर्णनात्मक कथांची रूपरेखा–कल्पनासृष्टि वस्तुसृष्टीशीं विसंगत नाहीं–इच्छिलें एक आणि झालें भलतेंच–कला व बोध यांचा समन्वय–हेतुपुरस्सर नीतिशिक्षण नको–असताचा निषेध–सताची प्रगति–सामाजिक शब्दाची अन्वर्थकता–जिव्हाळ्यावांचून सारें व्यर्थ आहे–

**( ८ ) श्री. न. चिं. केळकरांचें लघुकथालेखन.** ८४

लेखनप्रकार मनश्चर्येवर अवलंबून असतो–आजचा राजमार्ग– पूर्वीचीं आडवळणें–कथांचीं सूत्रें–केळकरवाङ्मयाचे विशेष–

**( ९ ) आवडत्या गोष्टी.** ९३

फुरसतीचा काळ व गोष्टींची लांबीरुंदी–संक्रमणावस्था दाखविणारें अनुकरण–निरनिराळ्या विकासस्थिति–

**(१०) प. वा. गोपाळ गणेश आगरकर.**
**निबंधलेखनाची मीमांसा** १०१

दागिने, अंडीं, आणि सण–मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घ्यावें–समाजाच्या वर्तनांतील असंबद्धता–वेदकालीन समाज–अवघे जन सुधारक झाले–प्रणयांत स्वेच्छा हवी कीं बळजबरी हवी–कार्यकर्त्यांचे दोन सांप्रदाय–विरोधकांचें म्हणणेंहि आगरकर विचारांत घेत–निरुत्तर करणारा कोटिक्रम–समाजाच्या सारासारविचारशक्तीला चालना–विषय पटवून देण्याची हातोटी–आगरकरांचें ब्रीदवाक्य व त्याचें मर्म–टिळक व आगरकर–आगरकरांच्या अंतःकरणावरील शिलालेख.

(११) **जयमङ्गला.** **१३०**

मनोविश्लेषणाला प्राधान्य–सहवासाचें स्वाभाविक पर्यवसान हृदय-मीलन–परोक्ष वर्णनांची परिणामकारकता–मूळांतील कांहीं हृदयंगम श्लोक.

(१२) **तांबे—समग्र—कविता.** **१३९**

काव्यांतील रस व रीति–परमेश्वराची प्रार्थना करणारी आस्तिक्यबुद्धि जीवनाबरोबर काव्याचाहि विकास–तांब्यांची काव्यदुहिता थोरा-मोठ्याची आहे.

(१३) **फलभार.** **१४८**

परकायाप्रवेशाचे अनुभव–स्पर्शेंद्रियांचीं सुखें अशाश्वत आहेत–निसर्गशक्तीशीं समरस होण्याकरितां तपश्चर्या केली.

# छायाचित्रांचा अनुक्रम

| नांव. | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ( १ ) लेखक—वि. बा. आंबेकर | .... | .... | आरंभीं |
| ( २ ) प. वा. बा. मा. आंबेकर | .... | .... | समर्पण |
| ( ३ ) प. वा. ह. ना. आपटे | .... | .... | १३ |
| ( ४ ) श्री. ग. त्र्यं. मांडखोलकर | .... | .... | ३३ |
| ( ५ ) प्रो. ना. सी. फडके | .... | .... | ४१ |
| ( ६ ) श्री. न. चिं. केळकर | .... | .... | ८४ |
| ( ७ ) प. वा. गो. ग. आगरकर | .... | .... | १०१ |
| ( ८ ) श्री. यशवंत | .... | .... | १३० |
| ( ९ ) श्री. तांबे | .... | .... | १३९ |
| ( १० ) श्री. गिरीश | ... | .... | १४८ |

# प्रस्तावना.

या पुस्तकांत मीं वेळोवेळीं लिहिलेल्या अनेक लेखांपैकीं तेरा लेखांचा समा-वेश करण्यांत आला आहे. हें तेरा लेख पुनर्मुद्रणाचा मार्ग आक्रमतील असें कोणी सांगूनहि मला कधीं खरें वाटलें नसतें. या लेखांचें माझ्या कांहीं स्नेह्यांना जें महत्त्व वाटत होतें, तें मला माझ्या स्वभावाच्या बुजरेपणामुळें पटत नव्हतें. आपलें लेखन पुनर्मुद्रित स्वरूपांत लोकांपुढें मांडण्यास माझ्या मनाची तयारी होणें न होणें, हें सर्वस्वीं ती कल्पना मूर्तस्वरूपांत येण्यावरच अवलंबून होतें. आणि ही कल्पना मूर्तस्वरूपांत येईल ही गोष्ट, हें पुस्तक छापखान्यांत छापावयास दिलें, त्याच्या आदल्या दिवसांपर्यंत मला स्वप्नांतहि खरी वाटली नसती. माझे निरपेक्ष स्नेही श्री. ज. शं. मेढेकर यांना हें पुस्तक काढावें, अशी प्रेरणा झाली. प्रेरणेच्या मागोमाग कार्याचा उरक करणाच्या बाबतींत ते फार तत्पर असल्या-मुळें त्यांनीं पुस्तकाचा मजकूर लगोलग छापखान्याकडे पोंचताहि केला. अर्थात् मजकुरासंबंधांत निवड करण्यास त्यांनीं मला मोकळीक ठेवली, आणि मला ज्या लेखांचें विशेष महत्त्व वाटलें, त्यांतील कांहींच मीं या संग्रहाकरितां निव-डून दिलें.

हे तेराहि लेख पूर्वी निरनिराळ्या निमित्तांनीं लिहिलेले आहेत. यांतील पुस्तक--परीक्षणांचें जे लेख आहेत ते सारे ज्ञानप्रकाशच्या काव्यशास्त्रविनोदांतून प्रथम प्रकाशित झाले आहेत. ज्ञानप्रकाशशीं माझें संबंध वडिलार्जितच आहेत. पण या संबंधांतहि नवीन जिव्हाळा निर्माण करण्याचें सारें श्रेय ज्ञानप्रकाशचे संपादक श्री. कृ. ग. ऊर्फ काकासाहेब लिमये यांना आहे. किंबहुना प. वा. तीर्थरूप बापूरावांची गोष्ट घरचीच म्हणून सोडून दिली तर माझ्या हातून झालेल्या पुष्कळशा लेखनव्यवसायाला श्री. काकासाहेबांचें प्रेमळ प्रोत्साहनच कारण झालें आहे. या पुस्तकांत आलेलीं आणि इतरहि अनेक पुस्तक–परीक्षणें त्यांनीं माझ्याकडून आग्रहानें लिहून घेतलीं. या परीक्षणांची सरसनीरसत

ठरविणें हें अर्थात्‌च मर्मज्ञ वाचकांचें काम आहे. पण या सर्व परीक्षणांसंबंधांत एक गोष्ट मात्र विशेष उल्लेखनीय आहे. आणि ती म्हणजे हीं सारीं परीक्षणें त्या त्या पुस्तकांवरील मराठी वाङ्मयांतील कालानुक्रमानें प्रायः पहिलीं परीक्षणें आहेत !

पुस्तकांत समाविष्ट झालेले प. वा. हरिभाऊ आपटे यांच्यावरील दोन विस्तृत लेख हे त्यांच्या दोन स्मृतिदिनानिमित्त लिहिलेले होते. पैकीं कादंबरीलेखनाची मीमांसा हा लेख मुळांत व्याख्यानाच्या रूपानें लिहिला गेला होता. " मी"-वरील कांहीं आक्षेपांचा विचार " हा लेखहि फर्ग्युसन कॉलेजांत १९३४ सालीं दिलेल्या एका व्याख्यानावरूनच तयार करण्यांत आला आहे. इतिहास व ऐतिहासिक कादंबरी हा लेख ज्योत्स्ना मासिकांत प्रसिद्ध झाला होता. या विषयावर कांहींतरी स्वतंत्र पुस्तकरूपानेंच लिहिण्याचा मानस आहे. या लेखाच्या निमित्तानेंहि नवीन प्रकाशित झालेलें पेशवेदप्तर मुद्दाम वाचलें, आणि त्यांतील महत्त्वाच्या माहितीचा या लेखांतहि दोन तीन ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. प वा. आगरकरांवरील लेख रत्नाकर मासिकांत १९३० सालीं प्रकाशित झाला होता. अर्वाचीन वाङ्मयसेवक, आजकालचा महाराष्ट्र वगैरे आगरकरांसंबंधींचीं साधनें अस्तित्वांत नव्हतीं त्याकाळीं हा लेख लिहिलेला आहे, एवढें सांगितलें म्हणजे त्याचें वेगळें महत्त्व दर्शविण्यास नको. यशवंतांच्या जयमङ्गला या काव्यावर लिहिण्याच्या निमित्तानें बिल्हणाचें मूळ चौरपंचाशिका हें, भांडारकरप्राच्यविद्यासंशोधनालयाव्यतिरिक्त दुसरीकडे सामान्यतः कुठेंहि उपलब्ध नसलेलें काव्य तेथूनच आणून वाचलें, आणि त्याचाहि योग्य तो उपयोग केला.

या पुस्तकाच्यासंबंधानें सांगण्यासारख्या आणखी कितीतरी गोष्टी आहेत ! पण त्या वाचकांनीं ओळखण्यांत आणि शोधून काढण्यांत खरी मौज आहे. त्यामुळें आपल्याच तोंडानें सांगत बसण्याचा आणि कदाचित् अशिष्टपणाचा वाटणारा प्रपंच करीत नाहीं. पुस्तकाचें ' परामर्श ' हें नांव हेतुपुरस्सरच ठेवलें आहे.

या पहिल्या भागाचें अपेक्षेप्रमाणें वाचकांनीं स्वागत केल्यास दुसरा भागहि प्रकाशित होण्याचा कदाचित् सुयोग येईल ! पुस्तकाची छपाई आणि सजावट यांच्या सरसतेचा वांटा माझ्याकडे अर्थात्‌च नाहीं ! लेखकांचे पुस्तकांत

फोटोंच्या रूपानें ठसे घातले आहेत, ते आयते मिळवून देण्यांत कितीतरी स्नेह्यांनीं आपलेपणानें साहाय्य केलें आहे. विशेषतः फर्ग्युसन कॉलेज, ज्योत्स्ना मासिक, केसरी संस्था, ज्ञानप्रकाश संस्था, लोकसंग्रह छापखाना इत्यादींचे चालक यांचा विशेष निर्देश करणें जरूर आहे. वाङ्मयांत जन्म घेणाऱ्या या अपत्याच्या आगमनानें वाचकांना प्रसन्नता लाभावी या प्रामाणिक हेतूनें मांडलेल्या या व्यूहाचा वाचक योग्य तो आदर करतील अशी आशा आहे.

ता. १ फेब्रुवारी १९३८
डेक्कन जिमखाना, पुणें. ४


**विष्णु बापूजी आंबेकर.**

समर्पण

प. वा. तीर्थरूप बापूराव यांस:—

" वळते अजली न कळत, बघुनी तुम्हालागीं "

आण्णा.



कै. बापूजी मार्तंड आंबेकर

[कोहिनूर आर्ट प्रेस, पुणे २.]

# १

# इतिहास व ऐतिहासिक कादंबरी.

" मीं रोम आणि ग्रीस या देशांच्या इतिहासाचें ज्ञान प्लुटार्कचे ग्रंथ वाचून संपादन केलें आणि शेक्सपीअरचीं नाटकें वाचून मला इंग्लंडच्या इतिहासाचें मर्म समजलें, " अशा आशयाचे उद्गार लॉर्ड रोसबरी यांनीं एके ठिकाणीं काढले आहेत. या एका वाक्यांत जो अर्थ सामावला आहे तो अक्षरशः समजावून घेतला म्हणजे ऐतिहासिक कथावाङ्मयाचें महत्त्व किती अभंग असतें हें सहज पटण्यासारखें आहे. सामान्यतः, देशाचा इतिहास किंवा राष्ट्राची एकंदर पूर्वपीठिका समजावून घेण्याची लालसा मनुष्याच्या स्वभावांत जन्मजातच असते म्हटलें तरी चालेल. राष्ट्राची पूर्वपीठिका उज्ज्वल बनविण्याच्या कामीं ज्या लोकोत्तर आणि कर्तृत्ववान् पुरुषांनीं श्रमसायास केले त्यांच्या चरित्राचें आणि चारित्र्याचें यथावत् ज्ञान करून घेणें ही भावना वस्तुतः राष्ट्राभिमानाच्या भावनेच्या तोडीची मानली जाते. शिक्षणाचा ओनामा गिरविण्यास सुरवात केल्याबरोबर शाळेंतील विद्यार्थ्याला प्रारंभीं जर कशाचें विशेष आकर्षण वाटत असेल तर तें आपल्या देशाचा इतिहास मोठ्या मर्मग्राहक बुद्धीनें वाचून काढण्याचेंच होय. गोष्टींच्या रूपानें वाचलेला आपल्या देशाचा इतिहास अल्पवयी बालकांच्या बुद्धींत इतक्या झपाट्यानें भिनून जातो कीं, स्नेहीसोबती जमवून लुटुपटीचे खेळ खेळतांना इतिहासांतील लढायांची आणि रोमहर्षण प्रसंगांची पुनरावृत्ति घडवून आणण्याची हौस त्यांच्याठिकाणीं जागृत होते आणि प्रत्यक्ष व्यवहारांतहि त्यांच्या हातून अशा प्रकारचें वर्तन घडतें. सारांश, पूर्वकालांतील इतिहासांत मन्वंतर घडवून आणणाऱ्या बारीकसारीक घटनांचीहि जबरदस्त पकड बालमनावर बसते आणि तिच्या अनुषंगानें बालमन आपल्या करमणुकीच्या खेळांची सजावट करण्यासाहि उद्युक्त होतें. इतिहासाची मनावर ही जी पकड बसते तिची स्निग्धता किंवा शिथिलता ही तो इतिहास ज्या पद्धतीनें लिहि-

लेला असेल त्या पद्धतीवरच अर्थात् अवलंबून राहते. इतिहासांत लोकोत्तर ठरलेले पुरुष वस्तुतः अजरामर करून सोडण्याचें काम इतिहासलेखकांचें असतें. किंबहुना, या श्रेष्ठ पुरुषांची भावी काळांतील आयुर्मर्यादा इतिहासलेखकाच्या लेखनकलेवरच अवलंबून असते असें म्हटलें तर त्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. पराक्रमी वीर, चतुर मुत्सद्दी, चक्रवर्ती सम्राट्, लोकोत्तर पुढारी, मातबर राष्ट्रोद्धारक इत्यादि सर्वश्रेष्ठ विभूतींचें विभूतिमत्त्व टिकवून ठेवण्याचें आणि त्या विभूतिमत्त्वाबद्दलची परमादराची भावना समाजांत चिरंजीवी करून सोडण्याचें सामर्थ्य जर कशांत असेल, तर तें चतुर इतिहासलेखकाच्या लेखणींत आहे.

ही लेखणी कमीअधिक प्रमाणांत प्रभावी असण्यावर लिहिलेल्या इतिहासाची परिणामकारकता अवलंबून असते. लेखणीचा प्रभावीपणा जो पारखावयाचा तो केवळ भाषासरणीवरून किंवा शब्दयोजनेवरूनच नव्हे. भाषा हें एक इतिहास कथन करण्याचें मामुली साधन आहे. उत्कृष्ट भाषा लिहिणारे इतिहासकार कित्येक होऊन गेले. त्यांच्या मोहक भाषेची पकड वाचकांच्या मनावर कांहीं काळ बसून गेली हेंहि खरें. पण ती पकड टिकून राहण्याचें खरें कारण इतिहासांत घडलेल्या घटनांची उपस्थिति लावण्याच्या कामीं त्या लेखकांनीं दर्शविलेलें कौशल्यच होय. इतिहासांत घडणारे प्रसंग किंवा घटना कांहीं सांगून सवरून घडत नाहींत. किंबहुना, इतिहासांत घडलेल्या प्रसंगांकडे आजहि परीक्षापूर्वक दृष्टीनें पाहिलें तर त्यांचा अनपेक्षितपणाच विस्मयकारक वाटण्यासारखा असतो. नारायणराव पेशव्यासारख्या राज्यकर्त्याचा खून प्रत्यक्ष त्याच्याच राहत्या वाड्यांत पडेल ही गोष्ट खुनाआधीं कोणाला सांगूनहि खरी वाटली नसती. राष्ट्रांत हाहाःकार उडविणारी ही अकल्पित आणि अमानुष घटना प्रत्यक्ष घडली, तेव्हां कित्येकांच्या चित्तवृत्ति स्तंभित होऊन गेल्या. जुन्या राजशाहीच्या इतिहासांत अशा अनेक विस्मयोत्पादक गोष्टी घडून आल्या. त्या तशा घडतील अशी कोणाची अपेक्षाहि नव्हती. अशा स्थितींत झालेल्या गोष्टी नुसत्या इत्थंभूत कथन करणें एवढेंच काम खऱ्या इतिहासलेखकाला करावयाचें नसतें. घडलेल्या गोष्टी अनपेक्षितपणानें घडल्या तरी त्यांच्यांत कांहीं कार्यकारणभावांची संगति

होती किंवा काय हें इतिहासलेखकानें पहावयाचें असतें. आणि कांहीं गोष्टींचे कार्यकारणभाव अगदीं उघड आणि स्पष्ट असतात; तर कांहींचे कार्यकारणभाव अनेक दुव्यांच्या गुंतागुंतींत दिसेनासे झालेले असतात. सामान्य इतिहास-लेखकाच्या बुद्धीचा किंवा विचाराचा पल्ला ज्या ठिकाणीं पोंचणें अशक्य ठरेल अशा ठिकाणींहि कांहीं घटनांचे कार्यकारणभाव गुंतून पडले असण्याचा संभव असतो.

असले कार्यकारणभाव उलगडतांना आणि त्यांच्यावर प्रकाश पाडतांना इतिहासलेखक आपल्या अंगचें कौशल्य ज्या प्रमाणांत प्रकट करील त्यावरच त्याच्या लेखनाची महती अवलंबून असणार. आज निरनिराळ्या इतिहासलेखकांत मत-भेद उत्पन्न झाल्याचें आपण पाहतों. हे मतभेद वस्तुतः घटनांच्या प्रत्यक्ष अस्तित्वाविषयीं शंका प्रदर्शित करण्याकरितां केव्हांहि निर्माण झालेले नसतात. घटनांचें अस्तित्व दोन्ही पक्षांना मान्य असतें; पण त्या घटनांच्या आगेंमागें असणाऱ्या कारणपरंपरेची निवडानिवड करण्याच्या बाबतींत खरा मतभेद उत्पन्न होतो. कारणपरंपरेची निवडानिवड करून तिची सर्वग्राह्य उपस्थिति लावण्याचें कार्य ज्यानें अतियशस्वी रीतीनें केलें तो इतिहासकार अधिक मार्मिक ठरतो. दाखला देऊन हें म्हणणें अधिक विशद करावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं सामान्य लेखक हा प्रत्यक्षाबरहुकूम चित्र वठवितो पण तें केवळ बाह्य अंगोपांगांचेंच असतें. चिकित्सक लेखक क्ष-किरणाच्या साहाय्यानें अंतर्गत भागापर्यंत जाऊन भिडणाऱ्या वैद्यासारखा असतो. आणि शिवाय सामान्य इतिहासलेखक आणि चिकित्सक इतिहासकार यांच्यांतील भेद चित्रकार आणि वैद्य यांच्या मनोवृत्तींतील भेदासारखाच असतो. चित्रकार कांहीं गोष्टी कमीअधिक करून रंगवून दाखवितो. वैद्य वस्तुस्थिति ध्यानांत आणून त्या वस्तुस्थितीचें उत्कृष्ट निदान करतो. म्हणजे या कामीं महत्त्व आहे तें प्रत्यक्ष वस्तुस्थितिकथनाला नाहीं, तर वस्तुस्थिति घडविणाऱ्या कारणपरंपरेचें निदान वर्तविण्याला आहे.

असें निदान करावयाचें म्हणजे इतिहासकाराची अंतर्दृष्टि मर्मस्पर्शी आणि सूक्ष्मदर्शी असली पाहिजे. शिवाय त्याला मनुष्यस्वभावाचें फार कांटेकोर ज्ञान असावयास पाहिजे. एकच मनुष्यस्वभाव अनेक घटनांच्या परिघांतून फिरतांना

बदलत जातो हें तर त्यानें जाणलें पाहिजेच, पण तसा तो बदलतांनाहि संगत-वार बदलतो हेंहि त्यानें विसरून चालतां कामा नये. मनुष्यस्वभाव बदलण्या-संबंधांत जर कांहीं संगति नसेल तर त्याच्या मुत्सद्दीपणाला तऱ्हेवाईकपणाचें स्वरूप येईल आणि त्याच्या शौर्यपराक्रमादि गुणांचें वेडाच्या लहरींत रूपांतर होईल. केव्हां कोणती गोष्ट घडेल हें जरी कधींहि नक्की ठरवितां आलें नाहीं तरी कोणतीहि गोष्ट घडत असतां विशिष्ट मनोवृत्तीचा मनुष्य कशा प्रकारचें वर्तन करील हें कांहीं विशिष्ट अनुमानप्रमाणांच्या साहाय्यानें ठरवितां येणें शक्य असतें. इतिहासकालांतील लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें पारखतांना हीच दृष्टि प्रामु-ख्यानें बाळगावी लागते. निरनिराळ्या इतिहासकारांत मतभेदांचे मुद्दे उपस्थित होतात ते दृष्टिकोनांत फरक पडल्यामुळेंच होय. तिखट पदार्थ तिखटच लागला पाहिजे, किंवा आंबट पदार्थ आंबटच लागला पाहिजे हीं अनुमानशास्त्राचीं ठोकळ प्रमाणें अनेक उदाहरणांच्या पडताळ्यावरून ठरविलेलीं असतात. पण अनुमान-शास्त्राच्या कित्येक ठोकळ प्रमाणांनाहि हुलकावणी देऊन आपापल्यापुरतें नवीन-च अनुमानशास्त्र निर्माण करण्याइतक्या कांहीं घटना प्रभावी असतात. अनु-मानशास्त्रांत अपवाद निर्माण होऊन त्या शास्त्राचें 'अनुमान' हें नांव अन्व-र्थकतेनें टिकून राहाण्याचें कारण म्हटलें म्हणजे त्या शास्त्राच्या आजवरच्या अनुमानपरंपरेच्या चौकटींत न बसणारे शेंकडो प्रसंग मानवी वर्तनक्रमांत उद्-भूत होण्याचा संभव उरतो हेंच होय.

इतिहासांतील मानवी वर्तनक्रम अशा ठोकळ अनुमानपरंपरेच्या ठराविक चौकटींत न बसण्याइतका तऱ्हेवाईक आणि विसंगतहि असतो. या तऱ्हेवाईक-पणाची सर्वतोपरी छाननी करून त्या विसंगतपणांतहि कांहीं एकसूत्रता आहे हें स्थापित करण्यांतच इतिहासकाराचें खरें चातुर्य आहे. इतिहासांतील मानवी स्वभाव आणि त्या स्वभावांनीं घडविलेले प्रसंग या सर्वांच्या समवायानें जी तत्त्व-प्रतीति होते ती यथासांग अजमावण्याचें कौशल्य इतिहासकाराच्या अंगीं असावें लागतें. या कौशल्याच्या कमीअधिकपणामुळें इतिहासकारांत मतभेद उत्पन्न होतात. आपल्याइकडील असल्या मतभेदांचें एक उत्कृष्ट उदाहरण द्यावयाचें झाल्यास तें राजवाडे व पारसनीस यांच्यांतील मतभेदाचें होय. ब्रह्मेंद्रस्वामी

धावडशीकराला पारसनीसांनीं पेशवाईतील रामदास बनवून सोडलें तर राजवाड्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें एकेरीवर येऊन सडेतोड भाषेंत ब्रह्मेंद्रस्वामीची आणि त्याच्या चरित्रक्रमाची सणसणीत पूजा बांधली. पारसनीसांनीं त्याच्या गळ्यांत विभूतिमत्त्वाची माळ घातली तर राजवाड्यांनीं त्याला निरक्षर आणि भोंदू बुवांच्या कोटींत नेऊन बसविलें. एकच ब्रह्मेंद्रस्वामी, त्याच्या आयुष्यांत घडलेल्या गोष्टीहि त्याच, पण त्याच्यावरील इतिहासकारांचें भाष्य कसें बदलूं शकतें याचा हा मतभेद म्हणजे उत्कृष्ट पुरावाच म्हटला पाहिजे.

इतिहासकार कितीहि निर्विकार वृत्ति बाळगणारा असला तरी तो मनुष्यच असतो. तेव्हां मनुष्यस्वभावानुसार विशिष्ट ऐतिहासिक घटनांबद्दल त्याच्या ठिकाणीं नकळतच ममत्वबुद्धि किंवा निषेधबुद्धि यांचें बीजारोपण होत जातें. मनावर या दोहोंतील एका प्रवृत्तीचा जसजसा अधिक प्रकर्ष होत जातो तसतशी त्याची इतिहासाकडे पाहण्याची दृष्टि पालटत जाते त्याचप्रमाणें इतिहासकाराच्या पुढें जें ऐतिहासिक साधन आणि साहित्य असतें त्याच्या स्वरूपाचीहि इतिहासकाराच्या मनावर छाप बसते. महाराष्ट्राच्या इतिहाससामुग्रीसारखी अपुरी साधनसामुग्री ज्या इतिहासकाराला परीक्षावयाची असते त्याची स्थिति तर कित्येक प्रसंगीं गोंधळल्यासारखी होऊन जाते. एका साधनसामुग्रीवरून एकादें अनुमान बांधलें कीं उद्यां तें नवीन साधनसामुग्रीच्या जोरावर डळमळूं लागण्याचा संभव असल्या इतिहाससंबंधांत तर फारच असतो. शिवकालीन आणि पेशवाईकालीन साधनें हीं दिवसेंदिवस अधिकाधिक उपलब्ध होत आहेत. अशा स्थितींत इतिहास लिहिणाराला आपलें अनुमान बांधतांना कांहीं " हातचे " राखावे लागतात. न जाणों आपल्या अनुमानाची पुरती वासलात लावणारीं साधनें केव्हां प्रकाशांत येतील याचा नेम नाहीं अशी त्याला एकसारखी धास्ती वाटत असते. इतिहासलेखकांची अनुमान बांधण्यासंबंधांत ही जी स्थिति होते तीच ऐतिहासिक कथाभागांवर संविधानकरचना करून नाटकें व कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांचीहि असते. इतिहासावर कथानकांची सिद्धता करूं पाहणाराला इतिहासाचें जसें सूक्ष्म अवलोकन करावें लागतें, तसेंच इतिहासांत प्रतिष्ठा आणि महती पावलेल्या लहानथोर व्यक्तींच्या

वर्तनक्रमाची आणि तो वर्तनक्रम त्याच्या हातून घडवून आणणाऱ्या मनश्चर्येची उत्कृष्ट रीतीनें तर्कग्राह्य अशी छाननी करण्याचेंहि कार्य करावें लागतें. इतिहासांत प्रत्यक्ष घडलेल्या घटना अद्भुत कादंबऱ्यांतील परमावधीच्या असंभाव्य वाटणाऱ्या प्रसंगांनाहि कित्येक वेळां मागें सारणाऱ्या असतात. त्या घटनांचा कथानकरचनेच्या कामीं उपयोग करून घेतांना त्यांच्या कार्यकारणभावाचीहि उपस्थिति लागणें आवश्यक होऊन बसतें. " History is past politics " या विधानाचें मर्म जाणून आणि त्यांतील " Politics " हा शब्द परमार्थानें ग्राह्य मानून इतिहासकालीन कथानकाची लेखकाला सिद्धता करावी लागते. विशेषतः, शिवशाही किंवा पेशवाई यांतील कथानकें व त्या कथानकांत वावरण्याकरितां बनविलेलीं किंवा ' सुधारून वाढविलेलीं ' ऐतिहासिक पात्रें यांच्या चालचर्येची मोठ्या कसोशीनें परीक्षा करणें कथालेखकाला भाग पडतें. महाराष्ट्राच्या या उज्ज्वल इतिहासकालांत व्यक्तिगत गुणांची महती जशी फार होती तशी स्वामिनिष्ठेचीहि आबड विशेष होती. शिवाय त्या काळांत राजकारण लढविण्यास सिद्ध झालेल्या व्यक्तीला आधुनिक काळांतील विद्यालयीन अभ्यासक्रमांत प्रावीण्य संपादन करून आपलें महत्त्व स्थापित करण्यास हल्लींच्या बुद्धिमान् लोकांस जसा वाव सांपडतो, तसा सांपडत नसे. त्या काळांत बुद्धिमत्तेचें प्रमाण सर्वांना एकाच निकषावर आपली बुद्धि घासून पटवून देणें केव्हांहि शक्य होत नसे. एका ठराविक अभ्यासक्रमांत उत्कृष्ट प्रावीण्य दाखवून मुत्सद्दीपणाच्या श्रीगणेशाला हमखास प्रारंभ करण्याची संधि हल्लीं नोकरशाहीच्या काळांत लाभण्याचा जसा संभव असतो तसा तो त्यावेळीं कोणाच्याहि वांट्यास येत नसे.

शिवशाहींत प्रत्यक्ष भोसल्यांच्या घराण्यापासून शिर्के-मोहिते यांच्या घराण्यांपर्यंत जीं घराणीं उदयास आलीं त्यांत, किंवा पुढें पेशवाईंत पेशवे, रास्ते, पटवर्धन वगैरे घराण्यांत एकामागून एक असे पराक्रमी आणि कर्तबगार पुरुष निर्माण झाले. ते कोठल्याहि विद्याशाखेंत प्रत्यक्ष जाऊन पढले नाहींत. विद्यालयें नाहींत, गुरुगृह नाहीं किंवा पढवून सोडण्याचे कारखानेहि नाहींत ! अशा स्थितींत य पुरुषांनीं आपली प्रतिष्ठा वाढविण्याच्या कामीं जें कांहीं भांडवल मिळविलें तें घरच्या घरीं. वडिलधाऱ्या माणसांनीं घरांतील लहान मुलांना मोठ्या कटाक्षानें

शिस्त लावावी; लष्करांत बरोबर वागवून युद्धनीतीचे त्यांना प्रत्यक्ष वस्तुपाठ द्यावेत; घरीं जवळ बसवून हिशेबाकितेबाचे फडशे कसे करावेत हें प्रत्यक्ष खतावणीच्या वह्या त्यांच्या पुढ्यांत मांडून शिकवावें; आणीबाणीच्या प्रसंगीं स्वतः जातीनें मुत्सद्देगिरी लढवावी आणि बरोबरीच्या लहानांनीं ती पाहून तिची चिंतनिका करावी! अशा रीतीनें ओठावरचा जार वाळला नाहीं तोंच धकाधकीचा मामला सुरू व्हावयाचा. हल्लींप्रमाणें सभा संमेलनांतून मोहोरेदार भाषणें करून प्रसिद्धि मिळविण्याचीं साधनें त्या काळांत उपलब्ध नव्हतीं. इंडियन सिव्हिल सर्व्हिससारख्या प्रमाणभूत परीक्षा नव्हत्या आणि प्रॉव्हिन्शिअल, किंवा इंपीरियल सर्व्हिसप्रमाणें टप्प्याटप्प्याची ठराविक बढतीहि नसे. कर्तृत्व, मुत्सद्देगिरी आणि व्यवहारचातुर्य यांच्या जोरावर उदयास आलेलीं त्या त्या काळांतील राजकारणें हीं भिन्नभिन्न आणि मनोज्ञ मनोवृत्तींच्या पुरुषांनीं जशीं घडविलीं तशींच केवळ इत्थंभूत मांडण्यांत त्यांच्या स्वभावाचें, तत्कालीन परिस्थितीचें आणि भोंवतालच्या वातावरणाचें खरें अन्वेषण केव्हांच होऊं शकणार नाहीं. इतिहासांत स्वतःच्या स्वायत्त बुद्धिमत्तेच्या जोरावर स्वतंत्र राजनीति निर्माण करण्याइतकी कर्तबगारी ज्या पराक्रमी आणि कार्यकुशल पुरुषांनीं केली त्यांचा कथेमध्यें अंतर्भाव होतांना त्यांच्या मनोवृत्तींची मोठ्या चिकित्सेनें छाननी झाली पाहिजे, आणि त्यांच्या हातून कांहीं काल्पनिक गोष्टी घडल्याचें दाखवितांना त्यांच्या मुळांतील अनेकविध धाग्यांनीं विणलेल्या मनोवृत्तींना अणुभरहि ढळ पोचतां कामा नये. एखाद्या कथानकाची बैठक इतिहासावर आधारलेली असली म्हणजे इतिहासाचा चौथरा आणि कथानकाचा इमला यांचें अनुसंधान कसें बेमालुम झालें आहे हें पहाणेंच अगत्याचें ठरतें. ऐतिहासिक कथालेखकानें नुसतें इतिहासकथन करूनच भागत नाहीं. तो इतिहासाचा मोठा मर्मग्राहक भाष्यकार असला पाहिजे. त्याच्या भाष्यानें आजपर्यंत गूढ वाटणाऱ्या ऐतिहासिक घटनांवर प्रकाश पडला पाहिजे. आणि हा प्रकाश अशा रीतीनें पडला पाहिजे कीं, इतिहासांतील व्यक्ति कथानकांत पुनरावृत्त होत असतांना त्या आपल्या विविध मनोवृत्तींच्या सर्व सांगाड्यांसह यथासांग अवतार पावल्या पाहिजेत.

आणि म्हणूनच कै. हरिभाऊ आपट्यांनीं आपल्या एका ऐतिहासिक कादं-

वरील प्रस्तावना लिहितांना " ऐतिहासिक कादंबरी म्हणजे इतिहास नव्हे, " असे स्पष्ट उद्गार काढले आहेत. इतिहास म्हणजे घडलेल्या गोष्टींचें केवळ वस्तुस्थितिनिदर्शक असें सरळ आणि साधें कथन होय. पण ऐतिहासिक कादंबरी या वस्तुस्थितीच्या जोडीलाच कल्पनासृष्टींतील स्थिति उत्पन्न करून देणारी असते. इतिहासकारांनीं ठरविलेल्या अनुमानशास्त्राच्या आणि निदानांच्या साहाय्यानें ही कल्पनासृष्टि वस्तुस्थितीचा हुबेहूब आभास उत्पन्न करून देण्याइतकी बेमालुम घडविण्यांत कथालेखक आपली सर्व प्रतिभाशक्ति खर्च करतो. एकादा पराक्रमी पुरुष विषयलालसेमुळें अधःपतन पावला, एखादी स्त्री अधिकारलालसेला बळी पडून सर्वस्वाला मुकली, एकादा सेनापति हेकेखोरपणामुळें आपल्या बरोबरीच्या पराक्रमी वीरांची सहानुभूति गमावून बसला, एकाद्या मुत्सद्द्याची विवेकनिपुण बुद्धि स्वार्थपरतेमुळें भ्रष्ट झाली वगैरे गोष्टी इतिहासांत सिद्ध झालेल्या असतात. या गोष्टी त्या त्या व्यक्तींकडून घडल्या त्या कोणत्या मनोवृत्तींच्या कारणपरंपरेमुळें घडल्या याचेंहि क्वचित् अनुमान निघालेलें असतें. या सर्व गोष्टी ऐतिहासिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला सायसंगीन किंबहुना जशा मिळाव्या तशा मिळतात हेंहि खरें. पण या प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींच्या ठिकाणीं अतिपरिचयामुळें वाचकाला नवीनपणा वाटत नाहीं. या प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींभोंवतीं नवीनपणा निर्माण करून वाचकाला त्याच कथाभागांकडे आकर्षून घेण्याचें कार्यहि ऐतिहासिक कादंबरीकाराला करावयाचें असतें.

हें कार्य करावयाचें म्हणजे त्यानें इतिहासकालाशीं समरस झालें पाहिजे. इतिहासकालाशीं लेखकानें समरस व्हावयाचें म्हणजे घडलेल्या गोष्टींच्या स्थलकालादि उपाधि तर त्यानें यथासांग अभ्यासावयास पाहिजेतच; पण इतिहासकालाशीं समरस होणाच्या अनेक प्रकारांपैकीं हा एक प्राथमिक आणि कांहीं अंशीं अप्रधान स्वरूपाचा असा प्रकार होय. समरस होण्याचें खरें मर्म जर कशांत असेल तर तें इतिहासकालांतील वातावरणाशीं लेखकाच्या मनोवृत्तींचा एकजीव होण्यांत आहे. इतिहासांतील वातावरण म्हटलें कीं त्यामध्यें सामाजिक धर्मबंधनें आलीं, रूढीचे रीतिरिवाज आले, लोकव्यवहाराचे शेकडों प्रकार आले! सामाजिक धर्मबंधनें म्हटलीं कीं स्थलकालपरत्वें बदलत जण्याची त्यांची क्रिया आली; रूढीचे

रीतिरिवाज म्हटले कीं कोणत्याहि व्यक्तीला आपल्या मगरमिठींतून सुटूं न देण्याची त्यांची जबरदस्त प्रवृत्ति आली; लोकव्यवहाराचे शेंकडों प्रकार म्हटले कीं अन्नपानादि ढोबळ वर्तनक्रमापासून शय्यागारांतील प्रणयिजनांच्या शृंगार–चेष्टांपर्यंतची समाजाची सगळी दिनचर्या आली. या गोष्टी नुसत्या लिहून दाखविण्यास किंवा बोलून दाखविण्यास फार सोप्या आहेत हें निःसंशय खरें; पण कादंबरीकाराला हीं सर्व व्यवधानें संभाळून आपली संविधानकरचना करावयाची असते.

यामुळेंच कै. हरिभाऊ आपट्यांनीं आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याकरितां जे निरनिराळे ऐतिहासिक कालखंड निवडले ते निवडतांना केवळ स्थलकालादिकांचाच हट्टाग्रही कांटेकोरपणा बाळगला नाहीं. किंबहुना स्थलकालासंबंधांत त्यांच्या हातून कित्येक प्रसंगीं चुकीचे निर्देश किंवा उल्लेख झाले असण्याचाही संभव आहे. एखादी गोष्ट अमुक वेळेला घडली किंवा अमुक ठिकाणीं घडली हें पळेंन्पळें आणि अंगुळेंन् अंगुळें मोजून कादंबरींत लिहिण्याचें वेड वस्तुतः महाराष्ट्राच्या इतिहासावर कथारचना करणारानें तरी निदान डोक्यांत घेऊं नये ! कोणत्या वेळीं कुठल्या दप्तरांतला दस्तऐवज दत्त म्हणून उठेल आणि या सगळ्या कांटेकोरपणाच्या नरडीला नख लावील याचा नियम नसतो ! भारताचार्य चिंतामणराव वैद्यांनीं आपल्या ' दुर्दैवी रंगू ' या प्रसिद्ध लोकप्रिय कादंबरींत असा कांटेकोरपणा मोठ्या प्रतिज्ञापूर्वक पाळण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांत त्यांना बऱ्याच अंशीं स्पृहणीय यश आलें असलें, तरी आधुनिक संशोधनानें त्यांच्या या यशाला क्वचित् गालबोटाचा टिकला लागलाच आहे. विश्वासरावाची पत्नी पानिपतचें रणकंदन होण्याच्या आधीं मरण पावली असा देखावा भारताचार्य वैद्यांनीं निर्माण केला आहे. पण आजच्या संशोधनानें विश्वासरावाची पत्नी विधवा होऊन शनिवारच्या वाड्यांत सुखरूप येऊन पोहोंचली असें जाहीर केलें आहे. नानासाहेब पेशवे हा एकपत्नीत्वाच्या महान् व्रताचा कट्टा उपासक होता अशी वाचकांची कल्पना व्हावी असा या कादंबरींत त्यांच्या हातून अजाणतां प्रयत्न झाला आहे. किंबहुना गोपिकाबाईनें नानासाहेबाला दुसरें लग्न करण्याचा आग्रह केला असतां नानासाहेबानें आपली तिच्यावरील निष्ठा अढळ असल्याचें दर्शविलें, त्यावरून तर वाचक नानासाहेबाला निःसंशय पेशवाईतलि

दाशरथि राम म्हणूनच संबोधील ! पण माधवरावांच्या दप्तरांत नाटकशाळांच्या मुलांच्या मुंजीला खर्च झाला त्याची जी नोंद आहे ती पाहिली म्हणजे निदान गोपिकाबाईचा अभिमान तरी व्यर्थ होता असें म्हणावें लागतें ! गोपिकाबाईची शिस्त फार कडक होती. विश्वासरावाच्या वृत्ति रंगूसंबंधांत निर्लेप राहिल्या त्याचें कारण आईची सोज्ज्वळ शिकवणच होय, असें वैद्यांनीं वर्णन करून सांगितलें आहे. पण बडोद्याच्या वाकसकरांनीं पूर्वी विविधज्ञानविस्तारांत आनंदीबाईच्या वतीनें कैफियत देण्याच्या निमित्तानें नारायणरावांच्या निरंकुश आणि बीभत्स वागणुकीचें जें वर्णन दिलें आहे तें पाहिलें म्हणजे या शिकवणीचें इतकें स्तोम करण्याचें कांहीं कारण नव्हतें असेंच शेवटीं वाचकाचें मत बनतें. मूळ माहितीसंबंधांत असा कांटेकोरपणा बाळगण्याच्या भरांत वातावरणाशीं समरस होण्याच्या कामीं त्यांच्या ठिकाणीं परिपूर्ण तादात्म्यवृत्ति जन्म पावली नाहीं. वैधव्य आणि केशवपन या दोन कादंबरीच्या आधारभूत कल्पनासंबंधांत त्यांच्या हातून वातावरणाच्या दृष्टीनें तर जवळजवळ कालविपर्यासच घडला आहे असें नाहीं, तर कांहीं अंशीं समाजसंबंधींचा वृत्तिविपर्यासहि झाला आहे. वैधव्य ही बाब वैद्यांना जितकी सहानुभूतीची वाटते तितकी ती पेशवाईच्या काळांत नव्हती. निदान या लोकव्यवहारासंबंधांत तरी लोकांच्या मनोवृत्ति त्या काळीं कांहींशा दाठर आणि कठोरच होत्या. केशवपनाची गोष्टही सामान्यतः अशीच आहे. साक्षात् पेशव्यांच्या घरांत पानिपतच्या युद्धांत नापत्ता झालेल्या भाऊसाहेबांची पत्नी पार्वतीबाई होती. भाऊसाहेब जीवंत आहेत अशा कल्पनेनें तिनें वैधव्य अंगीकारलें नव्हतें. यासंबंधांत ‘ पार्वतबाईनें केशवपन करून आमच्या हातून योग्य तीं श्राद्धकर्मे होतील अशी वृत्ति राखल्यास आमच्या घराण्याचा क्षय थांबेल ’ अशा आशयाचे थोरल्या माधवरावानें आपल्या शेवटच्या दुखण्यांत काढलेले उद्गार दप्तरीं नमूद आहेत. अशा स्थितींत तत्कालीन लोकाचारांचा आविष्कार वैद्यांनीं आधुनिक मनोवृत्तींच्या सांच्यांतून गाळून काढला आहे. त्यामुळें तत्कालीन वातावरण कादंबरींत निर्बाधरीतीनें निर्माण होण्यास फार मोठा प्रतिबंध झाला आहे. “ दुर्दैवी रंगू ” संबंधींच हा इतका विस्तार करण्याचें कारण म्हटलें म्हणजे

लेखकाची कांटेकोरपणाची प्रतिज्ञा हें एक असून शिवाय नांवाजलेल्या कादंबऱ्यांत तिनें बहुमानाचें स्थान संपादन केलें आहे. कित्येक साहित्यभक्तांनीं या कादंबरील तींत अंतर्भूत झालेला इतिहास प्रांजल आणि अविकृत असल्याबद्दल शिफारसपत्रहि दिलें आहे. यास्तव त्याच कादंबरीचा मुद्दाम दाखला घेऊन एवढें विवेचन करावें लागलें.

हरिभाऊंनीं ज्या शिवकालीन इतिहासभागावर कादंबऱ्या लिहिल्या त्याच इतिहासावर कथारचना करणारे तत्कालीन दुसरे कादंबरीकार म्हटले म्हणजे नाथमाधव होत. उषःकाल. सूर्योदय इत्यादि हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील इतिहासावरच नाथमाधवांनीं आपल्या ‘ स्वराज्या ’ च्या कादंबऱ्या रचल्या. पण सामाजिक वातावरणाशीं समरस होण्याची कला त्यांनाहि साधली नाहीं. सर वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्यांचा मनावर फार परिणाम झाल्यानें म्हणा किंवा कांहीं अन्य कारणामुळें म्हणा त्यांच्याहातून स्कॉटचें अंधानुकरण झालें आहे असें दिसतें. स्कॉटच्या कादंबऱ्यांत ‘ Chivalry ’ म्हणून जो एक प्रकार विशेष प्रामुख्यानें चित्रित केलेला दिसतो तोच प्रकार कै. नाथमाधवांनीं उचलला आणि आपल्या इतिहासांत तो मुरून जाणें शक्य नसतांनाहि घुसडून दिला. प्रौढ स्त्रीपुरुषांमध्यें प्रणयाची देवाण घेवाण होण्याचा प्रकार Chivalry च्या किंवा अबलायुगाच्या काळांत विशेष महत्त्वाचा असे. मराठ्यांच्या इतिहासांत प्रौढपणीं प्रणयभावना वाढीस लागून नंतर विवाह होण्याची शक्यता सामाजिक नीतिनिर्बंधांमुळें जवळजवळ नव्हतीच म्हटलें तरी चालेल. शिवाजी, नेताजी इ. पराक्रमी आणि रणसंगर म्हणजेच संसार मानणाऱ्या पुरुषांवर आसक्त होणाऱ्या अविवाहित प्रौढा त्या काळीं औषधालाहि सांपडणें शक्य नव्हतें. किंबहुना प्रणयानें हैराण होऊन आसक्त होणें म्हणजे काय असतें याची जाणीव होण्याच्या वयाला पोंचण्याच्या आधींच तत्कालीन स्त्रिया लेंकुरवाळ्याहि होऊन जात. अशा स्थितींत नाथमाधवांनीं आपल्या शिवकालावरील प्रायः सर्व कादंबऱ्यांतून तत्कालीन समाजाला असंमत वाटणारी अविवाहितावस्था मराठमोळा स्त्रियांवर लादण्याचा जो अतिप्रसंग केला आहे तो तत्कालीन वातावरणाशीं समरस होण्याच्या कादंबरीकाराच्या भूमिकेला सर्वथा बाधक ठरणारा आहे. ऐतिहासिक

कालावर कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला समाजाच्या सगळ्या परंपरा बिनचूक ठाऊक असल्या पाहिजेत. त्या बाबतींत थोडीशीसुद्धां शिथिलता फार मोठ्या रसभंगाला कारण होते हें त्यानें विसरून चालणार नाहीं. नाथमाधवांनीं इतिहासाचा अभ्यास मनःपूर्वक केला होता; पण इतिहासामध्यें अंतर्भूत होणारा एक विशिष्ट सामाजिक इतिहास असतो त्याकडे त्यांचें थोडेंफार दुर्लक्ष झालें.

वातावरणाशीं समरस होण्याचा गुण हरिभाऊंच्या प्रतिभेनें यशस्वी रीतीनें आत्मसात् केला होता. " चंद्रगुप्त " सारखी अडीच हजार वर्षांपूर्वीचा काळ दर्शविणारी कादंबरी असो किंवा " वज्राघात " सारखी स्मृतिशेष झालेल्या विजयानगरची कहाणी असो, शिवाजीसारख्या अष्टौप्रहर कार्यमग्न राहणाऱ्या शककर्त्याची जीवनस्थिति दर्शविणारी रोमहर्षक कथा असो किंवा नाना फडनवीसाच्या अपूर्व आणि अद्वितीय मुत्सद्दीपणावर रचलेलें प्रकरण असो, हरिभाऊंच्या प्रतिभेनें त्या त्या काळांतले सामाजिक जीवनाचे सर्व लहान मोठे प्रवाह जणूं काय प्रत्यक्ष पाहिले, पारखले, त्यांची नीरक्षीरविवेकनिपुणतेनें निवडानिवड केली, त्या प्रवाहांत सामावून जातील अशा कल्पनालहरी निर्माण केल्या आणि त्या लहरींवर वाचकाला बसवून त्याला त्या त्या वातावरणांत नेऊन सोडलें. कादंबरीवाचन संपवून नित्यपरिचयाच्या सृष्टींत वावरण्याकरितां वाचक उठला कीं, त्याला चुकल्याचुकल्यासारखें वाटावें, हरिभाऊंनीं निर्माण केलेल्या वातावरणांतच आपण अद्याप आहों असा त्याच्या ठिकाणीं संभ्रम उत्पन्न व्हावा आणि मागील काळाचें हरिभाऊंनीं उत्पन्न केलेलें चित्र अद्यापहि आपल्यासमोर घडूं शकेल या वेड्या मोहानें त्यानें सभोंवतीं दृष्टि ताणून पहावें इतकी हरिभाऊंची वातावरण निर्माण करण्याची बेमालुम हातोटी आहे. शिवाजीसारख्या खऱ्याखुऱ्या इतिहासांत अजरामर होऊन गेलेल्या वीरपुरुषाच्या चरित्रांत हरिभाऊंनीं आपल्या कल्पनासामर्थ्यानें समाविष्ट केलेले केवळ काल्पनिक प्रसंग मूळ शिवाजीच्या चरित्राला उठाव आणणारे असून त्यांनीं त्या काळाचें, त्या परिस्थितीचें आणि त्या वातावरणाचें हुबेहूब चित्र निर्माण केलें आहे. याचाच अर्थ असा कीं, इतिहासाचा चौथरा आणि कथानकाचा इमला यांचें अनुसंधान बेमालुम झालें आहे !

# २

## प. वा. हरि नारायण आपटे.

# कादंबरीलेखनाची मीमांसा.

हरिभाऊंच्या मृत्यूनंतरच्या या दीड तपाच्या अवधींत व्यक्ति या नात्यानें हरिभाऊंचा परिचय घडवून देणारीं तीन चरित्रें लिहिलीं गेलीं आणि त्यांच्या स्वभावाचे निरनिराळे धागे उकलून दाखविणाऱ्या आठवणींचींही दोन पुस्तकें प्रकाशित झालीं. या पुस्तकांचे लेखक हरिभाऊंशीं साक्षात्, समीपतः किंवा दूरतः संबंध आलेले असेच आहेत. अशा मार्मिक लेखकांच्या मध्यस्थीनें हरिभाऊंच्याबद्दल उपलब्ध झालेल्या माहितींत नवीन पिढींतील वयस्थ व्यक्ति कांहीं अधिक भर घालील असें वाटत नाहीं. हरिभाऊंच्याइतकी लोकप्रियता लाभलेला दुसरा महाराष्ट्रीय ललितलेखक अद्याप झाला नाहीं असें म्हटलें असतां यत्किंचित्ही अतिशयोक्ति होणार नाहीं. या लोकप्रियतेचें प्रमुख गमक म्हटलें म्हणजे सालोसाल अव्याहत रीतीनें प्रकाशित होणाऱ्या आणि अल्पावधींत उठणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्याच होत. गेलीं पंचवीस वर्षें त्यांचे ग्रंथ सतत पुनर्मुद्रित होत आले असून महाराष्ट्रांतील साक्षर लोकांतील त्यांचा प्रसार निःसंशय कौतुकास्पद आहे. लोकप्रियता या शब्दाचा पूर्णार्थ लक्षांत घेऊनही तो शब्द हरिभाऊंच्या वाङ्मयाला यथार्थत्वानें लागू करतां येईल !

हरिभाऊंचें वाङ्मय वरवर वाचणाऱ्या विद्यमान पिढींतील सुशिक्षितांच्या डोक्यांत ललित वाङ्मयाबद्दलच्या कांहीं स्थूल कल्पना आधींच घर करून राहिलेल्या असतात. अशा कल्पनांच्या आहारीं जाऊन हरिभाऊंच्या वाङ्मयाचा पूर्ण आणि सांगोपांग अभ्यास न करतांही असे लोक त्यांच्या वाङ्मयाबद्दलचें आपलें मत प्रदर्शित करतात. अशा प्रकारचीं मतें जशीं एकांगी असतात तशींच तीं तर्कशास्त्रदृष्ट्या अप्रतिष्ठित असतात. उत्कृष्ट कलेचे नमुने जमेंत धरून त्यांच्या अनुषंगानें उत्कृष्ट टीकाकार कांहीं नियम आणि निर्बंध ठरवीत असतात. हे नियम

आणि निर्बंध कांटेकोररीतीनें प्रत्येक कृतीला लावणें अर्थातच योग्य ठरणार नाहीं. पण या नियमनिर्बंधांना अजीबात फांटा देऊनही चालणार नाहीं. कारण हे नियम आणि निर्बंध सृष्टींतील एका ठराविक शिस्तीवरून बनविलेले असतात. सृष्टींतील प्रत्येक गोष्टीला शिस्त किंवा परंपरा आहे. गैरशिस्त, कार्यकारणभावाला विरोध करणारी अशी एकही घटना सृष्टींत घडत नाहीं, असें मानसशास्त्रज्ञ सांगतात. सकृद्दर्शनीं अनियमित पण मूलतः नियमित, वरपांगीं निःसूत्र पण तत्त्वतः सूत्रबद्ध अशीच प्रत्येक घटना घडत असेल तर या सृष्ट पदार्थांच्या व्यापारव्यवहारांवरून बनविलेले सिद्धांत अपसिद्धांत मानून त्यांनीं ठरविलेले विधिनिषेध अग्राह्य मानणें हें अर्थात्‌च समंजसपणाचें होणार नाहीं. कलेच्या नियमनिर्बंधांत प्रगतीच्या अनुरोधानें कमीअधिक फेरफार घडणें संभवनीय असतें; पण ते आमूलाग्र अमान्य होण्याचा संभव कधींच उरत नाहीं. कलेची व्याख्या करून तिनें ग्राह्य मानलेले नियम तर्ककर्कशपणानें प्रत्येक कलाकृतीला लागू करणें आणि ते तसे कांटेकोर जुळले नाहींत म्हणजे त्या कृतीला गौण ठरविणें हा टीकाप्रकार एकांगी मानला पाहिजे. आजतागायत उत्कृष्ट कलेच्या ज्या कल्पना दृढ होत आल्या आहेत, त्यावरून कलेची सूत्रबद्ध व्याख्या करणें अशक्य नसलें तरी बरेंच कठिण आहे. अशा वेळेला कला म्हणजे काय या प्रश्नाला, व्याख्येच्या स्वरूपानें उत्तर न देतां आपल्या मनांत या प्रश्नाच्या उत्तरादाखल ज्या कल्पना येतात त्या एकामागून एक निदर्शित केल्या म्हणजे काम भागण्यासारखें आहे. कला ही प्रत्यक्ष सृष्टीची प्रतिकृति असते. कलावंत फोटोग्राफप्रमाणें ही प्रतिकृति उठवितो इतकेंच नव्हे तर क्ष – किरणांप्रमाणें अन्तःसाक्षिवृत्तीनें आपल्या प्रतिकृतीला आदर्शभूत असणाऱ्या घटनेच्या हृदयापर्यंत जाऊन भिडतो; तेथील असंख्य मानसिक व्यापारांचें योग्य परिज्ञान करून घेऊन, त्या व्यापारांचा बाह्य चेष्टितांशीं कसा विरोध किंवा अविरोध आहे हें पारखून घेतो, त्या बाह्य चेष्टितांचें आणि अन्तर्गत व्यापारांचें अनुसंधान कसें बसवावयाचें तें तो आपल्या विशिष्ट दृष्टीला अनुसरून ठरवितो आणि मग आपल्या कलाकृतीची निर्मिति करण्याच्या व्यवसायास लागतो. म्हणजे कलावस्तूची प्रत्यक्ष निर्मिति व्हाव-याच्याआधीं वर सांगितलेले सर्व मानसिक व्यापार कलावंताच्या मनांत घडत

असतात. या सर्व मानसिक व्यापारांवर कलावंताच्या भोंवतालच्या परिस्थितीचा ठसा उमटलेला असतो. कलावंताची व्यक्तिमत्ता आणि भोंवतालची परिस्थिति यांच्या चकमकींतून ज्या ठिणग्या उडतात त्यांच्या प्रकाशांत आदर्श कला-वस्तूचा पाया सृष्टीच्या अनंत व्यापारांत कोठपर्यंत खोल गेलेला आहे हें त्याला पारखावयाचें असतें. ह्या गोष्टी जो कमालीच्या चातुर्यानें करील तो कुशल कलावंत मानला पाहिजे.

हरिभाऊ हे सामाजिक सुधारणेचे प्रचारक होते, त्यांचा कलेशीं कांहींहीं संबंध नव्हता, त्यांच्या कादंबऱ्या समाजाच्या उन्नतीकरितां लिहिल्या गेल्या, तेव्हां समाजोन्नति हें प्रचारकाचें कार्य असल्याकारणानें हरिभाऊ हे आमूलाग्र प्रचारक होते, त्यांच्या कादंबऱ्या उत्कृष्ट कला-वस्तु म्हणून निर्माण झालेल्या नाहींत, सुधारक मतांचा पुरस्कार करणाऱ्या वर्तमानपत्राच्या फायलीप्रमाणें त्यांचें स्वरूप आहे, अशा प्रकारचे आक्षेप घेऊन हरिभाऊंचा कलेशीं कोणताच संबंध नव्हता असें भासविण्याचा कित्येक आधुनिक अभ्यासक प्रयत्न करतात. जणूं कांहीं प्रचारकांची वसाहत वेगळी, कलावंतांची वसाहत वेगळी! प्रचारकांच्या वसाहतींत जुन्या इमारतींची पडझड दुरुस्त करणें, तुंबलेले नळ चालू करणें, रस्त्यावरील धूळ साफ करून त्यांवर पाणी शिंपडणें असले गद्य व्यवहार चाललेले असतात; तर कलावंतांच्या वसाहतींत सगळे झटपट रंगाऱ्यांचे कारखाने! नुसती टाळी वाजविली कीं मयसभा निर्माण व्हावयाची! एक फूत्कार सोडला कीं, पाण्याचीं कारंजीं उडूं लागावयाचीं! रस्त्यांच्या दुरुस्तीची किंवा व्यवस्थेची जरूरच नाहीं. कारण कलावंत चंडोलाप्रमाणें अहर्निश अंतराळांत हेलकावत राहणार. इमारतींचें किंवा वसतिस्थानांचें कारणच नाहीं, कारण कलावंत वातांबुपर्णाशन करणाऱ्या ऋषींवरही ताण करणार! म्हणजे एकंदरींत प्रचारकांची सृष्टि ईश्वरनिर्मित सृष्टींतला एक सामान्य भाग तर कलावंतांची सृष्टि ही त्या सृष्टीबाहेरची एक यक्षभूमि असाच या अभ्यासकांचा समज झालेला दिसतो. पण हा समज किती चुकीचा आहे हें थोडक्याशा विचारानेंही समजून येणार आहे. कलावंताची सृष्टि प्रत्यक्ष वस्तुसृष्टीशीं विरोध राखणें शक्य नाहीं. कितीही झालें तरी कलावंत हा मनुष्यच असतो. तो प्रत्यक्ष वस्तुसृष्टीच्या बाहेर जाऊन

आपल्या कल्पनाशक्तीचें कोड पुरवीत राहील हें सर्वथा अशक्य होय. त्याच्या अवलोकनाचा प्रांत म्हणजे प्रत्यक्ष वस्तुसृष्टीच! ह्या वस्तुसृष्टींतील मनुष्यांचे समाज जे रीतीरिवाज मानीत असतील, जे व्यापारव्यवहार करीत असतील, ज्या भावना आणि ज्या कल्पना बाळगीत असतील त्यांच्याच अनुषंगानें कलावंताचें अवलोकन चालू असतें. त्या समाजांतील ज्या गोष्टी त्याच्या सौंदर्यशोधक दृष्टीला किळसवाण्या वाटतील त्यांचा निषेध करणें हें तो आपलें कर्तव्य मानील. हा निषेध कोणत्या मार्गांनीं आणि कोणत्या उपायांनीं करावा हें तोच ठरवील! त्या समाजांतील जे रीतिरिवाज त्याला ओंगळ वाटतील त्यांचें त्यांचें तो खंडन करील. ज्या मनःप्रवृत्ति त्याला कुजक्या वाटतील त्यांचें निर्मूलन करणें त्याला आवश्यक वाटेल. जे नीतिनियम त्याला बदलावेसे वाटतील त्यांच्यांत तो स्वतःला योग्य वाटतील ते फेरफार सुचवील! कलावंताच्या सौंदर्यदृष्टीला कुरूप समाज खपावयाचा नाहीं. त्या समाजाला सर्वांगसुंदर बनविण्याची खटपट तो सदोदित करीत राहणार! सौंदर्यविघातक गोष्टी नाहींशा करून सौंदर्यवर्धनाला सहाय्य करणें हें तो आपलें अवश्यमेव कर्तव्यच मानीत राहाणार!

सामाजिक सुधारणेच्या प्रचाराचें कार्य करीत असतांना हरिभाऊंनाहि समाजांतील कित्येक सौंदर्यविघातक गोष्टी दिसल्या. समाजाचें मूळचें गोंडस आणि गोजिरवाणें स्वरूप अजिबात बदलून टाकणाऱ्या आणि त्या स्वरूपावर दृढमूल होऊन राहणाऱ्या कित्येक गोष्टी पाहून त्यांच्या सौंदर्यग्राही अंतःकरणाला खेद वाटला. समाजांत धर्माच्या नांवाखालीं आणि रूढीच्या धाकामुळें जे अनिष्ट प्रकार माजून राहिले होते त्यांचें यथायोग्य स्वरूप समाजाला समजावें आणि आपल्या या कुरूपपणाची समाजालाच चीड यावी असाच हरिभाऊंच्या एकंदर कलाकौशल्याचा रोख होता. हरिभाऊंच्या दृष्टीनें आकलन केलेल्या समाजाचें स्वरूप त्यांच्या प्रत्येक अभ्यासकानें नीट समजावून घेतलें पाहिजे. हें स्वरूप मॅक्स ओरेलनें आपल्या जॉन बुल अँड हिज आयलंड या पुस्तकांत अल्पांशानें वर्णन केलें आहे. तें वाचून हरिभाऊंना वैताग आला अशी एक आठवण ती. बापूराव आंबेकर यांनीं आपल्या आठवणींच्या पुस्तकांत दिलेली आहे. हरिभाऊंच्या लेखनव्यवसायाच्या अगदीं आरंभींच्या काळांत मॅक्स ओरेलचें पुस्तक

त्यांच्या वाचण्यांत आलें. " तीस कोटि लोक ब्रिटिशांचे जोडे पुसतात आणि त्यांतच आनंद मानून राहतात, " अशा आशयाचें त्यांतील एक वाक्य वाचतांना हरिभाऊंना अतिशय दुःख झालें. तरी पण हें त्याचें विधान वस्तुस्थितिनिदर्शकच आहे हेंहि त्यांच्या मनास पटल्याशिवाय राहिलें नाहीं. " व्यक्तिस्वातंत्र्यास व व्यक्तिविकासास विरोधक अशी जी आपली समाजरचना आहे तीमुळेंच ही वस्तुस्थिति निर्माण झाली आहे, तींत मूलतः सुधारणा झाल्याशिवाय आपल्याला राष्ट्रोन्नतीचा मार्ग आक्रमतां येणें शक्य नाहा, या त्यांच्या भावनेस वरील विधानानें अधिकच प्रज्वलित केलें. " गुलामगिरींत खितपत पडलेल्या समाजांतील व्यक्तीचें किंवा व्यक्तिसमूहाचें वाङ्मयाच्या द्वारें काढलेलें यथातथ्य चित्र सौंदर्यभंजक ठरल्याशिवाय राहणार नाहीं हें लक्षांत बाळगूनच हरिभाऊंनीं आपल्या कल्पित स्वभावचित्रांची घडण केलेली आहे. पुनर्विवाहप्रतिबंध, बालविवाह, जरठकुमारीविवाह, विधवांची दुःस्थिति, सापत्नसंबंध, स्त्रियांची एकंदर अवनत व परावलंबी स्थिति, मुलांचें पालन, पोषण, व संवर्धन करण्याची सदोष पद्धति, दुर्व्यसनापासून होणारे परिणाम वगैरे समाजास हनिदर्शेप्रत नेऊन पोंचविणाऱ्या बाबी; त्याचप्रमाणें नवससायास, सोवळ्याओवळ्याच्या वेडगळ कल्पना, व्रतवैकल्यांचें बंड, देवदेवऋषींचें वेड, किमयेचा नाद, भोंदू गुरूंचें प्रस्थ यांमुळें समाजाचा होणारा अधःपात यांचें हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांत योग्य रीतीनें आविष्करण करून दुष्ट रूढींबद्दल व वेडगळ धर्मसमजुतींबद्दल समाजांत नावड उत्पन्न होईल अशी आपल्या कथानकांची कुशलतेनें मांडणी केली.

वर उल्लेखलेल्या एकेक किंवा एकाहून अधिक अशा अनेक अनिष्ट गोष्टींच्या पायीं समाजांतील कित्येक चांगले आणि सत्प्रवृत्त स्त्री-पुरुष अधोगतीकडे झुकूं लागले होते. अशा स्त्री-पुरुषांची संख्या अधिकाधिक वाढत गेली असती तर समाज खरोखरच उध्वस्त झाल्याशिवाय राहिला नसता ! या अनिष्ट गोष्टींच्या धबधब्याला बांध घालणें हें त्यावेळच्या प्रत्येक समाजहितैषी व्यक्तीचें कर्तव्य होतें. शोभेकरितां बाग फुलवावयाची असली तरी तींतील सुंदर रोपटीं वठून जाऊं लागलीं म्हणजे त्यांच्या तळाशीं बेढब दिसणारी राख पसरावी लागत

नाहीं का ? ज्याच्यामधून कलेचे आदर्श पारखावयाचे तो समाजच असा मुळांत भंगलेला आणि जीर्णशीर्ण झालेला होता. त्याच्यांतील दोष आपल्या कलापूर्ण आदर्शांत नाहींसे करतांना ते दोष मुळांत कसे अस्तित्वांत होते हें अप्रत्यक्षरीतीनें दिग्दर्शित करण्याचें अवघड कार्यही हरिभाऊंना करावयाचें होतें.

उपर्युक्त अनिष्ट गोष्टींची यादी जर सूक्ष्मपणानें वाचली तर जगांतलि सर्व सुधारलेल्या समाजांत आज शतकानुशतकें निरंतरच्या महत्त्वाचा ठरलेला एक व्यापक प्रश्नच त्या सर्व गोष्टींना एकत्र गुंफून टाकणारा आहे हें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. वन्यावस्थेंत असलेल्या समाजापासून तों तहत सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर पोंचलेल्या समाजापर्यंत आपण सूक्ष्मपणानें अवलोकन केलें तर स्त्री ही कमीअधिक प्रमाणांत पुरुषाच्या अंकित असल्याचेंच आढळून येईल. त्या अंकित असण्याचें स्वरूप बाह्यतः बदललेलें असेल पण मुळांत जी परावलंबित्वाची अवस्था ती मात्र दोन्हीकडे सारखीच असते. अनेक विचारवंत लोकांनीं या परिस्थितीचा मानसशास्त्रदृष्ट्याही अभ्यास करून पाहिला. पण शेवटीं पुरुषाचें वर्चस्व कांहीं कांहीं प्रसंगीं स्त्रियांना बिनतक्रार रीतीनें मान्य करणें कां भाग पडतें याचा समाधानकारक उलगडा अद्यापही झाला नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. हिंदी समाज हा या परिस्थितीला फारसा अपवादभूत नाहीं. किंबहुना आपल्या इकडील रूढीच्या प्रभावानें स्त्री ही पुरुषाची मालमत्ता गणण्यापर्यंत मजल पोंचली. आणि रूढीच्या अनुषंगानें चालणाऱ्या कायद्यानें स्त्रीवर मालमत्तेचें शिक्कामोर्तबही करून टाकलें. हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतून ही परिस्थिति आज जवळ जवळ तीन हजार वर्षें कशी अस्तित्वांत आहे, हें दाखविण्याकरितां हरिभा. भाऊंना आपल्या सामाजिक कादंबऱ्यांच्या जोडीनें ऐतिहासिक कादंबऱ्याही लिहाव्या लागल्या. अडीच हजार वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र कसा होता हें दर्शविण्याकरितां हरिभाऊंनीं चंद्रगुप्त ही कादंबरी लिहिली. त्या कादंबरींतील मुरादेवीचें चित्र आणि चरित्र पाहिलें म्हणजे त्या कादंबरीच्या कथानकाला हात घालण्याचें अवघड कार्य हरिभाऊंनीं कां केलें हें समजण्यासारखें आहे. मुरा ही जात्याच जहांबाज होती. तिची बुद्धिमत्ता दुसऱ्या एकाद्या सत्कृत्यासाठीं उप-

योगांत आली असती तर तिच्या जीवनाचें चीज झालें असतें. पण, राजाच्या अंकित राहण्याचा आणि तो वागवील आणि वांकवील त्याप्रमाणें वागण्यावांकण्याचा तिच्यावर प्रसंग आला. आपल्या पोटीं जन्म घेतलेल्या पुत्राला गादी मिळावी या अनिवार इच्छेनें ती प्रेरित झाली आणि त्या इच्छेच्या परिपूर्तीकरतां तिची नंदवंशावर निखारे ठेवण्यापर्यंत मजल गेली. तिनें सर्वस्वाचा नाश केला त्याचें मूळ ती राजाची मालमत्ता गणली गेली हें होय. तिला स्वतांचे स्वायत्त असे हक्क असते, तिच्या व्यक्तिमत्तेला राजाच्या संबंधाव्यतिरिक्तही जर महत्त्व असतें तर तिच्या हातून अनर्थपरंपरेची मुहूर्तमेढ रोवली गेलीच नसती. चंद्रगुप्त कादंबरीच्या द्वारें हरिभाऊंनीं स्त्रियांच्या असहाय्य परिस्थितीचें मूळ भरतभूमींत किती दिवसांपासून रुजत आलें आहे हेंच निदर्शित केलें. मुद्राराक्षस नाटकांतील संविधानकाच्या आधारानें त्या कादंबरीचें कथानक रंगविलें गेलें पण हरिभाऊंनीं कालाच्या दृष्टीनें सर्वतोपरि अति दूर असलेल्या कथानकाच्या कार्येंत इतक्या शहाजोग रीतीनें प्रवेश केला कीं, नाशिकच्या एका विद्वान् शास्त्र्यांनीं हरिभाऊंची चंद्रगुप्त ही कादंबरी वाचली व हरिभाऊंना लिहिलें कीं, “ मुद्राराक्षस नाटक मीं कित्येक वेळां वाचलें व विद्यार्थ्यांनाही शिकविलें, पण त्यांतील भूमिकांचें रहस्य आपली कादंबरी वाचूनच माझ्या लक्षांत आलें. ” या कादंबरीनंतरची पृथ्वीराज चव्हाणाचें कथानक असलेली कालकूट कादंबरी होय. त्या कादंबरींतील विमलेचें चित्र कादंबरीच्या अपूर्णत्वामुळें मुरादेवीइतकें उठावदार झालें नाहीं ही गोष्ट खरी. पण त्या चित्राची सर्व बैठक स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचें तेज परवशतेमुळें पडत नाहीं या विचारावरच आधारली असावी असें समजण्यास भरपूर वाव आहे. सद्यःकालीन सामाजिक कादंबऱ्यांपर्यंत येऊन पोहोंचण्यास हरिभाऊंना इतिहासकालांतील आणखीही कित्येक कथानकांना हात घालावा लागला. वज्राघातमधील मेहेरजानचें चित्र रंगविण्यांतही उपर्युक्त सूत्राचा आणखी एक धागा काढून दाखविण्याचेंच कार्य हरिभाऊंनीं केलें. रामराजा म्हणजे सर्वस्व मानणारी मेहेरजान रामराजाच्या स्वार्थीपणामुळें ऐन तारुण्यांतच कशी फशी पडली आणि उरलेलें सर्व आयुष्य मनाच्या कोंडमाऱ्यांत आणि जगानें केलेल्या मानहानींत तिला कसें घालवावें लागलें याचें चित्र वाचकांपुढें ठेवून परावलंबित्वामुळें एक सौंदर्य-

शालिनी स्त्री जगांत असून नसल्यासारखी कशी झाली आणि परमावधीच्या मनस्तापामुळें तिजवर आत्महत्या करण्याचे प्रसंगही कसे ओढवले हें निदर्शित करण्यांत आलें आहे. ' उषःकाल 'मधील नानासाहेबावर शेवटपर्यंत प्रेम करीत राहिलेली मेहेरजान; ' सूर्यग्रहण 'मधील माता रणदेवी आणि वाराणशी; ' केवळ स्वराज्यासाठीं ' मधील औरंगजेब बादशहाची मुलगी रोषनआरा; ' गड आला पण सिंह गेला 'मधील कमलकुमारी, या सर्वांचीं हरिभाऊंनीं रेखाटलेलीं जीवनचरित्रें समाजाला एकच गोष्ट समजावून सांगत आहेत आणि ती म्हटली म्हणजे स्त्रियांना सर्वस्वीं अनवच्छिन्न अशी स्वायत्त व्यक्तिमत्ता लाभली पाहिजे. आज हजारों वर्षें समाजानें हा दोष अंगवळणीं पाडून घेण्याचा प्रयत्न केला त्यामुळें समाज कमकुवत झाला; समाजाची पिछेहाट होत चालली; हें उत्कृष्ट रीतीनें समजावून देण्याचें कार्य आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांद्वारें करून हरिभाऊंनीं त्यावेळीं त्यांच्यासमोर असलेल्या समाजाची प्रतिकृति उठविण्याच्या व्यवसायास आरंभ केला.

सृष्टींतील मोठयांत मोठा आणि लहानांत लहान असा कोणताही प्राणी पाहिला तर आपल्याला असें आढळून येतें कीं, प्रत्येक प्राण्याला आपलें अस्तित्व इतरांना भासवून देण्याची अनिवार इच्छा असते. तुमच्या शरीराचा चावा घेण्यावर कांहीं मुंगीचें जीवन अवलंबून नसतें; जीवधारणेस आवश्यक असे इतर अनेक पदार्थ तिला प्राप्य असतात. मग तुमच्या शरीराजवळ येऊन त्याचा चावा घेण्याचें तिला कारण काय ? रस्त्यांतून उगीचच भटकत फिरणारीं कुत्रीं अधूनमधून जाणाऱ्या-येणाऱ्याच्या अंगावर निष्कारण भुंकतात तें कां ? आपल्या भुंकण्याचें कांहींही प्रयोजन नाहीं हें त्यांना समजत नाहीं का ? या सर्वांचा अर्थ एकच आणि तो म्हटला म्हणजे प्रत्येक लहानमोठ्या प्राण्याला आपलें अस्तित्व भासवून देण्याची अनिवार इच्छा असते हाच होय. कोणत्याही लहान किंवा मोठ्या प्राण्याला हलकासा धक्का लावून पहा; त्याची प्रतिकारशक्ति जागृत झाल्याशिवाय रहावयाची नाहीं. म्हणजे सृष्टीचा संकेतच असा आहे कीं, प्रत्येक प्राण्याला स्वतंत्र व्यक्तिमत्ता लाभली पाहिजे. तशीं सुप्त आणि जागृत आयुधें प्रत्येक प्राण्याजवळ सज्ज ठेवण्याचें कार्य निर्माणकर्त्यानें केलें आहे. पण मनुष्य-

प्राण्यानें निर्माणकर्त्याची जणू खोड मोडण्याकरितांच आपल्या जोडीदार स्त्री-प्राण्याला अप्रतिकार बनविलें; अस्तित्व भासवून देण्याचे कामीं सर्वस्त्रीं अक्षम आणि असाहाय्य केलें. हें कार्य करण्याला मनुष्याला किती काळ लागला कुणास ठाऊक ? पण केलेलें हें कार्य हजारों वर्षे अव्याहतपणें टिकविण्याचें कार्य मात्र मनुष्यप्राण्यानें कोणत्याहि प्रकारचा आळस न करतां केलें ! कृत्रिमतेच्या आहारीं जाऊन मनुष्यप्राण्यानें निसर्गसिद्ध गोष्टींचा चालविलेला हा विरोध हरिभाऊंच्या सहृदय मनाला खपला नाहीं. हीच आपली निषेधबुद्धि त्यांनीं आपल्या कादंबरीवाङ्मयाच्या द्वारें प्रदर्शित केली. ‘ मी ’ मधील भावानंदाची आई व बहीण ताई; ‘ यशवंतराव खरे ’ मधील गंगाबाई; ‘ जग हें असें आहे ’ मधील राधाबाई; ‘ गणपतराव ’ मधील गोदावरी; ‘ मायेचा बाजार ’ मधील पद्मा; ‘ भयंकर दिव्य ’ मधील कमला; ‘ कर्मयोग ’ मधील नर्मदा; या सर्व स्त्रीपात्रांच्या द्वारें हरिभाऊंना आपली निषेधबुद्धि प्रदर्शित करावयाची होती. वर उल्लेख केलेल्या स्त्रीसमूहापैकीं प्रत्येक स्त्री स्वतंत्र अस्तित्व गाजविण्याइतकी बुद्धिमान् आणि तेजस्वी आहे. परिस्थितीच्या प्रतिकूलत्वामुळें आणि समाजानें प्ररूढ केलेल्या नैतिक निर्बंधामुळें तिला ही गोष्ट करणें शक्य झालें नाहीं. नवरा छंदीफंदी असो, व्यसनी असो, किंबहुना पंचमहापातकांचें हालाहल नित्यशः पचविणारा प्रतिशंकर असो; त्याची स्त्री ही त्याच्या अंगभूत अवयवाप्रमाणें त्यानें फिरवावी तशी फिरली पाहिजे. तिनें केलेला प्रतिकार खपायचा नाहीं; तिनें केलेला निषेध मानवायचा नाहीं. “ नष्टे, मृते, प्रव्रजिते, क्लीब च पतिते पतौ ” हा धर्मग्रंथांनीं सांगितलेला कानमंत्रही रूढीनें धुळीला मिळविला. अशा स्थितींत या सर्व स्त्रिया असाहाय्य बनल्या; परिस्थितीनें वांकविल्या तशा वांकल्या; ज्यांच्याकडे त्यांचा मालकी हक्क होता त्यांनीं ज्या स्थितींत ठेवल्या त्या स्थितींत राहिल्या. सृष्टींतील एखाद्या क्षुद्र जीवजंतूची कोटि शतपटींनीं बरी हें समाजाला आपल्या जीवनचरित्रानें समजावून देणाऱ्या या अष्टमूर्ति निर्माण करतांना हरिभाऊंनीं आपल्या सर्व शक्ति किती जागृत राखल्या असतील हें त्यांच्या कादंबऱ्या पूर्णपणें वाचल्याशिवाय समजणें शक्य नाहीं. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील स्वभाव-विशेष वाचतांना वाचक, शेक्सपीअरच्या ट्वेल्थ

नाइटमधील सर ॲन्ड्र्यू एग्चीकप्रमाणें, ‘ Ah that's me ’ असें म्हटल्या शिवाय खचित् रहात नसेल ! हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील विविध पात्रांचे स्वभावविशेष वाचतांना कित्येक स्त्रीवाचकांवर आणि पुरुष-वाचकांवर आपल्याच मासल्याचे आपले जोडीदार पहात असतांना असे उद्गार काढण्याचे प्रसंग कितीदांतरी आले असतील. ज्या समाजाची हरिभाऊंना प्रतिकृति काढावयाची होती तो समाज कशा स्वरूपाचा होता हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून ध्यानांत येईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत हंगामी सामाजिक चालीरीतींचाच काय तो ऊहापोह आहे, सर्व समाजांना सर्व काळीं व्यापून राहणारा असा कोणताच गहन किंवा महत्त्वाचा प्रश्न त्यांनीं मांडलेला नाहीं, अशा भ्रामक समजुतीनें त्यांच्या कादंबरीवाङ्मयाची वासलात लावणाऱ्या कित्येक अभ्यासकांनाही त्यांच्या कादंबरीवाङ्मयाला सर्वतोपरि व्यापून उरणारा महत्त्वाचा प्रश्न कोणता याची यथायोग्य कल्पना आल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आशा आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत कायम स्वरूप धारण करणारीं प्रश्नप्रमेयें नाहींत असें म्हणणाऱ्या कित्येक टीकाकारांनीं हरिभाऊंच्या वाङ्मयाशीं समरस होऊन त्याचें संपूर्ण आणि आमूलाग्र स्वरूप पडताळून पाहाण्याचा प्रयत्न केलेला नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणणें भाग आहे.

हरिभाऊंचें वाङ्मय इतकें विस्तृत आहे कीं, त्यांतील सौंदर्यस्थळें नुसतीं दिग्दर्शित करावयाचीं म्हटलीं तरी एक मोठा ग्रंथ होईल. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून कलेच्या दृष्टीनें अत्युत्कृष्ट ठरणारीं कित्येक स्थळें निवडून दाखवितां येतील. कलावंताच्या भूमिकेवरून हरिभाऊंनीं सामाजिक सुधारणेचा प्रचार कसा केला हें नीट रीतीनें समजण्याकरितां हीं सर्व सौंदर्यस्थळें केव्हां तरी एकत्रित स्वरूपांत पाहवयास मिळणें फार आवश्यक आहे. प्रस्तुतस्थळीं मात्र त्यांतील कांहीं वानगीदाखल म्हणूनच सादर करण्याचा मनोदय आहे. यासंबंधांत अर्थातच सामाजिक आणि ऐतिहासिक असा कादंबऱ्यांचा भेद बाळगण्याचें कारण नाहीं. प्रत्येक कादंबरींत कमींतकमी दहा तरी उत्कृष्ट प्रसंग सांपडण्यासारखे आहेत. उत्कृष्ट प्रसंगांची निर्मिति ही लेखकाच्या अवलोकनशक्तीवर अवलंबून असते. मागें म्हटल्याप्रमाणें कलावंताला बाह्य व्यापारांचा आणि अंतर्गत

मनश्चर्येचा एकसारखा मेळ घालावा लागतो. असा मेळ घालण्याची कला साधणें हें ज्याप्रमाणें अवलोकनशक्तीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणें लेखकाच्या अंगीं असलेल्या सूक्ष्म मनोविश्लेषणशक्तीवरहि अवलंबून आहे. किंबहुना या दोन शक्तींच्या संघटित कार्यांतूनच उत्कृष्ट प्रकारची कला निर्माण होत असते. कादंबरीकारानें निर्माण केलेल्या पात्रांच्या बाह्य हालचालींचीं वर्णनें अतिसूक्ष्मपणानें करतांना तीं वर्णनें त्या पात्रांच्या मनोव्यापारांचें यथायोग्य आविष्करण करणारीं ठरतील अशींच बनविलीं पाहिजेत. कादंबरीकाराच्या शब्दचित्रांचें कार्य तरफेच्या तंतुवाद्याप्रमाणें असतें. त्या तंतुवाद्यावरील बोटांलगत असलेल्या तारांचा झणत्कार केला कीं, त्यांच्या खालच्या बाजूला असलेल्या ताराहि त्या झणत्काराच्या अनुरोधानें नाद करून साथ देतात. त्याप्रमाणें कादंबरीकारानें किंवा कवीनें आपल्या वर्ण्य व्यक्तीच्या बाह्य व्यापारांचें आविष्करण करण्यास सुरवात केली कीं, त्या व्यक्तीच्या मनाचे धागेधोरेहि आपोआप उलगडून दाखविले गेले पाहिजेत. किंबहुना जीं वर्णनें अशा प्रकारचें द्विविध कार्य करणारीं नसतील तीं कलेच्या दृष्टीनें गौण मानणेंहि फारसें अनिष्ट ठरणार नाहीं. कादंबरी आकर्षक व्हावी म्हणून निरनिराळ्या शरीरावयवांचीं उत्तान वर्णनें देण्याचा मोह चांगल्या चांगल्या ग्रंथकारांनाहि होतो. हीं उत्तान वर्णनें तीं केवळ उत्तान आहेत म्हणून त्याज्य ठरवावींत असें नव्हे, तर त्या वर्णनांच्या द्वारें कोणत्याहि प्रकारचा अन्तर्गत मनोव्यापार सूचित होत नाहीं म्हणून तीं अग्राह्य मानलीं पाहिजेत. शरीरावयवांची कोणतीहि हालचाल कादंबरीकारानें वर्णन करावी. पण त्या वर्णनाचा वर सांगितल्याप्रमाणें मनोव्यापार विशद करण्याकडे उपयोग होत नसेल तर कादंबरीकारानें तें वर्णन बनविण्याचे कष्ट विनाकारण घेतले असेंच म्हटलें पाहिजे. हरिभाऊंचीं सर्वच वर्णनें अशा स्वरूपाचीं आहेत असें अट्टहासानें प्रतिपादन करण्याचें कांहीं कारण नाहीं. पण पुष्कळशीं वर्णनें अशा स्वरूपाचीं ठरावींत असाच त्यांचा एकंदर रोख आहे.

वज्राघात कादंबरींचा प्रारंभींचा भाग या म्हणण्याचा उत्कृष्ट असा दाखला आहे. मेहेरजान नौकाविहार करीत आहे. रामराजा आसपास नाहीं अशा समजुतीनें ती विप्रलंभशृंगाराचें गीत गात आहे. आकाशांतील पूर्णचंद्राचें प्रतिबिंब

पुष्करणींत पडलें आहे. एक अष्टपदी म्हणून रामराजानें तिच्या गीताला उत्तर दिलें आहे. पुढें दोघांचें मीलन झाल्यावर पुष्करणींत दोघांचाहि नौकाविहार चालू झाला. अशा वेळीं " आपण दोघेंहि एकमेकांला मिठ्या मारून बुडून गेलों तर—नव्हे, आपण तसें बुडून जावें "—अशी कल्पना मेहेरजाननें बोलून दाखविली. या प्रसंगाच्या सर्व वर्णनांत ठिकठिकाणीं सूचित केलेले मनोव्यापार केवळ अप्रतिम आहेत. आणि मेहेरजानच्या बोलण्यामुळें झालेलें अनिष्ट भविष्य-सूचन उत्कृष्ट कलेचें द्योतक आहे हें कोणालाहि मान्य करावें लागेल. कारण किती तरी वर्षांनीं पुढें त्याच पुष्करणींत त्या दोघांनाहि एकमेकांच्या साहचर्यानें दोनदां जलसमाधि घेण्याचे प्रसंग आले. अशा प्रकारचें भविष्यसूचन फार कौशल्यानें करावें लागतें आणि वज्राघाताचा प्रारंभींचा भविष्यसूचनाचा सर्व भाग कमालीचा कौशल्यपूर्ण वाटतो. वज्राघातमधील मेहेरजानवरून ' उषःकाल'मधील मेहेरजानची आठवण होते. सुलतानगडच्या आप्पासाहेब गडकऱ्यांचा मुलगा नानासाहेब हा हिचा बालमित्र. राष्ट्रहिताच्या तळमळीनें नानासाहेब इतका भारला गेला होता कीं, आपल्या बालपणच्या जिव्हाळ्याचे धागेदोरे कसे, कोठें आणि कोणापर्यंत पोंचले आहेत हें अजमावण्याचीहि त्याला भ्रांत राहिली नाहीं. हा नानासाहेब, मेहेरजानचा भाऊ रणदुल्लाखान याच्या कैदेंत विजापुरांत होता; तेव्हां त्याच्या बंदिखान्यापर्यंत मध्यरात्रीं चालून जाण्याचें धाडस सुकुमार मेहेरजाननें केलें. मेहेरजानचे नानासाहेबाशीं कांहीं जिव्हाळ्याचे संबंध यापूर्वी आले होते याची जाणीव खरोखरच कादंबरीच्या शेवटच्या पानापर्यंत वाचकाला होत नाहीं. हें रहस्य काय आहे अशा व्यवधानांत व्यग्र झालेला वाचक शेवटच्या पानापर्यंत एकसारखा वाचीत जातो आणि अगदीं शेवटीं तें रहस्य नाजूकपणानें उलगडलेलें पाहिल्याबरोबर वाचकाला आश्चर्याबरोबरच कादंबरीकाराच्या कलेचें परमावधीचें कौतुक वाटतें. या प्रेमकथेची ही कहाणी—' मायेचा बाजार ' या कादंबरींतील वसंत-पद्मा या जोडीचें स्मरण करून देते. अण्णासाहेबासारख्या आइतखाऊ घरजांवयाशीं लग्नगांठ पडल्यामुळें बिचारी पद्मा जीवंतपणीं मृत्यूच्या यातना भोगीत होती. वसंताच्या घरीं पद्मा बाळंतीण असतांना अण्णासाहेब तेथें गेला. अण्णासाहेबानें वसंतावर कांहीं घाणेरडे आरोप केल्या-

मुळें दोघांची मारामारी झाली. त्यावेळीं वसंतराव अण्णासाहेबास उद्देशून म्हणतो, " माकडा, असं रत्न माझ्या हातीं पडलं असतं तर देव्हाऱ्यांत ठेवून मीं त्याची पूजा केली असती. " हे उद्गार ऐकल्याबरोबर वाचकाला वसंतरावाच्या तोंपर्यंत घडलेल्या वर्तनाचे सर्व प्रसंग आठवून वसंतरावाच्या स्वभावाचा एकदम उलगडा होतो. बाह्य हालचाली निदर्शित करणाऱ्या प्रसंगांबरोबर स्वभावाचे धागे वाचकाच्या न कळत उलगडत नेण्याचें हें कार्य वाटतें तितकें सोपें नाहीं. हरिभाऊ पुष्कळशा गोष्टी पाल्हाळानें सांगतात असें म्हणणाऱ्या वाचकांनीं या पद्धतीनें जर एकंदर प्रसंगांची गुंफग वाचली तर त्यांना सुद्धां पाल्हाळाच्या ऐवजीं रहस्यमय गोष्टींचेंच ज्ञान अधिक होईल ! ' भयंकर दिव्य ' कादंबरींतील विवाहित दांपत्याची ताटातूट आणि त्या दंपतीवरील दादासाहेबांचा राग या मुख्य कथानकाचे धागेही असेच कौशल्यानें गुंतविलेले आहेत. कमला ही पुनर्विवाहितांची मुलगी. तिच्याशीं दादासाहबांच्या इच्छेविरुद्ध पद्माकरानें विवाह केला. आणि पुढें कांहीं संशय येऊन पद्माकरानें तिला टाकली. ही कमला अनेक दुःखद प्रसंगांतून मार्ग आक्रमीत शेवटीं ताईच्या आश्रमांत गेली. आणि तेथें तिला, आगगाडीच्या अपघातांत जखमी झालेल्या आपल्या सासऱ्याची शुश्रूषा करण्याचा योग आला. पूर्ण शुद्धि आल्यावर दादासाहेबांना कमलेच्या सद्गुणाची ओळख पटली. संशयनिरासाच्या मार्गावर असलेल्या पद्माकराला उद्देशून ते म्हणतात, " माझी पोटची मुलगी, तुझी बहीण असती तरीसुद्धां माझी तिनें इतकी काळजी घेतली असती कीं नाहीं याबद्दल शंका वाटते. ती अगदीं निष्पाप, निष्कलंक, निर्मल आहे असें मी तुला सांगतों; तेवढ्यावरच तूं तिचा पुन्हां स्वीकार कर; आणखी स्वच्छ चित्तानें रहा. " दादासाहेबांसारख्या कट्टया धर्माभिमानी माणसाच्या तोंडून कमलेस म्हणजेच सामाजिक सुधारणेच्या यशस्वितेस अन्तःकरणपूर्वक अनुमति मिळवून देण्याचा हरिभाऊंनीं आणलेला हा प्रसंग त्यांच्या निर्माणकौशल्याचा व विधायक विचारसरणीचा परमोत्कर्षच होय, असें कोणीहि प्रांजलपणें कबूल करील. ' मी '-मधील भाऊच्या आईचा मृत्यु आणि ताईचें आपल्या व्यसनी वृद्ध पतीकडे परत जाणें हे दोन प्रसंगहि असेच कौशल्यपूर्ण आहेत. ताईस नवऱ्यानें घरीं वेश्या

आणणें व आपल्या हातून तिची सेवा करविण्याचा आग्रह धरणें असह्य झालें तेव्हां ती घर सोडून भावाजवळ राहावयास गेली. पुढें तिच्या नवऱ्यास अर्धांग वायु झाल्याचें समजतांच ती ताबडतोब त्याची शुश्रूषा करण्याकरितां गेली. तिचें हें करणें तिच्या भावाला आवडलें नाहीं तेव्हां " मीं घर सोडलें त्याबरोबर दया, माया, कर्तव्य, ज्ञान वगैरे सर्व गोष्टी सोडल्या असें का तुला वाटतें ? अशी जर तुझी समजूत असेल तर ती चुकीची आहे. " हें तिनें दिलेलें उत्तर उत्कृष्ट स्त्रीस्वभावाचा एक मनोहर नमुना आहे असेंच कोणीहि म्हणेल ! ताईच्या माहेरीं तिला नेण्याकरितां तिच्या व्यसनी नवऱ्याकडून एक पाजी इसम आला असतां ताईनें सासरीं जाण्याचें नाकारलें. त्याप्रसंगीं ताईच्या आईवर घाणेरडा आरोप त्या नीचानें केला. तो ऐकल्याबरोबर आईनें जमिनीवर अंग टाकलें आणि थोड्याच वेळांत तिचें प्राणोत्क्रमण झालें हा प्रसंगहि असाच नमुनेदार आहे. ' चंद्रगुप्त'मधील सुवर्णकरंडकांतील अपूप, ' केवळ स्वराज्यासाठीं ' मधील संभाजीच्या प्रेतदहनप्रसंगीं राजारामाला रोषनआरा बेगमनें दिलेली मुद्रिका, ' सूर्यग्रहण'मधील किरातसिंगाच्या घोड्याचा मृत्यु, ' गड आला पण सिंह गेला ' मधील उदयभानु व कमलकुमारी यांच्या जबरदस्तीच्या शादीच्या प्रसंगीं मराठ्यांनीं घातलेला अचानक छापा इत्यादि प्रसंगही कलावन्त या नात्यानें हरिभाऊंची योग्यता कशी श्रेष्ठ स्वरूपाची होती हें दर्शविणारे आहेत.

हरिभाऊंच्या विस्तृत वाङ्मयांतून उत्कृष्ट स्वभावविशेष, मनोरम प्रसंग, वेधक घटना, आणि कौशल्यपूर्ण वर्णनें मुद्दाम शोधून काढण्याचें वस्तुतः कारणच नाहीं. नुसत्या ओझरत्या नजरेलाहि या सर्वांचें दर्शन घडल्याशिवाय खचित राहणार नाहीं. मात्र ही ओझरती नजरसुद्धां नित्याच्या अवलोकनानें सरावलेली व गुणग्रहणाच्या अभ्यासानें घटून गेलेली असली पाहिजे.

# ३

# आपटेकृत " मी "

## कांहीं आक्षेपांचा विचार.

[ मागील लेखाचें सूत्र ध्यानांत घेऊन हा लेख वाचावा अशी विनंति आहे.]

' मी ' मध्यें पंधरावीस प्रश्नांचा अंतर्भाव केल्यामुळें सर्वांच्या शिरोभागीं बसविण्यासारखा मुख्य प्रसंग कोणता याचा उलगडा होत नाहीं, असा सामान्यतः आक्षेप घेतला जातो. स्त्रियांची परवशता व तिचे अनिष्ट परिणाम हेंच हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें मुख्य सूत्र आहे. ' मायेचा बाजार ' मधील पद्मा, ' भयंकर दिव्य ' मधील कमला, ' यशवंतराव खरे ' मधील गंगाबाई, ' पण लक्षांत कोण घेतो ? ' मधील दुर्गी, गणपतराव ' मधील गोदावरी, ' कर्मयोग ' मधील नर्मदा इत्यादि विविध कादंबऱ्यांमधील हरिभाऊंनीं रंगविलेल्या स्त्रियांचीं चित्रें मनःपूर्वक पाहिलीं म्हणजे हरिभाऊंना समाजांतलि कोणत्या मोठ्या अनिष्ट चालीचें निर्मूलन करावयाचें होतें हें चटकन् उमगतें. हरिभाऊंचा समाज आज बदललेला आहे असें म्हणणाऱ्या लोकांची दृष्टि समाज म्हणून गणल्या गेलेल्या जनसमूहापर्यंत पोंचलेली नाहीं असेंच म्हणणें भाग आहे. मुंबई—पुण्यासारखीं पुढारलेलीं शहरें सोडून दिलीं तर हरिभाऊंनीं वर्णन केलेला समाज अजूनही तसाच आहे असें दिसून आल्याशिवाय राहाणार नाहीं. त्याच्या रूढिप्रिय मनोवृत्तींत फारसा फरक पडलेला नाहीं. कोणताही कलावंत म्हटला कीं तो भोंवतालच्या सृष्टीचेंच यथायोग्य प्रतिबिंब उतरविण्याचा प्रयत्न करणार. किंबहुना प्रतिबिंबक्षमतेखेरीज कलावंताच्या कलेला अस्तित्वच नाहीं, असें म्हणणें भाग आहे. विधात्याच्या सृष्टींत दोन पायाचीं माणसें असतात, आणि कलावन्ताची कल्पनासृष्टि चार पायाचीं माणसें निर्माण करते असें म्हणणें म्हणजेच कलावन्ताची सृष्टि वेगळी असते असा कोटिक्रम करणें होय. भोंवतालीं पसरलेला

बहुजनसमाज आणि शिक्षित असा कलापूर्ण समाज यांच्या नाड्यांचें स्पंदन एकतानतेनें चालल्याशिवाय खऱ्या कलेचा जन्म होत नाहीं. हरिभाऊंनीं कलेचें हें खरें स्वरूप ओळखलें होतें. आणि म्हणूनच कलावंताच्या दृष्टीनें त्यांनीं जें समाजाचें निरीक्षण केलें आणि समाजांतील ज्या कलाभंजक गोष्टी त्यांना आढळून आल्या त्यांच्यांत श्रेयस्कर सुधारणा व्हावी म्हणूनच त्यांनीं आपली कल्पनासृष्टि निर्माण केली. हरिभाऊंनीं तात्पुरत्या सामाजिक बाबींना आपल्या कादंबऱ्यांत कधीं प्रामुख्यानें तर कधी गौणत्वानें स्थान दिलें असलें तरी सर्व काळीं सर्व समाजांत, दिशा आणि काल यांनीं अनवच्छिन्न अशी जी एक समाजाची मनोवृत्ति असतें, त्याच मनोवृत्तीचें त्यांनीं निदर्शन केलें आहे. स्त्रियांची परवशता ही गोष्ट आज हजारों वर्षांच्या रिवाजानें जगांतील बहुतेक समाजांच्या अंगवळणीं पडलेली आहे. स्त्रीला आपल्या मालमत्तेपैकीं एक भाग कल्पून तिच्यावर वाटेल तशी सत्ता गाजविण्याचा उद्दामपणा आज शतका नुशतकें पुरुषवर्गाच्या हातून घडत आला. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य लाभलें पाहिजे, एखाद्या नवऱ्यानें स्त्रीचा अमानुषरीतीनें छळ केला आणि ती त्याच्यापासून दूर राहिली तर समाजानें तिला कुलटा मानूं नये, कुलीन मानावें, नवऱ्याच्या संसारावर लाथ मारून बाहेर पडणाऱ्या स्त्रीला जगांतल्या कोणत्याही न्यायमूर्तीनें नवऱ्याच्या इच्छेनुसार त्याच्या ताब्यांत देण्याचा अन्याय करूं नये, इत्यादि गोष्टींचें महत्त्व समाजाला पटावें म्हणूनच हरिभाऊंनीं आपल्या कलेची उभारणी केली. ' मी 'मधील भावानंदाची आई हिला रावजीनें टाकून दिली होती; पण त्याच्या मनाला वाटेल तेव्हां निर्लज्जपणानें तो परत येऊन तिला एखाद्या मुक्या जनावराप्रमाणें संसाराच्या गाड्याला जुंपूं शके. ही परिस्थिति रंगवून हरिभाऊंनीं स्त्रियांच्या परवशतेचें उत्कृष्ट निदर्शन केलें. जी गोष्ट भावानंदाच्या आईसंबंधांत घडली तीच त्याच्या बहिणीसंबंधांत म्हणजे ताईच्या बाबतींत पुनरावृत्त झाली. ही पुनरावृत्ति सुधारून वाढविलेली होती. रावजी लफंगा होता तर ताईचा नवरा बाहेरख्याली होता. 'ताई म्हणजे ऑथेल्लोंतील डेस्डिमोना किंवा एकच प्यालयांतील सिंधु आहे असेंहि म्हटल्याचें कित्येक ठिकाणीं ऐकूं येतें. पण ताई काय नाहीं ? असा जर मला कोणी प्रश्न विचारला तर ताई डेस्डिमोना

नाहीं किंवा सिंधु नाहीं असेंच उत्तर मी देईन. कारण नवऱ्याला सोडून राहण्याचें धाष्टर्य ताईनें दाखविलें तें उपर्युक्त दोन्ही स्त्रियांसंबंधांत सर्वथा अशक्य होतें. ताई नवऱ्याला देव मानीत नव्हती. मग नवरा आसन्नमरण असतां ती त्याच्या घरीं कां गेली ? असा प्रश्न साहाजिकच कोणीही विचारील. ताई नवऱ्याच्या घरीं परत गेली म्हणूनच ती सिंधूसारखी आर्यललना आहे असेंही म्हटलें जातें; पण ताई नवऱ्याकडे परत गेली ती तिला नवऱ्याबद्दल अनन्य निष्ठा वाटत होती म्हणून नव्हे ! हरिभाऊंनीं याच कादंबरींत एका आदर्श मठाची निर्मिति केली आहे. आणि हा मठ आपल्या इतर कादंबऱ्यांतून विकास पावलेला दाखवून लोकोपकारक कार्य करीत असल्याचा देखावा हरिभाऊंनीं निर्माण केला आहे. भयंकर दिव्य, आणि कर्मयोग या कादंबऱ्या या म्हणण्याची साक्ष देतील. या मठाची अधिष्ठात्री देवता ताई आहे. सर्व समाजाला उपकारक होणाऱ्या या मठाचें संकल्प-सिद्धीचें सर्व श्रेय तिला आहे. आपन्न, आधिव्याधिग्रस्त अशा कोणाही व्यक्तीला मार्गदर्शनाचा दिवा दाखवावयाचा हें कार्य ताईनें अखंडितपणें केलें. हें कार्य तिच्या हातून सुरू झालें तें तिच्या नवऱ्यापासूनच सुरू झालें असें दाखवून आपल्या सर्व कादंबरीसृष्टीला व्यापून उरणारी फार मोठी आणि अत्यंत हृदयद्रावक अशी ही Dramatic Irony ( भविष्यसूचन ) हरिभाऊंनीं साधलेली आहे. कादंबरींतील ताईचें नवऱ्याकडे परत जाणें हा प्रसंग अशा दृष्टीनें फार मनोज्ञ आहे. तिचा नवरा व्याधिग्रस्त होता. शाळुसोबत्यांनीं सोडल्यामुळें असाहाय्य झाला होता. अशा असाहाय्य, अनाथ आणि व्याधिग्रस्त जनतेला दुःखमुक्त होण्याकरितां साहाय्य करणारी ताई नवऱ्याकडेही धावत गेली. त्यावेळीं हा आपला नवरा आहे ही तिची भावना नष्ट झाली होती. हा एक व्याधिग्रस्त जीव आहे, अशा भावनेनें ती धावून गेली आणि Charity begins at home या न्यायानें तिनें आपल्या संकल्पित कार्याची मुहूर्तमेढ आपल्या सत्तेच्या घरांतच रोंवली ! ताईला तिच्या नवऱ्याकडे बोलावणें आलें असतां भाऊचें आणि त्या माणसाचें भांडण झालें. त्या भांडणांत भाऊंच्या आईच्या शीलासंबंधानें त्या गृहस्थानें घाणेरडे उद्गार काढले; त्यावेळीं त्याची आई भिंतीला टेकून उभी होती, ती एकदम जमिनीवर कोसळली आणि थोड्याच वेळांत मरण पावली !

कोणत्याही शिष्टसमाजांतील शीलवान् स्त्रियांना जीवापेक्षांहि शील प्रिय असतें हेंच या प्रसंगाच्या निमित्तानें हरिभाऊंनीं दाखविलें आहे !

कोणत्याही समाजांत स्त्रियांची वृत्ति अशीच असते. कारण कोठल्याही समाजांत समधात म्हणजे 'नॉर्मल' मनोवृत्तीच्या लोकांचेंच प्रमाण जास्त असतें आणि तें जमेंत धरूनच समाजाची स्थिति अजमावयाची असते. एखाद्या लग्नाच्या मिरवणुकींत कांहीं धांदरट लोक वाजंत्र्याच्याही पुढें जातात आणि पुन्हां परत येतात ! तशी स्थिति समाजांतील अत्यल्प अशा क्रांतिकारकांची असते. त्या लोकांचा अंतर्भाव सर्वसाधारण बहुजनसमाजांत होत नाहीं. असले क्रांतिकारक आणि बहुजनसमाज यांची कार्यें एकमेकांच्या अनुरोधानें चाललीं पाहिजेत अशा हेतूनेंच हरिभाऊंनीं कादंबरीवाङ्मयांत समाजाचें चित्र रेखाटलें.

कादंबरीच्या प्रारंभीं आलेला लखोट्याचा भागही असाच भविष्यसूचक ठरणारा आहे. तो निरर्थक नाहीं. भावानंदाच्या सर्व आयुष्याकडे आपण दृष्टि फेकली तर आपल्याला काय दिसतें ? भावानंद म्हणजे अष्टौप्रहर कार्य. भावानंद म्हणजे चोवीस तास कार्याचा निदिध्यास ! दिवे लावत जाणाऱ्या माणसाप्रमाणें त्याची स्थिति आहे. मागल्या दिव्याचें काय झालें हें पहावयास त्याला फुरसत नाहीं. इतकी त्याला कामाची निकड आहे. " मित्रा रामानंदा, या देहाला या लोकीं विश्रांति नाहीं. विश्रांतीकरितां परलोक सुविस्तीर्ण आहे." हे भावानंदाचे उद्गार त्याच्या तळमळणाऱ्या आणि कार्योत्सुक आत्म्याचे द्योतक आहेत. आपल्या पुढल्या आयुष्यांत सदासर्वदा कार्यमग्न होणारा भावानंद आपल्या किशोरावस्थेंतही तितकाच नादी होता हें दाखविण्याकरितां लखोट्याची सिद्धता झालेली आहे. त्या लखोट्यांत काय आहे हें जाणण्याची वाचकांची कितीही इच्छा असो, लेखकाला परिस्थित्यनुसार ती इच्छा पुरविणें शक्यच नाहीं. कारण भावानंद हा लहानपणापासूनच एखाद्या गोष्टीचा कसा ध्यास घेणारा होता एवढेंच लेखकाला दाखवावयाचें आहे आणि तें त्यानें उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. म्हणजे या लखोट्यांतही एक Dramatic Irony आहे. भावानंदानें सुंदरीला लिहिलेलीं पत्रें 'नवे विचार' या त्याच्याच वर्तमानपत्राच्या फायली शोभतील असाही आक्षेप घेतला गेल्याचें ऐकिवांत आहे. कारण त्या

पत्रांत " जिव्हाळया " च्या अशा कोणत्याच गोष्टी वाचकांना आढळत नाहींत. पण कुणाला कोणती गोष्ट जिव्हाळयाची वाटेल हें आपल्याला ठरवितां येणार नाहीं. भावानंदानें आपल्या पत्रांत ' प्रेमाच्या गोष्टी ' केल्या नाहींत, म्हणून तीं पत्रें टाकाऊ आहेत असाच या आक्षेपाचा अर्थ होतो. पण ज्या प्रेमाला भावानंदानें आपल्या सर्व आयुष्यभर गौण किंबहुना त्याज्य मानलें, त्याचे गोडवे तो आपल्या आत्मचरित्रांत गाईल हें शक्य तरी कसें होईल ? शिवाय भावानंदानें हें आत्मचरित्र आपल्या आयुष्याच्या शेवटीं लिहिलें. आयुष्याच्या शेवटीं त्याच्या प्रेमाबद्दलच्या कल्पना ठरून गेल्या होत्या. किंबहुना आपल्या आयुष्यांत " प्रेम " ही बाब सर्वथा अप्रधान रहावी असाच त्याचा यावेळीं कटाक्ष होता. अशा स्थितींत या पत्रांमधून प्रेमाच्या गोष्टी तो लिहील कशा ? त्याचप्रमाणें त्यानें सुंदरीला लिहिलेलें शेवटचें पत्र समग्र द्यावयास पाहिजे होतें, अशी एक नेहमींचीच तक्रार आहे. भावना जितक्या कमी तितके शब्द जास्ती आणि भावनांची तीव्रता जितकी जास्त तितके शब्द कमी असा मानसशास्त्राचा नियम आहे. तें पत्र लिहितांना भावनांची तीव्रता किती झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशा तीव्र भावना शब्दांत गुंतविणें म्हणजे त्यांचें पावित्र्य नष्ट करणें होय. शिवाय " Heard melodies are sweet but those unheard are sweeter still " ही गोष्टहि त्या पत्रासंबंधांत लक्षांत ठेवली पाहिजे.

शंकर आणि रावजी हीं दोन पात्रें कादंबरींत निरर्थक घातलीं आहेत असें कित्येक वाचकांना वाटतें. भाऊच्या आईची भूमिका त्याच्या मनावर परिणाम करील अशी होण्याकरितां रावजीच्या पात्राची फार जरूरी आहे. छायाप्रकाशाचें जें कोणत्याहि कलेंतील फार महत्त्वाचें तत्त्व असतें तें ललितवाङ्मयांतहि उपयोगांत आणावें लागतें. भाऊची आई हा जर प्रकाश म्हटला तर त्याचे वडील ही त्या प्रकाशाची छाया आहे. बापाचें पात्र प्रत्यक्ष दृष्टीस पडल्याशिवाय भाऊला आपल्या आईबद्दल कमालीची आदरबुद्धि वाटली नसती. आत्मचरित्रांत येणाऱ्या गोष्टी नेहमींच सुसंबद्ध आणि कार्यकारणयुक्त नसतात. आपल्या आयुष्यांत असे कितीतरी प्रसंग घडतात कीं, ज्यांचा आगापिच्छा

आपला आपल्यालाच शेवटपर्यंत उमगत नाहीं. किंबहुना आत्मचरित्राचा आभास बरोबर वठावा म्हणूनहि कादंबरीकाराला अशा कांहीं अधांतरीं लोंबकळणाऱ्या गोष्टी कल्पाव्या लागतात, आणि 'मी' कादंबरीचें सौंदर्यच या गोष्टींत आहे. भावानंदाचा मठ स्थापन करण्याची हरिभाऊंची कल्पना कादंबरींत लिहिली गेली, त्यानंतर कित्येक वर्षांनीं भारत-सेवकसमाज अस्तित्वांत आला. भावानंदाच्या आयुष्याचें ना. गोपाळराव गोखल्यांच्या आयुष्यक्रमाशीं कितीतरी साम्य आहे. "तुम्ही सभेला जाऊं नका. तुमची प्रकृति बरी नाहीं," असें भावानंदाच्या अनुयायांनीं त्याला वरचेवर म्हणणें आणि "एक गडी पडला तर दुसऱ्यानें लगट केली पाहिजे. कार्याची परंपरा अखंडित चालली पाहिजे," हा भावानंदाचा दिव्य संदेश हीं गोखल्यांच्या जीविताचें सारसर्वस्व विशद करणारीं आहेत. दक्षिण आफ्रिकेंत गोपाळरावांचा मुक्काम असतांना जनरल स्मट्स यांच्याबरोबर विचारविनिमय व्हावा म्हणून त्यांची गांठ घेण्याकरितां गोपाळरावांनीं एक दिवस मुक्रर केला होता. आफ्रिकेंतील काळ्यागोऱ्यांच्या लढ्याचा या विचारविनियमानें कांहीं निर्णय लागण्याचा यावेळीं संभव होता. हिंदी लोकांचे गोपाळराव हे प्रतिनिधि होते. सकाळीं बैठक व्हावयाची! त्याच्या आदल्याच रात्रीं त्यांना फार ताप आला आणि छाती सुजून तींत असह्य वेदना होऊं लागल्या. सकाळपर्यंत दुखण्याचा जोर कमी होण्याचें चिन्ह दिसेना. पहाटेच्या सुमारास सेवेस तत्पर असणाऱ्या महात्मा गांधींनीं त्यांना म्हटलें, "आपण जाऊं नका. आपल्या प्रकृतीवर त्याचे अनिष्ट परिणाम होतील." त्यावेळीं गोखल्यांनीं उत्तर दिलें, "गोखले शेकडों जन्माला येतील पण ही अशी संधि मात्र पुन्हां येणार नाहीं." शेवटीं गोपाळरावांच्या जबर इच्छाशक्तीनें आपलें वर्चस्व गाजविलें. आणि सकाळीं तशा आजारी स्थितींतही पांच सहा तासांची ती बैठक त्यांनीं व्यवस्थित रीतीनें पार पाडली. हा गोपाळरावांच्या आयुष्यांतील प्रसंग भावानंदाच्या वरील संदेशाची किती उत्कृष्ट रीतीनें छाननी करणारा आहे! अशा प्रकारचें कादंबरीचें अन्तःसौंदर्य पूर्णपणें समजून घेतल्याशिवाय तुलनात्मक दृष्टीनें तिचें वाङ्मयांतलि स्थान ठरविणें शक्य होणार नाहीं.

# ४

# मुक्तात्मा

रा. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं लिहिलेली ही पहिलीच कादंबरी होय. कांहीं वर्षांपूर्वी मासिक मनोरंजनांत त्यांनीं 'दिलरुबा' या नांवाची एक लघुकथा लिहिली होती. तीवरून त्यांचें रचनाकौशल्य सर्वसामान्य वाचकाच्या चांगल्यारीतीनें प्रत्ययास आले होतें. रा. माडखोलकर यांच्या अंगीं असलेलें हें रचनाकौशल्य त्यांनीं लिहिलेल्या प्रस्तुतच्या कादंबरींतहि पहावयास सांपडल्याशिवाय राहात नाहीं. आजपर्यंत मराठी वाङ्मयांत केवळ प्रचलित राजकीय उलाढालींचा वृत्तांत देऊन त्यांची चर्चा करणारी कादंबरी लिहिली गेली नव्हती. वाङ्मयांतील ही उणीव रा. माडखोलकर यांनीं पुष्कळ अंशीं भरून काढली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हरिभाऊ आपटे, वामनराव जोशी, प्रो. फडके, रा. खांडेकर इत्यादि जुन्या-नव्या लेखकांनीं समाजविषयक कादंबऱ्या लिहिल्या; त्यांच्या कादंबऱ्यांतून राज-कारणाला मिळाणारें स्थान सामान्यतः दुय्यम स्वरूपाचेंच असें. रा. माडखोलकर यांच्या या कादंबरींतील सर्व पात्रांचा आणि सर्व प्रसंगांचा समन्वय राजकारणाशीं च साधलेला आहे. कामगारवर्ग आणि भांडवालवाले यांच्या लढ्यांतून निर्माण होणारा समाजसत्तावाद या कादंबरींत प्रामुख्यानें उल्लेखिलेला आहे. समाजसत्ता वादाची ध्वजा फडकावी म्हणून परळच्या गिरणीकामगारांत व्याख्यानद्वारां जागृति करणारा चंद्रशेखर हा या कादंबरीचा नायक आहे. देशकार्याला बाध येऊं नये म्हणून त्यानें आपल्याभोंवतीं कोणत्याहि प्रकारचे प्रापंचिक पाश गुरफटून घेतले नाहींत. त्याच्यावर शेवटीं खटला होऊन त्याला पांच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. टिळक, गोखले, गांधी यांनीं राष्ट्रहिताच्या बुद्धीनें निर्माण केलेले निर-निराळे जे पक्ष आहेत त्या सर्वांबद्दल अनास्था आणि अनादर दाखवून स्वतःचा समाजसत्तावादाचा एक क्रांतिकारक पंथ निर्माण करणारी सध्यां जी कांहीं तरुण मंडळी आहेत त्यांचाच एक नमुना म्हणून चंद्रशेखराचें चित्र रंगविण्यांत आलें आहे. टिळकांच्या धडाडीबद्दल त्याला आदर आहे. क्रांतिकारकांच्या चळ-

वळीला त्याची अन्तःस्थ सहानुभूति होती म्हणून त्याला टिळक सर्व पुढाऱ्यांत श्रेष्ठ वाटतात. पण त्यांची होमरूलची चळवळ त्याला नापसंत आहे. महा-युद्धाच्या वेळीं टिळकांनीं जी राजनिष्ठेची शपथ घेतली ती घ्यावयास नको होती असें त्याचें मत आहे. गोखल्यांचें राजकारण सरकारच्या बाजूचें. ब्रिटिशांचा आणि हिंदी लोकांचा जो संबंध घडून आला त्यांत श्रेयस्कर परमेश्वरी संकेत असावा ही रानडे–गोखले यांची विचारसरणी त्याला हास्यास्पद वाटते. गांधींच्या शांततावादी धोरणाबद्दलहि त्याला फारसा आदर नाहीं. सारांश, हिंदुस्थाननें आयर्लंडचें अनुकरण केल्याशिवाय आपण स्वतंत्र होणार नाहीं या नवीन विचारसरणीनें त्याला भारून टाकलेलें आहे. आणि तदनुरूपच त्याच्या हातून एकंदर वर्तन झालें आहे. रा. माडखोलकरांनीं निर्माण केलेल्या चंद्रशेखराची ही कथा वाचतांना नामसादृश्यामुळें कित्येक वाचकांना कै. हरिभाऊ आपट्यांच्या चंद्रशेखराचीहि आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. कर्मयोग कादंबरींत हरिभाऊंनीं रंगविलेला चंद्रशेखर सामाजिक सुधारणेंत धडाडीनें भाग घेणारा एक क्रांतिकारकच आहे; पण हरिभाऊंचा चंद्रशेखर जितका तडफदार आहे तितकाच तो सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार करणारा आहे. रा. माडखोलकरांचा चंद्रशेखर फक्त तडफदार आहे. पण त्याच्या मध्यें बुद्धीचा समतोलपणा फारच कमी प्रमाणांत असल्याचें आढळून येतें. लोकांनीं केलेल्या कुटाळकीचा त्याला तिरस्कार वाटत असला, तरी सांगोवांगीनें चालत आलेल्या राजकारणांतील कंड्यांचा आदर करण्याइतका तो विवेकभ्रष्ट आहे. सुरतेच्या काँग्रेससंबंधानें त्यानें एके ठिकाणीं प्रदर्शित केलेले विचार त्याच्या विवेकशून्यतेची साक्ष पटवितील असेच आहेत. "हल्लींच्या पुढाऱ्यांपैकीं कोणीच आपल्याला गुरुस्थानीं होण्याच्या लायकीचे नाहींत. किंबहुना, त्यांनीं स्थापन केलेले पंथ आणि पक्ष नष्ट करण्याचेंच कार्य आपल्याला आधीं करावें लागेल." अशा विचारसरणीनें तो भारून गेला होता. त्यामुळें इतरांच्या मतांतील ग्राह्याग्राह्य भाग कोणता हें जाणण्याची त्याची विवेकशक्ति नाहींशी झाली होती. चंद्रशेखर स्वभावानें सरळवृत्तीचा असून बुद्धीनेंहि कुशाग्र आहे. पण बुद्धीची कुशाग्रता आणि स्वभावाचा सरळपणा हीं राजकारणांतील विधायक कार्यक्रमाला पोषक

आणि उपयुक्त ठरण्याऐवजीं विध्वंसक कार्यक्रमाचें बीजारोपण होण्यास कारण झालीं ! चंद्रशेखरासारख्या व्यक्तीबद्दल जो आदर वाटतो तो त्याच्या राजकीय कामगिरीमुळें नव्हे, तर त्याच्या प्रशंसनीय धैर्यामुळेंच होय ! चंद्रशेखरासारखे निःस्वार्थी आणि धैर्यशाली तरुण पद्धतशीर रीतीनें जर राजकारणविषयक चळवळी करतील तर देशाचें कल्याण झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं, हाच विचार या कादंबरीच्या वाचनानें मनांत येतो. कादंबरीचें कथानक फारसें गुंतागुंतीचें नाहीं. एकंदर कथानकाचा काळ १९२० पासून १९२३ पर्यंतचा म्हणजे असहकारितेच्या चळवळीशीं सामान्यतः समकालीन आहे.

भगवंतराव पाध्ये नांवाचे मुंबईत एक नामांकित वकील होते. त्यांचीं राजकीय मतें टिळकांच्या बाजूचीं असून त्यांचीं सामाजिक मतें प्रागतिक स्वरूपाचीं होतीं. म्हणूनच ते प्रागतिक पक्षांत सामील झाले. मुंबईस निघणाऱ्या प्रागतिक वर्तमानपत्राचे ते मुख्य संपादक होते. या वर्तमानपत्राचे चालक नानासाहेब एका युरोपिअन फर्ममध्यें कारकून होते. बबनराव, शास्त्रीबुवा, भुजंगराव देशमुख वगैरे मंडळी नानासाहेबांच्या स्नेहीवर्गांत असत. बबनराव हे एका राष्ट्रीय वर्तमानपत्राचे उपसंपादक असून प्रागतिकांतही कांहीं मजकूर लिहीत. रावसाहेब देशमुख हे सी. आय. डीं. तील पेन्शनर असून शिवकालीन इतिहाससंशोधनाचें कार्य करीत. प्रो. राळे हे मुंबईतील सरकारी कॉलेजांत प्रोफेसर होते. सर दीनानाथ या मुंबईतील प्रागतिक पुढाऱ्याचे ते स्नेही होते. भगवंतरावांची मुलगी ललिता आणि पुतण्या केशव हीं दोघें मॅट्रिकच्या वर्गांत होतीं. केशवाची आई पार्वतीबाई ही क्षयानें आजारी असून गांवीं राहात होती. केशवचे वडील त्याच्या लहानपणींच वारले. पार्वतीबाईला वाचन, गायन, काव्य वगैरेंची आवड होती. केशवाच्या ठिकाणींही या सर्व गोष्टींची आवड उत्पन्न झाली. भगवंतरावांना पार्वतीबाईबद्दल फार जिव्हाळा वाटे. तिच्या मृत्यूच्या वेळीं " माझें भावपूर्ण आयुष्य आज संपलें " असे त्यांच्या तोंडून उद्गार निघाले. केशवाचा मित्र चंद्रशेखर हा एका वेश्येचा मुलगा असून कॉलेजमध्यें बी. ए.च्या वर्गांत होता. समाजसत्तावादाचा पुरस्कार करणें हें त्याचें ध्येय होतें. तो बी. ए. झाल्यावर त्यानें याच कार्यास स्वतःला वाहून घेतलें. ललितेची मैत्रीण सुमति

हिचा आणि केशवचा सहवास दिवसेंदिवस वाढत जाऊन त्याचें प्रणयांत पर्यवसान झालें. ललितेला लवकरच ॲनिमीया जडला. चंद्रशेखराचें तिच्याकडे जाणें-येणें वाढल्यामुळें ललितेला त्याच्याबद्दल प्रेमभाव वाटूं लागला. आपणांस देशाचें कार्य करावयाचें आहे म्हणून कोणत्याहि स्त्रीच्या प्रेमाचा पाश आपण लावून घेतां कामा नये असा चंद्रशेखरचा निश्चय होता. प्रेमाबाई नांवाच्या एका सुस्वरूप विधवेच्या घरीं रावसाहेब देशमुख, नानासाहेब वगैरे मंडळी जमत असत. चंद्रशेखरच्या सर्व बातम्या कळाव्या म्हणून रावबाहेबांनीं प्रेमाबाईच्या घरीं त्याला आणविलें. प्रेमाबाईच्या वरपांगी प्रेमालापांना चंद्रशेखर बळी पडत नाहीं. हीं त्याची वृत्ति पाहून प्रेमाबाईला त्याच्याबद्दल खरोखरीचा जिव्हाळा वाटूं लागला. रावसाहेब चंद्रशेखरकडे जाऊं लागले. चंद्रशेखरच्या गैरहजेरींत त्यांनीं त्याच्या टेबलावरचें क्रांतिकारकांच्या कटासंबंधींचें एक पत्र खिशांत घातलें. इतकें करून चंद्रशेखरच्या येथील चहा पिण्यास मात्र ते विसरले नाहींत. या पत्राच्या पुराव्यावर त्यांनीं चंद्रशेखरवर बजाविण्याकरितां वॉरंट मिळविलें! प्रेमाबाईला ती गोष्ट कळून तिनें चंद्रशेखरला सर्व प्रकार सांगितला. रात्रींतल्या रात्रींत तो वेषांतर करून परळला गेला आणि तेथें सुभान नांवाच्या एका कामगाराकडे राहिला. संध्याकाळीं त्यानें एका वर्तमानपत्रांत केशवला आपला स्नेही म्हणून अटक झाल्याची बातमी वाचली. केशवला आपल्यासाठीं त्रास होऊं नये म्हणून तो आपण होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाला. त्याला पांच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. केशवची सुटका झाली. पण त्या सर्व प्रकाराचा धक्का बसून ललितेचा अंत झाला. केशव आणि सुमति यांनीं चंद्रशेखराची तुरुंगांत भेट घेतली. भेट पांचच मिनिटें झाली आणि "आतां पुन्हां पांच वर्षांनीं भेट" असें म्हणून चंद्रशेखरनें त्यांचा निरोप घेतला.

प्रेमाबाईच्या घरीं जाणारे लोक आणि त्यांच्यांत बोलल्या जाणाऱ्या गोष्टी यांचा कथानकांतील मुख्य भागाशीं अर्थाअर्थी कांहींही संबंध नाहीं. मुंबईतील कांहीं विशिष्ट व्यक्तींवर टीका करण्याच्या हेतूनेंच रा. माडखोलकरांनीं या कुटाळकंपूची सिद्धता केलेली असावी, असा भास होतो. असे कुटाळांचे अड्डे कादंबऱ्यांत रंगवून त्यांचा उपहास करण्यास अर्थातच कोणतीही हरकत नाहीं. पण अशा

प्रकारच्या अड्ड्यांशीं आपला विरोध असला, किंवा त्या अड्ड्यांतील लोकांच्या तोंडची एक टीकाविषयीभूत व्यक्ति म्हणूनच केवळ संबंध जडलेला असला म्हणजे अशा लोकांवर आपण टीका करण्यास प्रवृत्त होतों. आपली त्याठिकाणीं स्तुति होत असली म्हणजे मात्र आपण असल्या कुटाळ लोकांवरही खूष असतों ! चांगल्या दर्जाचा कादंबरीकार होऊं इच्छिणाऱ्या लेखकानें अशी वृत्ति ठेवणें इष्ट नाहीं. कलेच्या दृष्टीनें निरंतर महत्त्वाच्या अशा गोष्टी रंगविण्याकडे कादंबरीकाराचा कटाक्ष असावा. वर सांगितलेलें कुटाळांच्या अड्ड्याचें चित्र हें केव्हांही चिरस्मरणीय ठरण्यासारखें नाहीं. अशा तात्कालिक महत्त्वाच्या गोष्टींना कादंबरीसारख्या ललितकृतींत प्रमुखपणाचें स्थान देणें हें चांगल्या अभिरुचीचें लक्षण नव्हे. शिवाय आपणांस तिरस्करणीय वाटणाऱ्या लोकांवर वाटेल ती टीका करतांना आपणही आपली वृत्ति आपल्या विरोधकांसारखीच विक्षिप्त आहे हें अप्रत्यक्षपणें सिद्ध केल्याशिवाय राहात नाहीं. प्रेमाबाईच्या घरीं जमणारे लोक मांसाहार करीत असत, त्याचाही कादंबरीकारांनीं अप्रत्यक्षपणें उपहास केला आहे. हा उपहास करतांना माडखोलकरांना एकंदर परिस्थितीचें अवधान राहिलेलें नाहीं असेंच म्हणावें लागतें. हिंदुस्थानांत मांसाहार करणारेच लोक जवळजवळ शेंकडा नव्याण्णव इतके आहेत. समाजाचा प्रायः सर्व भाग जी गोष्ट आज आचरीत आहे, त्याचा अत्यंत अल्पसंख्याक असलेल्या लोकांनीं निषेध करण्याचें वस्तुतः कारण नाहीं. आपल्या धर्मसमजुतींना त्याज्य वाटणाऱ्या गोष्टींना सर्वस्वी निंद्य लेखणें हें केव्हांही समंजसपणाचें ठरणार नाहीं. मांसाहार निषिद्ध ठरविणारे आपण कोण असाही यासंबंधात प्रश्न उपस्थित होतो. आणि मांसाहार करणारे लोक शाकाहारी लोकांपेक्षां बुद्धीनें, कर्तृत्वानें, शीलानें, आणि मनानें सरसहा हीन असतातच असें जोंपर्यंत आपणांस म्हणतां येत नाहीं तोंपर्यंत आपणांस मांसाहारी लोकांचा उपहास करण्याचाही हक्क पोहोंचत नाहीं. असो.

कादंबरीचीं एकंदर चौतीस प्रकरणें आहेत. बहुतेक प्रकरणांची मांडणी चतुरपणानें केलेली आहे. प्रसंग कथानकाशीं संबंध पावणारे असोत अगर नसोत, त्यांची घडण मात्र परिणामकारकरीतीनें केलेली आहे. कांहीं कांहीं प्रकरणें पृथक्पणें मनोरंजक झालीं आहेत, पण कथानकाशीं त्यांचा संबंध कमी प्रमाणांत अस-

त्यामुळें त्यांचें महत्त्व प्रायः नाहींसें झाल्याशिवाय राहात नाहीं. 'गिरगांवांतील गांवठी नॉर्थक्लिफ,' 'उभयान्वयी उपसंपादक,' 'शिक्षकाच्या समाधीपाशीं' वगैरे प्रकरणें उदाहरणादाखल देतां येण्यासारखीं आहेत. कादंबरींत वर्ण्य विषय संगतवार रीतीनें कथन करणें एवढेंच कादंबरीचें उद्दिष्ट असतें असें नाहीं. वाचकाला विस्मय वाटेल अशा प्रकारची एकही घटना आकस्मिकपणें घडून आल्याचें दाखविलेलें नाहीं. वाचकाला अनपेक्षित वाटतील असे प्रसंग कादंबरींत इतस्ततः विखरून कथानकाला विस्मयकारक रीतीनें कलाटणी देण्याची हातोटी जागजागीं प्रत्ययास येण्यांत लेखकाच्या निर्माणकौशल्याची खरी कसोटी असते; किंबहुना उत्तम कादंबरीकाराच्या ठिकाणीं हाच गुण प्रामुख्यानें असावा लागतो. रा. माडखोलकर यांना प्रस्तुत कादंबरींतही असे प्रसंग निर्माण करतां आले असते. उदाहरणार्थ, चंद्रशेखर आणि ललिता यांच्यामधील प्रणयाचें पर्यवसान त्यांना अशाच अनपेक्षित रीतीनें दाखवितां आलें असतें. ललिता तर मूर्तिमंत भावनाच होती. चंद्रशेखर कर्तव्यकठोर असला तरी भावनाशून्य नव्हता. महत्त्वाची सभा तहकूब करून ललितेकडे धांव घेण्याइतका तो भावनाशील होता. 'मी' मधील भावानंद आणि सुंदरी यांच्यामधील प्रणयभावनेप्रमाणेंच प्रस्तुतची प्रणयभावना परिणत व्हावयास पाहिजे होती. 'मी' मधील पर्यवसानासारखेंच येथील पर्यवसानही विस्मयकारक आणि अनपेक्षित करून दाखवितां आलें असतें. ललितेचा आजार आणि मृत्यु या गोष्टीही अशाप्रकारच्या पर्यवसानाला सर्वस्वीं अनुकूल अशाच होत्या. चंद्रशेखराचा मोहाशीं झगड सुरू होतो न होतो तोंच लेखकांनीं कादंबरीची आवरासावर केली आहे. कादंबरींतील अनवश्यक वादविवाद, प्रवचनें आणि प्रसंग यांना छाट देऊन उपर्युक्त सूत्र मार्मिकपणानें रंगविलें असतें तर कादंबरी अधिक आकर्षक झाली असती.

राजकारणविषयक आणि वाङ्मयविषयक माहितीच्या चुकाहि कादंबरीमध्यें क्वचित् झाल्याचें दिसतें. राजकारणविषयक चुकांना व्यक्तिविषयक मतभिन्नता म्हणतां येईल. प्रागतिक आणि जहाल अशा उभय पक्षांचे लोक वादविवाद करीत असतांना त्यांनीं एकमेकांवर चुकीचे आरोप करणें सर्वस्वीं शक्य आहे. अर्थात्च कादंबरींतील पात्रांच्या मतांबद्दल आपण जबाबदार नाहीं असें

म्हणून रा. माडखोलकरांना आपली सुटका करून घेतां येईल. मात्र वाङ्मय-विषयक माहितीसंबंधानें अशी स्थिति नसते. प्रो. पार्कर यांनीं शेलेवर कॉलेज-मध्यें एक व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानाचा केशवच्या मनावर परिणाम झाला. समानशील दयितेच्या साहचर्यामुळें उत्फुल्ल झालेलें शेलेचें प्रेममय जीवन त्याच्या डोळयापुढें उभे राहिलें, आणि त्याच्या मनांत लगेच असा विचार आला कीं, " सुमाचें साहचर्य जर आपल्याला लाभलें तर शेलेप्रमाणें आपलेंहि जीवन सुखी होईल "—अशी केशवाची वृत्ति झाल्याचें रा. माडखोलकरांनीं एके ठिकाणीं वर्णन केलें आहे. शेलेचें चरित्र आणि त्याचें काव्य यांचें अवलोकन केलें असतां शेले प्रेमाच्या बाबतींत प्रायः जन्मभर नैराश्यावस्थेंतच राहिला असें आढळून येतें. त्याची पहिली बायको हॅरियट् हिला त्यानें टाकून दिली आणि मेरी गॉडविन्शीं लग्न केलें. पण मेरी गॉडविन्च्या सहवासांत त्याचें आयुष्य सर्वस्वीं सुखाचें झालें, असें मात्र म्हणतां येत नाहीं. तो अनेक प्रसंगीं दुःखी होत असावा असें मानण्यास शेलेच्या चरित्रक्रमाचा आधार मिळतो. मेरी गॉडविन्बद्दल त्याला फार प्रेम वाटे असें त्याच्या आयुष्यांतील कांहीं प्रसंगांवरून जर कादंबरीकार सिद्ध करूं जातील तर हॅरियट्संबंधानेंहि तसलेच प्रेमाचें प्रसंग दाखवून कादंबरीकारांना गप्प करतां येण्यासारखें आहे. हॅरि-यट्ला उद्देशून शेले एके ठिकाणीं म्हणतो,

" Then press into thy breast this pledge of love;
And know though time may change, and years may roll,
Each floweret gathered in my heart,
It consecrates to thine. "

त्याच्या आयुष्यांतील अशा प्रसंगावरून एवढेंच फार तर सिद्ध करतां येईल कीं, या दोघींच्याहि सहवासांत तो त्या त्या काळीं कधीं कधीं सुखी झाला, जन्माचा मात्र सुखी झाला नाहीं. रा. माडखोलकरांनीं आपली विचारसरणी प्रो. पार्करांच्या व्याख्यानांत अडकविल्यामुळें प्रो. पार्करांच्या पदरीं मात्र निष्कारण अज्ञानाचा दोष बांधला जाण्याचा संभव आहे !

रा. माडखोलकरांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें पुस्तकाची भाषा सरावलेली आणि कमावलेली अशीच आहे. कांहीं कांहीं ठिकाणचीं वर्णनें भाषेच्या दृष्टीनें वाचण्यासारखीं आहेत. पण सोपा मराठी शब्द योजून काम होईल तेथें अपरिचित संस्कृत शब्द घालण्याचा त्यांचा हव्यास अद्याप सुटूं नये याचें आश्चर्य वाटतें. परुषता, उन्मेषोन्मुख, निर्भर, संयत, प्रमाथी, कंबुकंठ, नीरव, प्रसाधन, कबरीबंधन, मदिर इत्यादि शब्द त्यांना सहज टाळतां आले असते. प्रि. आपटे यांच्या गाईडचें अध्ययन असणाऱ्या वाचकांना हे शब्द अडणार नाहींत हें खरें. पण आपल्या वाचकांत सगळेच गाईडचे अभ्यासक नसतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याचप्रमाणें जिद्दी, कणव, उबग, मोहरून, असें कांहीं बोंगाडे मराठी शब्दहि आढळतात. ' पाऊस अद्याप रीतसर सुरू झालेला नव्हता, ' " तिला चेष्टा करावीशी वाटली, " " चंद्रशेखर आणि ललिता–दोन्हीहि एकाच जातीचे " वगैरे कर्णकटु आणि अशुद्ध प्रयोगहि कांहीं ठिकाणीं आढळतात. भाषा सोपी आणि प्रवाहशील असणें हा गुण कादंबरीची आकर्षकता वाढविणाराच ठरतो. आपण कादंबरी लिहितों ती बहुजनसमाजाकरितांच लिहितों, तेव्हां बहुजनसमाजाच्या परिचयाचीच भाषा कादंबरींत योजणें इष्ट आणि अगत्याचें असतें, ही गोष्ट ललितलेखकानें विसरून चालणार नाहीं. असें असूनही कादंबरी लेखनासंबंधांतील पहिला प्रयत्न म्हणून या कृतिकडे पाहिलें असतां प्रसंगनिर्मिति, कथनकौशल्य, आणि भाषाप्रभुत्व इत्यादि लेखकाचे गुण वाखाणण्यासारखे ठरतील.

# ५

# अटकेपार

मराठी कादंबरीलेखनासंबंधांत प्रो. ना. सी. फडके यांनीं आजवर जें वैशिष्ट्य संपादन केलें आहे, त्याला अधिक शोभा आणण्यासारखी त्यांची अटकेपार ही कादंबरी प्रकाशित झाली याबद्दल मराठी वाचकांना निःसंशय आनंद होईल. पुष्कळ बायका सुगरण असतात. पण सुगरणपणांतही प्रत्येकीचें वेगवेगळें वैशिष्ट्य असतें. एकच पदार्थ सगळ्याजणींना सारखाच चांगला करतां येईल असें नाहीं. एकीचा एक पदार्थ करण्यासंबंधांत हातखंडा असेल तर दुसरा एखादा पदार्थ करण्यासंबंधींची दुसरीची ख्याति असेल. कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांची स्थिति कांहीं अंशी अशीच असते. कित्येक लेखकांना सृष्टिवर्णनाची पार्श्वभूमि निर्माण करण्याची हातोटी साधलेली असते तर कित्येकांना कथाप्रसंगाची निर्मिति व निवड अधिक उठावदार रीतीनें करतां येते. पुरुषपात्रांचें स्वभाववर्णन कित्येकांच्या हातून विशेष मार्मिकपणानें होतें तर कित्येकांची मदार स्त्रीपात्रांच्या वर्णनावर अवलंबून असते. कित्येकांच्यामध्यें अशा प्रकारचे अनेक गुण एकत्र आले असल्याचेंही दृष्टोत्पत्तीस येतें. प्रो. फडके यांना प्रेमबद्ध अविवाहित तरुण स्त्रिया फारच चांगल्या रीतीनें चित्रित करतां येतात. त्या तरुणींच्या निरनिराळ्या शरीरभागांचें आणि बाह्य वेषभूषेचें, वर्णन करण्यासंबंधांत प्रो. फडके अत्यंत प्रवीण आहेत. प्रो. फडक्यांचें हें वर्णन इतकें सुंदर असतें कीं, एखाद्या चित्रकाराला हुबेहूब असें चित्र फडक्यांच्या वर्णनावरून सहज काढतां यावें ! युवतींच्या मनांत खळबळ उडवून देणाऱ्या प्रणयभावनांचें दिग्दर्शनही प्रो. फडके उत्कृष्ट रीतीनें करतात. प्रेमविषयक झालेल्या तरुणाबद्दल तिला वाटणारें आकर्षण, त्याच्या चित्तवृत्तीचें यथायोग्य आकलन व्हावें एतदर्थ तिच्या अंतःकरणाची चाललेली धडपड, त्याच्या आणि आपल्या भेटींतील अडथळ्याचा निरास व्हावा या विचारानें तिच्या मनाची चाललेली उलघाल, त्याचें नुसतें दर्शनच झाल्यास, बोलावयास न मिळाल्यामुळें तिच्या चित्ताला वाटणारी रुख-

रुख वगैरे अविवाहित व प्रेमबद्ध अशा तरुणांच्या मनःस्थितीचें वर्णन प्रो. फडके अतिशय नाजुकपणानें करतात. जादूगारमधील इंदुमती, दौलतमधील निर्मला आणि अटकेपारमधील मीनाक्षी व सकीना या स्त्रीपात्रांचीं शब्दचित्रें पाहणाऱ्या कोणत्याही वाचकाला वरील म्हणण्याचें प्रत्यंतर आल्याशिवाय राहाणार नाहीं.

अटकेपार या कादंबरीच्या नांवावरूनच कादंबरींतील वर्ण्य विषयाची स्थूल कल्पना करतां येणें शक्य आहे. संस्कृतीचे रूढ रीतिरिवाज जर आजच्या परिस्थितींत गैरवाजवी रीतीनें बंधनकारक होत असतील तर संस्कृतीच्या रीतिरिवाजांची अटक ओलांडून इच्छित कार्य तडीस नेण्यास कोणती हरकत आहे ? अशा आशयाचा प्रश्न प्रस्तुत कादंबरींत विचारण्यांत आला आहे. " संस्कृतींत जुनी अन् नवी असा भेद करून त्याबद्दल कोणी हटवाद धरून बसलं कीं मला हंसूंच येतें. संस्कृति संस्कृति म्हणजे काय ? परिस्थितीचा ताप न होतां तिच्या प्रकाशाचा उपयोग मात्र घेतां यावा म्हणून चालीरीतींची जी एक छत्री आपण धरतों ती; सूर्य बदलला कीं आपण छत्रीचा झोंक पालटत नाहीं का ? संध्याकाळीं सूर्य पश्चिमेला आला तरी सकाळच्या जुन्या तऱ्हेनेंच मी छत्री धरीन म्हणणारा शहाणा का ? हट्टानें छत्री पूर्वेस धरून क्लेश सोसण्याचा करार त्यानें दाखविला म्हणून त्याचं मत नाहीं कांहीं बरोबर ठरत. " ( पान ५४ ) " मीं तुला वारंवार सांगितलें तेंच पुन्हां सांगतों कीं, पुत्रधर्माच्या कल्पनेचा व्यर्थ बाऊ करण्यांत अर्थ नाहीं. तुझं प्रेम जिथं जडलं तें ठिकाण सर्वस्वीं योग्य आहे अशी तुझ्या मनाची ग्वाही असल्यावर तें पूर्ण करून घेतांना पित्याची अनुमति केवळ धर्माच्या रूढीच्या कल्पनेमुळें मिळत नसली तर तिची फिकीर ठेवण्याचें कारण नाहीं. असें करण्यांत कसलंही पाप नाहीं." (पान २९९) हे दोन्ही ठिकाणचे केशवकाकांचे उद्गार वाचून लेखकाचा या संबंधांत काय निर्णय आहे याची सहज कल्पना येते. कमअस्सल का होईना, पण मुसलमानाचीच म्हणून मीनाक्षी मुसलमानाच्या घरांत पडावी, या उमरखानांच्या सांप्रदायिक मनोवृत्तींनीं सुधीरसारख्या परधर्मीयाशीं प्रेमबद्ध झालेल्या मीनाक्षीचा अखेर बळी घेतला. जुन्या परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या वडिलांच्या आग्रहामुळें परधर्मीय

मीनाक्षीशीं सुधीरला लग्न करतां आलें नाहीं. संस्कृतीचे रीतिरिवाज बंधनकारक झाले नसते तर सुधीर आणि मीनाक्षी व केशवकाका आणि सकीना यांचीं लग्नें निर्विघ्नपणें पार पडलीं असतीं !

प्रस्तुत कादंबरींतील कथानक मुंबई व धेनुकुंज या दोन गांवांतून घडलेलें आहे. मुंबईत शंभुराव जोग व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई हें जोडपें राहात होतें. शंभुराव स्नानसंध्याशील, अत्यंत शुद्ध व सात्त्विक असे होते. वेदांचें अध्ययन करावें, यज्ञयाग व्हावेत वगैरे जुन्या चालीरीतींतील आदर्श वर्तनक्रम प्रत्येकानें अनुसरावा अशी त्यांची विचारसरणी होती. आपले विचार स्पष्टपणें बोलून दाखविण्याइतकें स्त्रीजातीला वैयक्तिक अस्तित्व असतें, याची बिचाऱ्या लक्ष्मीबाईला कल्पनाही नाहीं. नवरा म्हणेल तें प्रमाण मानावें असेंच तिचें सर्व आयुष्य गेलें होतें.

त्यांना दोन मुलें होतीं. शंभुरावांनीं आपली मुलगी माई हिला कराचीचे एक विद्वान् ब्राह्मण भाऊशास्त्री यांचे चिरंजीव वसंतराव यांस दिलें होतें. भाऊशास्त्री वारल्यावर वसंतराव इस्टेटीचे मालक झाले आणि व्यसनापायीं त्यांनीं आपलें मातेरें केलें. माईला ते प्रसंगीं मारहाणही करीत. असत्याविरुद्ध ओरडणाऱ्या आपल्या खऱ्या विवेकबुद्धीला दाबावयाचें आणि अधर्म सहन करावयास सांगणारी खोटी विवेकबुद्धि निर्माण करून तिच्याप्रमाणें वागावयाचें ही आमच्या स्त्रियांची परंपरा आहे. या स्त्रियांच्या वर्तनाला माईही अपवाद नव्हती. शंभुरावांचा मुलगा सुधीर हा ह्या कादंबरीचा नायक आहे. दि मॉर्निंग न्यूज नांवाच्या वर्तमानपत्रांत सुधीर उपसंपादकाचें काम करीत होता. मुख्य संपादक मि. ब्राउनिंग यांची त्याच्यावर विशेष मर्जी होती.

शंभुरावांचे बंधु केशवकाका हे एक नामांकित चित्रकार होते. केशवकाका आणि सुधीर यांचें एकमेकांवर फार प्रेम होतें. सकीना नांवाच्या एका आपद्-ग्रस्त स्त्रीला त्यांनीं आपल्याजवळ आश्रय दिला होता. धेनुकुंजाला निसर्गाचे पुष्कळ देखावे आहेत ते रंगविण्यास एकदां केशवकाका सकीनासह तेथें गेले. मुंबईच्या मदीना हॉटेलमध्यें एकाएकीं आग लागली होती, आणि ज्या खोलीला आग लागली होती त्या खोलींत एक मनुष्य मरून पडला होता. या प्रकरणाची

बातमी सुधीरनेंच मिळविली होती. मयताच्या खोलींत सुधीरला एक मखमलीचें जुगदान आणि कव्यारीचें एक रिकामें घर सांपडलें होतें. त्यावर उंची मखमलीचें आवरण असून त्यावर कलाबतूनें कांहीं ऊर्दू अक्षरें, दोन व्यत्यस्त तलवारी आणि मधोमध चंद्रकोर अशी एक लहानशी पण सुबक निशाणी काढलीं होतीं. जुगदानाच्या सुलट बाजूवर नारळाच्या झाडाची आकृति कशियानें काढली होती. त्या नारळाच्या झाडाखालीं मरियम् असें ऊर्दू अक्षरांत नांव होतें. त्या जुगदानांत नांवाचीं छोटीं छापील कार्डेंहि होतीं. त्या सर्वांवर Miss Mary, Christian Orphanage - असा मजकूर छापला होता. या मेरीची सुधीरनें गांठ घेतली होती. आणि धेनुकुंज गांवाशीं त्या प्रकरणाचा कांहीं संबंध असावा असा त्याला ओझरता संशय आला होता. काकांच्या आग्रहावरून सुधीर धेनुकुंजाला आला होता. तो एकदां एकटाच हिंडावयास गेला असतां त्याला ~~दोन~~ मुसलमानी ~~स्त्रिया दिसल्या.~~

या ~~दोन स्त्रिया~~ म्हणजे मीनाक्षी ~~आणि जुबेदा होत~~. मीनाक्षी ही उमरखान नांवाच्या एका संपन्न गृहस्थांची मातृहीन कन्या होती. ती उमरखानांची अतिशय लाडकी होती. त्याच गांवांतील सय्यद अमीर नांवाच्या एका वैभवशाली तरुणांशीं त्यांनीं मीनाक्षीचें लग्न ठरविलें होतें. जुबेदा ही मीनाक्षीची दासी होती. पण मीनाक्षीचें पांचव्या वर्षापासून लालनपालन केल्यामुळें तिला बराच वरिष्ठ दर्जा प्राप्त झाला होता.

समुद्रकांठीं मीनाक्षीच्या केसांतील खड्याचा चाप गळून पडला होता, तो सुधीरनें तिच्या बंगल्यावर जाऊन तिच्या स्वाधीन केला. याच प्रसंगीं दोघांच्याही मनांत परस्परांच्याबद्दल प्रेमभावना जागृत झाल्या. पण दुसऱ्या दिवशीं केशवकाका, सकीना व सुधीर मुंबईस निघून आलीं.

धेनुकुंज गांवाशीं मदिना हॉटेलांतील प्रकरणाचा संबंध आहे ही वस्तुस्थिति सुधीरनें मि. ब्राउनिंगच्या नजरेस आणून दिली. ब्राउनिंगनें सुधीरला धेनुकुंजाला प्रत्यक्ष जाऊन सर्व गोष्टींचा नीट तलास लावण्याची कामगिरी सांगितली. वाटेंत सुधीरच्या मोटरला अपघात झाला. सुधीरला जखम झाली नाहीं; पण त्याच्या डोक्याला बराच मार बसून तो बेशुद्ध झाला होता.

मागून उमरखानांची मोटार आली. उमरखानांनीं सुधीरला आपल्या बंगल्यावर नेलें आणि त्यांचे बांदेज गांवचे परममित्र डॉ. अस्लम यांना बोलावून घेऊन त्यांनी सुधीरची उपचारव्यवस्था केली, व सुधीर बरा झाला. याच मुक्कामांत सुधीर व मीनाक्षी यांचें परस्परप्रेमसंवर्धन झालें. धेनुकुंज गांवांतील एका देवळांत दोघांची गांठ पडली आणि त्यांनीं आपलें प्रेम एकमेकांना बोलूनही दाखविलें.

मीनाक्षी व सुधीर यांचें एकमेकांवर प्रेम आहे ही गोष्ट उमरखानांना कळली तेव्हां त्यांना फार राग आला. त्यांनीं सुधीरची गांठ घेतली आणि त्याची कानउघाडणी केलीं. मीनाक्षी व डॉ. अस्लम या दोघांनाही खानसाहेबांचें हें करणें पसंत पडलें नाहीं. त्याच दिवशीं संध्याकाळीं मीनाक्षी सुधीरला त्याच्या झोपडींत भेटावयास गेली.

सुधीर मुंबईला परत आला तों माईकडील तार दत्त म्हणून तयार होती. आपल्या आईला घेऊन सुधीर माईकडे जाण्यास निघाला. माईच्या शेजारीं राहणारे डॉ० नीळकंठराव थत्ते यांची ती तार होती.

डॉ० नीळकंठराव थत्ते यांची सुभद्रा नांवाची एक भाची होती. तिचें त्यांनीं सुधीरचा बडोद्याचा मित्र जयंत बापट याच्याशीं लग्न ठरविलें होतें. या जयंत बापटाशीं माईचें लग्न व्हावें अशी सुधीरची फार इच्छा होती. पण वडिलांच्या हटवादीपणामुळें ती फलद्रूप झाली नाहीं.

जयंत बापटही कराचीस जात होता. तो सुधीरच्या डब्यांत बसला व त्यानें माईची हकिगत त्यांना सांगितली. सर्व मंडळी नीळकंठरावाच्या येथेंच उतरली. माईला वसंतरावांनींच कोंडून ठेवलें होतें. मॅजिस्ट्रेटची मदत घेऊन सुधीरनें तिला आपल्या ताब्यांत घेतलें, आणि माईसह सर्व मंडळी मुंबईस परत आली. माईनें नवऱ्याचें घर कायमचेंच सोडलें. ही गोष्ट शंभुरावांना पसंत पडली नाहीं. सुधीर व मीनाक्षी यांचा अस्लमकाकांच्या मध्यस्थीनें पत्रव्यवहार चालू होता. मीनाक्षीनें स्वतः कशिदा काढून एक उंची शेला सुधीरकडे पाठविला.

' मी तार करीन तेव्हां ताबडतोब निघून ये ' असें मेरीला सांगून मदिना हॉटेलांतील आग व हसनचा मृत्यू या प्रकरणाचा निकाल लावण्याकरितां सुधीर

धेनुकुंजास रवाना झाला. सी. आय्. डी. चे लोकही या कामीं त्याच्याबरोबर मदतीला होते. सय्यदचा हस्तक याकूब याच्याकडून मरतां मरतां जबानी घेऊन मॅजिस्ट्रेटच्या साहाय्यानें सुधीरनें सय्यदची गुन्हेगारी सिद्ध केली.

मेरीला घेऊन सुधीर खानसाहेबांकडे गेला. तेथें सय्यदच्या देखत त्यानें मेरीला खानसाहेबांना खरी हकीगत सांगावयास लाविलें. मेरी ही मूळची मरि-यम् होती. तिच्या नवऱ्याला सय्यदनें याकूबच्या हातून मारविलें होतें. सय्यदनें मरियमला गांठून तिची अब्रू घेतली. त्यामुळें मरियम् फरारी झाली व तिनें ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. खानसाहेबांचा विश्वासु नोकर हसन याला या गोष्टी माहीत होत्या. म्हणून युक्तीनें त्याला मुंबईस पाठवून त्याचा खून कर-विण्यांत आला.

सय्यदनें आत्महत्या केली. त्यामुळें उमरखानास वाईट वाटून त्यांचा सुधीर-वरील रोष अधिकच वाढला. अस्लमकाकांनीं त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण सुधीर आणि मीनाक्षी यांचें लग्न व्हावें ही कल्पना खानसाहेबांना असह्य झाली.

आपण परधर्मीय स्त्रीशीं विवाह करणार आहों अशा आशयाचें सुधीरनें एक विस्तृत पत्र शंभुरावांस लिहिलें होतें. त्यामुळें शंभुरावास फारच वैताग आला होता. कांहीं दिवसांनीं अस्लमकाकांचें पत्र आलें त्यांत मीनाक्षीच्या मृत्यूची दुःखद वार्ता होती. अशा रीतीनें उमरखान आणि शंभुराव यांच्या जुनी संस्कृति बाळगण्याच्या अट्टाहासामुळें सुधीर आणि मीनाक्षी यांच्या प्रणय-कहाणीची इतिश्री भग्नमनोरथ स्थितींतच झाली !

या कथानकाला, प्रो. फडक्यांच्या लुसलुशीत संभाषणाची जोड मिळाल्या-मुळें कादंबरी अतिशय मनरंजक झालेली आहे. फडक्यांच्या संभाषणांत कृत्रिम-पणा नसून साधेपणा आणि व्यावहारिकपणा असतो, याची प्रचीति प्रस्तुत कादंबरीत अनेक ठिकाणीं आल्यावांचून राहात नाहीं. कादंबरींतील विषयाशीं जरी कित्येकांचा मतभेद झाला तरी कादंबरीच्या या गुणामुळें कादंबरी निःसंशय वाचनीय झाली आहे, असें कबूल करण्यास मात्र कोणीही माघार घेणार नाहीं.

विवाहेच्छु तरुणतरुणींना आपआपली निवड करण्यास परवानगी असावी

हें तत्त्व एकदां मान्य केल्यावर त्यांच्या निवडीचें क्षेत्र कोणत्या तरी काल्पनिक बंधनापर्यंत मर्यादित असावें अशी अपेक्षा करणें अर्थातूच सयुक्तिक होणार नाहीं. अनुरूप तरुणतरुणींचा स्वेच्छेनें विवाह व्हावा ही गोष्ट कबूल असणारांना निवडीचें क्षेत्र व्यापक असावें, असें वाटणेंही अगत्याचें आहे. एखादा तरुणाला एखादी परधर्मीय स्त्री आपली सहधर्मिणी व्हावी असेंहि वाटण्याचा संभव आहे आणि तिची प्राप्ति करून घेण्यासंबंधांत त्याला अडथळा होऊं नये हें सर्व दृष्टींनीं इष्ट होय, अशी या कादंबरींतील साधारण स्थूलशीं विचारसरणी आहे. ही विचारसरणी मान्य होणें न होणें प्रत्येकाच्या स्वभावधर्मावर अवलंबून आहे. ही विचारसरणी मान्य असणारांनीं ती अमान्य असणारांचा उपहास करणें गैरवाजवी ठरणार आहे. शंभुराव किंवा उमरखान यांनीं या विचारसरणीला विरोध केला तो प्रामाणिक बुद्धीनेंच होय. संस्कृतीच्या बंधनांची त्यांच्यावर पकड बसते, याचे कारण त्यांचा स्वभावधर्म आहे. समाजांत अशा भिन्न स्वभावधर्मांच्या लोकांचाहि समावेश झालेला असतो. आणि त्यांच्याकडून नव्या रीतिरिवाजांना आणि मतांना विरोध होतो तोहि नाइलाजानेंच होय. जुन्या संस्कारांच्या अशा एककल्ली लोकांचा उपहास दुसऱ्याहि एका कारणामुळें करतां येत नाहीं. नवीन मतांचा आदर करून त्यांचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींतहि सगळेच मनमिळाऊ आणि जनमिळाऊ स्वभावाचे असतात असें नाहीं. जुन्या लोकांच्यामध्यें कांहीं विक्षिप्त व्यक्ति आहेत तशा त्या नवीन विश्वबंधुत्वाचा धर्म पाळणाऱ्या लोकांतहि नाहींत असें नाहीं. जुन्या संस्कारांच्या दडपणाखालीं चिंबून जाऊन नवीन विचारांचा डोक्यांत शिरकावच होऊं द्यावयाचा नाहीं, अशा वृत्तीच्या लोकांचा उपहासहि करतां आला असता. पण प्रो. फडके यांनीं आपल्या कादंबरींत अशा मनोवृत्ति असलेलें पात्र नमुना म्हणूनच निर्माण करावयास हवें होतें. शंभुराव किंवा उमरखान हे जुन्या गोष्टींचा गौरव करणाऱ्या लोकांचे प्रतिनिधि किंवा नमुने नव्हत. त्या एकांगी विचाराच्या दोन व्यक्ति आहेत. किंबहुना या कादंबरींतील एकही पात्र समाजांतील विशिष्ट घटकांचा नमुना म्हणूनच केवळ चित्रित केलेलें नाहीं. समाजांत दृढमूल झालेल्या एखाद्या संस्काराचा अगर परिस्थितीचा वाचकांनीं उपहास करावा

अशी इच्छा असल्यास वाचकांपुढें प्रत्यक्ष नमुना मांडून दाखविणें आवश्यक असतें. असा नमुना दाखवीत असतां आपलें पात्र एका विशिष्ट मर्यादेचा अतिक्रम करून विक्षिप्त गोष्टी करणार नाहीं अशाबद्दल लेखकानें अर्थातूच खबरदारी घेतली पाहिजे. पण समाजनिरपेक्ष व्यक्तीच निर्माण करण्यांत प्रो. फडक्यांचें खरें कौशल्य आहे असें दिसून येतें. आपण चित्रित केलेल्या पात्रांमध्यें वाचकांनीं बहुजनसमाजाच्या विशिष्ट घटकांचें प्रातिनिधिक स्वरूप पाहण्याचा प्रयत्न करणें युक्त नव्हें असेंच बहुधा प्रो. फडके यांस वाटत असावें, असें त्यांच्या पात्राचे जे निरनिराळे वैयक्तिक स्वरूपाचे स्वभावधर्म आहेत त्याचें निरीक्षण केल्यास दिसून येतें.

कथानकांतील प्रसंगांच्या अनुरोधानें सृष्टीच्या देखाव्यांचें शब्दचित्र काढावयाचें ही कथाप्रसंग अधिक परिणामकारक आणि विशेष मनोरंजक करण्याची हातोटी प्रो. फडके यांच्या प्रस्तुत कादंबरींत दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय रहात नाहीं. धेनुकुंजाला सुधीर प्रथमच गेला होता त्यावेळीं त्यानें निरनिराळ्या प्रसंगीं पाहिलेलें सृष्टीचें स्वरूप फडक्यांनीं यथायोग्य रीतीनें वर्णन करून सांगितलें आहे. " जीवित कीं स्वप्नमालिका " या प्रकरणांतील २१५ व २१६ या पानांवरील गायनाचें वर्णन अतिशय हृदयस्पर्शी आहे. १७५ पानावरील नारळीच्या झाडांचें वर्णन, १९७ पानावरील देवालयाचें वर्णन, २३५ पानावरील जत्रेचें वर्णन वगैरे वर्णनें वाचल्यावर कथाप्रसंगांची पार्श्वभूमीच अधिक उठावदार झाली आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं. प्रो.फडके यांची निरीक्षणशक्ति सूक्ष्म आणि सर्वसंग्राहक स्वरूपाची आहे याचें प्रत्यंतर त्यांचे दाखले वाचल्यास कोणासही सहज पटण्यासारखें आहे. " टेबलावरची घंटा त्यानें इतक्या निर्दयपणें दाबली कीं, कसाबाच्या सुरीच्या पहिल्या स्पर्शाबरोबर मेंढरानें ब्यॲऽऽऽ असा लांबलचक विलाप काढावा त्याप्रमाणें घंटेतून घंर्ऽऽऽऽ असा गुद्मरलेला आवाज किती वेळ तरी निघत राहिला. " " ज्यानें कधीं जन्मांत सारथ्य केलें नाहीं त्याच्या हातीं एकदम पांच बेफाम घोडयांचे लगाम दिले असतां त्याची जी अवस्था होईल ती सय्यदची झाली. " " आमच्या मुलखात पहाडांत एखादे वेळेस डोंगरी वावटळ सुटते अन् मग त्याच्या झपाट्यापुढें गरीब शेतकऱ्यांच्या

झोपड्या हालून हालून खिळखिळया होतात. तसल्या त्या झोपडीसारखी झाली माझी अवस्था ताप भरावयाच्या आधीं." "एखाद्याच्या डोळयाला आपल्या कोपराचा चुकून धक्का लागला म्हणजे ज्या तत्परतेनें दिलगिरी दाखविण्यासाठीं आपण डोळयांवर हात फिरवितों व फुंकर घालतो त्याच तत्परतेनें तो म्हणाला";– "फुलझाडांच्या ताटव्यांत एखाद्या उधळलेल्या बैलाचें पाऊल पडतांच तोंपर्यंत त्या ताटव्यांत असूनही रंगसादृश्यामुळें नजरेस न आलेलीं कितीक फुलपांखरें पंखांची मनोहर उघडझांप करीत उठलेलीं दिसावींत तसें त्याच्या मनांचें झालें होते." इत्यादि दाखले अतिशय मार्मिक असून नित्याच्या अवलोकनांतले आहेत.

कादंबरींतील कित्येक प्रसंगही विशेष आल्हादकारक आहेत. पहिल्याच प्रकरणांतील मि. ब्राउनिंगच्या कचेरींतील धांदलीचें वर्णन कोणत्याही वर्तमानपत्राच्या कचेरींत थोड्याफार प्रमाणांत अनुभवण्यास सांपडण्यासारखें आहे. सुधीर आणि मीनाक्षी यांच्याबरोबर गेलेला जेवर कुत्रा परत आल्यावर अस्लमकाकांना त्या दोघांच्याकडे बघून कांहीं तरी निवेदन करण्याचा प्रयत्न करीत होता, हें वर्णन मजेदार आहे. लक्ष्मीबाईचा नऊ दिवसांचा ताप निघून त्यांना घाम आला ही बातमी सुधीरनें शंभुरावांना सांगितल्यावर त्याच्या डोळयांतून घळघळा अश्रु वाहिले तो देखावा अतिशय हृदयस्पर्शी आहे. सुधीर आणि मीनाक्षी यांची देवालयांतील भेट, मीनाक्षीकडून तिनें स्वतः ज्यावर कशीदा काढला होता तो शेला पार्सलनें सुधीरला पाठविण्यांत आला तो प्रसंग, माईच्या अंगावर शंभुरावांनीं त्यांना यज्ञप्रसंगीं बक्षिसादाखल मिळालेली शाल घातली वगैरे कथाभाग अतिशय मनोरंजक आणि हृदय हलवून सोडणारे आहेत.

यथायोग्य वर्णनें, अनुरूप दृष्टांत, मनोरंजक कथाप्रसंग, प्रवाहशील भाषाशैली, शारीरिक हालचालींचें स्वाभाविक वर्णन, मानसिक वृत्तींचें सूक्ष्म निदर्शन वगैरे गुणविशेषांमुळें अटकेपार ही प्रो. फडके यांची कादंबरी रसज्ञ वाचकांना एक कायमचा कौतुकाचा विषय होऊन राहील.

---

# ६

# लघुकथेचें शारीरशास्त्र

उत्कृष्ट लघुकथालेखन करावयाचें झालें तर अव्वल दर्जाच्या गुरूच्या किंवा कलावंताच्या कलेंतील खुब्या आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावा असें म्हटलें तर तें विधान पुष्कळांना सकृद्दर्शनीं वेडगळपणाचें वाटेल. किंबहुना महाराष्ट्रांत इतरत्र बोकाळलेली गुरुबाजी सरस्वतीच्या पवित्र मंदिरांतही घुसडूं पाहणाऱ्या अशा उपदेशकाला कित्येक लघुकथालेखक ' जुनापुराणा ' म्हणून तुच्छही लेखण्यास कमी करणार नाहींत. पण मोपांसाची प्रख्याति म्हणजे या विधानाचा एक निरंतर महत्त्वाचा ठरणारा असा शिलालेखच होय. त्यानें संपादिलेल्या सुप्रसिद्धीचें श्रेय बऱ्याच अंशीं त्याच्या जन्मजात स्वभावगुणांनाच असलें तरी या उपजत अंगस्वभावाचें यथायोग्य संस्करण झालें नसतें तर त्याचें तेज खात्रीनें खुलून दिसलें नसतें. खाणींतून बाहेर काढलेल्या सोन्याच्या लगडी जशाच्या तशाच गळ्यांत बांधून फिरणारी स्त्री कदाचित् श्रीमंत ठरली तरी तारतम्य व अभिरुचि यांच्या दृष्टीनें ती उपहासास्पदच ठरेल. सोन्यापासून निर्माण होणारे अलंकार किंवा नाणीं हीं संस्कारांच्या अनेकविध मुशींतून बाहेर पडल्याशिवाय त्यांना उज्ज्वलता, उपयुक्तता व आकर्षकत्व यांची जोड लाभत नाहीं. मोपांसाच्या उपजत अशा अनेक अलौकिक मनोवृत्तींचेंहि असेंच संस्करण झालें. त्यानें लघुकथालेखनाची दीक्षा घेतली ती अगदीं सशास्त्र व पायाशुद्ध पद्धतीनेंच घेतली. आणि आपल्या लेखनकलेचें अध्ययन एका अव्वल दर्जाच्या गुरूपाशीं केलें. हा गुरु फ्लॉबर्ट होय. त्यानें मोपांसाला वेळोवेळीं योग्य दिशा दाखविली. मोपांसाच्या गोष्टींत वर्णनांचा जो बारकावा आढळून येतो त्याचाहि वस्तुपाठ फ्लॉबर्ट याच्या एके ठिकाणीं प्रकाशित झालेल्या एका लेखांत आहे. हा लेख त्यानें आपल्या शिष्यालाच उद्देशून लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो, " कोणत्याहि वस्तूचें वर्णन करावयाचें झाल्यास लेखकानें त्या वस्तूचें अवधानपूर्वक व एकाग्रतेनें अवलोकन केलें पाहिजे. हें अवलोकन करतांना त्या वस्तूंतील जो भाग कोणीं कधीं पाहिला किंवा वर्णिला नाहीं तो शोधून काढण्याचा त्यानें यत्न केला पाहिजे. सामान्य डोळ्यांना अगोचर आणि अव्यक्त

असणारे विशेष प्रत्येक वस्तूमध्यें कमीअधिक प्रमाणांत गुप्त होऊन राहिलेले असतात. इतरांचे अनुभव आणि वर्णनें हीं जमेस धरूनच आपण एकाद्या वस्तूकडे पहात असतों आणि त्यामुळेंच आपल्याला त्यांतील नवीनता शोधून काढण्यास अवसर सांपडतो. समजा, तुम्हांला एकाद्या ज्वालेचें किंवा एकाद्या झाडाचें वर्णन करावयाचें आहे; तर प्रथम असें करा. त्या ज्वालेकडे किंवा त्या झाडाकडे एकाग्रतेनें पहा. आणि इतका वेळ पहा कीं, परिणामीं त्या ज्वालेसारखी तीच ज्वाला आहे किंवा त्या झाडासारखें तेंच झाड आहे, इतकें तादात्म्य तुमच्या ठिकाणीं उत्पन्न व्हावें. गाड्यांच्या अड्ड्यांत उभ्या असलेल्या शेंपन्नास घोड्यांपैकीं वर्णनाकरितां निवडलेल्या घोड्याचें वर्णन अशा रीतीनें करा कीं, वाचकाला अड्ड्यांतील इतर घोड्यांपेक्षां त्या घोड्याचा बांधा व झोकनोक अगदीं वेगळा आहे अशी स्पष्ट कल्पना यावी. ''

मोपांसाच्या गोष्टींतील कोणत्याहि व्यक्तीचें किंवा वस्तूचें वर्णन वैशिष्ट्यदर्शक किंवा वैशिष्ट्यसूचक पद्धतीनें केलेलें असल्याचें आढळून येतें. याचें कारण बहुधा त्याच्या गुरूनें त्याला दिलेला हा एकाग्रतेचा कानमंत्र हेंच असावें. ज्या व्यक्तीचें किंवा ज्या वस्तूचें वर्णन करावयाचें ती तज्जातीयांपासून चटकन् वेगळी काढून घेण्यांतच कलेची खरी करामत आहे. दुतर्फा खांबांच्या रांगा असलेल्या भव्य दिवाणखान्याचें चित्र काढणारा चित्रकार प्रवेशद्वाराचे खांब व खांबांनीं केलेली मेहरप खूप मोठी दाखवितो. पाठीमागच्या मेहरपी आकारमानानें कमीकमी आणि रंगरूपानें अस्पष्ट होत होत शेवटली तर बिंदुमात्रहि उरत नाहीं. समोरासमोरचे खांब अस्पष्ट होत जाऊन अधिक जवळजवळ येत जातात आणि पहाणाराला खोलींतल्या खांबांचें फक्त अस्तित्वच भासमान होतें, पण त्यांच्या स्पष्ट रेखांकित आकृति मात्र दिसेनाशा होतात. शब्दचित्रांतील व्यक्ति किंवा वस्तु यांचें वर्णन वाचूनहि वाचकाच्या मनावर असाच परिणाम झाला पाहिजे. तें वर्णन वाचून आपल्या नित्याच्या अवलोकनांतील गोष्टी त्याच्या डोळ्यांपुढें तर उभ्या राहिल्याच पाहिजेत. पण परिचयाच्या गोष्टीनाहीं अधिक आकर्षक बनविण्याइतकी सामर्थ्यवत्ता लेखकानें निर्माण केलेल्या कलावस्तूंतील अनपेक्षित पण परिणामकारक वर्णनविशेषांत असली पाहिजे.

हल्लींच्या आपल्या लघुकथावाङ्मयाची स्थिति पाहिली तर तेथें झालेली तरुण लेखकांची गर्दी डोळयांत भरण्याइतकी महत्त्वाची आहे. दोन पिढयांपूर्वी प्रत्येक ब्राह्मण गृहस्थाच्या मुलाला मोडी लिहिणें आणि हिशेब ठेवणें या गोष्टी सक्तीनें शिकाव्या लागत. हल्लींच्या कॉलेजांतील विद्यार्थी इतक्या लघुकथा लिहितात कीं, त्यांच्यावर अशी अदृश्य स्वरूपाची सक्तीच होत असावी असा जबर संशय येतो. ही सक्ति कोणत्याहि बाह्य परिस्थितीची किंवा अन्य व्यक्तीची कदाचित् नसेल; पण त्यांची स्वतःची मनःस्फूर्ति त्यांच्यावर अशी सक्ति करीत असावी ! अशा लेखकांपैकीं सर्वांचें नाहीं तरी पुष्कळांचें लेखन मासिकांचे संपादक ' साभार परत ' करतात. प्रत्यक्ष लघुकथा लिहिण्याचे आधीं तिचें शारीरशास्त्र शिका असाच या गोष्टी परत करण्यासंबंधांत संपादकांचा गर्भित अभिप्राय असावा. अशा लेखकांनीं मोपांसाप्रमाणें लेखनकार्यांत गुरु करावयाचें ठरविलें तरी इतके गुरु उपलब्ध होणें प्रायः दुरापास्तच होईल. मात्र मानवी देह धारण करणारे जीवंत गुरु त्यांना लाभले नाहींत तरी या विषयावरील अशा गुरूंचे प्रतीक जे उत्कृष्ट ग्रंथ ते ती जागा निसंशय भरून काढतील.

ज्या लेखकांच्या गोष्टी निरनिराळ्या मासिकांकडून परत केल्या जातात त्या लेखकांचा हिरमोड तर होतोच; पण त्यांना आपल्या लेखनकार्याविषयीं निराशाहि वाटूं लागते. आपल्या गोष्टींत कोणकोणते दोष आहेत हें जाणून घेण्याचा ते प्रयत्न करीत नाहींत किंवा ' आपल्या लघुकथा वस्तुतः अत्यंत सरस आहेत, पण संपादकांना गुळाची चव काय कळणार ! ' अशीहि कित्येकांची स्वतःच्या लेखनासंबंधानें कल्पना होत असली पाहिजे. पण या लेखकांनीं आपली चिकित्सावृत्ति जागृत ठेवून आपले दोष जाणून घेण्याइतका मनाचा समतोलपणा राखला पाहिजे. संपादकांनीं गोष्टी परत करण्यासंबंधांत संपादकांकडूनहि कित्येक वेळां दोष होण्याचा संभव असतो; नाहीं असें नाहीं. पण हमखास पसंत पडेल अशाच तऱ्हेचें आपलें लिखाण बनविण्याचा लेखकांनीं प्रयत्न केल्यास त्यांच्यावर पुढें केव्हांहि खट्टू होण्याचा प्रसंग येणार नाहीं.

प्रत्यक्ष आयुष्यामध्यें आपल्याला जे अनुभव येतात तेच आपण आपल्या लघुकथांमध्यें उपयोगांत आणावेत हें खरें. पण जें जें घडेल किंवा जें जसें घडेल

तें तें तसेंच सांगत सुटणें हें कलेच्या दृष्टीनें सर्वथा गौणच होय. लघुकथा ही कांहीं डायरी नव्हे. घडलेली गोष्ट तशी कां घडली याचा कार्यकारणभाव लेखकानें आपल्या कल्पनाशक्तीनें जाणला पाहिजे. आणि या कार्यकारणभावाचा अनुरोध कायम ठेवून ती गोष्ट अधिक उठावदार रीतीनें सांगण्याकरितां लेखकानें स्वतः नवे प्रसंग निर्माण केले पाहिजेत. सत्यसृष्टींत घडलेले प्रसंग जसेच्या तसेच सांगितले म्हणजे असंभाव्यतेचा दोष पदरीं येणार नाहीं असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे; पण सत्यसृष्टींत वैचित्र्यपूर्ण व विलग प्रसंग पद्धतशीर रीतीनें घडून येतीलच असें नाहीं. शिवाय जीवनक्रमामध्यें उद्भवणाऱ्या प्रसंगांत कित्येक भाकड किंवा नित्य परिचयानें नीरस वाटणाऱ्या अशा गोष्टींचा भरणा झालेला असतो. अशा गोष्टी लघुकथेमध्यें येतां कामा नयेत. आयुष्यांत घडणारा कोणताही प्रसंग घेतला तरी तो अशा अनावश्यक बाबींत गुरफटून गेल्याचें आढळून येतें. तेव्हां जीवनांतील कोणताहि प्रसंग लघुकथेच्या कथानकाकरितां निवडून काढतांना या अनावश्यक बाबींचा सगळा पसारा नाहींसा केला पाहिजे. अशा रीतीनें साफसूफ केलेलें कथानक अधिक उठावदार आणि कार्यकारणांनीं युक्त असें होईल. असें कथानक किंवा त्यांतील प्रसंग हे प्रत्यक्ष व्यवहारांत घडलेले असतील किंवा घडतील असें जरी नाहीं तरी ते घडणें अगदीं अशक्य नाहीं अशी कथा वाचल्यानंतर मर्मज्ञ वाचकांची खात्री पटावी असाहि यासंबंधांत कटाक्ष बाळगला पाहिजे.

चित्रकार ज्याप्रमाणें कोणत्याहि देखाव्याभोंवतीं अव्यक्त स्वरूपांत स्वतःचा असा एक दृष्टिकोन उभा करतो त्याप्रमाणें लघुकथालेखकासहि कथानकाभोंवतीं अव्यक्त स्वरूपांत त्या कथानकाबद्दलची आपली भूमिका प्रकट करतां येते. सत्यसृष्टींतील प्रत्यक्ष जीवन कित्येक वेळां असमर्थनीय प्रसंगांनीं गजबजलेलें असतें. असले असमर्थनीय प्रसंग लघुकथालेखकानें सर्वतोपरी टाळलेलेच बरे. सत्यसृष्टींत अपवादादाखलच कां होईनात, पण विक्षिप्त अशा व्यक्ति असतात. अशा व्यक्तींच्या हातून कोणत्या वेळीं कोणतें आचरण होईल याचा आगाऊ कयास करणें मुष्किलीचेंच ठरेल. अशा व्यक्तींची लघुकथालेखकानें आपल्या कथानकाकरितां निवड केली तरी तीं पात्रें रंगवितांना त्यानें फार कुशलतेनें

रंगविलीं पाहिजेत. त्यांच्या ठिकाणचा विक्षिप्तपणासुद्धां पद्धतशीर राखण्याची लेखकावर जबाबदारी असते. ही जबाबदारी पार पाडणें नवशिक्या लेखकाला बऱ्याच अंशीं कठिण जातें. त्याचप्रमाणें सामान्यतः कधींहि विक्षिप्तपणा न करणाऱ्या माणसानें विक्षिप्तपणा केला असें दाखवितांना त्या विक्षिप्तपणाला पोषक असा जोरदार प्रसंग लेखकाला निर्माण करतां आला पाहिजे. नाहींतर सुसंगत स्वभावविकासाच्या दृष्टीनें कथानकांत किंवा कथेंत फार मोठा दोष उत्पन्न होतो.

एका अमेरिकन मासिकांत एका इंजिनड्रायव्हरची गोष्ट प्रकाशित झाली होती. तिचें उदाहरण या दोषाविषयीं लिहितांना एका टीकाकारानें मुद्दाम दिलें आहे. या ड्रायव्हरची प्रियकरिणी आगगाडीच्या रस्त्याजवळच एका घरांत राहात असे. एके दिवशीं ती आणि तिची मैत्रीण रुळांवरून चालत चालत एका वळणापाशीं आल्या. समोरून येणाऱ्या इंजिनड्रायव्हरला त्या लांबून दिसूं नयेत असेंच तें वळण विचित्र होतें. आगगाडी चालवीत येणारा इंजिनड्रायव्हर तिचा प्रियकरच होता. वळणापाशीं आल्यावर त्याला त्या दोघीजणी दिसल्या. येथपर्यंत गोष्ट वाचणाऱ्या वाचकाला यापुढें वर्णन केलेला प्रकार अनपेक्षितच नव्हे, तर अगदीं विसंगत व विद्रूप वाटण्यासारखा आहे. इंजिनड्रायव्हर अगदीं शांत राहिला; पण त्यानें इंजिनचा वेग मात्र दुपटीनें वाढविला. हेतु हा कीं, एवींतेवीं त्या दोघींजणींवर मृत्यु ओढवणार होताच; पण मरतांना त्यांना होतां होईतों कमी यातना व्हाव्यात! एकंदर कथानकाचा झोंक लक्षांत घेऊन कोणताहि वाचक असेंच म्हणेल कीं, ड्रायव्हरनें आपल्या प्रियकरिणीकरितां जिवाचें रान करून इंजिन थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न करावयास पाहिजे होता. पण या गोष्टीवर असा आक्षेप घेणारांना खुद्द लेखकानें गप्प करण्याचा प्रयत्न केला आहे. अशी गोष्ट प्रत्यक्ष व्यवहारांत घडली असल्याचें सांगून त्यानें आपल्या गोष्टीच्या वास्तवतेचें समर्थनच केलें. फक्त स्वतःचीं वैयक्तिक सुखदुःखेंच कथांमध्यें लिहिणारा लेखक जसा श्रेष्ठ कलावंत ठरणार नाहीं, त्याचप्रमाणें जें जें सुसतें पाहिलें किंवा अनुभविलें तें तें जसेंच्या तसेंच लिहिणारा लेखकहि निर्माणकुशल असा कलावंत बनणें शक्य नाहीं. लघुकथालेखकानें स्वतः कांहींतरी निर्माण करावें लागतें.

. घडलेल्या गोष्टी जशाच्या तशा लिहिणें शक्य असतें, व तें लेखन श्रेष्ठ कलेचें द्योतक ठरलें असतें तर लघुकथालेखक तयार करण्याचे हजारों कारखाने निर्माण झाल्याशिवाय खचित राहिले नसते ! लेखक जेव्हां कोणत्याहि प्रसंगाकडे, व्यक्तीकडे किंवा वस्तूकडे पहातो तेव्हां त्याला त्यांतील सर्व भाग परिपूर्ण स्थितींत दिसणें शक्य नसतें. प्रत्येकांतील अर्धवट भाग त्याच्या दृष्टीस पडतो. चांगला लेखक हे सर्व अर्धवट तुकडे एकत्र जोडून त्यांचें संविधान आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर करीत असतो. आणि असें करण्यानेंच अपूर्ण प्रसंग, अपूर्ण व्यक्ति आणि अपूर्ण वस्तु यांना पूर्णत्व येत असतें. आपण वर्णन केलेली व्यक्ति वैशिष्टयपूर्ण असली तरी ती अमानुष असतां कामा नये. किंबहुना मनुष्यजातीचा तो एक सर्वांगपरिपूर्ण आणि सर्वश्रेष्ठ असा नमुनाच ठरला पाहिजे. " The beautiful is that in which the many still seen as many become one. " हे कोलरिजचे उद्गार यासंबंधांत अवश्यमेव लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

आपल्याकडील मासिकांतून प्रकाशित होणाऱ्या गोष्टी वाचल्या तर त्यांत प्रणयविषयक कथाच प्रायः अधिक असतात. लेखकानें प्रणयविषयक कथा लिहूं नयेत असें अर्थातच कोणीही म्हणणार नाहीं; पण त्या लिहितांनाहि वस्तुस्थितीकडे लक्ष पुरविलें पाहिजे. इंग्लंड किंवा अमेरिका या देशांतून प्रणयकथा लिहिल्या जातात त्या वस्तुस्थितिनिदर्शन करण्याकरतांच लिहिल्या जातात. पण आपल्याइकडचे लेखक प्रणयकथा या कारणाकरितां लिहीत असतील असें वाटत नाहीं. इंग्लिश किंवा अमेरिकन गोष्टी वाचून प्रायः त्यांची नक्कल उठविण्याचाच त्यांचा हा प्रयत्न असतो. असा प्रयत्न करणारांनीं आपल्या भोंवतालचें जें परिचित जग आहे त्याकडे नजर फेंकली तर त्यांना उत्कृष्ट कथानकांचा तुटवडा पडेल असें म्हणवत नाहीं. शिवाय अशा परप्रत्ययी लेखकांनीं प्रणयकथा लिहिल्या तरी त्यांतील प्रणयभावना स्वतः त्यांना अगदीं परक्या असाव्यात यांतहि कांहीं आश्चर्य नाहीं. कॉलेजांत न जातांहि कॉलेजच्या विद्यार्थ्यांचाच नूर बाळगणारे तरुण लेखक प्रणयविषयक गोष्टी लिहून आपलें हंसें मात्र करून घेतात. कारण कथेंतील वर्ण्य विषयाचा ओनामासुद्धां त्यांना स्वतःला

प्रत्यक्षपणें किंवा इतर परिचित सहचरांसंबंधांत अनुभवाला आलेला नसतो. तरुण वय प्रणयासि अनुकूल असेंच असतें. प्रणयविषयक कथा लिहाव्या किंवा वाचाव्या असें वाटतें तें विशेषेंकरून याच वयांत होय. पण ज्या कथा लिहावयाच्या त्या आपल्या वातावरणाला, समाजाला आणि समाजाच्या मनोरचनेला शोभतील अशा तरी असल्या पाहिजेत. प्रणयभावना ही इतर भावनांप्रमाणेंच जन्मसिद्ध असते. तेव्हां तिची नक्कल करण्याचें वस्तुतः कांहींच कारण नाहीं. यासंबंधांत प्रसिद्ध कथालेखक श्री. विष्णु विनायक बोकील यांचें उदाहरण देतां येण्यासारखें आहे. " तारेचा संसार " " टपालखर्च माफ " अशा दोनचार गोष्टी त्यांनीं फारच उत्तम लिहिल्या. पण आपल्या उत्तम गोष्टींना दृष्ट लागूं नये म्हणूनच कीं काय, गालबोटादाखल त्यांनीं कांहीं गोष्टी नकली प्रणयभावनांचेंच निदर्शन करतील अशा लिहिल्या. " पूर्वजांची आठवण " ही गोष्ट त्याचें एक उदाहरण म्हणून दाखवितां येण्यासारखी आहे. आणि त्यांच्या " फोल आशा " या दीर्घकथेंत तर या दोषाचें अतिरिक्त स्वरूप फारच भडक प्रमाणांत दिसून येतें.

श्री. बोकील यांनीं कांहीं काळ बरीच लोकप्रियता मिळविली व तिचा परिणाम त्यांचा संप्रदाय उत्पन्न होण्यांत झाला. श्री. बोकील यांची नक्कल करून एकादी प्रणयकथा भरकटली कीं आपल्यालाहि लोकप्रियता लाभेल असा कांहीं लेखकांनीं समज करून घेतला असावा. " This is Boccacio without Boccacio's art ", असा शेरा एका अमेरिकन संपादकानें एका परत केलेल्या गोष्टीला दिला होता. त्याची यासंबंधांत आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. श्री. बोकील यांच्यामध्यें लेखक या नात्यानें जे गुणविशेष आहेत त्यांचा त्यांच्या नक्कलनवीसांत जवळजवळ अभावच असल्याचें दिसून येतें. अशा अनुकरणांतील पात्रें म्हणजे प्रयोगशाळेंतील मानवी देहाचे निर्जीव सांगाडेच होत. कांहीं पात्रांच्यामध्यें थोडासा जींवतपणा किंवा भावनाशीलत्व दिसून आलें तरी त्यांतहि कायम ठशाचा ठराविकपणा आणि कंटाळवाणेपणा हे दोष उत्पन्न होतात. याकरितां नवशिक्या लेखकांनीं आपलें स्वत्व विसरून कोणाचेंहि आंधळें अनुयायित्व न पत्करणेंच चांगलें असें म्हणावें लागतें. नवशिक्या

लेखकानें यशस्वी आणि नामांकित कथालेखकांकडे ढुंकूनहि पाहूं नये असा मात्र याचा अर्थ नाहीं. त्यांनीं त्यांच्या ग्रंथांचें आणि उत्कृष्ट कृतीचें अवश्य परिशीलन करावें. पण त्यांच्यापैकीं कोणाचेंहि अनुयायित्व पत्करतांना स्वत्वाला किंवा आपल्या स्वतंत्र अस्तित्वाला आणि विचारांना तिलांजलि देऊं नये. एका प्रख्यात विनोदी लेखकानें एके प्रसंगीं आपल्या प्रकाशकाला उद्देशून जे पुढील उद्गार काढले ते कोणाहि नवशिक्या लेखकानें सदैव ध्यानांत धरण्यासारखे आहेत. " माझ्या पुस्तकाच्या जाहिराती देतांना तें ओ-हेन्रीच्या धर्तीचें आहे असें मात्र कृपा करून जाहीर करूं नका, " असें त्यानें आपल्या प्रकाशकाला बजावून लिहिलें होतें. ओ-हेन्रीच्या नांवावर पुढें येण्यांत मला आनंद वाटत नाहीं, असाच त्याच्या उद्गारांचा आशय होता.

कोणतीही लघुकथा वाचल्यानंतर मर्मज्ञ वाचकाच्या मनावर तिचा कांहीं काळ परिणाम राहील तरच ती कथा यशस्वी ठरेल. वाचकाच्या मनावर ज्या मानानें कथेचा परिणाम होईल त्या मानानें त्या कथेच्या यशाचें माप मोजलें जावें, असें सांगतांना एका टीकाकारानें कथा वाचल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांनीं तिचें विस्मरण झालें तर ती कथा चांगली नाहीं असें खुशाल ठरवावें, म्हणून म्हटलें आहे. एखादी कथा परिणामकारक न होण्याचें कारण तिच्यामध्यें भावना नसतात असें नाहीं. पण त्या भावनांचें कथेतील स्वरूप किंवा त्यांची सजावट यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा मनोवेधकपणा लेखकाला उत्पन्न करतां येत नाहीं. कथाविषयाची भावनापूर्ण सजावट करण्याची कला हस्तगत झाल्याशिवाय यशस्वी कथालेखन झालें असें म्हणतां येणार नाहीं. विशिष्ट प्रसंग आणि त्यांना अनुरूप अशा प्रभावी भावना यांचा कित्येक कथांतून पूर्णपणें अभावच दिसून येतो. कै० शिवरामपंत परांजपे, श्री. वा. ना. देशपांडे इत्यादि लेखकांच्या कांहीं कथा या म्हणण्याची सत्यता पटवून देण्यास खात्रीनें साहाय्य करतील.

एका प्रसंगानें काम होईल तेथें दोनचार प्रसंगांची गर्दी उडवून देण्याचा एक दोष नवशिक्या लेखकांमध्यें बऱ्याच मोठ्या प्रमाणांत दिसून येतो. हा दोष विशद करून सांगतांना फूटबॉलच्या खेळाचा दृष्टान्त देतां येण्यासारखा आहे. फूटबॉलचें क्रीडांगण ठळक रेषांनीं मर्यादित केलेलें असतें. आणि तेवढ्या मर्या-

देंतच कोणाहि क्रीडापटु खेळाडूनें आपलें नैपुण्य प्रदर्शित करावयाचें असतें. पण एखाद्या खेळाडूनें चेंडू पायानें ठोंकरीत ठोंकरीत क्रीडांगणाच्या मर्यादेपर्यंत जावें आणि तेथेंही न थांबतां खुशाल सबंध मैदानभर चेंडूशीं धुडगूस घालीत धावावें तसाच प्रकार लघुकथालेखनासंबंधांतही होतो. आपल्या प्रसंगांची गुंफण एका उद्दिष्ट परिणामाकरितांच करावयाची असते. कित्येक वेळां ही गुंफण निष्कारण लांबविल्यानें वर सांगितलेल्या विचित्र खेळाडूसारखी लेखकाची अवस्था होते. कित्येक नामांकित व लोकप्रिय लेखकांमध्येंसुद्धां हा दोष आढळून येतो. आपणास जें जें सुचतें तें तें सर्व ' येन केन प्रकारेण ' कथेंत अंतर्भूत करण्याची अनावर इच्छाच या दोषास बहुधा कारण होत असावी. अनेक स्वादिष्ट पदार्थांनीं भरलेल्या ताटावर आपण बसलों असतांना आपल्याला मानवेल तितकेंच आपण खातों, त्याप्रमाणें कथा लिहीत असतांना अनेक सुंदर प्रकरणें आपणांस आठवलीं किंवा सुचलीं तरी कथेच्या उद्दिष्ट परिणामाला व मर्यादेला तीं मानवण्यासारखीं नसतील तर तीं बाजूलाच ठेवून दिलीं पाहिजेत.

आद्यंत आणि सजावट यांच्यांतही पुष्कळ वेळां नीरसपणा येतो. वाचकाच्या दृष्टीनें कथेचा आरंभ उद्दिष्ट परिणाम ज्या प्रसंगानें होतो त्या प्रसंगाच्या बराच आधीं झालेला असला तरी लेखकाच्या मनांत कथेचें स्वरूप ठरत असतांना तो आरंभ त्या प्रसंगानेंच होतो. कारण, तो प्रसंगच कथेला प्राणभूत असतो. अशा रीतीनें लेखकाच्या दृष्टीनें कथेची रचना उलट स्वरूपाची असते. लघुकथेंतील सर्व धागे एका विशिष्ट प्रसंगांत गुंतवून ठेवलेले असतात. त्या प्रसंगाच्या आधीं अनेक मनोरंजक हकीगती घडून येतात. त्या मनोरंजक असून वाचकाचें मन, रिळाभोंवतीं ज्याप्रमाणें दोरा गुंडाळतात त्याप्रमाणें निरनिराळया कथाभागांभोंवतीं गुंडाळून घेतात. या सर्व कथाभागांचे धागे ज्या विशिष्ट प्रसंगांत गुंतविलेले असतात, त्या प्रसंगांशीं येईपर्यंत वाचकाचें मन कथानकांत बुडून गेलेलें असतें. त्या मनाला कथाभागांशीं विलग किंवा विसंगत असणारी कोणतीही भावना त्या वेळीं स्पर्श करूं शकत नाहीं. एकादी विसंगत किंवा विसदृश भावना मनावर अशा वेळीं आघात करील तर कथेच्या रसाचा भंग होऊन जाईल. अशा वेळेला कथाभागांत परमोत्कर्षाचा म्हणून जो प्रसंग यावयाचा असतो तो फारच

प्रभावी असला पाहिजे. तो वाचकाला अनपेक्षित वाटला नाहीं तरी तो वाचून "अरे, हें आपणांस सुचलें नव्हतें. पण आपल्याला याची आधीं कल्पना व्हाव-यास हवी होती," असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले पाहिजेत. उलटपक्षीं, "छेः! अशी कल्पनाच करणें अशक्य आहे; हा प्रकार असंभाव्य आहे," असें जर वाचकाला वाटेल तर तो प्रसंग आणि त्याच्या अनुषंगानें सबंध कथाच रसविहीन ठरेल. आणि हा दोष पुष्कळांच्या हातून होतो. हा दोष घडूं नये अशी इच्छा असणाऱ्या लेखकांनीं कथानकांतील परमोत्कर्षाच्या प्रसंगाचें स्वरूप आपल्या अंतर्दृष्टीसमोर स्पष्ट उभें करावें; तो प्रसंग शक्य तितका परिणामकारक कसा करतां येईल हें विचारपूर्वक ठरवावें; आणि नंतरच कथालेखनाला आरंभ करावा.

कथेचा आरंभही वाचकाचें मन वेधून टाकील असा पाहिजे. कित्येकांचा आरंभ कहाणीच्या स्वरूपाचा होतो. कथानकाला कधींहि प्रस्तावना लिहिण्याचें कारण पडूं नये. ही प्रस्तावना लेखकानें आपल्या मनांतच वागवावी आणि तिच्या अनु-रोधानें कथानक रंगवीत जावें. कथानकांतील पात्रांचें पूर्ववृत्त सांगण्याची लेख-काला आवश्यकता असते, पण तें पूर्ववृत्त कथेंत विस्तारानें म्हणजे प्रमाणाबाहेर येणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. हा दोष टाळण्याचा उपाय म्हणजे मुख्य पात्रांच्या संवादानें किंवा मुख्य पात्राला मध्यवर्ति करून एकाद्या प्रसंगानें सुरवात करावी. अशा रीतीनें मागील वृत्तान्ताचें सूचन आणि पुढील कथाभागाचें बीजारोपण या दोन्ही गोष्टी सुरवातीलाच झाल्या पाहिजेत. आरंभ करण्याची ही कला सरावाशिवाय हस्तगत होणें शक्य नाहीं. पट्टीचा पोहणारा नदीच्या कांठावरून पाण्यांत उडी टाकतांच अवघ्या चार हातांत मध्यावर जातो तो केवळ शक्तीच्याच जोरावर जातो असें नाहीं, तर बऱ्याच दिवसांच्या सरावानें त्यानें हें कौशल्य संपादन केलेलें असतें.

स्वभावपरिपोष, पूर्ववृत्तसूचन आणि प्रसंगप्रगति हीं साधण्याचें कार्य सर्वस्वीं उत्तम संवादावर अवलंबून असतें. पात्रें केवळ क्षेमकुशलाच्या गप्पा मारीत बसतील तर या तिन्ही गोष्टींची हानि होईल. नित्याच्या व्यवहारांतील सटर-फटर बोलण्याची कथानकामध्यें कोठेंही नकल करणें श्रेयस्कर नव्हे. कित्येक

चांगले चांगले लेखकही असले संवाद लिहिणें हें आपलें स्वतंचें आणि आदर्श लघुकथेचें वैशिष्ट्य समजतात. सटरफटर संवाद लिहिणें ही त्यांच्यासंबंधांत तर एक फॅशनच पडून गेली आहे. " He wrote like an angel but talked like poor Poll " असे गोल्ड्स्मिथबद्दल त्याच्या एका भक्तानें एकदां उद्गार काढले होते. त्यांतील शब्दांची फिरवाफिरव करून आधुनिक लघुकथालेखकांच्या संवादपद्धतींत कित्येक वेळां पोपटपंची कशी केलेली असते हें सांगतांना एक टीकाकार म्हणतो, " Their characters talk like Poor Poll, but it can hardly be said that they write like an angel. " हें वर्णन महाराष्ट्रांतील हल्लींच्या कित्येक तरुण कथालेखकांना अन्वर्थकतेनें लागू करतां येण्यासारखें आहे. कथेंतील पात्रांच्या बोलण्याचालण्यांत निरुद्दिष्ट असें कांहींहि असतां कामा नये. किंबहुना कथानकाची प्रगति किंवा संविधानकाचा विकास हा जो त्यांचा मुख्य उद्देश तो त्यांनीं अतिसूक्ष्म अशा हालचालींतसुद्धां स्पष्टपणें व्यक्त केला पाहिजे; पण पात्रांच्या संवादांचें हें सामर्थ्य ओळखून फारच थोडे लेखक त्यांची तशी सिद्धता करतात. आपला प्रत्येक शब्द सहेतुक ठरावा अशीच प्रत्येक चांगल्या लेखकानें कसोशी बाळगावयास पाहिजे; पण " I like my stories best until they are written. " या जोव्हेना मॉरिसच्या स्वानुभवाच्या उद्गारांवरून ही लेखनकला किती कठिण आहे ह्याची प्रचीति सहज पटण्यासारखी आहे.

अर्थातच हें कांहीं काटेकोर नियम नव्हेत पण मोठ्या लेखकांनीं ग्राह्य मानलेल्या त्या श्रेयस्कर पद्धति आहेत. संभाव्य पण प्रभावी प्रसंग निवडणें, कथानकाच्या अनुरोधानें प्रसंगाचा बेतीवपणा राखणें, आद्यंत मनाची चटकन् पकड घेतलि इतकें सामर्थ्यशील असणें, पात्रांच्या संख्येचा आटपसर मांड मांडणें आणि संवादांतील शब्दांचा कथानकांतील धाग्यांशीं एकजीव असणें, इत्यादि गोष्टी यशस्वी लघुकथालेखन करण्यासंबंधांत केव्हांही मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत आणि त्या कोणाही मर्मज्ञ आणि विवेककुशल लेखकाला तशा मार्गदर्शक वाटल्याही पाहिजेत !

# ७

# लघुकथालेखक हरिभाऊ आपटे.

विद्युद्दीपांच्या रोषणाईनें फुलून गेलेल्या महालांत केवळ आराशीकरितां मेण-बत्त्यांचे दिवे हारीनें लावलेले असले म्हणजे त्या दिव्यांच्या प्रकाशाकडे आणि म्हणूनच त्यांच्या अस्तित्वाकडेही जमलेल्या जनसंमर्दाचें तादृश लक्ष जात नाहीं. विद्युद्दीपांच्या झगझगाटानें लोकांचे डोळे इतके नादावलेले असतात कीं, त्या डोळ्यांना त्याच्यापेक्षां प्रभाहीन प्रकाश पाहण्याची भ्रांत उरत नाहीं. सर-स्वतीच्या मंदिरांत आपल्या उद्बोधक आणि मनोरंजक कादंबऱ्यांच्यारूपानें हरिभाऊंनीं जे तेजस्वी प्रकाशदीप तेवत ठेवले आहेत, त्या दीपांच्या दिपवून टाकणाऱ्या दीप्तीमुळें हरिभाऊंच्या लघुकथारूपी मंदमंद ज्योतींकडे पाहण्याची लोकांना प्रायः बुद्धीच उरत नाहीं. शिकंदर, नेपोलियन यांच्यासारख्या धुरंधर वीरांची निरनिराळे प्रदेश काबीज करण्याची महत्वाकांक्षा जशी कधींही कमी होत नाहीं, तशीच सरस्वतीच्या एकनिष्ठ उपासकांची वाङ्मयाची सेवा कर-ण्याची प्रवृत्ति किंवा मनीषा कधींही कमी न होतां ती वाढत्या प्रमाणांत कार्य-क्षम होत असल्याचेंच आढळून येतें. आणि हरिभाऊंच्यासंबंधांत हीच गोष्ट प्रत्ययास आल्याशिवाय राहात नाहीं. कादंबरीच्या क्षेत्रांत बहुमानाचें अढळ-पद मिळविण्याकरितां त्यांचे परिश्रम चालू असतांनाच त्याला पोषक असें इतर वाङ्मयकर्तृत्व करण्याची त्यांची खटपट चालूच होती. या त्यांच्या प्रयत्नामुळेंच करमणुकीमध्यें त्यांच्या वेळोवेळीं कित्येक लघुकथाही प्रकाशित झाल्या आहेत, व त्यांतल्या कांहीं त्यांनीं स्वतःच पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्या आहेत.

स्फुट गोष्टींच्या चार भागांत मिळून ज्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांतल्या सुमारें वीस गोष्टी विशेष प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारख्या आहेत. हरिभाऊंनीं लिहिलेल्या गोष्टींचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हटला म्हणजे प्रकरणवार लिहिलेल्या विस्तृत गोष्टींचा होय. वीस गोष्टींपैकीं प्रकरणशः आणि बऱ्याच विस्तारानें लिहिलेल्या गोष्टींची मोजदाद केली तर ती अवघी तीनच

असेल. वीस गोष्टींपैकीं अवघ्या तीनच गोष्टी " कादंबरीचा सारांश " या संज्ञेस पात्र ठरण्यासारख्या आहेत. बाकीच्या सर्व गोष्टीं आजच्या चालू घडीला श्रेष्ठ प्रकारच्या लघुकथा म्हणून उल्लेखण्यास फारसा प्रत्यवाय येणार नाहीं.

विषयप्रतिपादनाच्या किंवा लेखनपद्धतीच्या अनुरोधानें लघुकथांचें वर्गीकरण करण्याची परिपाठी पाश्चात्य टीकाकारही अमान्य करीत नाहींत. किंबहुना विनोदात्मक, वर्णनात्मक, विचारात्मक, विवेचनात्मक आणि रूपकात्मक अशा धर्तीचें वर्गीकरण करण्याचा सामान्यतः सर्वत्र प्रघात आहे. या वर्गीकरणाच्या अनुरोधानें हरिभाऊंच्या स्फुट गोष्टींचें विवेचन करणें अर्थातच योग्य होईल. विनोदात्मक गोष्टींच्या सदरांत " डिस्पेप्शिया," "पुरी हौस फिटली," " पक्की अद्दल घडली, " आणि " खाशी तोड " या कथांचा समावेश करावा लागेल. डिस्पेप्शिया ही गोष्ट सुमारें आठ पानांची आहे. कृष्णराव वकिलांना आपली प्रकृति बिघडली आहे असें नेहमीं वाटत असे. त्यांचे स्नेही गणपतराव हे डॉक्टर होते. त्यांना कृष्णरावांनीं आपली प्रकृति दाखविली. गणपतरावांनीं लगेच चिठ्ठी लिहून कळविलें कीं " कळविण्यास फारच वाईट वाटतें कीं, ज्या रोगानें आपणास ग्रासलें आहे, असा तुम्हांला आजपर्यंत निव्वळ संशय होता, तो रोग खरोखरच तुम्हांस त्रास देत आहे. " प्रत्यक्ष डॉक्टरची चिठ्ठी हातांत पडल्यावर आपल्यास डिस्पेप्शिया झाला आहे, अशी कृष्णरावांची पुरी खात्री झाली. इतके दिवस त्यांची बायको राधाबाई व मित्र गणपतराव यांनीं त्यांच्या तक्रारींकडे लक्ष न देतां उलट कित्येक वेळां हसून त्यांची चेष्टाच केली होती ! चिठ्ठी मिळाल्यावर कृष्णरावांनीं अंथरूण धरलें आणि शेवटच्या निरवानिरवीला सुरवात केली. शेवटीं बायकोनें दुसऱ्या एका डॉक्टरला बोलावून आणलें; त्यांनीं प्रकृति तपासून म्हटलें, 'तुम्हांला कांहीं झालेंच नाहीं, डिस्पेप्शिया म्हणता, पण त्याचें एकही लक्षण दिसत नाहीं. जीभ थोडी खराब दिसते. पण अशी जाग्रणानें किंचित् अजीर्ण होऊनही दिसते. कांहीं नाहीं, तुम्ही जरा दोनतीनदां पौष्टिक पदार्थ खाऊन सकाळीं, संध्याकाळीं चारदोन मैलाची रपेट करून येत जा. " हे डॉक्टर निघून गेल्यावर गणपतरावांकडून चिठ्ठी आली! ती चिठ्ठी कृष्णरावांच्या हातांत येतांच " अशा प्रसंगीं आपण स्वतः येण्याचे टाकून चिठ्ठ्या पाठवितो

आहे. कसला केही दगडाचा! सगळा पैसा! लेका, फी घे. नको कोणी म्हणतें आहे का काय?" असें म्हणत त्यांनीं ती फोडली. "प्रिय मित्रा, माझ्या हातून काल एक मोठी गाढवासारखी चूक झाली; तुला पाठविण्याकरितां लिहिलेली चिठ्ठी दुसऱ्याच एका रोग्याच्या पाकिटांत जाऊन त्यांच्यासाठीं लिहिलेली तुझ्याकडे आली. संध्याकाळीं तुझ्याकडे जेवायला राहण्याच्याच बेतानें येईन." असा त्या चिठ्ठींत मजकूर होता. ठरल्याप्रमाणें गणपतराव कृष्णरावांकडे गेल्यावर थट्टामस्करी व्हावयाची ती झालीच. आपणास डिस्पेप्शिया झाला नाहीं असें वाटूं लागलें तरी त्यानें तसें स्पष्टपणें कधींच कोणाजवळ, त्यांतून राधाबाईजवळ तर नांवसुद्धां नको, कबूल केलें नाहीं. अजूनसुद्धां तो असें म्हणतो कीं, "गणपतरावांची व इतर सर्व डॉक्टरांची चूक आहे, मला डिस्पेप्शिया आहेच." असें या गोष्टीचें शेवटचें वाक्य आहे.

"पुरी हौस फिटली," या गोष्टीचा विस्तार दहा पानेंच आहे. जानकी बाईनें दुसऱ्याची नथ मागवून आणून घातली. दुर्लक्ष्यामुळें ती नथ हारवली आणि कांहीं केल्या सांपडेना! संसार पडला गरीबीचा. त्यामुळें नथ ताबडतोब भरून देणें अशक्य होतें. शेवटीं कशीबशी काटकसर करून नथेसारखी नथ केली आणि ज्या बाईकडून नथ आणली होती, तिची तिला परत करून टाकली. कांहीं दिवसांनीं जानकीबाई आपल्या घरांतील झाडलोट करीत असतां, ती नथ एका उंदराच्या बिळांत सांपडली. आणि दुसऱ्याची नथ फेडण्याकरितां केलेली काटकसर अशी पथ्यावर पडून जानकीबाईला स्वतांचीही एक नथ झाली.

"पक्की अद्दल घडली" ही गोष्ट अवघ्या पांचच पानांची आहे. एका मारवाड्याच्या मुलाला आपण आतां धंद्यांत निष्णात झालों, अशी फुशारकी वाटत होती. ही त्याची वृत्ति त्याच्या बापाच्या ध्यानांत आली. मुलाला ताळ्यावर आणण्याकरितां कांहींतरी उपायांनीं अद्दल घडविली पाहिजे, असें बापाला वरचेवर वाटूं लागलें. त्यानें आपल्या मुलाला एकदां मुंबईहून महाबळेश्वरास कांहीं जवाहीर पोहोंचविण्याकरितां पाठविलें. बापानें आपल्या एका जुन्या मित्राची प्रवासांत मुलापासून तें जवाहीर लांबविण्याकरितां रवानगी केली. मुलाच्या निष्काळजीपणामुळें जवाहीराची चोरी झाली. मुंबईस परत येऊन मुलानें बापाला

झाला प्रकार सांगितला आणि आपल्या निष्काळजीपणाबद्दल पश्चात्ताप प्रदर्शित केला. त्यानें बापास म्हटलें, " बाबा, मी झटक्यासारखा फसेन अशी तुमची खात्री होती तर मग एवढया किंमतीचें जवाहीर तुम्हीं माझ्या स्वाधीन कां हो केलेंत ? " यावर बापानें उत्तर दिलें, " तुम्हीं कालचीं पोरें जशीं कच्चीं तशींच आम्हीं म्हातारीं माणसेंही असतों असें वाटतें ना रे तुम्हांला ? अरे वेड्या, ते जवाहिर खोटें होतें."

' खाशी तोड ' ही चौथी विनोदी गोष्ट सात पानांची आहे. वामनराव नांवाचे एक गृहस्थ होते. त्यांना जेवतांना, कपडे करतांना, आंघोळ करतांना, किंबहुना बसतां उठतां, कांहींतरी किरकिर करण्याची संवय होती. या त्यांच्या स्वभावामुळें, त्यांच्या बायकोला बराच त्रास होत असे. या स्वभावामुळें वामनराव आपल्या मुलांशींहि कित्येक वेळां खाष्टपणा करीत. त्यांची बायको आनंदीबाई, हिचे बंधु केशवराव यांनीं हा प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला. वामनरावाला शेराला सव्वाशेर हा न्याय अमलांत आणून ताळ्यावर आणला पाहिजे असा त्यांनीं बेत केला. त्यांनीं वामनरावांना एक पत्र पाठविलें. " आमचे काशींतील चुलतचुलते काशीनाथ काका हें पत्र पोहोंचेल त्याच दिवशीं बहुधा तेथें येतील. त्यांचे डोळयांस कांहीं विकृति झाली आहे, व त्यांस हींव येत असतें. त्याला उपाय करण्याच्या हेतूनें ते तिकडे जात आहेत. कदाचित् ते तेथें चार दिवस औषधपाणी घेण्याकरितां राहतील. ' पत्राप्रमाणें काशीनाथकाका आले. वामनराव रात्रीं आठ वाजतां घरीं आले. पायाला कांहीं सामान लागून ठेंचाळल्यामुळें वामनराव बायकामुलांवर खेंकसण्याच्या बेतांत होते. इतक्यांत काशीनाथकाका दुलई पांघरून कोपऱ्यांत पडले होते, ते ओरडले ' वामनराव ' तेवढा दरवाजा लावून घ्या पाहूं. वारा कोण सुटलाय् ? पण घरांत एकालादेखील दार लावायाचं सुचत नाहीं. थंडी कोण वाजते ? आणि ही खालीं कसली गडबड ? मथू, अगोदर गणूला उगी कर पाहूं. मी जर इथें राह्यला पाहिजे, तर मी असेपर्यंत त्यानें हूं कां चूं करतां कामा नये. एकसारखें रे रे चाललें आहे. आणि काढा झाला का ? नसेलच केलास तूं अजून. पण झाला असला तर आण पाहूं. ऊन ऊन घेतला तर कांहीं घाम तरी येईल. ' या ओरडाओरडीपुढें वामनरावाचें ओर-

डणें जागच्याजागींच जिरलें. चारपांच दिवस काशीनाथकाकांचा वामनरावांच्या घरीं मुक्काम होता. तेवढ्या अवधींत त्यांनीं वरीलप्रमाणें किरकिर करण्याचा अगदीं सपाटा चालविला. आनंदीबाईनीं आपल्याला या किरकिरीचा कांहीं त्रास होत नाहीं, कारण लग्न झाल्या दिवसांपासून आपल्याला ती परिचयाची झालेली आहे असें एकदां सहज उद्गार काढले. तेवढ्यानें प्रकाश पडून वामनरावांना आपले दोष हळूहळू समजून आले. पांचवे दिवशीं काशीनाथकाकांनीं आपला मुक्काम हालविला. त्या दिवशींच संध्याकाळीं केशवराव दाखल झाले. थोडा वेळ काशीनाथकाकांच्या किरकिऱ्या स्वभावाविषयीं बोलणें झालें. केशवरावांच्या आवाजांत आणि काशीनाथकाकांच्या आवाजांत वामनरावांना एकदम साम्य आढळून आलें, व त्यांनीं आपला संशय बोलून दाखविला. तेव्हां केशवरावांनीं उत्तर दिलें, ' मला वाटतें केशवरावांचेच काशीनाथकाका बनले असतील ? मी दोन वर्षांपूर्वीं येथून गेलों तेव्हांच तुम्हांला सुधारण्याची ही खाशी तोड मला सुचली होती. पण कांहींना कांहीं तरी कारण होऊन मला इतक्या अवकाशांत मुळींच इकडे यावयाला झालें नाहीं. पण मीं दिलेल्या त्रासाबद्दल राग न मानतां मला घरांत पाऊल टाकूं द्या म्हणजे झालें. केशवरावांना दुसरे दिवशीं राहण्याची सवड नव्हती, म्हणून वामनरावांनीं त्यांस रात्रीं मेजवानी दिली व जेवण्याच्यावेळींच त्यांनीं आपला स्वभाव किती सुधारला आहे याविषयीं केशवरावांची खात्री केली.

या सारांशावरून आणि अवतरणांवरून हरिभाऊंच्या चार विनोदी कथांची मांडणी कशा प्रकारची आहे, याची स्थूलशी कल्पना वाचकांना झाल्याशिवाय राहाणार नाहीं. विनोदात्मक लघुकथेला नांवाची अन्वर्थकता प्राप्त होण्यास गोष्टींतील विनोद प्रसंगनिष्ठ असावा लागतो. आज इतर थोड्या लेखकांची विनोदी लघुकथालेखक म्हणून प्रसिद्धि आहे. पण त्यांच्या लघुकथा वाचल्यावर त्यांतील विनोद प्रसंगनिष्ठ नसून शब्दनिष्ठ असल्याचें आढळून येतें. गोष्टींमध्यें नियोजित केलेलीं यच्चयावत् पात्रें समाजांतील विशिष्ट स्वभावाच्या लोकसमुदायाचे नमुने ( types ) म्हणूनच निर्माण केलेलीं असतात. समाजाला दर्पणवत् वाटणारी लघुकथांच्या वातावरणाची सृष्टि कोणत्याही रीतीनें अस्वाभाविक ठरणार नाहीं, अशी प्रत्येक लघुकथालेखकानें खबरदारी बाळगणें आवश्यक

असतें. सामान्य लोकांच्या आयुष्यक्रमांत हरिभाऊंनीं आपल्या लघुकथांतून निर्माण केलेलें प्रसंग थोड्याफार फरकानें उद्भवण्याचा संभव किती आहे हें समाजाचें सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या वाचकाला समजावून सांगण्याचें अर्थात्‌च कारण नाहीं. सामान्य लोकांच्या आयुष्यक्रमांत प्रसंगांची व घटनांची गर्दी बरीच असते. भाषणाचा आणि शाब्दिक वटवटीचा डोलारा कित्येक वेळां नसतोच म्हटलें तरी चालेल. कित्येक विनोदी लघुकथालेखकांचीं पात्रें सर्वसामान्य समाजाचे प्रतिनिधि म्हणून पुढें येतात; पण अलंकारिक आणि कोटिप्रधान भाषा बोलतां बोलतां त्यांच्यासंबंधांत कोणत्याहि प्रसंगाचें विशेषसें वैशिष्ट्य उरत नाहीं. विनोद उत्पन्न होतो तो भाषेमुळें होतो, अशी जी कित्येकांची निष्कारण कल्पना झाली आहे तीच या अनवस्थाप्रसंगाच्या मुळाशीं आहे. भाषेमध्यें शाब्दिक कोट्या लढवून पात्रांचीं संभाषणें कितीही चटकदार बनविण्याचा प्रयत्न केला तरी संबंध लघुकथेंत प्रसंगामुळें उत्पन्न होणाऱ्या विनोदाची जर उणीव असेल तर ती लघुकथा विनोदात्मक ठरणें दुरापास्त होईल. "डिस्पेप्शिया," "पुरी हौस फिटली," "पक्की अद्दल घडली," आणि "खाशी तोड," या चारही विनोदात्मक लघुकथांतलि भाषा कशा प्रकारची आहे, त्याची कल्पना त्याच लघुकथांतून कांहीं अवतरणें उद्धृत केलीं आहेत त्यांवरून येण्यासारखी आहे. लघुकथची भाषा अगदीं बोलल्यासारखी असावी असा जरी प्रत्यक्ष टीकाशास्त्राचा नियम नसला तरी पाश्चात्य लघुकथालेखकांच्या गोष्टी वाचल्या असतां भाषा शक्य तितकी प्रवाहशील, साधी आणि सोपी लिहिण्याची त्यांची पद्धत खात्रीनें अनुकरणीय ठरल्याशिवाय राहणार नाहीं. किंबहुना भाषेसंबंधांत असा कटाक्ष ठेवूनच भाषा लिहिली गेली पाहिजे. हरिभाऊंच्या कथांतील चटकदारपणाचें रहस्य पुष्कळ अंशीं त्यांच्या बालबोध लेखनशैलींत आहे.

लघुकथेचा सर्वांत मोठा गुण जर कोणता असेल तर तो वाचकांना शेवटपर्यंत गोष्टींचे पर्यवसान कळूं न देणें हा होय. मध्यवर्ति कल्पनेची अथवा प्रसंगाची अखेरी कशामध्यें होणार आहे याचा वाचकांना सुगावा लागूं न देण्यांतच लेखकाचें खरें कौशल्य असतें. हें कौशल्य प्रत्येक लेखकाच्या अंगीं असणें शक्य

नसतें आणि म्हणूनच कोणत्याही वाङ्मयांत निवडक आणि श्रेष्ठ प्रकारच्या लघु-कथा नेहमीं संख्येनें कमीच असतात. मराठी वाङ्मयांत तर शेंकडा ऐशीं लघुकथांचा सांचा अगदीं ठरून गेल्यासारखा झाला आहे. एकाद्या तरुणाची समवयस्क तरुणीशीं गांठ पडावयाची, दोघेंही प्रेमबद्ध होऊन प्रेमचेष्टा करावयास लागावयाचीं, वडील माणसांची दोघांपैकीं कोणालाच जर आडकाठी झाली नाहीं तर दोघेही विवाहबद्ध होऊन मंगलाष्टकांच्या जयघोषांत गोष्टींचें पर्यवसान व्हावयाचें, किंवा दोघांपैकीं कोणा एकाच्या बाबतींत वडील मंडळींनीं मोडता घातला तर आत्महत्येच्या अगर मृत्यूच्या योगानें प्रियकरानें किंवा प्रियकरिणीनें या जगांतून नाहींसें व्हावयाचें, आणि गोष्ट दुःखान्त व्हावयाची असा ठराविक प्रकार मराठी लघुकथांच्यामध्यें स्पष्टपणें दृष्टीस पडतो. प्रणयाच्या भावनेशिवाय आयुष्यामध्यें इतर ज्या कोमल भावना असतात, त्या भावनांच्यावर गोष्टींतील प्रसंगांची उभारणी करण्याची कल्पना अद्यापसुद्धां मराठी वाङ्मयांत विशेष प्रसार पावलेली नाहीं. हरिभाऊंच्या मृत्यूनंतर लघुकथा हा वाङ्मयप्रकार विशेष लोकप्रिय झाला. पण आजच्या घडीला जरी लघुकथा-वाङ्मयाकडे दृष्टि फेकली तरी प्रणयाच्या गोष्टींव्यतिरिक्त अद्यापही दुसऱ्या कसल्याच प्रकारच्या गोष्टी मराठी वाङ्मयांत विशेष प्रामुख्यानें लिहिल्या जात नाहींत असेंच दिसून येईल. जुन्यांतले जुने म्हणून आज तरुण पिढी ज्यांचा उल्लेख करते त्या हरिभाऊंच्यासंबंधांत मात्र याच्याउलट प्रवृत्ति दिसून आल्याशिवाय राहात नाहीं. हरिभाऊंच्या वेळेला लघुकथा या वाङ्मयप्रकाराला वेगळें वैशिष्ट्य किंवा एक विवक्षित दर्जा प्राप्त झालेला नव्हता. तरीसुद्धां आपल्या गोष्टींच्या द्वारें हरिभाऊंनीं आदर्श लघुकथेचे नमुने वाचकांना सादर केले असेंच कोणीही अभिमानानें म्हणेल!

वर्णनात्मक अशा हरिभाऊंनीं सुमारें सहा लघुकथा लिहिलेल्या आहेत. त्यांतली एकही गोष्ट तरुणतरुणींच्या विवाहाप्रीत्यर्थ लिहिण्यांत आलेली नाहीं ही बाब विशेष प्रामुख्यानें लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. पतिपत्नींचा संसार, बहीणभावंडांचें प्रेम, मातृवात्सल्य, संवयीचा परिणाम, चोराला सोडून संन्याशाला सुळीं देण्याचा जगांत नेहमीं घडून येणारा प्रकार, वगैरे सामान्य वाचकाच्याही परि-

च्याचे असणारे अनुभव हरिभाऊंनीं या वर्णनात्मक कथांतून यथातथ्यरीतीनें रेखाटलें आहेत.

" गरीब बिचारी पार्वतीबाई " या गोष्टींत हरिभाऊंनीं एका विस्कटलेल्या संसाराची घडी पुन्हां पूर्ववत् कशी बसली हें दाखविलें आहे. दत्तोपंत नांवाचा एक गृहस्थ आपला सर्व उद्योगधंदा सोडून एका नाटकमंडळीच्या नादीं लागला. नाटकमंडळीचे आपण मॅनेजर आहों अशा डौलांत तो वागत असे. पण नाटकमंडळींतील लोक त्याला अतिशय तुच्छ लेखीत असत. त्याच्याकडून लागेल तितकें काम करून घ्यावें आणि त्याला कांहीं फुकट पास द्यावेत असा नाटक मंडळींतील लोकांचा क्रम होता. दत्तोपंताच्या या विक्षिप्त वागण्यामुळें घरीं त्याच्या बायकामुलांची मात्र उपासमार होत असे. शेजारीं रंगोपंत नांवाचा एक सद्गृहस्थ राहात असे, तो या मंडळींना मदत करी. दत्तोपंत अधूनमधून घरीं येत असे, आणि बायकोनें उसनें धान्य आणून शिजवलेलें अन्न बेशरमपणानें खात असे. रंगोपंतांचें खाऊन रंगोपंताला शिव्या देण्यासुद्धां तो कमी करीत नसे. तीनचार दिवसांच्या उपासानंतर दत्तोपंताच्या थोरल्या मुलानें एकदम जास्त खाल्लें, त्यामुळें एक असाध्य रोग होऊन लवकरच तो मुलगा मृत्यु पावला. दत्तोपंतानें या सुमारास घर वर्ज्यच केलें होतें. कंपनीच्या नव्या खेळाकरितां पडदे लावीत असतांना एका अवघड जागेवरून तो खालीं पडला व त्यांत त्याचा पाय मोडला. रंगोपंतानें पैसे खर्चून अनेक उपाय केले, पार्वतीबाईनें शुश्रूषेचे अहोरात्र श्रम केले, आणि दत्तोपंत बरा झाला.

" दोन चित्रें–सकाळीं आणि संध्याकाळीं " ही गोष्ट दुःखप्रसवी आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष दृश्य पाहिलेल्या मनुष्यानें निवेदन करावी तशी सांगितलेली आहे. एक गृहस्थ सकाळीं सहल करावयास गेला असतांना त्यानें एक रमणीय दृश्य पाहिलें. एक तरुण माता आपल्या अपत्याला प्रेमभरानें खेळवीत होती. वात्सल्याच्या भावनेशिवाय त्यावेळीं त्या स्त्रीच्या हृदयांत दुसऱ्या कसल्याही भावनेला थारा नव्हता. ती त्याला आपल्या दोन्ही हातांनीं धरून वर उंच करीत होती, व 'पडला रे पडला,' म्हणून पुन्हां खालीं आणीत होती. तें मूल खदखदां हसत होतें. त्या मुलाला खालीं वर करून हंसविण्यांत गर्क झालेल्या त्या तरुणीचा पदर

अस्ताव्यस्त झाला. शेवटीं तो पार दूर झाला. तरी तिला भान नाहीं. मुलगा हंसे, त्यावेळीं त्याच्या तोंडांतून लाळ गळे, ती तिच्या तोंडावर पडली तरी ती चटकन् हातानें पुसून, " हा लाळ्या " एवढेंच म्हणून त्याला पुन्हां उंच करी; पण संध्याकाळीं त्याच ठिकाणीं बरोबर उलट असा प्रकार घडला. त्या मुलाला सुशी किंवा डबा म्हणून म्हणतात तो रोग होऊन तो मुलगा मृत्यु पावला! सकाळवाच गृहस्थ पुन्हां संध्याकाळीं त्या ठिकाणीं गेला तेव्हांचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें केलें आहे. " ज्या खिडकींत मीं तिला इतक्या आनंदांत पाहिली, त्याच खिडकीजवळ आतां ती आक्रोश करीत बसली होती. तिचें कुंकूं अगदीं पुसून गेलें होतें. तिचा सर्व केशकलाप अगदीं विस्कळित होऊन मोकळा झाला होता. तिचें तोंड अश्रुजलानें अगदीं मलिन झालें होतें. तिचे ते पाणीदार डोळे रडूनरडून अगदीं मुठीसारखे झाले होते."

यानंतरची वर्णनात्मक गोष्ट म्हटली म्हणजे " गोदावरीनें काय केलें " ही होय. गोदावरी ही एक बारा वर्षांची मुलगी होती. तिचा दहा वर्षांचा भाऊ गोविंदा याचे डोळे अधु होऊन कांहीं दिवसांनीं त्याला अगदीं दिसेनासें झालें. भायखळा येथें जाऊन डॉ. गोपाळरावांचे औषधोपचार केले तर दृष्टि पुन्हां परत येईल असा पुष्कळांनीं सल्ला दिला. आईबापांचा संसार अतिशय गरीबीचा तेव्हां गोपाळरावांची फी देण्याइतकी त्यांची अर्थात्च ऐपत नव्हती. अशा स्थितींत आईबापांना न कळत एके दिवशीं पहांटें गोदावरीनें गोंदूस बरोबर घेतलें आणि भायखळ्यास प्रयाण केलें. डॉ. गोपाळरावांनीं परोपकारबुद्धीनें त्या दोघांनाही आपल्या घरीं ठेवून घेतलें, आणि योग्य औषधोपचार करून कांहींही मोदबला न घेतां गोंदूचे डोळे बरे केले. पुढें गोदावरी ही डॉ. गोपाळरावांची सून झाली!

एका शेटजीच्या मुलाला आपल्या वडिलांच्या गैरहजेरींत पेटींतून पैसे चोरण्याची संवय लागली. पण मुलाचा प्रारंभीं संशय न येतां दुकानचा मुनीम बळवंतराव यांचेवर चोरीचा आरोप लादण्यांत आला. बळवंतरावांवर नोकरी सोडून घरीं बसण्याचा प्रसंग आला. शेटजीचा मुलगा चोरी करतो हें बळवंतरावांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें. शेवटीं शेटजींनाही आपल्या मुलाची कारवाई समजून आली व आसन्नमरण असतांना शेटजींनीं बळवंतरावांना बोलावून आणून त्यांची क्षमा

मागितली व आपल्या पश्चात् आपल्या सर्व जिंदगीचे त्यांना व्यवस्थापक नेमलें. हा वृत्तांत " होतें तें असेंच " या गोष्टीमध्यें सांगितला आहे.

" उपकारांची उत्तम फेड " या गोष्टीचें कथानकही जवळ जवळ असेंच आहे. एका शाळामास्तरांनीं नारायण नांवाच्या एका गरीब विद्यार्थ्यास आश्रय दिला आणि कांहीं दिवसांनीं त्याला एका शेटजीच्या पेढीवर नोकरी लावून दिली. नारायणानें पेढीवरून पैसे लांबविण्यास सुरवात केली, आणि आपल्या पापाचें खापर शहाजोगरीतीनें मास्तरांच्या माथीं फुटावें अशी व्यवस्था केली. शेवटीं मास्तरांच्यावर आळ आलाच. कोर्टामध्येंही मास्तरांच्याविरुद्ध सर्व पुरावा सिद्ध झाला. आणि मास्तर आरोपी ठरणार इतक्यांत एका मुलाच्या पालकानें ऐन वेळीं येऊन साक्ष दिली त्यामुळें मास्तरांच्यावरील आरोप नाशाबीत झाला. नारायणाचा तपास होऊन तो सांपडला व त्यास योग्य शासन झालें.

लहान मुलें एक अपराध लपविण्याकरितां दुसरे अनेक अपराध कसे करतात याचा दाखला हरिभाऊंच्या " हरवलेली किल्ली " या गोष्टींत पहावयास मिळतो. राजारामाला घरांतून पैसे चोरून बाहेर जिन्नस विकत घेऊन खाण्याचीं संवय जडली. घरांत पैसे चोरतां न आल्यामुळें त्याला एकदां आपलें पुस्तक गहाण ठेवावें लागलें. आपल्या आजीच्या फडताळांत पैसे असतात हें राजारामाला ठाऊक असल्यामुळें त्यानें त्याच दिवशीं आजीच्या फडताळाची किल्ली चोरून ठेवली. किल्ली हरवल्याचें आजीच्या ध्यानांत आल्यावर सगळ्या घरांत त्याचा बभ्रा झाला. शाळेंतील मास्तरांनाही इतर मुलांच्याकडून राजारामानें पुस्तक गहाण ठेवल्याचा सुगावा लागला. शाळेंत राजारामाला चोप बसला आणि त्याच्या घरीं जाऊन मास्तरांनीं सर्व प्रकार त्याच्या वडिलांना निवेदन केला. राजारामाला झाल्या प्रकारामुळें बरीच जरब बसली आणि त्याची चोरीची संवय कायमची नाहींशीं झाली.

हरिभाऊंच्या वर्णनात्मक लघुकथांची रूपरेखा ही अशा प्रकारची आहे. कित्येक लघुकथालेखकांच्या गोष्टींमधील सृष्टि त्यांच्यामधील अस्वाभाविक वर्ण्य विषयां-मुळें वाचकांना जशी दूरची आणि अननभूत वाटते तशी हरिभाऊंची कल्पनासृष्टि वाटत नाहीं. हरिभाऊंचा मनुष्यस्वभावाचा अभ्यास अतिशय मार्मिक, सूक्ष्म

आणि सहानुभूतियुक्त असा होता, हेंच यांचें प्रमुख कारण होय. सत्यसृष्टींत वावरणाऱ्या हजारों लोकांच्या अंतर्गत चालचर्येचें आणि मनःप्रवृत्तींचें ज्याला यथायोग्य अवलोकन करतां येतें, आणि त्यांचें हुबेहूब शब्दचित्र वठविण्याइतकी ज्याच्यामध्यें प्रतिभाशक्ति आहे, तो मनुष्य आपली कल्पनासृष्टि प्रत्यक्ष वस्तु-सृष्टीशीं कधींहि विसंगत होऊं देत नाहीं. "त्यांची निरीक्षणशक्ति हृदयक्रिये-प्रमाणेंच एकसारखी चालत असे. ते कोणाशींहि बोलत असले किंवा कांहींही करीत असले तरी त्यांची ही शक्ति कधींही स्वस्थ नसे. त्यांच्या मेंदूवर अनेक गोष्टींचें ओझें असे. बाकींचें ओझें सर्व वरवर असावयाचें. अगदीं मेंदूशीं लगट-करणारा बोजा म्हणजे कादंबऱ्याच्या कथानकांचाच होय. वरचे कपडे थोडे मळा कट असले तरी चालतील, पण अंगाबरोबर असलेला कपडा स्वच्छ असल पाहिजे, त्याप्रमाणें इतर कोणताही व्याप असला तरी आपलीं कथानकें परीट-घडीसारखीं स्वच्छ ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असे आणि कथानकास परिपोषक अशी सामुग्री जमवितांना त्यांची निरक्षिणशक्ति आल्यागेल्याचा समाचार घेत-ल्याशिवाय राहात नसे. पुष्कळ वेळां एकाद्याशीं बोलतांना त्याच्या चेहेऱ्याचें, स्वभावाचें व अंतर्गत विकारांचें ते सूक्ष्म निरीक्षण करीत असावे असें वाटें. असें ते निरखून पाहूं लागले म्हणजे "पहा हो, मला एकाद्या कादंबरींत उतरून-बितरून घ्याल," असें त्याच्या निकट सहवासांतील माणसें त्यांना म्हणत असत. आणि त्यांत अर्थ नव्हता असेंही नाहीं." हरिभाऊंचे चरित्रकार कै. ती. रा. बापूराव आंबेकर यांनीं आपल्या पुस्तकांत केलेल्या वरील वर्णनाचा यासंबंधांत अवश्यमेव निर्देश करण्यासारखा आहे.

"Painting is mute poetry while poetry is a speaking picture", असें एका आंग्ल टीकाकारानें शब्दचित्र व रंगचित्र यांची तुलना करतांना उद्गार काढले आहेत. रंगचित्रामध्यें शब्दचित्रांतील अर्थ-वाहकता मूकस्थितींत वास करीत असते. शब्दचित्रांतील अक्षरांच्या साहाय्यानें निर्माण होणारी सृष्टि रंगचित्रांत केवळ रंगसाहित्याच्या कौशल्यपूर्ण योजनेनें सूचित झाल्याशिवाय राहात नाहीं. याच्याउलट शब्दचित्र हें एक बोलकें रंग-चित्र असतें, रंगचित्रांत सूचित होणाऱ्या भावना शब्दचित्रांत योग्य शब्दांच्या

योजनेनें निदर्शित झालेल्या असतात, असा वरील इंग्रजी अवतरणाचा आशय आहे. हरिभाऊंच्यासंबंधांत हें विधान निर्विवादरीतीनें पुढें मांडतां येण्यासारखें आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें शब्दचित्र काढतांना त्यांतील स्वभाविकपणा तिळमात्र कमी होऊं नये अशी हरिभाऊंनीं खबरदारी बाळगलेली दिसून येते. अंतर्दृष्टीसमोर उभा केलेला कोणताहि प्रसंग आपल्या अद्वितीय प्रतिभासामर्थ्याच्या साहाय्यानें कागदावर जशाचा तसा उठवून दाखविण्याची कला ज्याच्या अंगीं पूर्णांशानें वास करीत असते तोच लेखक उत्कृष्ट दर्जाचा लघुकथालेखक ठरण्याचा पुरेपूर संभव असतो. ही कला केवळ अभ्यासानें किंवा पाहिलेल्या प्रसंगांची जन्मभर टिपणें करून ठेवण्यानें साध्य होण्यासारखी नाहीं, हें कोणासहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल. बोलतां येत असलें तरी वक्ता होण्यास वक्तृत्वकला साध्य असावी लागते. त्याचप्रमाणें प्रसंगांचें टिपण करतां आलें तरी तें सुबकपणानें, स्वाभाविक रीतीनें आणि चटकदार पद्धतीनें मांडतां येण्याची अवघड आणि असाधारण कला अंगीं नसेल तर त्या टिपणांचा यत्किंचितही उपयोग व्हावयाचा नाहीं. हरिभाऊ पाहिलेल्या प्रसंगांचें टिपण करून ठेवीत होते, या सामान्य गोष्टीवरच विशेष भर देण्याचें कारण नाहीं. प्रसंगांची मनोवेधक मांडणी करण्याची त्यांची हातोटी, आबालवृद्धांना सारखीच मनोरंजक आणि उद्बोधक होईल अशी त्यांची विवेचनशैली, आणि वाचकांना सात्त्विक आनंदाच्या उकळ्या फुटाव्यात अशा प्रकारचें मनुष्यस्वभावाचें त्यांनीं सहानुभूतिपूर्वक केलेलें निदर्शन या त्यांच्या गुणविशेषांनाच अधिक महत्त्व देणें निःसंशय अगत्याचें आहे.

"दुर्गाताईची ओवाळणी" ही हरिभाऊंची एकच विचारात्मक लघुकथा आहे. या कथेंत केशवपनाच्या चालीचें तिरस्करणीय स्वरूप दाखविलें आहे.

विश्वनाथपंत नांवाचा एक नवमतांचा पुरस्कार करणारा गृहस्थ मुंबईस राहात होता. त्याची दुर्गाताई नांवाची बहीण पुण्यास सासरीं होती. लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं बिचारीवर वैधव्यदशा भोगण्याचा खडतर प्रसंग आला. एके दिवशीं दुपारीं विश्वनाथरावाला स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत तो पुण्यास गेला असल्याचा त्याला भास झाला, आणि दुर्गाताईच्या घरीं त्यानें एक भयंकर प्रकार पाहिला;

ओटीवरून रडण्याच्या अनुरोधानें तो माजघरांत गेला. तो खोलीच्या दारावर धक्का मारणार तों कसाबानें गाय धरल्यावर ऐन प्राण घेण्याच्यावेळीं जेवढा मोठ्यानें ती हंबरडा फोडते तेवढ्या मोठ्यानें रडत रडत उच्चारलेले शब्द त्याच्या कानीं पडले:-- "अरे दादा ! यंदा नाहीं कां रे ओवाळणी घालायला येत ? अरे मला यांतून सोडीव रे ? हीच मला ओवाळणी" पुढचे शब्द तिला कोणीं उच्चारूं दिले नसावे. तेवढें ते ऐकण्याबरोबर विश्वनाथराव झपाट्यानें आंत गेला. तों त्याच्या दृष्टीस फारच भयंकर असा देखावा पडला. आपली बहीण दुर्गा ही अतिशय दीन होऊन ओरडते आहे, असें त्याला आढळून आलें. त्यानें जोरानें 'चल हो दूर, शिंच्या' असें मोठ्यानें शब्द उच्चारले व त्या न्हाव्याच्या छातीवर हाताचा सणसणीत सपाटा मारला, तों हात इंझिचेअरच्या हातावर फाडकन् लागून तो जागा झाला. गुलामांचा व्यापार करण्याची सांप्रत आज बंद पडली असली तरी त्यासंबंधाच्या कादंबऱ्या आपण आजही सहानुभूतीच्या भावनेनेंच वाचतों. त्याचप्रमाणें केशवपनावर लिहिलेली ही गोष्ट, ती चाल नष्ट झाली तरी नेहमीं वाचनीयंचं वाटेल !

'तीन फुलें' ही एक रूपकात्मक गोष्ट आहे. तीन कळ्यांच्यामध्यें संवाद चालला असतांना एका कळीनें आपल्याला देवाच्या शिरीं पडावें अशी इच्छा असल्याचें सांगितलें. आपल्याला जागचे जागींच वाळून जावेंसें वाटतें असें दुसरीनें म्हटलें. गुणग्राहकाच्या हातीं पडावें असें तिसरीला वाटत होतें. योगा-योग असा कीं पहिल्या कळीची रवानगी वेश्येच्या घरीं झाली. दुसरी देवाच्या डोक्यावर अधिष्ठित झाली. आणि तिसरी माळ्याच्या दुकानांतील राशींतून खालीं पडून गाढवाच्या पायाखालीं चिरडून गेली. सारांश कोणत्याच कळीची आपल्या भवितव्याबद्दलची अपेक्षा फलद्रूप झाली नाहीं. उलट प्रत्येकीची अपेक्षा फोल ठरून प्रत्यक्ष प्रकार कांहीं विपरीतच झाला ! माणसाच्या अपेक्षा आणि आकांक्षा फोल ठरण्याचें प्रमाणच एकंदरींत जगाच्या व्यवहारांत कसें वारंवार प्रत्ययास येत असतें हें या रूपकात्मक कथेच्याद्वारें चांगल्या तऱ्हेनें दिग्दर्शित केलें आहे.

प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारख्या विवेचनात्मक अशा दोनच लघुकथा आहेत. " गरीबीचा संसार " या लघुकथेंत राधाबाई नांवाच्या एका विधवा स्त्रीनें आपल्यावरील मातृपदाची पूर्ण जबाबदारी ओळखून आपल्या मुलांना कशा प्रकारें वाढविलें याचें विवेचन केलें आहे. राधाबाईच्या गृहव्यवस्थेचें आणि गृहशिक्षणाचें वर्णन देऊन हरिभाऊंनीं मुलांचें मानसिक आणि शारीरिक संवर्धन करण्याची आदर्श पद्धति वाचकांना सादर केली आहे.

" पहिलेंच भांडण ', ही दुसरी विवेचनात्मक गोष्ट होय. सीताबाईच्या डोक्यांत समानहक्काचें वेड होतें तर तिचा नवरा रामभाऊ याला आपला श्रेष्ठपणा स्थापित व्हावा अशी इच्छा असे. अशी विरोधक विचारसरणी असूनही दोघांमध्यें कधीं भांडण झालें नव्हतें. तो प्रसंग एके दिवशीं येऊन ठेपला. रामभाऊनें सीताबाईला आधीं न कळवितां तिच्यासह नाटकाला जाण्याचा बेत ठरविला. सीताबाईला ही गोष्ट पसंत पडली नाहीं. तिनें नवऱ्यांशीं भांडण केलें. आणि ती आपल्या आजीकडे निघून गेली. रामभाऊला फार राग आला व तोही बॅकवेबर जीव देण्याकरितां निघून गेला. आजीनें सीताबाईला आपल्या स्वतांबद्दलचीच गोष्ट सांगितली. " सीते, तुझ्यासारखीच एक हट्टी मुलगी होती. तिच्य नशीबानें तिलाही चांगला, पण अभिमानी आणि आपलें तें खरें करणारा नवरा मिळाला. पहिल्यानं दोघं मोठीं सुखांत होतीं. बायको कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें त्यांना होऊन जाई. पण पुढें तें कांहीं तिच्या मर्जीविरुद्ध करूं किंवा बोलूं लागले. आणखी त्यांचे एक, तर हिंचं दुसरंच असें होऊं लागलें. परिणाम असा झाला कीं, ती निघून जाऊन पुन्हां आजन्म दोघांच्या गांठीं पडल्या नाहींत. ताबडतोब गांव सोडून स्वारी काशीक्षेत्राला निघून गेली ! चार महिन्यांनीं काशीहून पत्र आलें, त्यांत लिहिलें होतें कीं वाखा होऊन शेवट झाला." आणि शेवटीं म्हातारी म्हणाली," ती अभागी बायको मीच." या हकिकतीनें सीताबाईच्या मनावर विलक्षण परिणाम झाला आणि घरीं येऊन ती अधीर चित्तानें नवऱ्याची वाट पहात बसली. इकडे रामभाऊंच्या मनावर विचाराचा पगडा बसला आणि प्राणत्यागाची कल्पना अमलांत न येतां तो घरीं परत आला.

दोघांची भेट झाल्यावर दोघांनाही खूप पश्चात्ताप झाला. आणि हें पहिलेंच भांडण त्यांच्या सुखमय संसारांत शेवटचेंच झालें.

लघुकथालेखन ही एक कला आहे आणि ती लिहिण्याचे किंवा बनविण्याचे निरनिराळे प्रकार आहेत. त्याच प्रकारांना विनोदात्मक, वर्णनात्मक, विचारात्मक, विवेचनात्मक आणि रूपकात्मक अशी नांवें देण्याचा परिपाठ पडून गेला आहे. वर्णनात्मक लघुकथांचें प्रमाण वाङ्मयात प्रायः जास्त असतें. हरिभाऊंनीं जरी नुसत्या वर्णनात्मक लघुकथाच लिहिल्या असत्या तरी त्यांना लघुकथालेखकांमध्यें श्रेयस्कर स्वरूपाचा दर्जा प्राप्त झाला असता. मग विनोदात्मक, विचारात्मक, विवेचनात्मक आणि रूपकात्मक हे इतर अवघड कथाप्रकारही हरिभाऊंनीं विशेष कौशल्यानें नटविलेले आहेत हें सिद्ध झाल्यावर हरिभाऊंचे लघुकथेसंबंधांतील बहुमानाचें किंबहुना आद्यप्रवर्तक म्हणून अग्रमानाचें स्थानही निर्विवादपणें अढळ राखलें जाईल. ललितवाङ्मयांतील कला आणि बोध या परस्परभिन्न प्रमुख अंगांचाही हरिभाऊंनीं आपल्या लघुकथांतून कसा व्यवस्थेनें समन्वय लावला आहे, याचेंहि दिग्दर्शन करणें अगत्याचें आहे. त्यापूर्वी कला आणि बोध यांच्याबद्दलची सांप्रत वाङ्मयांतील प्रवृत्ति काय आहे हें पहाणेंहि जरूरीचें आहे.

ललित वाङ्मयामध्यें कलेकडेच सर्वस्वीं लक्ष्य दिलें जावें या विचारसरणीला अलीकडे विशेष वर्चस्व प्राप्त होत चाललें आहे. कलाविलासाकरितां प्रत्येक ललितवाङ्मयलेखकानें आपली सर्व शक्ति खर्च केली पाहिजे असा निश्चित निर्बंध घालण्यापर्यंतही कित्येकांची मजल गेलेली आहे. उपकारक गोष्टींचें आणि प्रवृत्तीचें वाचकांना नीतिशिक्षण मिळावें असें प्रतिपादण्याच्या भरांत कलाविलासाची एक वेळ गळचेपी झाली तरी चालेल असें अट्टाहासानें बजावण्याचा जसा एका बाजूनें प्रयत्न चालविलेला आहे तसाच विक्षिप्त प्रयत्न कलाविलासाच्या वेडानें अंध बनलेल्या कांहीं विशिष्ट लेखकांच्या हातूनही होत असतो. कलाविलास साधण्याकरितां लेखकानें प्रयत्न केला व त्यांत त्याला यश प्राप्त झालें तर आपल्या हातून न्याय्य प्रकाराचें प्रतिपादन झालें आहे किंवा एखाद्या अन्याय्य गोष्टीचा आपण वस्तुपाठ दिलेला आहे याचा विचार करण्याच्या भानगडींत त्यानें पडूं नये असें कलाविलासाचे अभिमानी लेखक खुशाल बोलून दाख-

विितात. कलाविलास केव्हांहे आणि कोठेंहे साधलेला असला तरी तो नेहमीं श्रेयस्करच असतो, असें म्हणून चालणार नाहीं. परमेश्वरानें गळ्याची देणगी दिलेली आहे, गायनाची खुलावट कशी करावयाची याचें स्वभावतःच ज्ञान आहे, त्यांत शास्त्रोक्त अध्ययनाची भर पडलेली आहे आणि एकंदर साथीचा संचही जसा असावा तसा आहे; असा अपूर्व योग जुळून आल्यावर श्रोत्यांची गाण्याबद्दलची एक अपेक्षा ठरून जाण्याचा संभव असतो. क्वचित् प्रसंगीं कानावर पडणारें दुर्मिळ संगीत आपणांस ऐकावयास मिळणार अशी जर प्रेक्षकांनीं अगर श्रोत्यांनीं मनाशीं खूणगांठ बांधली तर त्यांत त्यांची गुणग्रहणप्रवृत्तीच दृष्टोत्पत्तीस येईल ! अशा स्थितींत गायकानें तमाशांतील एकादी लावणी म्हणण्यास प्रारंभ केला तर एकंदर परिस्थितीचा निःसंशय विरस झाल्याशिवाय राहाणार नाहीं. मात्र ती लावणीहि–अतिशय बीभत्स आणि अशिष्ट अशी ती लावणीहि पूर्णपणें शास्त्रोक्त पद्धतीनें त्यानें गाऊन दाखविण्याचा प्रयत्न केला आणि लावणींतील वाङ्मयाचा किंवा गायनाचा शक्य तितका कलाविलास त्यानें साधून दाखविला, अथवा आपल्या निसर्गतःच गोड आणि नाजूक गळ्याची शक्य ती करामत श्रोतृवर्गाच्या निदर्शनास आणून दिली तरी त्या लावणीच्या एकंदर अर्थामुळें आपण बांधलेला कयास अनपेक्षित रीतीनें विफळ ठरला अशा जाणीवेमुळें त्या शास्त्रोक्त गायनाची आणि अपूर्व करामतीची प्रेक्षकांकडून चहा होण्याची आशा उरणार नाहीं. गायनाची ही जी स्थिति तीच वाङ्मयाची होय. एकाद्या वेश्येच्या घरीं चाललेल्या दुराचाराचें यथायोग्य आणि कलापूर्ण शब्दचित्र वठविण्याचा एखाद्यानें प्रयत्न केला आणि तो पूर्णपणें यशस्वी झाला तर तें शब्दचित्र केवळ कलाविलास साधला आहे, या सबबीवर खासच वाचनीय ठरणार नाहीं. कलाविलासच हवा आणि बाकी कांहीं नको, असें प्रतिपादण्याच्या भरांत कांहीं लोक वेश्येच्या दुराचरणासंबंधानें लिहिलेलें शब्दचित्रहि वाचनीय आहे असें म्हणण्यास कमी करणार नाहींत ही गोष्ट खरी ! पण त्यांत तथ्यांश फारच थोडा. कारण मनुष्य एकदां हट्टाला पेटल्यावर कोणती बाब किती ताणावी याची त्याला क्षिति उरत नाहीं. कलाविलास विरुद्ध नीतिशिक्षण या वादाची स्थिति अशीच झाली आहे. दोन्ही पक्षांच्या म्हणण्यांपैकीं

पुष्कळसा भाग ग्राह्य आहे, पण एकाच पक्षाचें वर्चस्व असावें किंबहुना विरोधक पक्षाचें अस्तित्वसुद्धां असूं नये अशी जी प्रवृत्ति या दोन्ही पक्षांच्या कित्येक अनुयायांमध्यें दिसून येते, तीमुळें वादाचें वादळ उत्पन्न होऊन सत्याचें स्वरूप मात्र अदृश्य होऊं पहात आहे.

ललितवाङ्मयामध्यें कोणत्या गोष्टी लिहावयाच्या आणि कोणत्या गोष्टी लिहावयाच्या नाहींत यासंबंधानें विधिनिषेध घालून देतां येणें शक्य नसलें तरी प्रत्येक लेखक आपल्यापुरती आपली मर्यादा पाळीतच असतो. आणि कांहीं अनपेक्षित अपवाद सोडून दिले तर प्रत्येकानें आपापल्यापुरती घालून घेतलेली शिष्टाशिष्टतेची मर्यादा प्रायः सर्वांच्याच संबंधांत जुळण्यासारखी असते, असें स्थूल मानानें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. कलाविलास विरुद्ध नीतिशिक्षण हा वाद उपस्थित करून तो विशेष जोरानें चालू ठेवणारे उभय पक्षांतील लोकसुद्धां असे विधिनिषेध अजाणत पाळीत असतातच. कलाविलासाचे पक्षपाती न कळतच नीतीच्या बंधनांनीं गुरफटलेले असतात आणि नीतिशिक्षणाचें अभिमानीहि कलाविलास साधण्याकरितां धडपड करीत असतात ! यामुळें शेवटीं वातावरणांत फक्त शाब्दिक वादविवादच खेळत राहतो !

ललितवाङ्मयांत कलाविलासाला प्राधान्य दिलें जावें हें मत मात्र कोणाहि समंजस माणसाला साधारणतः मान्य होण्यासारखेंच आहे. नीतिशिक्षण देण्याकरितांच ललितवाङ्मयाचा जन्म झालेला आहे असें कोणीहि म्हणण्याचा संभव नाहीं. वाङ्मयाचें इतर गंभीर विभाग नीतिशिक्षण देण्यास सर्वतोपरी समर्थ असतांना ललितवाङ्मयाच्या माथ्यावरहि पुन्हां नीतिशिक्षणाचें ओझें लादलें जाऊं नये असें वाटणें स्वाभाविक आहे. प्रकृति सुधारण्याकरितां पौष्टिक पदार्थांचें सेवन करणें वेगळें आणि केवळ गंमतीखातर त्या पदार्थांचा आस्वाद घेणें वेगळें. यांत जो भेद आहे तोच भेद ललिवाङ्मयांतील प्रत्यक्ष व हेतुपुरस्सर नीतिशिक्षण देणें आणि केवळ यदृच्छया व अजाणत नीतिशिक्षणाचा परिपोष होणें यांमध्यें आहे. ललितवाङ्मयाच्या लेखकांनीं प्रत्यक्ष व हेतुपुरस्सर नीतिशिक्षण द्यावें ही विचारसरणी अंमलांत आणल्यास ती विशेषशी हितावह ठरण्याचा संभव नाहीं. पण साधावयाचा तो कलाविलास साधल्यानंतर लेखकाला

वर नीतिशिक्षणाचीहि जर सिद्धता करतां आली तर सामान्यतः निसर्गभिन्न असणाऱ्या दोन गोष्टी एकसंस्थ करण्याचें सामर्थ्य लेखकाच्या अंगीं दिसून आल्यामुळें वाचक त्याच्या लेखनाबद्दल गौरवबुद्धीच प्रदर्शित करतील. " सत्यं, शिवं, सुंदरम्" हें जे उत्कृष्ट वाङ्मयाचे गुणविशेष जुन्या संस्कृत साहित्यकारांनीं मान्य केले आहेत ते ललितवाङ्मयालाहि पूर्णपणें लागूं करतां येण्यासारखे आहेत. सदभिरुचि, शिष्टाचारप्रवणता, आणि कलासक्ति या सर्वांचें समवायानें पोषण होऊन पूर्णपणें संवर्धन व्हावें आणि असा परिणाम ज्याच्या योगानें घडून येईल तें वाङ्मय लोकांच्या वाचनांत यावें हेंच वरील नियमाचें सारतत्त्व आहे, असें म्हटलें असतां कोणत्याहि दृष्टीनें अतिशयोक्ति होण्याचा संभव नाहीं.

कलाविलास आणि बोधविकास यासंबंधींचीं हरिभाऊंची विचारसरणी फार मननीय आहे. " हें विदग्धवाङ्मय फार सामर्थ्यवान् असतें. त्यानें न कळत परंतु फार प्रभाववान् असा श्रोते, वाचक व प्रेक्षक यांच्या मनावर परिणाम होतो. कवि, कथाकार, व नट हे समर्थ असले तर मनुष्यांचीं मनें आपल्या ताब्यांत ठेवूं शकतात. त्यांच्या मनावर आपल्या कृतीच्या द्वारें अप्रत्यक्ष परंतु विलक्षण परिणाम घडवून आणतात. जें काय त्यांनीं नेहमीं लक्षांत बाळगावयाचें तें हें कीं, आपल्या या वृक्षास सत्य आणि सत् हीं दोन फळें अवश्य लागलीं पाहिजेत. त्यांस असत्याचें व असताचें खत मात्र पाहिजे. असत्याच्या भासां-तून परंतु सत्य आपणांस पुढें करावयाचें आहे. असताच्या निषेधानें सताची प्रगति करावयाची आहे. " " असताच्या निषेधानें सताची प्रगति करावयाची आहे, " हें शेवटचें वाक्य फारच महत्त्वाचें आहे. कोणत्याहि कथेमध्यें सत्य पुढें झालें पाहिजे हें खरें; पण तें सत्य पुढें होत असतांना सताचीहि प्रगति झाली पाहिजे. असत् अशा गोष्टीचा अगर प्रवृत्तींचा कथालेखनाच्या अनुरोधानें कथेमध्यें निर्देश झाला असला तरी तो चांगल्या प्रवृत्तींच्या विरोधानें परा-काष्ठेचा किळसवाणा आणि ओंगळ वाटेल अशाच रीतीनें व्हावा ! सत्यान्वेषण आणि कलाविलास यांच्या अवडंबरानें द्विपून जाऊन कित्येक लोक त्या सत्या-न्वेषणाच्या अगर कलाविलासाच्या परिणामाकडे लक्ष पुरवीत नाहींत. सत्या-न्वेषणबुद्धीनें समाजांतील अशिष्ट प्रकाराचें विवेचन जरी करण्यांत आलें तरी

त्याचा परिणाम त्या प्रकाराबद्दल वाचकाच्या मनांत निषेधबुद्धि उत्पन्न होण्यांतच झाला पाहिजे. आणि शब्दचित्र जितकें कलापूर्ण तितकी ही निषेधबुद्धीची तीव्रता अधिक वाढत जाते. " असताच्या निषेधानें सताची प्रगति करावयाची आहे, " ही गोष्ट कलाविलास साधत असतांना लक्षांत ठेवली तर वर्ण्य विषयांतील कला आणि बोध यांचें सौंदर्य परस्परांच्या प्रभेनें अधिक खुलून दिसण्याचा अपूर्व योग उत्पन्न झाल्याशिवाय केव्हांहि राहाणार नाहीं.

अन्न जें बनवावयाचें असतें तें केवळ अंगचें पाकसिद्धीचें कौशल्य दाखविण्याकरितांच बनवावयाचें नसतें. तयार केलेलें अन्न खाणाराला रुचलें पाहिजे आणि पचलेंहि पाहिजे. रुचणें आणि पचणें या दोन गोष्टी जशा अन्न तयार करण्याच्या बाबतींत एकाद्या सुगरणीला साधावयाच्या असतात त्याचप्रमाणें वाङ्मय हें ज्या समाजाच्या हातीं द्यावयाचें त्या समाजाला तें रुचलें पाहिजे आणि त्याचप्रमाणें तें समाजाच्या गळीं उतरलें पाहिजे, असा लेखकानें कटाक्ष बाळगणें जरूरीचें आहे. अन्न खाणाराचा हेतु केवळ तें रुचावें व पचावें हाच नसतो. खाल्लेलें अन्न रक्तसंवर्धक आणि शरिराला पुष्टिकारक व्हावें हाहि खाणाराचा हेतु असतो. त्याचप्रमाणें ललितवाङ्मयाच्या वाचकानें आपण जें वाङ्मय वाचणार आहों तें वाङ्मय आपल्या मनोवृत्तींना अधिक उन्नत बनवील, आपल्या अंतःकरणामध्यें सुविचारांचें बीजारोपण करून त्यांचें यथायोग्य संवर्धन करील आणि आपल्या सर्व मानसिक शक्तींचें त्यायोगें हितकारक असें परिपोषण होऊन आपला सामाजिक दर्जा श्रेष्ठ ठरेल अशी प्रथमपासूनच खबरदारी बाळगली पाहिजे. ताटांत वाढलेले सर्वच पदार्थ आपण केवळ शरीरपोषणाच्या हेतूनें खात नाहीं. जिभेला रुचि येण्याकरितां कांहीं पदार्थ वाढलेले असतात. पण या रुचकर पदार्थांचाहि पुष्टिकर अन्न अधिक पौष्टिक बनविण्याचें कामीं न कळतच उपयोग होत असतो. त्याचप्रमाणें कलाविलासाकरितां उत्पन्न केलेले प्रसंग शेवटीं बोधविकासाच्याहि उपयोगीं पडून त्यांच्या साहाय्यानें आणि समन्वयानें वर्ण्य विषयाला एक प्रकारचें तेज चढतें. हरिभाऊंच्यासंबंधांत हीच गोष्ट प्रत्ययास आल्याशिवाय राहात नाहीं. त्यांनीं बहुविध लेखनव्यवसाय केला असला तरी कोणत्याहि वाङ्मयप्रकाराचें आविष्करण करतांना एका विशिष्ट हेतूचें पोषण

व्हावें अशीच त्यांची इच्छा असल्याचें दिसून येतें. कलाविलासाकरितां लिहिलें गेलेलें वाङ्मय समाजाला सदोदित उपकारक ठरतेंच असें नाहीं. कलाविलास साधण्याची हातोटी हरिभाऊंना साध्य होती इतकेंच नव्हे तर ती त्यांच्या कायमचीच हस्तगत झालेली होती. पण समाजाला उपकारक गोष्टींचें वस्तुपाठ देऊन त्याच्या ठिकाणीं सद्वृत्तींचें बीजारोपण करावयाचें हाहि त्यांच्या लेखनाचा एक प्रमुख हेतु होता. तो साधण्याकरितां त्यांनीं आपल्या कलापूर्ण कथानकाची मांडणी वस्तुस्थितीच्या कोंदणांत यथायोग्य रीतीनें केलेली आहे.

हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांच्या आणि कथांच्या शिरोभागीं " सामाजिक " हा शब्द योजिला होता तो केवळ निरर्थक म्हणून नव्हे. हरिभाऊंचें समकालीन किंवा त्यांच्यानंतरचे कादंबरीकार आणि कथालेखक आपल्या कथासृष्टीला ' सामाजिक ' या विशेषणानें गौरवितात; पण समाजाच्या कोणत्याच वर्गाचें त्यांच्या कथासृष्टींत पूर्ण प्रतिबिंब पडलेलें दिसून येत नाहीं. समाजाच्या एका विशिष्ट वर्गांत रूढ असलेलीं नांवें उपयोगांत आणलीं कीं, आपल्या कृतीला " सामाजिक " हें विशेषण लावण्यास हरकत नाहीं असाच या लेखकांचा समज झालेला दिसतो. या लेखकांच्या लेखनांत कल्पनारम्यत्व, भाषाप्रभुत्व व कलाविलास वगैरे बाबींचें कमीअधिक प्रमाणांत अन्वेषण झालेलें असलें तरी " सामाजिक " या विशेषणानें गौरविण्याइतकी त्यांची कथासृष्टि समाजाला आत्मसात् करण्यासारखी सामर्थ्यवान् नसतें. समाजांतील कोणत्याच वर्गाचा ज्या सृष्टीशीं कधीं संबंध येणार नाहीं अशा प्रकारची कथासृष्टि आधुनिक लेखकांपैकीं बऱ्याचशा लेखकांच्या कथांतून आढळून येते !

सतराव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांच्या कालावधींत इंग्लंडमध्यें जे नाटककार झाले त्यांच्या हास्यरसप्रधान आनंदपर्यवसायी नाटकांच्यासंबंधानें सुप्रसिद्ध इंग्लिश निबंधलेखक चार्लस लँब यानें जे उद्गार काढले आहेत, त्या उद्गारांतील तीव्रता जरा कमी केल्यास ते उपरिनिर्दिष्ट लेखकांच्याहि कल्पनासृष्टीला पुष्कळ अंशीं लागू करतां येण्यासारखे आहेत.

" They are a world of themselves almost as much as fairyland. In that world there are no vices,

no sins, because they have no standard of right or wrong by which to judge. There is neither right nor wrong; gratitude, nor its opposite. The whole is a passing pageant where we should sit as unconcerned at the issues for life or death, as at the battle of the frogs and mice."

त्यांची सृष्टि त्यांच्या पात्रांपुरतीच संकुचित असते; किंबहुना ही कल्पनासृष्टि यक्षभूमीसारखी विचित्र आणि विलक्षण भासते. या कल्पनासृष्टींत पापाचरण अनाचार इत्यादि संबंधांत कसलाच विधिनिषेध बाळगण्यांत येत नाहीं. न्याय, अन्याय, कृतज्ञता, कृतघ्नपणा वगैरे परस्परविरोधी गुणावगुण व त्यांमधील भेद-भाव सूक्ष्मपणानें आविष्कृत होण्यास या सृष्टीमध्यें अवसरच राहात नाहीं. कोणत्याहि प्रसंगाचें पर्यवसान कशा प्रकारचें होईल याचा कांहींच धरबंध नसल्यामुळें कथाविषय, त्यांतील पात्रें व प्रसंग यांच्याबद्दल वाचकांच्या मनांत उपेक्षाबुद्धीच उत्पन्न होते, असा लँबच्या टीकेचा आशय आहे. लँबनें ही टीका फक्त "सामाजिक" या शब्दाच्या अनुरोधानेंच केली आहे. भाषा, कल्पना, प्रसंगनिर्मिति, वगैरे अंगांच्या सरसनीरसतेचा या टीकेशीं कोणत्याही प्रकारें संबंध पोहोंचत नाहीं. या टीकेचें मर्म लक्षांत घेऊन 'सामाजिक' या शब्दाचा विचार केला तर हरिभाऊंच्या संबंधांत "सामाजिक" हा शब्द अन्वर्थक असाच होता, असें प्रांजलपणें कबूल करावें लागेल.

हरिभाऊंच्या गोष्टीतून संपन्न अशा मध्यम वर्गाचेंच फक्त चित्र देण्यांत आलें आहे अशी कित्येकजण टीका करतात; पण ज्याच्यावर टीका करा-वयाची त्याचें म्हणणें पूर्णपणें तरी ऐकून घेतलें पाहिजे. आपलें वाङ्मय दिवाण-खान्यापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत संचार करणार, असा हरिभाऊंनीं आपला लेखनव्यवसाय सुरू करण्याच्या सुमारास स्पष्ट इषारा दिला आहे. तेव्हां त्यांच्या वाङ्मयांत सामान्यतः मध्यम वर्गाचेंच प्रतिबिंब पडणें अपरिहार्य होतें. ज्या लोकांच्याकरितां त्यांनीं बुद्धिपुरस्सर कथारचना केली त्या लोकांचें त्यांच्या कथासृष्टींत पूर्णपणें प्रतिबिंब पडलें आहे कीं नाहीं, हेंच मुख्यतः पाहिलें पाहिजे.

हरिभाऊंच्या दृष्टीनें " सामाजिक " हा शब्द सार्थ ठरलेला आहे. मात्र समाज-शिक्षणाच्या या व्यवधानांत त्यांनीं कलेची हेळसांड केलेली नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कथेचा एकसूत्रीपणा, एकच प्रसंग अथवा एकमेकांशीं अतिशय निगडित झालेले थोडे प्रसंग त्या सूत्रांत गुंफण्याचें कौशल्य, कथेचा प्रारंभ व पर्यवसान परिणामकारक करण्याचें चातुर्य व एकाच भावनेचा परिपोष करून तिचा पूर्णपणें विकास करण्याची हातोटी वगैरे पथ्यें चांगल्या लघुकथालेखकाला कांहीं झालें तरी पाळावयाचींच असतात. प्रसंगनिर्मितीसंबंधांत तर हरिभाऊंचा हातखंडा आहे. कांहीं कांहीं लेखकांच्या मनोरचनेंतच अशी कांहीं पठाणी गोम असते कीं, त्यांच्या कथानकांत ठराविक ठशाचें प्रसंग, पात्रांच्या त्याच त्याच मनोवृत्ती आणि कथानकांची एकाच सांच्याची घडण हीं पुनरावृत्त झाल्याशिवाय राहात नाहींत. विविध प्रसंगनिर्मिती करण्याइतका त्यांच्या कल्पनेचा व्याप नसतो हेंच यावरून सिद्ध होण्यासारखें आहे.

महाराष्ट्रवाङ्मयांत प्रतिष्ठा पावलेल्या कितीतरी लोकप्रिय कथालेखकांच्या निर्माणसृष्टीला वर उद्धृत केलेली चार्लस लँब याची टीका सामान्यतः लागू करतां येण्यासारखी आहे. उपमा, दृष्टांत, भाषेची कसरत वगैरेंमुळें त्याच्या लेखनाला कितीहि सौंदर्य येत असलें तरी अतर्क्य सृष्टीच्या कोंदणांत बस-विलेलीं त्यांचीं पात्रें व प्रसंग हीं वाचकाच्या मनांत जिव्हाळा अथवा आस्था उत्पन्न करूं शकत नाहींत. कथानकांतील पात्रें नुसतीं मनोरंजकच ठरून उप-योगाचें नाहीं. त्या पात्रांबद्दल वाचकांच्या मनांत जिव्हाळा उत्पन्न झाला पाहिजे. आणि असा जिव्हाळा उत्पन्न होण्यास कथानकांतील विचित्र विस्मयजनकता निःशेष नाहींशीं करतां आली पाहिजे. आपल्यासंबंधांत किंवा आपल्या भोंव-तालीं वावरणाऱ्या परिचितांसंबंधांत कथानकांतील हे प्रसंग घडून येणें संभव-नीय आहे अशी वाचकाला खात्री वाटणें म्हणजेच त्याच्याठिकाणीं जिव्हाळा उत्पन्न करणें होय. असा जिव्हाळा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य हजारांतून दहा-पांच गोष्टींतूनहि आढळून न येण्याचें कारण म्हटलें म्हणजे पुष्कळ लेखकांना भोंवतालचें जग किती जागरूक दृष्टीनें आणि कशा सदय आणि सहानुभूतिपर अंतःकरणानें पाहावें याची जाणीव होत नाहीं हेंच होय! कांहीं लेखक श्रेष्ठ प्रकारचें

मनोरंजन करतात, तत्त्वप्रतिपादन करतात, विस्मयजनक प्रसंगांचें आविष्करण करतात, क्वचित् प्रसंगीं सद्भावनांचेंहि अन्वेषण करतात, पण वाचकाला लघुकथेंतील कथानकांशीं पूर्णपणें समरस करून घेऊन त्या कथानकांत त्याला बुडवून टाकण्याची शक्ति त्यांच्यामध्यें नसतें. लघुकथेंत एकच प्रसंग असावा, त्या प्रसंगांच्या अनुषंगानें वाढीस लागणाऱ्या भावनेचाच अप्रतिहत ओघ तींत कायम टिकावा, प्रारंभ अंतःकरणाला हात घालील असा परिणामकारक करावा, आणि पर्यवसान वाचकांच्या ठिकाणीं विस्मय उत्पन्न करील असें अनपेक्षित पण स्वाभाविक असावें इत्यादि उत्कृष्ट कथेला आवश्यक असणारीं आयुधें परिश्रमानें सुसज्ज राखतां येतील. पण वर सांगितलेली ही जिव्हाळा उत्पन्न करण्याची कला हस्तगत होणें हें फार कठीण कार्य आहे. लघुकथालेखकांमध्यें हरिभाऊंना जो प्रमुखपणाचा मान मिळतो त्याचें कारण त्यांची ही जिव्हाळा उत्पन्न करण्याची हातोटी होय. हरिभाऊंच्या कोणत्याहि कथानकांमध्यें विस्मयजनकता कमी प्रमाणांत असण्याचेंहि हेंच कारण होय. प्रसंगांची विविधता ज्याला साधली त्याच्या कथानकांत विस्मयजनकता उत्पन्न होणें शक्य नसतें. कारण वाटेल तो प्रसंग स्वाभाविक भासविण्याची त्याच्यामध्यें शक्ति असते. प्रसंगांची विविधता नसली म्हणजे पुनरावृत्ति आणि विस्मयजनकता यांचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय राहात नाहीं. प्रसंगांची विविधता व्यापक कल्पनाविलासावर अवलंबून असते. तिला केवळ अभ्यासपूर्ण अवलोकन असून भागत नाहीं. अभ्यासपूर्ण अवलोकनाला व्यापक व सर्वग्राही कल्पनाविलासाची जोड लाभली म्हणजेच विविध प्रकारचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता असते. या गोष्टी पुस्तकी विद्येनें साध्य होत नाहींत, त्या जन्मजात प्रतिभाशालित्वावर अवलंबून असतात आणि त्या लाभण्याचें भाग्य फारच थोड्या लेखकांच्या वांट्यास येतें. हरिभाऊ आपटे हे अशा थोड्या लेखकांतहि अग्रगण्य होत !

— —

# ८

# श्री. न. चिं. केळकरांचें लघुकथा-लेखन.

लघुकथालेखनाचा आधुनिक संप्रदाय आपल्याकडे सुरू होऊन फार दिवस झाले नाहींत. त्या वेळीं केळकरांचें वय चांगलें चाळीस पंचेचाळीसच्या सुमाराचें असावें असें वाटतें. शिवाय त्यांचा नित्याचा व्यवसाय वर्तमानपत्रांतील लेखनाचा होता. या व्यवसायामुळें लिहिण्याचा किती वीट येतो हें तो व्यवसाय एक दोन वर्षें केल्यानेंसुद्धां समजून येण्यासारखें आहे. पण अशा स्थितींतहि या नवीन वाङ्मयप्रकाराला आपल्या लेखनसाहाय्यानें हातभार लावण्याची त्यांनीं तत्परता दाखविली ही गोष्ट निःसंशय अभिनंदनीय आहे. पंधरावीस वर्षांपूर्वी किंवा त्या काळाच्या थाटांत लिहिलेलें वाङ्मय चालू घडीलाहि तितकेंच आकर्षक वाटणें शक्य नसतें. जुन्या रुबाबांत वाढलेले केळकर हल्लींच्या नवीन काळाचें वातावरण आत्मसात् करून हल्लीं प्रचलित असलेल्या नमुन्याच्या लघुकथा लिहिणें अर्थात्च शक्य नाहीं. वाङ्मयाच्या एका शाखेमध्यें यशस्विता आणि लोकप्रियता संपादन केलेला लेखक दुसऱ्या कोणत्याहि शाखेंत तीच यशस्विता आणि तीच लोकप्रियता मिळवील असें नाहीं. त्यांतूनहि ही गोष्ट साध्य होण्यास या दोन शाखांत थोडेंफार तरी अनुसंधान असावें लागतें. सनई वाजविण्यांत कुशल असलेला मनुष्य अलगुजावरही तत्सदृश आलाप काढील ही गोष्ट खरी; पण अलगुज वाजवितां आलें तर सतारहि वाजवितां येईल असें जर तो म्हणेल तर ती गोष्ट त्याला तितक्या सहजपणानें करतां येईलच असें नाहीं. भावगीत आणि खंडकाव्य, निबंध आणि प्रबंध, लहान गोष्ट आणि मोठी गोष्ट, यांतील एकेक जोडी सारख्याच अनुसंधानानें नियोजित झालेली आहे. पण एका जोडींतील एक शाखा आणि दुसरींतील एक यांचें अनुसंधान केवळ विषमच नव्हें तर कित्येक वेळां विरोधकहि ठरण्याचा संभव आहे. असल्या विरोधक गोष्टी समन्वयानें साधणें आणि त्या पूर्ण यशस्वीपणानें साधणें ही गोष्ट साक्षात् आचरणांत आल्याचें क्वचित् प्रसंगींच प्रत्ययास येतें. शिवाय

विशिष्ट वाङ्मयप्रकार साधणें अगर न साधणें ही गोष्ट एका ठराविक मनश्चर्येवरच अवलंबून असतें.

कोणाची मनश्चर्या कोणत्या पद्धतीच्या वाङ्मयप्रकाराला अनुकूल आहे हें नेहमींच नक्की ठरवितां येणें शक्य नाहीं. पण विचारप्रधान किंवा चिंतनाविषयक वाङ्मयाला अनुकूल असणारी किंबहुना सर्वस्वीं योग्य असणारी मनोभूमिका भावनाविशिष्ट वाङ्मयाला फारशी अनुकूल ठरण्याचा संभव नसतो असेंच कित्येकांच्या उदाहरणानें अनुभवास आलें आहे. विचारप्रधान वाङ्मयांतील निरनिराळे गंभीर वाङ्मयप्रकार अशा बुद्धिप्रमुख माणसाला आपल्या विचारांच्या सामर्थ्यानें सजवितां येणें शक्य होईल; पण भावनाप्रधान वाङ्मयांतील ललितप्रकार विचारांच्या भारानें विशोभित होण्याचीच भीति अधिक! आपल्या विचारांना अधिक खुलविण्याच्या हेतूनें ललितवाङ्मयाकडे धांव घेणाऱ्या अशा लेखकांचे विचार एखाद्या नाटकाच्या, कादंबरीच्या अगर लघुकथेच्या कोंदणांत खुलून दिसण्याऐवजीं ते त्या कोंदणाचा सर्व परिघ व्यापून टाकतात आणि कोंदणाचें अस्तित्वच अजिबात नाहींसें करतात. केळकरांच्या पिढींतील लेखकांच्या वेळीं उपर्युक्त ललितवाङ्मयाचे प्रकार हल्लींच्या स्वरूपांत विकास पावले नव्हते. किंबहुना त्यांचें खरें स्वरूप त्यावेळीं पूर्णपणें प्रकट व्हावयाचें होतें. विशेषतः लघुकथा या वाङ्मयप्रकाराचें हल्लींचें स्वरूप अगदींच अभिनव आणि लघुकथेच्या पूर्वींच्या कल्पनेशीं विसंगत असें आहे. लघुकथेमध्यें विचारांपेक्षां भावनेचा जोर अधिक असावा ही विचारसरणी अलीकडेच रूढ झालेली आहे. विचारांचें यथार्थ निदर्शन करण्यास योग्य असा सोप्यांतला सोपा वाङ्मयप्रकार म्हणजे लघुकथा होय, अशी लघुकथेसंबंधींची लोकांची कल्पना व्हावी इतकें पूर्वींच्या लघुकथेचें स्वरूप बोधप्रधान असे. निबंधासारख्या दिसणाऱ्या कथा लिहिण्याचा क्रम पाश्चात्यांमध्यें ही एके काळीं होता. पण त्यांच्यामध्यें लवकरच चांगले प्रतिभावान् कथालेखक उदयास आल्यामुळें निबंध व लघुकथा यांमधील भेद स्पष्टपणें दृग्गोचर झाला. आपल्या इकडे अद्याप असा स्पष्ट भेद दिसत नसला तरी केळकरांनीं कथा म्हणून लिहिलेल्या लेखांचा परामर्श सामान्य लघुकथांच्या अनुरोधानें घेण्यास प्रायः हरकत नाहीं. आजच्या

प्रचलित उत्कृष्ट लघुकथेचे आवश्यक व विशिष्ट गुण त्यांच्या लेखांमध्यें पाहण्याचा एकसारखा प्रयत्न करणें अनुचित होईल. कारण खुद्द केळकरांनींच आपल्या या लेखांना लघुकथा असें संबोधण्याचा आग्रह धरलेला नाहीं. लेख किंवा गोष्ट असेंच संबोधण्याचा त्यांनी उपक्रम केला आहे. आणि त्याच दृष्टीनें त्यांच्या गोष्टींचें परीक्षण केलें पाहिजे. केळकरांनीं लिहिलेल्या या सात आठ गोष्टी न लिहितां आजपर्यंतच्या त्यांच्या आयुष्यांत त्यांनी फक्त एकच गोष्ट लिहिली असती तर केळकर लघुकथालेखक कां झाले नाहींत अशी कोणत्याहि सरस, सहृदय आणि मार्मिक वाचकाला हळहळ वाटली नसती ! उत्तम कलाकृतीच्या यशस्वितेचें रहस्य हेंच आहे. ' अमुक एका लघुकथेचा लेखक अशाच प्रकारच्या आणखी कांहीं लघुकथा लिहील तर काय बहार होईल, ' असे उद्गार तज्ज्ञ वाचकांच्या तोंडून निघणें म्हणजेच लघुकथा यशस्वी होणें होय. आपली मनोभूमिका कोणत्या प्रकारचे लेखन करण्यास अनुकूल आहे, याची केळकरांनाही योग्य जाणीव आहे. अशी जाणीव त्यांच्या ठिकाणीं नसती तर हजारों निबंध आणि शेंकडों प्रस्तावना लिहिण्याचा त्यांनीं व्याप केलाच नसता. आजपर्यंतच्या चाळीस वर्षांच्या व्यासंगपूर्ण आयुष्यक्रमांत त्यांनीं केवळ सातआठच गोष्टी लिहिल्या. वास्तविक केळकर हे व्यवसायांत आणि व्यासंगांत कधींहि कसूर करणारे नाहींत. आपल्याला लघुकथा साधते आहे अशा खोट्या कल्पनेच्या आहारी त्यांनीं आपलें मन जाऊं दिलें नाही याचें त्यांच्यासारख्या अहर्निश उद्योग करणाऱ्या माणसानें रोजचा लेखनव्यवसायाचा क्रम असूनहि आजतागायत सातआठच गोष्टी लिहिल्या हे एक उत्कृष्ट प्रत्यंतरच होय. ज्या पुस्तकांत त्यांनीं आपल्या लघुकथा संग्रहित केल्या आहेत त्या पुस्तकाला त्यांनीं " मौजेचे चार प्रहर, " असें नांव दिलें आहे. यावरून त्यांच्या गोष्टी हें त्यांच्या व्यासंगाचें आविष्करण नसून केवळ करमणुकीचा एक मामला आहे हेंच सिद्ध होण्यासारखें आहे. तात्पर्य, केळकरांनी ज्या वृत्तीनें आपल्या गोष्टी लिहिल्या त्याच वृत्तीनें त्यांचें परीक्षण करणें योग्य होईल. विनोदाचें भाषण ज्याप्रमाणें विनोदानेंच ग्रहण करावें लागतें त्याप्रमाणे केवळ गंमतीनें लिहिलेल्या गोष्टी गंमतीखातरच वाचल्या पाहिजेत. ' परिहासविजल्पित ' भाषणाचें ' परमार्थानें ' ग्रहण केलें तर अर्थाचा अनर्थच व्हावयाचा !

केळकरांच्या प्रायः सर्वच गोष्टी जुन्या थाटाच्या आहेत. त्यांत एखादें तत्त्व किंवा एखादा विचार स्पष्टपणानें सांगितलेला आढळून येतो. सूचकपणा हें अलीकडच्या लघुकथेचें प्रमुख वैशिष्ट्य केळकरांच्या गोष्टींत विशेष प्रकर्षानें प्रत्ययास येत नाहीं. हा दोष बऱ्याच अंशीं ज्या काळांत केळकर वावरत होते, त्या काळाचा आहे. जी भावना, जो विचार, जो प्रसंग किंवा जी मनोवृत्ति वाचकांच्या मनावर विशेष प्रामुख्यानें बिंबवावयाची असते ती यत्किंचितही दृष्टिआड होऊं द्यावयाची नाहीं हा आधुनिक लघुकथेचा एक आवश्यक गुण मानला जातो. एखाद्या सरोवराची वाट एका सरळ आणि लांब अशा सडकेनें गेलेली असावी, त्या सडकेच्या दोन्ही बाजूंस हारीनें तऱ्हातऱ्हांचे वृक्ष उभे असावेत आणि रस्त्यानें सरोवराकडे जाणारा एकादा पांथ चाललेला असावा; अशा स्थितींत त्या वाटसरूची दृष्टि दूरवर दिसणाऱ्या सरोवरावरच सर्वथैव खिळलेली असते. रस्त्यावर दुतर्फा असणाऱ्या वृक्षराजींच्या विरळ विरळ भागांमधून पलीकडचा व भोंवतालचा प्रदेश दिसला न दिसल्यासारखाच असतो. चालणारा वाटसरूही त्यांकडे ओझरते दृष्टिक्षेप टाकीत असतो; पण त्याचा मोर्चा मात्र सरोवराच्या बाजूलाच वळलेला असतो. हाच प्रकार आधुनिक लघुकथालेखकाच्या लेखनपद्धतीला लागू करतां येण्यासारखा आहे. एका विशिष्ट व परिणामकारक प्रसंगावर त्याची दृष्टि खिळलेली असतांना, त्या प्रसंगाशीं कमी अधिक प्रमाणांत संबंध पावणाऱ्या इतर बाबींचा विचार तो विस्तारानें करीत बसत नाहीं. त्यांचा ओझरता उल्लेख करावयाचा किंवा त्यांची वाचकांना नुसती सूचनाच द्यावयाची एवढेंच कार्य करित करीत तो आपल्या केंद्रीभूत प्रसंगाचें स्थान गांठतो. याउलट जुन्या धर्तीच्या गोष्टींची स्थिति निबिड कुंजवनांतील पुष्करणीकडे जाणाऱ्या आडवळणांसारखी होती. या मनोहर आडवळणांनीं जातां जातां कंटाळून गेल्यावर कुंजवनांतील पुष्करणी दृष्टीला दिसावयाची; क्वचित् प्रसंगीं हीं आडवळणें इतकीं लांबलांब असावयाचीं कीं, जाणाराला आतां पुष्करणीपर्यंत कशाला जा असेंसुद्धां वाटूं लागावयाचें. कुंजवनांत जाऊन पुष्करणी गांठावयाची हा त्याचा हेतु खरा; पण तो साध्य व्हावयास हे अगणित आडमार्ग तुडवावे लागावयाचे! केळकरांच्या गोष्टींची स्थिति या दुसऱ्या प्रकारासारखीच आहे. जुन्या धर्तीच्या

लघुकथांचे हे विशेष ध्यानांत ठेवूनच केळकरांच्या गोष्टींतलि कथानकाचे धागे पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

'गीताराव,' या गोष्टींत गीतेच्या, अभ्यासाचें वेड असलेल्या एका गृहस्थाचें शब्दचित्र रेखाटलें आहे. एखाद्या विशिष्ट गोष्टीचें माणसाला वेड लागलें किंवा ध्यास लागला, कीं त्या माणसाच्या चालचर्येत सहजगत्याच विनोद उत्पन्न होतो, या अनुभवाच्या अनुरोधानें गीताराव या व्यक्तीचें विनोदप्रचुर वर्णन करण्याचा आरंभापासून प्रयत्न केला आहे. आपलें गीतेचें वाचन आणि मनन यथासांग परिपूर्ण झालें असें मानून गीतारावानें अवभृथ स्नानाची तयारी चालविली; पण गीतेंतील अक्षरांच्या ध्वनीवरून त्यांचें स्वरूप निदर्शित करण्याची कल्पना अद्याप पूर्णपणें तडीस गेली नाहीं असा युक्तिवाद करून त्याच्या मित्रानें त्याला "तुझा गीतेचा अभ्यास अद्याप पुरा झाला नाहीं," असें पटवून दिलें. या गोष्टींतलि सुरवातीची विनोदी वृत्ति शेवटपर्यंत सारख्या प्रमाणांत कायम टिकली नाहीं. शेवटीं शेवटीं 'गीताराव' या व्यक्तीवर केंद्रीभूत व्हावयाची दृष्टि गीताग्रंथावर खिळून गेली असावी असा भास होतो. ही गोष्ट जुन्या थाटाची असली तरीसुद्धां हा एक दोष मानण्यास हरकत नाहीं. जी व्यक्ति किंवा जो विचार प्रारंभीं प्रमुख म्हणून उभा केला असेल त्याच्या स्वरूपाच्या परिपूर्ण कल्पनेनेंच गोष्टींचे पर्यवसान घडून आलें पाहिजे. हा दोष वगळल्यास गोष्टींतलि विनोदात्मक शब्दचित्र मनोरंजक वाटल्याशिवाय राहात नाहीं.

'सामाजिक चालीरीतींचा फरक,' या गोष्टींत इंग्रजी समाजांत शिष्ट आणि संभावित म्हणून गणल्या गेलेल्या चालीरीति आपल्याकडील स्त्री-पुरुषांनीं अंगीकारल्या तर काय चमत्कार दिसेल हें दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या गोष्टींतील वर्णनें उत्तम तऱ्हेचीं असून शब्दयोजनाही समर्पक आहे. 'म्हाळसाबाईचा पोषाख कसा होता तें मी सांगतों. चापून चोपून नेसलेलें जरीकांठी पातळ, अंगावर बुट्टेदार शालू, अगदीं ताजीताजी वेणी घालून वेणींत खोंवलेलीं ताजीं फुलें, सर्व अंगभर जेथें जेथें म्हणून घालतां येतील तेथें तेथें दागिने," हें एके ठिकाणीं केलेलें वर्णन यथायोग्य आहे. पण पातळ आणि शालू हीं दोन्हीं वस्त्रें नेसावयाचींच असतात. शालू शेल्यासारखा पांघरावयाचा असतो अशा

कल्पनेनें लेखकांनीं म्हाळसाबाईच्या अंगावर एकदम दोन नेसूं वस्त्रें चढविलीं आहेत असें दिसतें! ही चूक शाब्दिक असली तरी तीमुळें रसभंग झाल्याशिवाय राहात नाहीं. ही चूक सोडली तर सर्वच गोष्ट वर्णन व विवेचन या दोन्ही दृष्टींनीं सरस उतरलेली आहे.

'माझी आगगाडी कशी चुकली,' ही गोष्ट आपल्या इकडील पाहुणचाराचें स्वरूप दाखविणारी आहे. गाडीची वेळ चुकली तरी हरकत नाहीं, पण पाहुणचारांत उणीव होतां कामा नये या समजुतीनें लोक कसकसा अनर्थ करतात याचें हें एक चित्र आहे. पाहुण्याला सुख घावें, आनंद व्हावा ही मुख्य कल्पना लोपून, त्या ठिकाणीं आपल्या वैभवाची बडेजाव किंवा अगत्याचें प्रदर्शन दाखविण्याची कल्पना यजमानाच्या मनांत न कळत उत्पन्न होते व तिच्यामुळें पाहुण्याला त्रास होतो. या गोष्टीला ज्या कल्पनेचा आधार आहे, तसल्या कल्पनेची गोष्ट Arabian Nights मध्यें आहे. त्या गोष्टीच्या कथानकाचें केळकरांच्या कथानकाशीं फारसें साम्य नाहीं; पण ठरवलेलें काम तडीस जाण्याच्या मार्गांत भाकड भानगडी उपस्थित होऊन शेवटीं ठरलेलें काम व्हावयाचें तसेंच राहून गेलें हा निष्कर्ष दोन्हीं गोष्टींसंबंधांत सारखाच आहे.

'दुधाची धार अथवा गुप्तदान,' या गोष्टींत एका विपन्न वृद्ध स्त्रीला एका गृहस्थानें गुप्त रीतीनें व तिच्या न कळत पैशाची मदत केली. हा गृहस्थ लहानपणीं एका देवळांत एका कथेच्या प्रसंगीं या म्हातारीचें दूध प्याला होता आणि त्यामुळें त्याला तिचें पुत्रत्व प्राप्त झालें, अशी त्या मुलाची कल्पना थोरपणींही कायम राहिली. या कल्पनेवरच सर्व गोष्टीची उभारणी केलेली आहे. या गोष्टीमध्यें भाकड वर्णनें किंवा अवांतर वळणें मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल. एका विशिष्ट भावनेचा परिपोष करण्याकरितां जे प्रसंग आणले आहेत तेही व्यवस्थित रीतीनें आणि परिणामकारक पद्धतीनें चित्रित केले आहेत.

'अलीगड किल्ल्यांतील एक रहस्य,' या गोष्टींत एका स्त्रीची पूजेच्या देवांबद्दलची निष्ठा व्यक्त केलेली आहे. किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत गेलेला असूनही त्या किल्ल्याच्या तटांत पुरून ठेवलेले आपले देव उकरून काढण्याचें साहस त्या स्त्रीनें केलें. किल्ल्याच्या पहारेकऱ्यानें तिला साहाय्य केलें. त्यासंबंधीं रीत-

सर चौकशी झाली; पण युरोपियन अधिकारी ममताळू असल्यामुळें पहारेकरी व स्त्री या दोघांनाही शिक्षा झाली नाहीं. त्या स्त्रीचा बाडगा भाऊ हिंदु देवांची पूजा करण्याच्या विरुद्ध होता. त्यानें आपल्या बहिणीस बाटविण्याचेही पुष्कळ प्रयत्न केले. शेवटीं बहिणीचा त्यानें खून केला. ही गोष्ट आत्मकथनपर पद्धतीनें सांगितलेली आहे. प्रारंभींचा प्रास्ताविक भाग, आहे या मानानें आटोपशीर हवा होता. या प्रास्ताविक भागामुळें गोष्टीला सुरवातीच्या वेळीं पंचतंत्रांतील कथेचें स्वरूप आलें आहे. "ठीक आहे. सांगतोंच तर मग." हे अयोध्याप्रसादाचे उद्गार तर या म्हणण्याची निःसंशय साक्ष देतील!

'कपड्यांची अदलाबदल,' ही गोष्ट बरीच प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहे. महायुद्धाच्या वेळीं रिक्रूटभरती करतांना अधिकारी लोक एका माणसाच्याऐवजीं दुसऱ्या माणसाला कसा त्रास देत असत याचें निदर्शन या गोष्टींत केलें आहे. फरारी झालेला इसम शोधतां शोधतां त्याचेच कपडे घातलेला दुसरा एक इसम दिसला. विचारपूस न करतांच त्याला पकडून आणलें व कोठडींत ठेवलें. शेवटीं खरा फरारी इसम आपल्या पायांनीं लष्करांत चालून आला म्हणून या गृहस्थाची सुटका झाली. "आठ दिवस कोठडींत राहिलों काय? फरारी ठरलों काय? चौकशी झाली काय? आणि मी सुटलों काय? कोणीं एकानें तरी आठ दिवसांत मला नांव विचारावयाचें होतें. किंवा माझी चेहेरेपट्टी पडताळून पहायची होती? रंगरूट खात्यांत तेव्हां अशीच अंदाधुंदी होती!" हा या गोष्टीचा मथितार्थ आहे; पण तो लेखकांनीं खुद्द गोष्टींतच न सांगतांही समजला असता! स्पष्ट शब्दांत गोष्टींचें तात्पर्य सांगण्याची पद्धत जुन्या वळणाचीच द्योतक आहे. गोष्टीच्या शेवटचे तीन प्यारे विनोदाच्या दृष्टीनें चांगले असले तरी कलात्मक दृष्ट्या त्यांच्यांत फारसें स्वारस्य वाटत नाहीं.

'शृगाल संमेलन' हें एक असेंब्लीवरील रूपक आहे. या रूपकाच्या द्वारें असेंब्ली हा एक केवळ देखावा आहे, स्वातंत्र्याच्या अभावीं तेथें होणारे वादविवाद निष्फळ आहेत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वरानें बळ हें कांहीं सर्वांना सारखें वांटलेलें नाहीं. यामुळें प्रबळ दुर्बळाला जिंकील, पराभूत होऊन पारतंत्र्य पदरांत पडणें हें नशिबांत असलें तर कांहीं कोणाला

चुकत नाहीं. उलटपक्षीं केवळ सुदैवानें प्रबळ शत्रूचा घाला न पडल्यानें ज्यांचें स्वातंत्र्य गमावलें गेलें नाहीं, असे नादान प्राणीहि जगांत थोडे नाहींत. पण त्या स्वातंत्र्याचा त्यांनींहि गर्व वाहण्यांत अर्थ नाहीं. नादान प्राणी स्वतंत्र राहिला हें जसें त्याला भूषण नाहीं, तसेंच स्वाभिमानी मनुष्य परतंत्र झाला हेंहि कांहीं त्याला दूषण नाहीं. पण दुर्दैवानें आलेल्या पारतंत्र्यांतहि कोण कसा वागतो यावरूनच जग त्याची परीक्षा करील. म्हणून जे केवळ सुदैवानें नव्हे तर स्वपराक्रमानें स्वतंत्र राहिले, पारतंत्र्यांत पडले नाहींत तेच प्राणी जगांत श्रेष्ठ असा या रूपकाचा निष्कर्ष आहे.

पुस्तकरूपानें प्रसिद्ध आणि लोकप्रिय अशा केळकरांच्या एवढ्याच गोष्टी आहेत.

केवळ कला या दृष्टीनें लघुकथा लिहिण्याचा प्रघात नुकताच सुरू झाला असल्या-मुळें जुन्या पद्धतीच्या किंवा जुन्या काळांतल्या गोष्टींना कलेची कांटेकोर कसोटी लावण्याचें वास्तविक कारण नाहीं. शिवाय लघुकथालेखकांत प्रमुख स्थान मिळ-विण्याचा केळकरांचा उद्देश नाहीं. या सर्व गोष्टी मनांत बाळगूनच केळकरांच्या लघुकथा वाचल्यास त्या कोणालाहि श्रेष्ठ प्रकारचें मनोरंजन करण्याइतक्या वाचनीय वाटल्याशिवाय राहाणार नाहींत. केळकरांची मनोभूमिका ललितवाङ्म-याला फारशीं अनुकूल नाहीं ही गोष्ट खरी असली तरी त्यांच्या गंभीर प्रकारच्या वाङ्मयांत दिसून येणारे, सहजपणा, पृथक्करणसुलभता, मार्मिकपणा, उपमादृष्टा-न्ताची योजकता इत्यादि त्यांचे इतरत्र आकर्षक ठरलेले गुण त्यांच्या लघुकथांतूनहि फार मोठ्या प्रमाणांत आढळतात. कोणताहि विचार शक्य तितक्या स्वाभाविकपणानें व्यक्त करून त्याची युक्तायुक्त दृष्टीनें फोड करणें, वर्ण्य विषयाचें वर्णन जितकें मार्मिक आणि हृद्य होईल तितकें तें करण्याचा प्रयत्न करणें, उपमा, दृष्टान्त वगैरे अलंकार योग्य ठिकाणीं आणि केवळ आवश्यक आहेत म्हणूनच त्यांचा आकर्षक पद्धतीनें उपयोग करणें, विषयप्रतिपादनांत सुबोधता राखण्यासाठीं समर्पक शब्दांची आणि मोजक्या शब्दप्रयोगांची योजना करणें वगैरे गुणविशेषांमुळें केळकरांचें वाङ्मय नेहमींच वाचनीय आणि उपयुक्त ठरण्यासारखें आहे. आणि याच दृष्टीनें यांच्या लघुकथांनाहि एक प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे. सामाजिक विष-

यांची विविधता व लघुकथेसंबंधींची लोकांची कलाप्रवण दृष्टि हीं ज्या प्रमाणांत वाढत जातील त्या प्रमाणांत जुन्या लघुकथांची सरसनीरसता कमीअधिक होत जाणार. पण कालांतरानें आपलें लेखन जुनें ठरेल या भीतीनें लेखकानें अजिबात लिहूंच नये असें अर्थातच म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक वस्तु केव्हां तरी जुनी ठरणें हा सृष्टीचा क्रमच आहे; पण आज जें जुनें होतें तें एका काळीं नवें होतें, हें नेहमीं लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. झाडावरून गळून पडलेलीं व वाळून कोळ झालेलीं पानें एके काळीं पालवीच्या स्वरूपांत अस्तित्वांत होतीं ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. काळ हा गंगेसारखा आहे. आज ताजीं दिसणारीं व देवाच्या मस्तकावर विलसत असलेलीं फुलें उद्यां गंगेच्या प्रवाहांत निर्माल्य म्हणून वाहून जावयाचीं असलीं तरी त्यांचें एका वेळीं पूजासाहित्य या नात्यानें असणारें महत्त्व कमी होणें शक्य नाहीं. आज टवटवीत दिसणारीं सरस्वतीच्या शिरावरील वाङ्मयपुष्पें उद्यां कालगंगेमध्यें वाहून जाणार असलीं तरी आजच्यापुरता विचार केल्यास सरस्वतीदेवी त्यांच्यामुळें सुशोभित झाली आहे असें कोणीहि म्हणेल. वाङ्मयांतील नित्यशः बदलत जाणाऱ्या वाङ्मय-प्रकारांचें अवलोकन करतांना हीच गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. उद्यांच्या लघु-कथांचें सौंदर्य आजच्या लघुकथांमध्यें दिसून येणाऱ्या दोषांच्या निरासावरच अवलंबून आहे. आणि हे दोष निदर्शित करण्याचें काम आजच्याच लेखकांनीं केलेलें आहे. या दोषांचा निरास करण्याची संधि आणून दिल्याबद्दल उद्यांच्या लेखकांनीं आजच्या लेखकांबद्दल कृतज्ञताबुद्धीच बाळगली पाहिजे. केळकरांच्या लघुकथा कलेच्या दृष्टीनें क्वचित् स्थळीं दोषान्वित असल्या तरी लघुकथेच्या इतिहासांत त्यांचा दर्जा निःसंशय महत्त्वाचा आहे. कारण त्या एका स्वतंत्र कालखंडाच्या निदर्शक आहेत.

# १०

## प. वा. गोपाळ गणेश आगरकर

# निबंधलेखनाची मीमांसा.

इंग्रजी राजवटीचा उदय होऊन बराच काळ लोटला होता. गलितगात्र अवस्थेत पडून राहिलेल्या आपल्या राष्ट्रपुरुषाच्या ठिकाणीं चेतनेची पहिली लकेर जेव्हां स्फुरण पावली तेव्हां गाढ निद्रेतून जागृत झालेल्या झोंपाळू माणसाप्रमाणें त्यानें एकवार सभोंवार पाहिलें. आजपर्यंत आपण जिकडे पाहावयास पाहिजे होतें तिकडे आपण ढुंकूनही पाहिलें नाहीं अशी जाणीव होऊन विषाद वाटावा त्याप्रमाणें त्या राष्ट्रपुरुषाला पश्चात्तापबुद्धीनें घेरलें. तिचा अंमल थोडथोडा कमी होऊं लागल्यावर आपल्या शरीरांत कायमची वसाहत करून राहिलेल्या रोगांचें उच्चाटन कोणत्या उपयांनीं करावें याचा त्यानें विचार आरंभला. एका रोगाचें पथ्य तेंच दुसऱ्या रोगाचें कुपथ्य असावें आणि दोन्ही रोग शरीराला एकाचवेळीं जडलेले असावेत म्हणजे रोग्यावर उपचार करणाऱ्या वैद्याची जशी अनुपानयोजेनेसंबंधांत तारांबळ उडून जाते, तशीच तारांबळ राष्ट्राची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून अहर्निश मनःपूर्वक विचार करणाऱ्या समाजप्रणेत्यांचीही झाली. ' आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय, ' हा पन्नास वर्षांपूर्वी माजून राहिलेला कडाक्याचा वाद असल्याच स्थितीचा उत्कृष्ट निदर्शक होय. यांतील सामाजिक शाखेचा पुरस्कार करणारांत कै. गोपाळराव आगरकर हे अग्रगण्य होते. अनिष्ट सामाजिक चालींचें निर्मूलन झाल्याशिवाय राष्ट्राची खरी प्रगति व्हावयाची नाहीं, हें आगरकरांचें मुख्य सूत्र होतें. या एका सूत्रांत आगरकरांनीं शेंकडों मणी ओंवले. यांतील एकेक मणी ओढून त्यांनीं सुधारणेचा जप जपला ! या सूत्रांत ओंवलेला प्रत्येक मणी म्हणजे त्या काळचा समाजव्यापक असा सुधारणेचा प्रश्न होता.

आगरकरांच्या निबंधांकडे वरवर पाहणारासमुद्धां त्यांतील विषयांची विविधता व विचारांचें वैचित्र्य हीं दृष्टोत्पत्तीस येण्यासारखीं आहेत. आणि कोण-

त्याही भाषेंतील किंवा देशांतील निबंधकारांची स्थिति पाहिली तर त्यांना सुप्रसिद्धि संपादन करून देण्यास हेच गुण कारणीभूत झाले असल्याचें दिसून येतें. समाजसुधारणेच्या कक्षेंत वाटेल त्या विषयाला फिरावयास लावण्याचें काम आगरकरांना फारच कौशल्यानें करतां आलें. त्यांच्या सामाजिक विषयांचें स्थूल मानानें चार प्रकारचे विभाग पाडतां येतील. समाजांतील सर्वसामान्य व्यक्तींच्या नित्यनैमित्तिक आचरणावर आगरकरांनीं आपल्या कांहीं लेखांची उभारणी केली आहे, तर त्यांचे कांहीं निबंध संशोधनात्मक स्वरूपाचे असून समाजाचा त्याच्या प्रथमावस्थेपासून आजतागायतचा इतिहास कथन करणारे आहेत कांहीं राजकीय व सामाजिक लेखांतून केवळ नैमित्तिक पक्षभेद व्यक्त करण्याचें कार्य झालेलें आहे, तर चौथ्या विभागांत त्यांचे अबलोन्नतिसंबंधांतील चर्चात्मक निबंध समाविष्ट झाले आहेत. त्यांची निबंधांतील विषयांची निवड जशी समर्पक आहे तशीच त्यांतील विवेचनपद्धतीही मार्मिक व वाचकांच्या मनास चटका लावून सोडण्यासारखी आहे.

प्रथमविभागांत अर्थातच जोडा, हजामत, ग्रहण वगैरेसारखे विषय येतात. आपल्या रहाणीकडे त्यांचें आपादकेशान्त कसें लक्ष्य होतें हें जोड्याबरोबरच हजामांसंबंधानें त्यांनीं जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यावरून दिसून येतें.

युरोपियन बायकांच्या झग्यांपेक्षां आमच्या बायकांचीं लुगडीं, नेसण्याच्या सोयीच्या दृष्टीनें अधिक चांगलीं आहेत. पण पदर सांवरण्याची अडचण दूर होण्यासाठीं बायकांनीं जाकिटें घालण्यास आरंभ करावा असें त्यांनीं एका लेखांत प्रतिपादन केलें आहे. आज स्त्रिया जाकिटें नसलीं तरी पोलकीं वापरूं लागल्या आहेत. पण आगरकरांच्या म्हणण्याप्रमाणें पदराला अजीबात रजा देण्याचें कार्य अद्याप व्हावयाचें आहे! पागोटें आणि पगडी यांपेक्षां रुमाल त्यांना अधिक पसंत आहे. धोतर आणि सैल तुमान यांच्यामध्यें त्यांच्या दृष्टीला फारसा भेद दिसून येत नाहीं. पण हिंदुस्थानांतील लोकांनीं युरोपियनांप्रमाणें तिन्हीत्रिकाळ तंग विजार घालणें त्यांना नामंजूर आहे.

बायकांनीं दागिने घालावेत; पण त्यांमुळें चोऱ्या व खून होतात अशी अडचण असेल तर खरे दागिने न घालतां खोटे दागिने घालावे म्हणजे झालें! असें

केलें असतां श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत पाहिजे त्याला दागिन्यांपासून सौंदर्यास होणाऱ्या मदतीचा फायदा घेतां येऊन, शिवाय आपल्या मगदुराप्रमाणें, लत्त्या-कपड्यांवर खर्च करण्यास सवड सांपडेल; इतकेंच नाहीं तर देशांतील बरेंच धन दागिन्यांत अडकून पडल्यामुळें त्याचें नुकसान होत आहे असें ज्यांचें म्हणणें आहे त्यांची दागिने वापरण्यास असलेली बहुतेक हरकत दूर करतां येण्या-सारखी आहे ! एकदां हा खोटे दागिने घालण्याचा प्रघात रूढ झाला, म्हणजे त्यासाठीं घरें फोडण्यांत कांहीं हांशील नाहीं हें चोर लोकांस समजून येईल, आणि मारवाड्यासारखे द्रव्यलोलुप लोक लहान मुलांचे खून करण्यास प्रवृत्त होणार नाहींत. हें दागिन्याबद्दलचें आगरकरप्रणीत अलंकारशास्त्र जितकें मनो-रंजक तितकेंच वैशिष्टयपूर्ण आहे.

शक्तीकरतां लोकांनीं अंडीं खाण्याची जरूर नाहीं असें आगरकरांनीं आपलें मत दिलें आहे. यावरून आगरकरकालीन सुधारक व अंडीं यांचें जें साहचर्य त्यांच्या टीकाकारांनीं जमवून दिलें होतें तें सर्वस्वीं अवस्त्वारोप करणारें कसें होतें हें दिसून येईल.

शिमग्यासारखा बीभत्स सण जितक्या लवकर नष्ट होईल तितका तो होणें अगत्याचें असून दिवाळीसारख्या सणांचें योग्य संवर्धन होणें अवश्य आहे. असेंही त्यांनीं प्रतिपादन केलें आहे.

प्रेतें जाळण्याची पद्धत चांगली आहे. पण तीं नेण्यास गाड्या ठेवाव्यात व पांढरपेशा वर्गांतील लोकांनीं एकमेकांना प्रेतें वाहाण्यांत तत्परतेनें साहाय्य करावें असेंही त्यांनी कळकळीनें सांगितलें आहे. स्मशानांतील ओंगळ उत्तरक्रिया त्यांना अर्थातच नापसंत आहे.

"पुण्याची प्रकृति व गवताच्या गंजी," या आपल्या लेखांत आगरकरांनीं पुणें म्युनिसिपालिटीच्या हातून होणारी आरोग्याची हेळसांड अत्यंत हानिकारक आहे असा स्पष्ट इषारा दिला आहे. लोकांच्या विश्रांतीकरतां म्युनिसिपालिटीनें ठिकठिकाणीं आरामवाटिका ( parks ) तयार करणें श्रेयस्कर आहे, अशीही त्यांनीं सूचना केली आहे.

अशा प्रकारचे विषय हे समाजाच्या रोजच्या प्रवृत्तीसंबंधानें आहेत. या

प्रवृत्ती सामान्यतः उपेक्षणीय वाटण्यासारख्या असतात. पण त्यांना अगदींच महत्त्व नाहीं असें नाहीं, हें पटवून देण्याकरितां आगरकरांनीं त्या विषयांची मांडणी करतांना उपरोध किंवा विनोद यांच्या बैठकीचा आश्रय केला आहे.

द्वितीय विभागांत येणारे विषय संशोधक आणि ऐतिहासिक स्वरूपाचे आहेत. देवतोत्पत्ति म्हणजे स्थूल मानानें पूर्वजपूजा आहे आणि सृष्टींतील सचेतन व अचेतन पदार्थांचे ठायीं प्रबल पुरुषाचे गुण कल्पून त्यांस देवता मानूं लागणें व प्रबल पुरुषांसच जिवंतपणीं आणि मरणोत्तर देव कल्पून त्यांचें पूजार्चन करणें असे देवतोत्पत्तीचे दोन प्रकार आरंभीं सुरू झाले, अशी आगरकरांनीं त्यांची यथार्थ मीमांसा केली आहे. मूर्तिपूजा तीन प्रकारची आहे. जड वस्तूंची पूजा, वनस्पतींची पूजा व प्राण्यांची पूजा. नर्मदेंतले दगड, वृंदावनांतील तुळस व गोठ्यांतली गाय या तीनही वस्तु आपल्या देवता होत. समाजांत श्रेष्ठकनिष्ठ संबंध कसा उत्पन्न होतो, बहुपत्नीकत्वाची चाल कशी पडली असावी, बळी देण्याची पद्धत कां सुरू झाली असावी, मरणानंतर आत्म्याची काय गति होत असावी वगैरे प्रश्नांचा त्यांनीं निरनिराळ्या लेखांतून विस्तारपूर्वक ऊहापोह केलेला आहे. या गोष्टींची चर्चा करतांना आगरकरांनीं स्पेन्सर, मिल्ल वगैरे इंग्रजी ग्रंथकारांचा आधार योग्य त्या ठिकाणीं घेतला आहे. हिंदु समाजाची स्थिति ऐतिहासिक दृष्टीनें अवलोकन करीत असतांना त्यांनीं इतर देशांतील लोकांविषयींचेंही दाखले मधून मधून दिले आहेत.

भारतीय कलांचें पुराणत्व या आपल्या लेखांकांतून आगरकरांनीं भारतीय कला ख्रिस्ती सनाचा आरंभ नव्हता तेव्हांपासून रूढ आहेत असें वेद, मनुस्मृति व पुराणें यांच्या आधारानें सिद्ध केलें आहे. यावरून आपल्यांतील दुष्ट चालीरीति व वेडगळ समजुती यांच्याबद्दल त्यांना जसा तिरस्कार वाटत होता तसाच आपल्या पूर्वजांच्या वास्तविक गुणांबद्दल व थोरवीबद्दल त्यांना परमादर वाटत होता हेंही स्पष्ट रीतीनें दिसून येतें.

तिसऱ्या विभागांत आगरकरांचे मतभेदाचे लेख येतात. सामाजिक सुधारणा आणि कायदा वगैरे लेखांतून सुधारणेला कायद्याची आवश्यकता किती आहे याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें आहे. " फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून

गेलेल्या या आमच्या समाजास प्रथम गति देण्याचें काम मात्र कायद्यानें होणारें आहे. आगगाडी चालू होण्यापूर्वी जसा थोडासा धक्का सोसावा लागतो तसाच हा कायद्याचा उपाय थोडासा गौण असला तरी तो पत्करला पाहिजे." युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांतून मराठी भाषेचा समावेश व्हावा आणि शक्यतोंवर बरेचसे विषय मराठींतून शिकविले जावेत असें आगरकरांचें मत आहे. 'हे तुमचे पुढारी नव्हत!' या लेखांत आगरकरांनीं शिंगें मोडून वासरांत शिरणाऱ्या सुशिक्षित प्रच्छन्न सुधारकांचें खरें स्वरूप उजेडांत आणिलें आहे. संमतिवयाचा कायदा करून घ्या, पण विवाहाची वयोमर्यादा वाढविणें हाच अस्नात बालिकांच्यावर अकालीं होणारी बळजबरी निवारण्याचा खरा आणि टिकाऊ उपाय आहे असें आगरकरांनीं आपली संमतिवयाच्या बिलाची लेखमाला लिहून प्रतिपादन केलें आणि आज तेंच मत ग्राह्य कसें ठरलें आहे हें उत्कृष्ट रीतीनें प्रत्ययास आलें आहे! अशबर्नरसाहेबांनीं एका लेखांत हिंदु विधवा असन्मार्गी असतात अशा तऱ्हेचें एक विधान केलें होतें. आगरकरांनीं एक लेख लिहून त्यांचा खरपूस समाचार घेतला आहे. अशबर्नरांचे जातभाई कर्नल मनरो यांनीं हिंदु स्त्रियांच्यासंबंधानें जे प्रशंसापर उद्गार काढले आहेत त्यांतील अवतरण घेऊनच आगरकरांनीं साहेबमजकुरांच्या विधानास उत्तर दिलें आहे. कर्नल मनरो म्हणतात, "कोणत्याही देशांतील स्त्रियांस व इंग्लंडच्याही स्त्रियांस, त्यांचें वर्तन ब्राह्मणी किंवा वरिष्ठ हिंदु स्त्रियांहून कमी शुद्ध नाहीं, असा दाखला मिळणें म्हणजे आपली मोठी वाखाणणी झाली असें मानण्यास हरकत नाहीं." वुइलर्ड नांवाच्या दुसऱ्या एका युरोपियन गृहस्थांनीं हिंदुस्थानी संगीतावरून हिंदी स्त्रिया विषयलोलुप असतात अशा प्रकारचा आरोप करण्याचें धाडस केलें. त्यालाही आगरकरांनीं 'आणखी एक शहाण्याचा कांदा,' असा एक स्वतंत्र लेख लिहून उत्तर दिलेलें आहे. या लेखाच्या शेवटीं आगरकर लिहितात, "कोणत्याही देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये, म्हणून आम्ही इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयीं कांहीं एक म्हणत नाहीं. तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें आणूं लागतील, तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून

मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत असें म्हणण्यास आम्ही कधींही सोडणार नाहीं." याप्रमाणें 'बाबावाक्यं प्रमाणं' मानून चालणाऱ्या आपल्या वेडगळ बंधूंना आपल्या तीव्र वाग्बाणांनीं जागें करण्याचा आगरकरांचा एका बाजूनें प्रयत्न चालला होता तर दुसऱ्या बाजूनें आमच्या समाजस्थितीसंबंधानें निरर्गल प्रलाप काढणाऱ्या गोऱ्या लोकांचीहि योग्य संभावना करण्याचें काम ते बिन-तोड रीतीनें कसें करीत होते हें उत्कृष्ट ध्यानांत येण्यासारखें आहे. 'इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार' हा आपल्या ब्रीदवाक्याचें स्वरूप स्पष्टपणें मांडणारा घोष, आणखी एक जात निर्माण करून आधींच असंख्य असलेल्या जातींत भर घालण्याचा मूर्खपणा करण्याची आपली अनिच्छा दाखवून 'जात कां करीत नाहीं?' या प्रश्नाचा दर्शविलेला फोलपणा इत्यादि लेख तिसऱ्या विभागांत येण्यास हरकत नाहीं.

राहातां राहिले केवळ स्त्रियांच्यासंबंधींचे लेख. स्वयंवर पुन्हा रूढ होण्याची आवश्यकता, घटस्फोटाची सवलत असण्यापासून होणारे फायदे, पुनर्विवाहाची परवानगी आणि ते अधिक प्रमाणांत होण्याबद्दल व्हावयाचे प्रयत्न, स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याचें महत्त्व, स्त्रियांची परवशता व पराधनिता, त्यांना वरिष्ठ शिक्षण आणि सहशिक्षण देण्यापासून होणारें समाजाचें हित, केशवपनाच्या गलिच्छ चालीचें निर्मूलन करण्याची आवश्यकता, विवाहाची कालमर्यादा वाढविण्याची जरूरी, स्त्रियांस समान हक्क देण्यानें होणारा सुपरि-णाम इत्यादि समाजहिताच्या अनेक प्राणभूत विषयांची आगरकरांनीं निर-निराळ्या लेखांतून विस्तारानें चर्चा केलेली आहे. येथवर केलेल्या सविस्तर विवेचनावरून आगरकरांचे विषय अत्यंत व्यापक स्वरूपाचे होते हें जसें लक्ष्यांत येतें, त्याप्रमाणेंच समाजस्थिति सुधारण्याकरतां त्यांनीं जे उपाय सुचविले आहेत तेही डोळे उघडून पाहणारांना व निर्विकार बुद्धीनें विचार करणारांना सर्वस्वीं मान्य होण्यासारखे कसे होते याचा आजच्या परिस्थितीवरून कोणासही प्रत्यय येण्यासारखा आहे.

समाजाच्या दृष्टीवरील अज्ञानाची व दुराग्रहाची झांपड दूर करण्याचा असा प्रयत्न करणाऱ्या लेखकाची अवलोकनशक्ति फार मार्मिक आणि विशाल असावी

लागते. व्यक्तींच्या वर्तनांतील किंवा समाजाच्या व्यवहारांतील अगदीं लहान-सहान गोष्टींसुद्धां बारकाईनें पाहून त्यांची यथायोग्य रीतीनें मांडणी करण्याची कला वरवर दिसण्यांत जितकी सोपी वाटते तितकीच ती प्रत्यक्ष करून दाखविण्यास अत्यंत कठीण असते हें कोणालाही अनुभवानें समजण्यासारखें आहे. किंबहुना विषय जितका सोपा आणि नित्यपरिचयांतला असेल तितका तो भारदस्त रीतीनें मांडणें अधिकच बिकट असतें असेंही म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. सामाजिक विषयांची शहानिशा करणाऱ्या आणि अचेतन समाजाला जागृति आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या आगरकरांसारख्या लेखकांत तर या गुणाचें परमोत्कर्षानें वास्तव्य असण्याची आवश्यकता होती. आपल्या सामाजिक चालीरीतींत अमुक-अमुक आचार टाकाऊ आहेत हें नुसतें यादवार सांगितलें असतें तर त्याचा लक्षावधि अंधश्रद्ध लोकांवर कदाचित् अनिष्ट परिणामही झाला असता. पण अनेक रिवाजांचा उल्लेख एकाच ठिकाणीं करून त्यांची परस्परांमधील असंबद्धता दाखवून देण्यानें त्या विवक्षित बाबींबद्दल मर्मज्ञ व विचारी वाचकाच्या मनांत विनोदपूर्वक उपहास उत्पन्न झाला आणि त्यासंबंधानें तर्कशुद्ध विचार करण्याकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति होऊं लागली. ज्या काळांत आगरकरांसारख्या लोकहिततत्पर आणि आपल्या बांधवांच्याबद्दल सदय बुद्धि बाळगून त्यांची श्रेयस्कर उन्नति करण्याचा स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न करणाऱ्या गृहस्थांची शिमग्याच्या सणानिमित्त त्याच्यादेखत प्रेतयात्रा निघाली आणि जनतेनें त्याच्या परहितपरतेची मर्मभेदक संभावना मांडली त्या काळांत आगरकरांनीं केली ही कामगिरी प्रायः अशक्य स्वरूपाचीच होती! सोंवळ्याची मीमांसा करतांना आगरकर म्हणतात, " हरभऱ्याची डाळ भिजवून वाटली आणि तिचा चटणी केली तर ती निर्लेप होऊन फराळास चालते ! पण तीच डाळ अगोदर न भिजवतां जात्यांत चिरडून मग तिच्या पिठांत पाणी घातलें कीं तें खरकटें झालें ! त्याचें पिठलें मुकटा लावून घेतल्याशिवाय तोंडांत घालण्याची सोय नाहीं ! भडमुंज्याकडच्या पोह्याकुरमुऱ्यासारख्या भाताच्या जाती राजरोसपणें खाण्यास कांहीं हरकत नाहीं ! पण बाजारच्या भाजीभाताकडे किंवा पावबिस्कुटाकडे ब्राह्मणानें पाहण्याची सोय नाहीं. दवाखान्यांत कोणत्याही माणसानें कसलेंही

औषध दिलें तरी चालतें; पण ट्रेचरच्या दुकानचें सोडावॉटर किंवा लेमोनेड उघडपणें पिणें म्हणजे ब्राह्मण्याला हरताळ लावण्यासारखें होय." या उताऱ्याच्या मूळ लेखावरून आगरकरांची अवलोकनशक्ति किती सूक्ष्म आणि सर्वगामी होती याची आपोआपच प्रचीति येते. असल्या अवलोकनशक्तीला अभ्यास आणि व्यासंग या गुणांची जोड मिळालेली असली म्हणजे हे सर्व गुण एकमेकांच्या साहाय्यानें अधिकच उठावदार दिसतात. आणि समाजहिताची श्रेष्ठ भावना अंगीं उत्कट रीतीनें बाणलेली असली म्हणजे या सर्व सामुग्रीची मांडणी जोरकस रीतीनें व वाचकांचीं हृदयें हलवून सोडील अशा पद्धतीनें कशी करतां येतें याचें आगरकरांचे लेख हें उत्कृष्ट प्रत्यंतर होय. निरनिराळ्या देशांचा सामाजिक इतिहास आगरकरांनीं तुलनात्मक पद्धतीनें आत्मसात् करून ठेवला होता. 'विजयलांछनें' आणि 'व्यवच्छेदन' या त्यांच्या लेखांतून अशा प्रकारचा त्यांचा अभ्यास विशेष प्रमाणांत पहावयास मिळतो.

त्याचप्रमाणें रामायण, महाभारत वगैरे पुराणांतील कथांशीं त्यांचा चांगला परिचय घडलेला आहे. वेद, मनुस्मृति, वगैरे प्राचीन पौरस्त्य ग्रंथ व स्पेन्सर मिल्ल वगैरे विद्वानांचे आधुनिक ग्रंथ या दोन्ही ज्ञानशाखांचा त्यांचा व्यासंग वाखाणण्यासारखा होता. 'शनिदेव ऊर्फ साडेसातीचा देव' या लेखाचा पूर्वार्ध मनोरंजक पौराणिक कथांच्या संदर्भांनीं व्यापलेला आहे. आणि उत्तरार्धांत शनीविषयीं सुधारलेल्या ज्योतिष्यांचें काय म्हणणें आहे, याचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. एकाद्या लहानशा उताऱ्यानें त्या लेखाची स्थूल कल्पनासुद्धां येणें शक्य नाहीं. यास्तव जुन्या व नव्या गोष्टी आकर्षकपणानें एकत्र गुंफून देण्याची आगरकरांची हातोटी मूळ लेख वाचूनच समजावून घेणें कोणत्याही वाचकाला आवश्यक वाटेल. भारतीय कलांचें पुराणत्व सिद्ध करण्याकरतां आगरकरांनीं मनुस्मृतींतील आधार घेतले आहेत. देऊळ, मूर्ति, तळीं, हौद, विहिरी व जीवंत टांकीं, पूल, भुइकोट किल्ले व डोंगरी किल्ले, राजवाडे व त्यांवरील निशाणें, कोठारें, हत्यारखाने, बसण्याच्या गाड्या व ओझ्याच्या गाड्या, पांढरे पोषाख, लोंकर, कापूस व ताग यांचीं रंगीत वस्त्रें, रेशमी कपडे, नीळ व लाख, जोडे, छत्र्या, दागिने, अत्तरें, आसनें व मंचक, दिवे, दगडांच्या वस्तु, चमचे व

भांडीं, बिछाने व घोंगड्या वगैरे जिनसांचे उल्लेख मनुस्मृतीमध्यें आलेले आहेत. त्याचप्रमाणें रामायणाच्या दुसऱ्या कांडांतील एकोणिसाव्या अध्यायांत अयोध्यें-तील सर्व जातीचे लोक भरताबरोबर रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्यावेळचें वर्णनही आगरकरांनीं दिलेलें आहे. या भरताच्या स्वारींत प्रत्येक धंद्याचे लोक होते. जवाहिरे, गंधी, सोनार, कोष्टी, लोंकर विणणारे, सुतार, पितळेचें काम करणारे, चितारी, गायनाचीं वाद्यें करणारे, शस्त्रें करणारे, लोहार, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कापणारे, कांच करणारे, आणि असेच इतर कारागीर त्या स्वारींत समाविष्ट झालेले होते. त्याच लेखमालेंत वेदकालाविषयीं लिहितांना आगरकर म्हणतात, “ वेदकालीं आर्यलोकांना सोनें, रुपें, लोखंड वगैरे धातूंचा उपयोग समजला होता; ते शेतकी करूं लागले होते; गाई, घोडे वगैरे जनावरें माणसाळून त्यांनीं त्यांस आपल्या कामास लाविलें होतें. धनुष्य, बाण, खड्ग वगैरे जिनसा त्यांना करतां येत होत्या; गरीब व श्रीमंत आपल्या मगदुराप्रमाणें लहानमोठीं घरें बांधून राहात होते; यज्ञयागादि क्रिया होऊं लागल्या होत्या; शहरें व किल्ले बांधण्यास आरंभ झाला होता; इत्यादि गोष्टी चांगल्या रीतीनें सिद्ध होतात. ” अशा प्रकारची उपयुक्त आणि मनोरंजक माहिती आगरकरांनीं निरनिराळ्या लेखांतून वेळोवेळीं दिली आहे. मार्मिक अवलोकनशक्ति आणि बहुविध व्यासंग या दोन गोष्टी आगरकरांच्या लेखनांत किती उत्तम रीतीनें निदर्शनास येतात याच प्रत्यंतर त्यांच्या निबंधांतील वरील-सारख्या निर्देशांवरून चट्कन् येण्यासारखें आहे.

आस्था, आशावाद आणि आत्मविश्वास या गुणत्रयीमुळें आगरकरांच्या लेखनाला उत्कृष्ट सौंदर्य प्राप्त झालें आहे. हातीं घेतलेल्या प्रत्येक विषयाबद्दल आगरकरांची तळमळ कशी रसरशीत आहे, त्यांचा आशावाद किती कणखर आहे आणि त्यांचा आत्मविश्वास किती जाज्वल्य आहे याचा दाखला त्यांच्या निबंधांचें विहंगावलोकन करणाऱ्या कोणत्याही वाचकाला चट्कन् मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. समाजहितविषयक निबंधलेखन करणाराला आपल्या विषयाबद्दल आस्था वाटली नाहीं तर त्याच्या लेखनाचा इष्ट तो परिणाम वाचकांच्या मनावरही सर्वस्वीं व्हावयाचा नाहीं हें निर्विवाद आहे. रोग्याची त्याच्या जिवाभावाच्या

आप्तेष्टांनीं केलेल्या सेवेची भाडोंत्री लोकांनीं पराकाष्ठेच्या काळजीनें ठेवलेल्या त्याच्या व्यवस्थेशीं जशी कधींही बरोबरी होणार नाहीं, तशीच एकाद्या विषयाची एकाद्या लेखकानें आस्थेवाईकपणानें केलेली साधीसुधी मांडणी, दुसऱ्या एखाद्या लेखकाच्या अलंकारप्रचुर पण अनास्थेच्या प्रतिपादनशैलीपेक्षां जिज्ञासु वाचकाला अधिक श्रेयस्कर वाटते. आगरकरांच्या लेखनाकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहाणाराच्या हेंही लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं कीं, आगरकर त्वेषानें लिहीत असोत अगर करुणापूर्वक अंतःकरणानें लिहीत असोत, विनोदाच्या हेतूने लिहीत असोत अथवा उपहासबुद्धीनें लिहीत असोत, निर्भर्त्सनेकरितां लिहीत असोत किंवा उपदेशाकरितां लिहीत असोत, त्यांच्या या सर्व लेखनाच्या मुळाशीं उत्कट कळकळीचा बळकट आधार असलेला दिसतो. कित्येक प्रसंगीं तर त्वेष, करुणा, विनोद, उपहास वगैरेंची गर्दी झाली असतांनाही त्यांची पराकाष्ठेची आस्था त्यांतून स्पष्टपणें दृग्गोचर झाल्याशिवाय राहात नाहीं. सुप्रसिद्ध आंग्ल ग्रंथकार कार्लाईल यानें आपल्या विभूति आणि विभूतिपूजन ( Hero and Hero-Worship) या पुस्तकांत उत्तम अग्रणीचा प्रमुख गुण म्हणजे त्याची अंगीकृत कार्याबद्दलची तळमळ किंवा मनःपूर्वकता होय असें म्हटलें आहे. महाराष्ट्रीय निबंधलेखकांत आगरकरांना जो अग्रेसरत्वाचा मान मिळत आहे त्यास त्यांच्या अंगचे इतर गुण कितीही साधनीभूत झाले असले तरी त्यांत त्यांच्या ठिकाणीं असलेल्या जाज्वल्य आस्थेसच श्रेष्ठ स्थान द्यावें लागेल. ‘आमचें अजून ग्रहण सुटलें नाहीं,’ या सुप्रसिद्ध लेखाचा समारोप करतांना आगरकर लिहितात, ‘पुराणांतलीं वांगीं पुराणांत अशा पद्धतीनें आमच्यांतील विद्वान् म्हणविणारांचें वर्तन बहुधा होत असल्यामुळें दुर्मति, दुराग्रह आणि दुष्ट चाली यांचें ठाणें या देशांत कायम झाल्यासारखें झालें आहे. बाकी ज्या देशांत भास्कराचार्यांसारखे ज्योतिषी होऊन गेले, त्या देशांत अजूनपर्यंत चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण आलें असतां कांहीं वेळ थंड पाण्यांत निष्कारण बुड्या मारण्याची, आणि जणुं काय आपणांस सुतक्यानेंच स्पर्श केला आहे कीं काय असें समजून, स्त्री-पुरुषांनीं धोत्रापात्रांसकट डोक्यावरून पाणी घेण्याची चाल अजूनपर्यंत दृष्टीस पडावी काय ? पण आमच्या भास्कराचार्यांसच हा प्रकार अप्रशस्त म्हणण्याची छाती कोठें होती ?

भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व फक्त वेधशाळेंत ! लोकापवादाचें भय टाकून, आपल्या मनास शुद्ध दिसेल तें लोकांस सांगण्याचें व तदनुसार वागण्याचें धैर्य केलें पाहिजे; आणि तसें पुष्कळांकडून होऊं लागलें, तरच अज्ञानराहूनें ग्रासलेल्या या आमच्या हतभाग्य देशाचें ग्रहण लौकर सुटणार आहे ! " या उताऱ्यावरून आगरकरांची आस्था कशा प्रकारची होती याची सहज कल्पना होणार आहे. ' समजत नाहीं तें हें, ' या लेखाचा आरंभही यासंबंधांत नमुन्यादाखल वाचण्यासारखा आहे. इतकें असूनही सामाजिक सुधारणेबद्दल आगरकरांना कधींही निराशा वाटली नाहीं. किंबहुना आपल्या राष्ट्राची सामाजिक प्रगति इतउत्तर कूर्मगतीनें न होतां ती गरुडभरारीच्या वेगानेंच होणार अशाबद्दल त्यांच्या मनाला निःशंकपणें खात्री वाटत होती. ' इति चहाप्रामण्यप्रकरणं समाप्तम् ' या लेखाच्या समारोपांत आगरकरांचा हा आशावाद अत्यंत उत्कटत्वानें प्रकट झालेला आहे. "तुम्ही सुधारकांचा कितीही द्वेष करा, त्यांस कितीही झिडकारा, पण फिरून ते तुम्हांस चिकटलेले आहेत असें तुमच्या दृष्टीस पडेल. त्यांची मगरमिठी ज्यास उकलतां येईल असें कोणतेंही प्रामण्य तुमच्याच्यानें बसवतां येणार नाहीं. त्यांच्या तुम्हांवरील भक्तीस पाहिजे तर विरोधभक्ति म्हणा, पण तिचें तुमच्याच्यानें सत्त्वहरण होणार नाहीं आणि सरतेशेवटीं आपल्या प्रभावानें ' मन सुधारकीं रंगलें, अवघे जन सुधारक झाले, ' असें करून टाकल्याशिवाय ती राहाणार नाहीं ! " आगरकरांना अशा प्रकारची आशा वाटण्याचें कारण आपण ज्याकरितां जिवाचें रान करीत आहों तो आपला पक्ष सत्पक्ष आहे, तो यशस्वी होण्यानेंच समाजाची खरीखुरी उन्नति होणार आहे अशाबद्दल त्यांना वाटणारी श्रद्धा हें होय. आपली शारीरिक, मनिसिक आणि बौद्धिक शक्ति आपल्या पक्षांतील देशबांधव समाज सुधारण्याच्या कार्याकडे एकाग्रतेनें खर्च करतील तर देशाची सुधारणा झाल्याशिवाय राहाणार नाहीं असेंच त्यांचें मत होतें. या लोकांचा अधिकार फार प्रचंड आहे, तो त्यांनीं जर पूर्ण प्रभावानें गाजवून घेतला तर ' न भूतो न भविष्यति ' अशा प्रकारची सुधारणा झाल्याशिवाय राहाणार नाहीं, असें आगरकरांची मनोदेवता त्यांना नित्यशः सांगत असे. या सुशिक्षित देशबांधवांच्या वतीनें पुढें येऊन आगरकर आपल्या

'स्वयंवर' नामक लेखांत जाहीर करतात कीं, "कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें तितकें किंवा त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे. सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेंच आम्हीं पालन करणार व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांच्या जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार." आपल्या तरुण देशबांधवांनीं बुद्धिपुरस्सर प्रयत्न केल्यास बालविवाहासारख्या अपकारक चाली पंचवीस वर्षांच्या अवधींत निःशेष नष्ट झाल्याशिवाय राहावयाच्या नाहींत असे त्यांनीं एके ठिकाणीं आशापूर्ण अंतःकरणानें कळकळीचे उद्गार काढलेले आहेत! इंग्लिश निबंधकार चार्लस् लँब याला तिकडील टीकाकार त्याच्या लेखनांतील भावनांच्या तरलतेमुळें ( Elasticity of Sentiments ) 'निबंधलेखकांचा सम्राट्' या गौरवपूर्ण संज्ञेनें संबोधीत असतात. चलत्चित्रपटांच्या कथानकांत काम करणाऱ्या अभिनयपटु नटासही जितकी चलाखी साधणार नाहीं तितक्या चलाखीनें लँबच्या लेखनांतून भिन्न भिन्न स्वरूपांच्या भावना जणुं काय उसळया मारीत असतात. आगरकरांच्यासंबंधांतही हाच मनोधर्म विशेष प्रामुख्यानें प्रतीत झाल्याशिवाय राहात नाहीं. हा मुद्दा उदाहरणानें सिद्ध करण्याकरतां आगरकरांच्या 'वल्लभोपासना,' या लेखांतलि खालीं दिलेला उतारा, त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें कोणत्याही तऱ्हेचा आडपडदा न राखल्यानें अगदीं स्पष्ट व उत्तान स्वरूपाचा असला तरी वरील विधानाच्या विशदीकरणार्थ त्याचा उत्कृष्ट उपयोग होणार आहे. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशाच्या विवाहपद्धतींची तुलना करतांना आगरकर म्हणतात, "क्षणभर असेंही मानलें कीं, बालविवाहामुळेंच ही विशेष शुद्धि आम्हांस दृष्टीस पडत

आहे, तर तेवढ्यासाठीं या दुष्ट चालीपासून दुसरे जे अनेक तोटे आहेत, ते करून घेण्यास आम्हीं तयार व्हावें काय ? " हा प्रश्न मनाला विचारल्याबरोबर आगरकरांच्या भावनेची भरारी वाऱ्याच्या वेगानें वाढत गेली आहे ! स्वयंवर आणि बालविवाह या दोन विवाहपद्धतींची तुलना करतां करतां सात्त्विक आनंदानें आणि सात्त्विक संतापानें हृदय एकदम भरून येऊन त्या संमिश्र भावनांच्या भरांत आगरकर लिहितात, " ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे; ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागावर तारुण्याचें तेज चकाकत आहे: विषयवासना जागृत झाल्यामुळें उल्हासानें व उत्कंठेनें अननुभूत सुखास्वादाच्या अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत, दृष्टींत व चर्येंत लज्जा, अधीरता, साशंकपणा वगैरे परस्परविरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्यांचे हरएक प्रयत्न चालले आहेत; विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनीं आपणांस होईल तितकें अलंकृत करून, अन्योन्यास मोह पाडण्याविषयीं जे अहोरात्र झटत आहेत; अन्योन्य समागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यांस युगतुल्य झाला असून, जे सूर्याच्या अश्वांस मंदगतित्वाबद्दल निंदूं लागले आहेत, व यामिनीस आपली समागमकारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे जे डोळे लावून बसले आहेत अशा स्त्री-पुरुषांच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणीकडे ? आणि पंतोजीचा मार खाणाऱ्या व अभ्यासाखालीं अर्धमेल्या झालेल्या, दुर्बळ, भेकड आणि लुस्कान अशा आमच्या सोळा-सतरा वर्षांच्या बहुतेक पोरांच्या, आणि बाहुला-बाहुलीचा व भातुकलीचा ज्यांचा खेळ नुकताच सुटला आहे, व नवरा म्हणून ज्याच्याशीं आपला एक प्रकारें विशेष संबंध झाला आहे, असा पुरुषजातीपैकीं कोणी एक इसम आहे, असें कोठें नुकतेंच समजूं लागलें आहे, अशा आमच्या बारा-तेरा वर्षांच्या निस्तेज, लाजाळू व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या महालाची बहार कोणीकडे ! " अशाप्रकारें भावनेचा आवेग कितीही अनावर होत असला तरी वाचकांच्या भावनेलाच केवळ आंदोलन देण्याचा आगरकरांचा प्रधान हेतु नसे ही त्यांतल्या त्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. वाचकांच्या मनोवृत्ति नुसत्या भावनामयच करून टाकण्याचें सोपें काम आगर-

करांना वाटेल तेव्हां करतां आलें असतें; पण त्यांचा हेतु नुसत्या भावना हालवीत बसण्याचाच नसून वाचकांच्या बुद्धीला आणि विचाराला चालना देऊन त्यांना सन्मार्गवर्ती करण्याचा होता. यामुळें वर दिलेला उतारा संपण्याच्या बेताला शरीरांतील हृदयाला आणि हातांतील कलमाला निमिषार्धांत लगाम लावून आगरकर म्हणतात, " पण स्वतंत्रपणें विचार करून तदनुसार वर्तन करण्यास लागणाऱ्या धैर्यानें ज्या आम्हांस अनेक शतकें सोडलें आहे, त्या आम्हांस बलाढ्य रूढींच्या अमलाविरुद्ध बंड करून, दास्यशृंखला झुगारून देण्याची व उभयसुखांतील महदन्तराचा विचार करण्याची हिंमत कोठून असणार ? " आगरकरांच्या साऱ्या सुधारणाविषयक मतांचा मोर्चा बालविवाह आणि विधवाविवाह याकडेच वळलेला आहे, आणि त्यांच्या सुधारणेचा पल्ला व्यापक स्वरूपाचा नाहीं, असा सूर काढून आगरकरांनीं उपर्युक्त बाबींचें प्रतिपादन केलेलें महत्त्व प्रायः तात्कालिक स्वरूपाचें होतें, असाही युक्तिवाद आज कित्येकांच्याकडून पुढें केला जातो. प्रत्यक्ष आंकड्यांचें प्रमाण पाहून खात्री करून घेण्याचा अशा आक्षेपकांनीं विचार केला तर त्यांना आपल्या स्वतांच्याच अज्ञानाची कींव वाटल्याशिवाय राहाणार नाहीं ! आगरकरांच्या काळानंतर सुमारें चाळीस वर्षांनीं म्हणजे १९३१ सालीं प्रसिद्ध झालेल्या खानेसुमारीच्या सरकारी अहवालांतील आंकड्यांचें प्रमाण जरी पाहिलें तरी समाजसुधारणेची आस्था बाळगणाऱ्या कोणाही वाचकाला फार मोठा धक्का बसेल आणि आगरकरांच्या मतांबद्दल निःसंशय आदरबुद्धि वाटूं लागेल ! १९३१ सालच्या अहवालांत पुढील कोष्टक दिलें आहे.

| वयोमान | विधवांची संख्या. |
|---|---|
| शून्य ते एक | १५१५. |
| एक ते दोन | १७८५ |
| दोन ते तीन | ३४८५ |
| तीन ते चार | ९०७६ |
| चार ते पांच | १५०१९ |

| | |
|---|---|
| पांच ते दहा | १०५४८२ |
| दहा ते पंधरा | १८५३३९ |

१९३१ सालीं विधवांच्या संख्येसंबंधानें जर ही अवस्था होती तर १८९२ सालीं म्हणजे संमतिवयाच्या बिलावर अनुकूल प्रतिकूल टीकांच्या फैरी झडत होत्या त्या काळांतील एकंदर दुरवस्थेची सामान्यतः कल्पना करणेंही अशक्य म्हटलें पाहिजे! आगरकरांची लेखरचना पूर्णपणें सहेतुक होती. त्यामुळें कोणत्याही लेखांत मुद्द्याला सोडून जाण्याची त्यांना सोयच नव्हती! स्वतांच्या आणि लोकांच्या मनोरंजनापेक्षां, उभयतांच्या मनःशिक्षणावरच आगरकरांची दृष्टि सदैव खिळलेली होती. यामुळें आपल्या भावना तारतम्यबुद्धि व विवेचक वृत्ति यांच्या कोंदणांत बसवूनच त्यांना आपली कामगिरी करावी लागली आणि ती त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें केली.

समाजांतील कार्यकर्त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीमुळें सामान्यतः दोन भिन्न किंबहुना परस्परविरुद्ध अशा मनश्चर्येच्या कार्यकर्त्यांचे सांप्रदाय समाजांत नेहमीं निर्माण होत असतात. एका सांप्रदायाची मदार बहुसंख्य लोकांच्या सर्वसामान्य भावनांवरच विशेष असते. लोकांच्या भावनांना एकसारखे हलवीत ठेवावयाचें, साऱ्या समाजाची बुद्धि आपल्या अभिनिवेशी व्यक्तिमत्वानें ग्रासून टाकावयाची आणि अशा रीतीनें समाजाला स्वतंत्र अशी विचारवृत्ति राखूंच द्यावयाची नाहीं, असा रोख या भावनाधिष्ठित सांप्रदायाचा असतो! तर याउलट दुसऱ्या सांप्रदायाची सारी भिस्त समाजाच्या तर्कशक्तीचें आवाहन करण्यावरच असते. समाजांतील सुबुद्ध जनता विचारमार्गाकडे वळण्याकरितां जागी व्हावी, तिच्या साऱ्या प्रवृत्ति विचारांच्या आंदोलनानें हादरून जाऊन कार्यप्रवण व्हाव्या, आणि आपल्या श्रेयस्कर उन्नतीकरितां तिनें कंबर कसावी असा या विचारप्रवर्तक सांप्रदायाच्या कार्याचा एकंदर अभिप्राय असतो. आगरकर अर्थातच समाजाला प्रबुद्ध आणि विवेककुशल बनविणाऱ्या या दुसऱ्या सांप्रदायाचे पुरस्कर्ते होते!

•

आगरकरांना विनोद वावडा होता असें सकृद्दर्शनीं कांहींजणांना वाटण्याचा संभव आहे; पण त्यांच्या निबंधांच्या अल्पशाही परिशीलनानें हा समज निखालस

चुकीचा कसा आहे हें सहज समजून येण्यासारखें आहे. आपल्या तीव्र आणि भेदक दृष्टीनें जगाच्या इष्टानिष्ट व्यापारांकडे बघणारा एखादा स्थितप्रज्ञ एखाद्या हास्योत्पादक दृश्याच्या अनुभवानें जसा गालाला एखादीच खळी पाडून स्मित करील आणि त्या मिस्किल स्मिताची छटा जशी इतरेजनांच्या मुखांवरही प्रतिबिंबित करील, तद्वतच व्यक्तीच्या आणि समाजाच्या नित्यनैमित्तिक बाबींची चर्चा करतांना आगरकर एखाद्या हास्योत्पादक गोष्टीकडे स्मितपूर्वक अंगुलिनिर्देश करून वाचकांनाही गालांतल्या गालांत हंसावयाला भाग पाडतात. आगरकरांच्या वाचकांना हंसण्याकरितां पुस्तक कधींही बाजूला करण्याचें कारण पडत नाहीं. आणि वाचकांच्या हास्यध्वनीच्या लहरी फारच क्वचित्प्रसंगीं वाऱ्याशीं संमिश्रण पावत असतात. पण या बाह्य नादाऐवजीं वाचकाच्या गंभीर मनःसागरावर मात्र किती वेळ तरी असंख्य हास्यतरंग उसळत राहिलेले असतात! 'खुळें रे खुळें! अथवा बहिष्काराचें शुष्क अवडंबर,' या लेखांत आगरकर एकें ठिकाणीं विनोदानें म्हणतात, "शर अथवा शस्त्रें, हत्यारांच्या कायद्यामुळें आम्हांपाशीं राहिलीं नाहींत! तेव्हां आतां आमची सारी भिस्त शापावर येऊन ठेपली आहे! ही शापशक्ति आमच्यासारख्या सुधारकास अनुकूल नाहीं हें उघडच आहे! तस्मात् ज्या क्षौरी शास्त्र्यांच्या किंवा दर्दुरानुकारी वैदिकांच्या यज्ञोपवीतांत जोर असेल त्यांनीं आपल्या मंत्रसामर्थ्यानें या फिरंग्यास खाक केल्याशिवाय, आमच्या सनातन वैदिक धर्माचें संरक्षण होण्याची आशा राहिली नाहीं!" अशा प्रकारचीं विनोदी स्थळें अनेक आहेत. यासाठीं त्यांतील कांहीं थोडींच येथें वानगीदाखल देऊन समाधान मानून घेणें जरूर आहे. दागिन्यांबद्दल विवेचन करीत असतांना आपल्या 'व्यवच्छेदन' या लेखांत आगरकरांनीं म्हटलें आहे कीं, "येवढ्यानें अलंकारशास्त्राचें रहस्य पुरतें उमजत नसेल तर खालच्या वरच्या ओंठास चार किंवा पांच भोकें पाडून त्यांत बाळयाबुगड्यांच्या व नथांच्या नवीन सवती अडकविण्याचा प्रघात पडेल तर किती बहार होईल! तसेंच गुजराथी बायकांप्रमाणें दातांत सोन्यारुप्याच्या चुका मारून त्या ओंठांतून बाहेर काढण्याचा प्रघात पडेल तर अलंकारशास्त्रांत एकदोन नवीन उल्लास करून घातल्याचें श्रेय येणार नाहीं काय?" त्याचप्रमाणें दागिन्यांच्या योगानें

श्रीमंतीचा जो अनुभव मिळतो तो बँकेमध्यें हजारों रुपये ठेवण्यानें मिळत नाहीं, हें दाखविण्याकरितां आगरकर एकें ठिकाणीं विनोदानें विचारतात कीं, "ठुशीच्या जागीं कां बँकबुक घालतां येणार आहे ?" 'आमच्या स्त्रियांचा पेहराव,' या आपल्या निबंधांत मडमांच्या झग्यांची व्याजस्तुति करण्याकरितां आगरकर विनोदानें लिहितात कीं, "साऱ्या मडमा आपापले झगे वर उचलून न धरतां जमिनीवर पडूं देतील तर घरांत व रस्त्यावर केरसुण्यांचें काम फारसें पडणार नाहीं." 'उपायन, कर, व बलिदान' या लेखांत, उपायनांची देवघेव होत असते, ती समान दर्जाच्या लोकांतच विशेषेंकरून होत असते असें सांगून आगरकर म्हणतात कीं, "सुधारकाच्या एडिटरानें लॉर्ड रेसाहेबांस अपुसाचे कांहीं निवडक दाणे पाठविले, किंवा लेडी रेनें मिसेस आगरकरणीस बाळंतविडा पाठविला असें होण्याचा संभव नाहीं." पागोटीं आणि पगड्या यांचीं वर्णनेंही आगरकरांनीं फारच चटकदार पद्धतीनें केलेलीं आहेत. शितावरून भाताची परीक्षा या न्यायानुसार आगरकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण विनोदाची कल्पना वर दिलेल्या त्रोटक उताऱ्यांवरूनच करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्यांच्या विनोदाची खरी मख्खी लक्षांत येण्यास त्यांचे 'पांचजन्याचा हंगाम,' 'पुण्याची प्रकृति व गवताच्या गंजी,' 'गुलमांचें राष्ट्र' इत्यादि लेख समग्र वाचणेंच अवश्य आहे.

विरोधक पक्षानें पुढें केलेल्या विचारसरणीची अनाठायीं भंबेरी उडवावयाची, अथवा त्याच्या म्हणण्याचा निष्कारण विपर्यास करावयाचा अशी कित्येक लेखकांची गांवगुंडी पद्धत असते. त्या पद्धतीचा अंगीकार आगरकरांनीं अर्थात्‌च कधींही केलेला नाहीं. विरोधक बाजूचें म्हणणें सायसंगीन रीतीनें मांडून त्यांत कांहीं ग्राह्यांश असला तर त्याचें जरूर समर्थन करावयाचें व नंतर त्यांतील असंबद्धता अथवा विसंगति निदर्शित करावयाची ही त्यांच्या प्रतिपादनाची शिष्टांना आदरणीय वाटेल अशीच पद्धति होती. आगरकरांच्या विरोधकांनाही त्यांच्या लेखनांचें कौतुक वाटतें तें या गुणामुळेंच होय. आगरकरांना त्यांच्या विरोधकांनीं त्यांचा उपहास करण्याच्या निमितानें कां होईना, चार्वाकाच्या पंक्तीला नेऊन बसविलें यांतही त्यांनीं आगरकरांबद्दलची

आपली गुणग्रहणबुद्धीच व्यक्त केली! वादाचीं वादळें उठवून आपलें अंग धुळीनें माखून घेण्याची आगरकरांना कांहीं हौस नव्हती! पण समाजाची नाडी हातीं घेतल्याबरोबर एकाद्या प्रतिभावान् धन्वंतऱ्याप्रमाणें त्यांना समाजाच्या अंगांत महारोगांचीं बीजें बद्धमूल होऊन राहिलीं असल्याचें उमगून आलें. त्यांची समाजाबद्दलची प्रवृत्ति एकाद्या रासवट परिचारकाप्रमाणें नव्हती. रोग्याचें तोंड उघडून त्यांत अगदीं यांत्रिक पद्धतीनें हवें तें औषध ओतीत बसण्याचा ममत्वशून्य उपक्रम जसा त्यांना करावयाचा नव्हता तसाच रोगजर्जर रोग्याचा सारा हटवादीपणा पुरविणाऱ्या आणि औषधें बाजूला ठेवून कुपथ्याच्या वस्तू त्याच्या घशांत ओतणाऱ्या एकाद्या अडाणी आजीबाईचा अजागळपणाहीं त्यांना करावयाचा नव्हता! हातीं घेतलेल्या समाजाच्या नाडीचें स्पंदन अनारोग्यतेपासून सर्वस्वीं अलिप्त आहे असें स्पष्ट सूचित होण्याइतकें तें प्रभावी बनावें, किंबहुना निरामयतेचा उत्कृष्ट आदर्श बनण्याइतपत त्या नाडीमध्यें सामर्थ्यवत्ता निर्माण व्हावी असा त्यांचा कटाक्ष होता!

समाजाच्या अंतिम आणि अविनाशी कल्याणाबद्दल आगरकरांना अर्थातच मनापासून तळमळ वाटत होती. पण या तळमळीच्या भरांत जुन्या गोष्टींचा भरमसाट उपहास करून नवीन मतांचें तट्टू बेधडकपणानें दामटण्याचा अविचार त्यांच्या हातून एकदांसुद्धां झाला नाहीं. सामाजिक चालीरीतींचें यच्चयावत् समूळ उच्चाटण करून त्यांच्या जागीं नवीन आचारविचार स्थापित करण्याचा आगरकरांचा हेतु होता असा अद्यापपर्यंतही पुष्कळांचा समज झालेला दिसतो; पण तो चुकीचा आहे. आगरकरांचा परिचय या लोकांना टीकाकारांच्या चष्म्यानेंच घडला असल्यामुळें त्यांच्या हातून अशी चूक होणें स्वाभाविकच आहे. पण निदान आपली साक्षरता सत्कारणीं लावण्यासाठीं ते आगरकरांचें निबंध प्रत्यक्ष वाचून पहाण्याची तसदी घेतील, तर ही चूक त्यांच्या स्वतांच्याही लक्षांत आल्याशिवाय राहावयाची नाहीं. आगरकरांची वृत्ति हंसासारखी नीरक्षीरविवेकनिपुण अशी होती. सामाजिक चालीरीतींतून इष्ट तेच आचार ग्राह्य मानावयाचे आणि अनिष्ट अशा आचारविचारांना मूठमाती द्यावयाची हेंच आगरकरांच्या जीवनकार्याचें रहस्य आहे. सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करण्याची त्यांना जरूर भासली तीही या हेतूच्या

सिद्ध्यर्थेच होय. बालविवाह, केशवपन, विधवाविवाह, संमतिवयाचा कायदा, स्वयंवर, घटस्फोट वगैरे विषयांची चर्चा करतांना विरुद्ध बाजूच्या म्हणण्याचा विचार करण्यास आगरकरांनीं कधीं यत्किंचित्ही कसूर केली नाहीं त्याचें कारण हेंच होय. आगरकरांच्या लेखनांतील हा गुण योग्य अवतरणें देऊन सिद्ध करावयाचा म्हटल्यास त्यांचे अनेकचे अनेक लेखच उतरून काढावे लागतील. यास्तव त्यांच्या निरुत्तर करणाऱ्या कोटिक्रमाचीं कांहीं उदाहरणें देऊनच निर्वाह करणें जरूर आहे. 'स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता,' या आपल्या लेखांत आगरकर एकें ठिकाणीं म्हणतात, "एकानें दुसऱ्याकरितां सहज मरणें, बुद्ध्या मारून घेणें, किंवा नाहीं नाहीं ते हाल भोगणें हें सर्वथैव इष्ट असेल तर स्त्री मेल्यावर पुरुषानेंही तिच्याबद्दल प्राण सोडणें, प्राणहत्या करणें, किंवा वैधव्यव्रताचें सेवन करणें प्रशस्त होईल किंवा झालें असतें! बायको मेल्याची वार्ता येतांच बेशुद्ध होऊन परलोकवासी झालेल्या भार्यारतांचीं उदाहरणें कधीं तरी आपल्या ऐकण्यांत येतात काय? किंवा स्त्रीबरोबर सहगमन केलेल्या प्रियैकरतांचीं उदाहरणें कधीं तरी आपल्या पाहाण्यांत येतात काय? किंवा बायकोस देवाज्ञा झाल्यामुळें नित्य भगवीं वस्त्रें परिधान करणारे, क्षौराच्या दिवशीं डोक्याच्या किंवा तोंडाच्या कोणत्याही भागावरील केंसांची काडीमात्र दयामाया न ठेवणारे, भाजणीच्या थालिपिठाशिवाय दुसऱ्या कोणत्याही आहारास स्पर्श न करणारे, अरिष्ट गुदरल्यापासून चारसहा महिने कोणास तोंड न दाखविणारे, पानतंबाखूची किंवा चिलीमविडीची त्या अत्यंत खेदजनक दिवसापासून आमरण समिध शेकणारे व मंगलकार्यांत किंवा कामासाठीं घरांतून बाहेर पडणाऱ्या इसमापुढें येण्यास भिणारे नवरे कोणीं पाहिले आहेत काय? जर नसतील तर स्त्रियांची अशा तऱ्हेची वागणूक सतीत्वाची, साध्वीत्वाची, पतिव्रतात्वाची, एकनिष्ठ प्रेमाची व अलौकिक सद्धर्मित्वाची साक्ष देणारी कशी होते, हें कोणी उघड करून सांगेल काय? जो सांगेल त्यास आम्ही बृहस्पतीचा बृहस्पति मानूं!" आपल्या 'व्यवच्छेदन' या लेखांत श्राद्धविधीची मनोरंजक मीमांसा करतांना आगरकर म्हणतात, "मेलेल्या पितरांस अंथरुणें पाहिजेत, गाई पाहिजेत, वडे पाहिजेत, तर घोडीं कां नकोत, कुत्रीं कां नकोत, गंजिफांच्या

पेव्या आणि बुद्धिबळांचे आणि सोंगट्यांचे पट व त्या खेळण्यास लागणारे मित्र कां नकोत ! खरी प्रीतीच दाखवावयाची असेल आणि मृताकरतां जें जें देण्यांत येतें तें तें त्याला पावतें, व त्याचा उपभोग त्याला घेतां येतो हें खरें असेल तर अगोदर घरेंदारें जाळून टाकून मग आईबापांनीं मुलांबरोबर, मुलांनीं आई-बापांबरोबर, बहिणींनीं भावांबरोबर व भावांनीं बहिणींबरोबर, राजानें प्रजे-बरोबर व प्रजेनें राजाबरोबर आणि मित्रांनीं एकमेकांबरोबर सती जावें आणि येथल्यासारखाच सारा थाट पिशाच्चयोनींत उडवून द्यावा हें योग्य आहे ! ” ‘शहाण्यांचा मूर्खपणा किंवा आमचे प्रेतसंस्कार, ’ यांत उत्तरक्रियेची चाल सारासारविचाराच्या कसोटीनें पाहतां किती अप्रयोजकपणाची आहे हें उत्कृष्ट रीतीनें सिद्ध करून देण्याकरितां आगरकर लिहितात, “ ज्या गाईचें दूधतूप खाऊन तुम्ही इतके धष्टपुष्ट होतां, ज्या बैलांच्या श्रमानें हजारों खंडी धान्य पिकवितां, ज्या घोड्यावर बसून युद्धास जातां आणि ज्या कुत्र्याच्या साहाय्यानें आपल्या संपत्तीचें संरक्षण करतां त्या साऱ्या उपयोगी जनावरांचीं श्राद्धें तुम्ही कां करीत नाहीं ? त्यांच्यासाठीं उत्कुंभ कां देत नाहीं ? गाईला आत्मा नाहीं, असें पाद्र्याप्रमाणें तुमचें तर मत नाहीं ना ! जर नसेल तर या अत्यंत उपयोगी जनावरांच्या आत्म्यांविषयीं तुम्ही इतके उदासीन कसे ? शिवाय, आणखी एक शंका अशी येते कीं, फार झालें तर तुम्ही आजापणजां-पर्यंत आपल्या पितरांचा समाचार घेतां; पण आजाच्या आजाची आणि पणजा-च्या बापाची काय वाट ? त्यांनीं थंडा फराळ करून नित्य दिगंबर असावें कीं काय ? वास्तविक पहातां ते विशेष घृद्ध असूनही तुम्ही त्यांचें नांव-देखील काढीत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? ” प्रतिपक्षाला चीत करण्या-करितांच केवळ वरील कोटिक्रम केलेला नाहीं. नित्याच्या व्यवहारांतल्या गोष्टी परस्परविसंगत किती असतात, जाणूनबुजून आपल्या हातून कशी प्रतारणा होत असते हेंच सिद्ध करण्याचा वरील लेखांचा प्रधान हेतु आहे. ‘ होऊच द्या तर दोन हात, ’ या निबंधांत एके ठिकाणीं आगरकरांनीं ढोंगी धर्मरक्षकांना जे प्रश्न विचारले आहेत ते वाचून भारतीय युद्धाच्या प्रसंगीं कर्णार्जुनयुद्धाच्या आख्यानांत कृष्णानें कर्णाला मागल्या सर्व वृत्तान्ताची आठवण करून देऊन

" कोठें गेला होता तेव्हां राधासुता तुझा धर्म ? " अशा अर्थाचे जे मर्मभेदक प्रश्न विचारले आहेत, त्यांचें स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं. आगरकर विचारतात, " भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदुलोकांनो, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठीं कोंकणपट्टींत तुमचे अनन्वित हाल केले, त्यावेळेस तुमचा धर्माभिमान कोठें गेला होता ? विषयलंपट निःशक्त वाचाळ बाबूंनो, जेव्हां महंमदीयांनीं हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत साऱ्या हिंदु लोकांस आपल्या धर्मवेडानें जर्जर करून सोडलें व तुम्हां हिंदूंच्या मानांवर असिधारा ठेवून तुम्हांकडून तुमच्या शेंड्या काढविल्या आणि तुम्हांस गोमांस चारलें, तेव्हां धर्मरक्षणासाठीं तुम्हीं आतांसारखा नसता ओरडा तरी करावयाचा होता ! जर तुम्हांस तुमच्या धर्माची इतकी प्रतिष्ठा वाटत आहे, तर पूर्वी ज्यांनीं ज्यांनीं त्याचें उल्लंघन केलें त्यांचें तुम्हीं शासन कां केलें नाहींत ? रजपुतांनीं आपल्या बायका मुसलमानांच्या घरांत कशासाठीं नेऊन घातल्या ? थेट शनवारच्या वाड्यांत थोरल्या बाजीरावानें एका यवनीस आणून ठेवून तिच्याशीं राजरोस व्यवहार ठेवला तेव्हां त्याला वाळींत कां टाकलें नाहींत ? " आगरकरांच्या झणझणींत पण कळकळीच्या कोटिक्रमाचीं उदहारणें प्रायः त्यांच्या प्रत्येक निबंधांतून पहावयास मिळतात. त्यांच्या या सर्वोत्कृष्ट आणि सुप्रतिष्ठित कोटिक्रमाचा उपयोग लेख खमंग बनविण्याकडे जितक्या प्रमाणांत झालेला आहे तितक्या किंबहुना त्याहूनही अधिक प्रमाणांत सुबुद्ध आणि सुशिक्षित देशबांधवांच्या सारासारविचारशक्तीला चालना देऊन उपकारक विचारांची त्यांच्या ठिकाणीं प्रेरणा करण्यासही तो कारणीभूत झाला आहे. सांचलेल्या डबक्याप्रमाणें आपला समाज निश्चल स्थितींत राहूं नये, त्यांतील अक्कलवंत लोकांनीं विचारपूर्वक प्रयत्न करून त्याची शक्य तितकी उन्नति करण्याचा प्रयत्न करावा आणि पाश्चात्य देशांतील सुधारलेल्या समाजांच्या बरोबरीनें आपल्या समाजाचें पाऊल पडत राहावें, अशी तळमळ आगरकरांच्या मनाला अहर्निश लागून राहिलेली असल्यामुळें त्यांच्या लेखणींतून अशा प्रकारचे कळकळीचे आणि उद्बोधक निबंध बाहेर आले.

एखाद्या सामान्य विषयाला आपल्या कौशल्याच्या साहचर्यानें गांभीर्य चढ-

विण्याचें कठीण काम जसें निबंधलेखकाला करावें लागतें, तसेंच अवघड विषयालाही सुगमता आणण्याचें वैदग्ध्य त्याच्या अंगीं असावें लागतें. नुसतें सांगणें आणि पटवून देणें यांत फार अंतर आहे. किंबहुना, पटवून देण्याचें कसब किंवा कौशल्य अंगीं कमीअधिक प्रमाणांत असण्यावरच लेखकाच्या परिणामकारकतेची कसोटी लागत असते. सामान्य लेखक आणि प्रभावी लेखक यांच्या लेखनांतील विषयाच्या निवडींत स्वरूपतः भेद फारच थोडा असतो. त्या दोघांमध्यें जो खरा भेद असतो, तो त्यांच्या विषयविवेचनाच्या पद्धतींतच होय. विषयविवेचनाची सर्व हातोटी विषय मांडून दाखविण्याच्या पद्धतींतच सामावलेली असते. मानसशास्त्राचा असा एक सर्वसाधारण नियम सांगतात कीं, मन हें कोणतीही नवीन गोष्ट ग्रहण करतांना ती अगदीं कोरी करकरीत एकदम ग्रहण करीत नाहीं. मनाचे जे निरनिराळे भाव-विभाव असतात त्यांच्याशीं समरस होण्यासारखी जी गोष्ट असेल तीच मन एकदम आत्मसात् करून घेतें. वाचकाच्या मनाची अवस्थाही कांहीं अंशीं अशीच असते. परिचयाच्या, किंबहुना, ज्यांचे सारे संकेत मनाशीं अगदीं एकजीव झाले आहेत अशा गोष्टींच्या बोटाला धरून नवीन गोष्टींनीं मनोमंदिरांत प्रवेश केला तरच त्या मंदिरांतील त्या गोष्टींचा संचार नवख्यासारखा बुजरा न होतां, अगदीं सराइताप्रमाणें धिटाईचा आणि सलगीचा होतो. दृष्टान्त, उपमा इत्यादि अलंकारांचें कोणत्याही वाङ्मयांत महत्त्व उत्पन्न होतें, तें याच कारणामुळें होतें. उपमानाचा निकट परिचय उपमेयाची तोंडओळख पटवून देण्यास निःसंशय साहाय्यक होतो. विषयाला सुगमता येण्यास निबंधलेखकाच्या अंगचे इतर कोणतेही गुण कितीही कारणीभूत होत असले तरी त्यांत अनुरूप दृष्टान्तांची चतुरपणानें योजना करण्याच्या गुणासच प्राधान्य देणें अधिक सयुक्तिक ठरणार आहे. अशा प्रकारचा अचूक योजकपणा आगरकरांच्या लेखांतील दृष्टान्तांतून वेळोवेळीं पाहावयास सांपडतो. 'विवाहनिराकरण किंवा घटस्फोट,' या लेखांत स्वयंवराची शिफारस करतांना आगरकर म्हणतात, "तारुण्यवसंत प्राप्त होऊन शरीरद्रुमावर पालवी, मोहर व सूक्ष्म फलनिर्भर यांचा आविर्भाव झाला असतां ते किती रमणीय दिसतात, हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. ही रमणीयता पराकाष्ठेची मोहक

आहे, व हिच्या भरांत पाणिग्रहण केल्यानें कधीं कधीं प्रमाद होण्याचा संभव आहे हेंही आम्हांस कबूल आहे. पण निर्दोष अशी या जगांत कोणती वस्तु आहे? गुलाबाचें सुंदर फूल कांट्यांतून काढावें लागतें; मौक्तिकासाठीं समुद्रमज्जन करावें लागतें; सुवर्णकण मृत्कणांशीं मिसळलेले असतात." 'गुलामांचें राष्ट्र,' या निबंधांत जुन्या ऋषींच्या कार्याबद्दल लिहितांना आगरकर म्हणतात, "त्यांत जेवढा ग्राह्यांश असेल तेवढा अलबत घ्या व त्याचें काळजीपूर्वक रक्षण करा. पण त्यांच्या कृतींत जीं जीं दोषस्थलें असतील तीं तीं काढून टाकून तींत नवीन भर घालण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तुमचा निभाव कसा लागेल? पुढील उपमेबद्दल कदाचित् कोणास वाईट वाटेल पण सारासार विचार करतां एकाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेप्रमाणें आम्हां भारतीयांची स्थिति झालेली आहे, असें आम्हांस वाटतें! पतिनिधनामुळें नवीन संतानाची आशा खुंटलेली ती गतभर्तृका ज्याप्रमाणें असलेल्या अपत्यांचें वारंवार दृढालिंगन करून "आमचे पुरुष असे होते, आमच्या पुरुषांनीं असें केलें, आमच्या पुरुषांनीं तसें केलें, अशा प्रकारचे गुणानुवाद गाण्यांतच आपलें समाधान मानून घेते, व आपल्या जीविताची कृतार्थता समजते, त्याप्रमाणें जुन्या थोर पुरुषांचे गुण गाण्यांतच आमच्या पुरुषार्थाची परमावधि होऊन बसली आहे." 'स्वयंवर' या लेखांत मानसिक धैर्याचें विवेचन करतांना आगरकर लिहितात, "उन्हाळयाच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेढीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे. तें प्रत्येक दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट तें कमी होऊं लागलें म्हणजे भूमितिश्रेढीनेंच कमी होतें. ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो, त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एकाद्या व्यक्तीच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिक ग्रासीत जातें!" कायदे करून घ्या पण भलते कायदे करून घेण्यांत तात्पर्य नाहीं, हें शिकविण्याकरितां आगरकर म्हणतात, "सगळया झाडाला कीड लागून जाऊन तें अगदीं वठून गेलें असलें व त्याचीं फळें आळयांनीं भरून जात असलीं तर त्याच्या वरच्या सालीवर किंवा फळांवर औषधोपचार करून काय फायदा

होणार आहे? क्षारोदकादि ज्या उपायांची योजना करावयाची असेल त्यांचा परिणाम त्यांच्या अंतर्सालीवर किंवा मुळावर झाला तरच त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव आहे. ज्याप्रमाणें हाडापर्यंत जाऊन भिनलेला व्रण त्याच्या तोंडावर चोपडलेल्या तेलांनीं किंवा मलमाच्या पट्ट्यांनीं बरा होण्याची आशा नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या हाडापर्यंत जाऊन खिळलेल्या व शेकडों वर्षें वाहात असलेल्या अमंगलाचाररूप व्रणांचें निराकरण भलत्याच प्रकारच्या कायद्यांनीं होण्याचा संभव नाहीं." 'सुधारणा आणि कलह' या लेखांत समाजांतील गतानुगतिक लोकांची परिस्थिति आगरकर वर्णन करून सांगतात कीं, "ज्या आचारांत, ज्या कल्पनांत आपण वाढतों, त्या कितीहि दोषार्ह असल्या तरी रोजच्या रहाटीमुळें त्यांची दोषार्हता लक्षांत येत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्याच प्रशंसनीय व सुखावह वाटूं लागतात. आणि त्याहून भिन्न आचार व कल्पना विशेष श्लाघ्य व कल्याणप्रद असतील अशी शंका देखील येत नाहीं! उलट ज्याप्रमाणें ज्वर आलेल्या मनुष्यास जें अन्न स्वतःच्या तोंडांत घालवत नाहीं, तें दुसरीं माणसें मोठ्या आवडीनें खात आहेत, असें पाहून मोठें आश्चर्य वाटतें; इतकेंच नाहीं, तर त्यांचा तो अधाशीपणा पाहून कधीं कधीं कळमळूनहि येतें, त्याप्रमाणें ज्यांना सामाजिक व धार्मिक विषयां-विषयीं विशेष विचार करण्यास अवकाश सांपडलेला नाहीं, त्यांना आपणांस न रुचणारे तत्संबंधक विचार अत्यंत अमंगळ व तिरस्करणीय वाटतात यांत कांहीं नवल नाहीं! असल्या विचारांचें ताट त्यांचेंपुढें आलें कीं, त्यांस उमळून येतें व त्यामुळें तें आणणारांवर ते क्रुद्ध होतात! तथापि ज्याप्रमाणें दुखणे-कऱ्यांचे हितचिंतक, सुज्ञ आप्त किंवा ममताळू वैद्य, त्यांच्याकडून त्यांतील पदार्थांचें होईल तेवढें सेवन कधीं धाकानें व कधीं आर्जव करून करवितात, त्याप्रमाणें सामाजिक व धार्मिक भिषक् आपल्या विचाररूप 'अप्रिय पण पथ्य-कारक' अन्नाचा स्वीकार आपल्या देशबांधवांकडून आळेंबळें करवितात!" गतानुगतिक समाजाची त्रासलेल्या रोग्याशीं जी आगरकरांनीं तुलना केली आहे, ती किती अन्वर्थक आहे हें कोणालाहि सहज समजून येण्यासारखें आहे. लोकांना न पटणारे विषय रोजच्या परिपाठांतल्या गोष्टींचे दाखले देऊन आगर-

कर कशा परिणामकारक रीतीनें सुगम आणि सुसंवेद्य करीत असत, हें वर निर्दिष्ट केलेल्या कांहीं उताऱ्यांवरून स्थूल मानानें समजून येईल.

‘ जें मनांत तेंच वचनांत ’ असा आगरकरांचा बाणा होता हें मागें एकदां सांगितलेंच आहे. ज्या ज्या अपकारक रीतीरिवाजांचें आपण खंडन केलेलें आहे, त्यांचा आपल्या वर्तनांत मागमूससुद्धां नाहीं असें लोकांना भासविण्याचा त्यांनीं कधींहि प्रयत्न केला नाहीं. मनुष्याला ज्या ज्या गोष्टी इष्ट वाटतात त्या त्या सर्वस्वीं त्याला आचरणांत आणतां येतातच असें नाहीं. पण असल्या असाध्य गोष्टींच्या इष्टपणाविषयीं आपलें प्रांजल मत देण्याचा अधिकार प्रत्येक मनुष्याला आहे हेंहि नाकबूल करून चालणार नाहीं. ‘ इष्ट असेल तें बोलणार आणि साध्य असेल तें करणार, ’ या आगरकरांच्या ब्रीदवाक्याचा अर्थ आगरकरांच्यासंबंधानें सहानुभूतिपूर्वक विचार करणाराला असाच लावावा लागेल. अमुक एक गोष्ट चांगली आहे असें लिहूनहि ती आपण आचरणांत आणीत नाहीं, असें आगरकरांनीं अनेक वेळां कबूल केलेलें आहे. आपण प्रतिपादन केलेल्या मतांत व आपल्या नित्याच्या वर्तनक्रमांत जी कांहीं विसंगतता असेल ती कित्येक प्रसंगीं प्रांजलपणें पुढें मांडून आगरकरांनीं आपली सत्यनिष्ठा व दंभद्वेष हीं उत्कृष्ट रीतीनें निदर्शनास आणिलीं आहेत. शरीराची इंद्रियनिरुद्ध हालचाल आणि मनाची अनिरुद्ध भरारी यांच्यामध्यें जें अंतर आहे तेंच शरीराकडून होणारे आचार आणि मनाकडून होणारे विचार यांच्यामध्यें आहे. आचारांचा सारा भर शरीराच्या किंवा देहाच्या ठराविक चापल्यावर अवलंबून असणार. देहाचीं सारीं प्रभावीं बंधनें त्या आचारांचा संचार एकसारखा रोखून धरणार. मनाच्या उसळीसरशी एखादी गोष्ट करावी असें वाटलें तरी त्या उत्साहाची तीच परिसीमा शरीरहि तितक्याच प्रमाणांत आत्मसात् करील हें सर्वथा अशक्य होय. माणसाचें विचार त्याच्या आचाराशीं सांगड राखून राहात नाहींत, तेव्हां त्यांमध्यें त्या माणसाची कांहीं तरी दांभिकता असावी असें आपण म्हणतों; पण हें म्हणणें नेहमींच खरें ठरत नाहीं. मनाची भरारी ही सदासर्वदा शरीरांकडून आक्रमली जाईलच असें जसें ठाम म्हणतां येत नाहीं, तसेंच आचारांकडून विचारांचा नेहमींच पाठलाग होत राहून

जसे विचार तसे आचार असा वर्तनक्रम सर्वदा साध्य राहाणें, कित्येक प्रसंगीं अशक्य होऊन बसतें. ‘ इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार, ’ या आगरकरांच्या उक्तीचें रहस्य हेंच होय.

महाराष्ट्रांतील मृत आणि विद्यमान अशा प्रसिद्ध निबंधलेखकांशीं आगरकरांची तुलना केली असतांसुद्धां आगरकरांचें निबंधलेखकांमधील प्रमुख स्थान निर्विवाद रीतीनें अढळ राहातें. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर हे आगरकरांच्या आधीं निबंधलेखक म्हणून चमकूनही गेले. शास्त्रीबुवांच्या निधनाच्या वेळीं आगरकरांच्या लेखणीला नुकती कोठें धार येऊं लागली होती! शास्त्रीबुवांचा लेखनसंभार हाच बहुधा आगरकरांच्या पुढें नमुन्यादाखल असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. आगरकरांनीं शास्त्रीबुवांच्या गुणांची जशी उजळणी केली तशी दोषांची मात्र केली नाहीं. शास्त्रीबुवांची भाषाशैली आणि सडेतोडपणा हे गुण आगकरकरांनीं उचलले खरे, पण शास्त्रीबुवांच्या भाषाशैलीचा नकली नटवेपणा आणि सडेतोडपणाच्या पाठीमागें दडलेला लहरीपणा आगरकरांनीं अणुमात्र उचलला नाहीं. शास्त्रीबुवा कित्येक प्रसंगीं भाषेचें फार मोठें अवडंबर रचीत. त्याचप्रमाणें सडेतोडपणाच्या भरांत वाटेल त्याच्यावर वाटेल तसें तोंड टाकून लिहिण्यांत त्यांना संकोच वाटत नसे. आगरकर स्वाभिमानी होते. चिपळूणकर दुरभिमानी होते. आगरकर तत्त्वावर हल्ला करीत. चिपळूणकर व्यक्तीवर हल्ला करीत. आगरकरांच्या टीकेंतून विचारांचा ओघ उत्पन्न होत असे तर चिपळूणकरांच्या टीकेंतून विकारांचा असह्य दर्प उफाळून बाहेर येत असे. व्यक्तीवर टीका करण्याच्या भरांत चिपळूणकर इतके वाहावत कीं कित्येक वेळां “ आतां आपण प्रकृत विषयाकडे वळूं, ” असें म्हणून त्यांना वाटेल तेथें सोडून दिलेला विषय पुन्हां हातीं घ्यावा लागे! लोकहितवादी, स्वामी दयानंद सरस्वती, प्रार्थना समाज इत्यादि विषयांवरील त्यांचे लेख आज तर बरेच हास्यास्पद वाटतात.

लोकहितवादींनीं आगरकरांच्या आधींच सामाजिक सुधारणेचे झेंडे रोवले. पण लोकहितवादींच्या ठिकाणीं हातीं घेतलेल्या विषयानें भारून जाऊन प्रसंगविशेषीं स्वकीयांचा करूं नये अशा प्रकारचा उपहास करण्याची प्रवृत्ति विशेष प्रमाणांत होती. किंबहुना लोकहितवादींना स्वकीयांच्याबद्दल आगरकरांइतकी

समावेशक आणि व्यापक सहानुभूति वाटत नव्हती असेंही त्यांच्या कित्येक लेखां-वरून आणि त्यांतील विचारसरणीवरून प्रत्ययास आल्याशिवाय राहात नाहीं. टिळक व आगरकर यांची प्रभावी प्रचारक म्हणून तुलना केली तर दोघांमध्यें अधिक सरस कोण हें ठरविणें फार कठीण जाईल. टिळक आगरकरांसारखेच तर्ककर्कश होते पण त्यांच्या ठिकाणीं सहानुभूतीचा ओलावा आगरकरांइतका नव्हता. पूर्वपक्ष–उत्तरपक्ष करण्यासंबंधांत आगरकरांचें जोरदार शस्त्र म्हटलें म्हणजे तर्कशुद्धता होय. टिळकांचें जबरदस्त हत्यार म्हणजे तर्काभास होय. त्यामुळें आगरकरांच्या लेखणींतून उपरोधाचा प्रसव होत असे तर टिळकांच्या लेखणींतून उपहासाचा स्रोत खळाळत असे. बुद्धीची कसरत हा टिळकांच्या लेखांचा विशेष आहे, तर हृदयाची कळकळ हें आगरकरांच्या लेखांचें वैशिष्ट्य आहे. टिळकांचें लेख वाचून वाचक चकित होतो, स्तंभित होतो पण आगर-करांचें लेख त्याच्याठिकाणीं गांभीर्य उत्पन्न करतात. तूर्तातूर्त वादांत जय मिळ-विण्याकरितां तात्कालिक स्वरूपाची विचारसरणी योजून प्रतिपक्षावर हमखास कुरघोडी करण्यांत टिळक कित्येकप्रसंगीं समाधान मानीत. "Do not think of crossing the bridge until you get to it," या तत्त्वाचा टिळकांच्या वाद लढविण्यासंबंधांतील नीतींत प्रामुख्यानें समावेश झाला होता. मार्गांतील दूरदूरच्या बारीकशा अडचणींचाही आधीं विचार केल्या-शिवाय पाऊल टाकूं नये अशा मताचा आगरकरांच्यावर पगडा बसलेला होता! टिळक सोपी, साधी आणि हुकमी भाषा लिहीत. आगरकर संस्कृतप्रचुर आणि अलंकारांनीं मण्डित अशी लेखनशैली नटवीत. त्यामुळें टिळक व आगरकर यांची केवळ लेखक या दृष्टीनें तुलना केल्यास टिळकांपेक्षां आगरकरच कदाचित् अधिक सरस ठरतील.

आगरकरांच्या काळचे त्यांचे एक यशस्वी विरोधक म्हणून कै. महादेव शिवराम गोळे यांचें नांव आगरकरांच्या मतांचा विचार करतांना आठवल्यावांचून राहात नाहीं. ‘ हिंदुधर्म आणि सुधारणा ’ या प्रसिद्ध ग्रंथांचें जनकत्व याच गृहस्थां-कडे आहे. विशेषतः या ग्रंथाच्या द्वारें त्यांनीं सुधारक पक्षाची आकर्षक रीतीनें नालस्ती केली!

कै. गोळे यांची विषयप्रतिपादनाची हातोटी विशेष वाखाणण्यासारखी आहे. त्यांची भाषाहि आगरकरांच्या भाषेपेक्षां अधिक आकर्षक आहे. पण त्यांच्या लिहिण्याचा हेतु होतां होईल तों विनोद उत्पन्न करण्याचाच होता. आगरकरांचा हेतु केवळ लोकशिक्षणाचाच होता. कै. शिवरामपंत परांजपे यांच्या लेखनांत भावनांचा देखावा अधिक असून त्यांची भाषाहि अलंकारप्रचुर आहे. पण त्यांच्या निबंधांनीं वाचकांच्या बुद्धीला आणि विचाराला फारच थोडें पोषण मिळतें. शिवरामपंतांच्या लेखनांत पाल्हाळिकपणाचा दोषहि पुष्कळ वेळां आढळून येतो. कै. वि. का. राजवाडे हे आगरकरांच्यापेक्षांहि अधिक निर्भीड आणि जास्त सडेतोड आहेत. पण आगरकरांचा निर्भीडपणा योग्य स्थळीं आणि योग्य वेळींच अवतीर्ण होतो. निर्भीडपणाचा राजवाड्यांनीं इतका अतिरेक केला आहे कीं, त्यामुळें त्यांच्या लेखांवर विक्षिप्तपणाचा छाप बसला आहे ! रा. श्री. कृ. कोल्हटकर हे आगरकरांच्यासारखेच समाजसुधारणाप्रिय आहेत. पण आपल्या विचारांचें यथार्थ निदर्शन करण्याऐवजीं भाषेची आणि शब्दांची कसरत करून नाटकी विनोद उत्पन्न करण्यांतच त्यांनीं आपलें लेखनचातुर्य कारणीं लावलें आहे. रा. न. चिं. केळकर यांचें दृष्टान्त आगरकरांच्यासारखेच व्यावहारिक व सुंदर असतात, पण त्यांच्यामध्यें आगरकरांचें गांभीर्य तितक्या प्रमाणांत दिसून येत नाहीं.

उपरिनिर्दिष्ट प्रत्येक निबंधलेखकाच्या लेखनांत पूर्णांशानें प्रकट होणाऱ्या एकेक गुणाचें आगरकरांच्या लेखनांत समप्रमाणांत विभाजन झालें असल्यामुळें त्या प्रत्येकाच्या लेखनापेक्षां आगरकरांचें लेखन अधिक प्रभावी आणि परिणामकारक झालें आहे. आगरकरांच्या अंतःकरणाची तळमळ जितकी प्रखर आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि लेखकाची नाहीं. स्वकीयांच्या खऱ्या कल्याणाबद्दल आगरकरांना जी कळकळ वाटते तिची सर दुसऱ्या कोणत्याही लेखकाला येणार नाहीं. आणि या दोन गुणांमुळेंच आगरकर इतरांपेक्षां अधिक यशस्वी निबंधलेखक असल्याचा वाचकाला प्रत्यय येतो. इतकें असूनहि आगरकरांनीं केला हा सारा पपंच केवळ स्वार्थनिरपेक्ष बुद्धीनें केला ! त्या कामीं त्यांनीं समाजाची परमावधीची अप्रियताहि मोठ्या धीरगंभीर वृत्तीनें सहन केली. समाजानें दिलेल्या

डागण्या त्यांनीं पराक्रमाचीं बिरुदें म्हणूनच अंगावर बाळगल्या ! ज्या लोकमताचा पुष्कळसा बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां, असें दिसून येईल कीं, बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षां अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय. कोट्यवधि अक्षरशत्रु व विचारशून्य मनुष्यांनीं आपल्या अडाणी समजुतीप्रमाणें चांगलें किंवा वाईट म्हटलें, अज्ञान व धर्मभोळया लोकांच्या आचरट धर्मकल्पनांची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून, त्यापासून निघेल तेवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण, उदरंभरू हजारों टवाळांनीं शिव्यांचा वर्षाव केला, किंवा छीः थूः करण्याचा प्रयत्न केला, शेंकडों अविचारी किंवा हेकड लोकांनीं नाकें मुरडलीं किंवा तिरस्कार केला, सारांश ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचें रूप बिलकुल समजलें नाहीं, किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हें ठाऊक नाहीं, अशांच्या पर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पटल्या तरी, जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे, अशानें वरच्यासारख्या क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला, यत्किंचित् न भितां आपल्या मनाला योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें, हेंच त्यांस उचित होय. त्याच्या अशा वर्तनानेंच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता होते. अशा प्रकारची श्रेष्ठ तत्त्वश्रद्धा आगरकरांना आचरणांत आणावयाची होती; आणि कोणत्यांही अडचणीला न जुमानतां त्यांनीं ती आचरणांत आणली. मृत्यूनंतर त्यांचें अंतःकरण कोणीं उघडून पाहिलें असतें, तर "Forgive them, my Lord, for they know not what they do !" असे, देव न मानणाऱ्या पण निर्मळ आणि निष्कलंक देवमाणसाला सर्वथा शोभून दिसणारे उद्गार, त्या ठिकाणीं एकाद्या शिलालेखासारखे कोरलेले आढळून आले असते ! आगरकरांचें स्मरण झाल्याबरोबर त्यांचे विरोधकहि आदरानें मस्तक नम्र करतात त्याचेंहि सारें रहस्य त्यांच्या ज्या निर्मळ मनोवृत्तींतच सांठवलेलें आहे.

---

# ११

# जयमङ्गला

रविकिरणमंडळाचे सदस्य आणि प्रसिद्ध कवि श्री. यशवंत यांनीं उपर्युक्त नांवाचें एक भावगीतात्मक खंडकाव्य नुकतेंच प्रकाशित केलें आहे. निरनिराळया भावगीतांच्या योगानें कथानकाचें एक सूत्र बनवून त्याचें खंडकाव्य रचण्याची ही पद्धत आपल्याकडे फारशी प्रचारांत नाहीं. टिळक, गडकरी, अनंततनय, गिरीश व स्वतः यशवंत प्रभृति कवींनीं आजपर्यंत विविध विषयांवर खंडकाव्यें रचिलीं आहेत; पण त्यांची मांडणी प्रायः सर्गबद्ध अशी असून भावनेच्या एकमेव परिपोषाऐवजीं कथानकांतील घडामोडी व्यवस्थित रीतीनें मांडण्याचेंच कार्य त्यांनीं आजपर्यंत केलें आहे. कवि माधव ज्यूलियन यांचें लोकप्रिय काव्य ‘ विरहतरंग ’ हें मात्र अशा स्वरूपाच्या भावगीतात्मक खंडकाव्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून उल्लेखण्यास हरकत नाहीं. श्री. यशवंत यांचें प्रस्तुतचें जयमङ्गला हें काव्य त्याच धर्तीचें असून त्यांत समाविष्ट केलेलीं एकवीस भावगीतें फारच सरस स्वरूपाचीं झालेलीं आहेत. या एकवीस भावगीतांची मिळून एक रसपूर्ण प्रणयकथा बनलेली असून तिचा धागा श्री आणि सरस्वती यांच्या अनादिसिद्ध व प्रायः शाश्वतिक अशा विरोधांतूनच निर्माण झालेला आहे. राजकन्येवर प्रेम करून तिच्याशीं प्रेमाची देवघेव करणाऱ्या एका अभिजात कवीवर राजाचा कोप झाला आणि राजानें त्याला देहान्ताची शिक्षा फर्मावली; पण अखेर त्याच्या प्रेमाचा विजय होऊन ही शिक्षा रद्द झाली, असा या काव्यांतील कथानकाचा थोडक्यांत निष्कर्ष आहे. कवि सहज फिरतां फिरतां राज दरबारीं आला. त्याची रसवत्ता आणि कलानैपुण्य पाहून राजानें त्याला आपल्या कन्येचा शिक्षक नेमलें. राजकन्येबद्दल त्या कवीला आकर्षण वाटूं लागलें. आपलें मनोगत राजकन्येला कसें सांगावें याची कवीला विवंचना पडली. शेवटीं हिय्या करून त्यानें आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर कवीच्या मनांत वन-

विहाराची कल्पना आली. आपण करतों आहों हा प्रेमविकास योग्य आहे कीं अयोग्य आहे अशीहि त्याला मनांत कित्येकदां शंका आली. तरीहि राजकन्येच्या दर्शनाशिवाय त्याला चैन पडेनासें झालें. शेवटीं त्या दोघांच्या भावना एकमेकांना स्पष्ट स्वरूपांत कळून आल्या आणि त्यांचें मीलनहि झालें. या प्रकाराबद्दल राजाचा त्या कवीवर अर्थात्‌च रोष झाला. कवीला नजरकैदी करून शेवटीं राजानें त्याला देहान्तशासनाची शिक्षाही फर्मावली. वधस्तंभापाशीं कवि असतांना त्यानें आपल्या प्रियेचें अंतःकरणपूर्वक चिंतन केलें. अखेर घोडा भरधांव फेकीत स्वतः राजकन्या त्या ठिकाणीं आली आणि त्याची शिक्षा रद्द झाल्याचें सुखकारक वृत्त तिनें त्याला सांगितलें आणि कवीची सुटका झाली. असें या काव्याचें कथानक असून याच कथानकांतील निरनिराळया भावनायुक्त भागांवर श्री. यशवंतांनीं एकेक गीत रचलें आहे.

या काव्यांतील प्रायः सर्वच भावगीतांतून कथानकविवरणाला प्राधान्य देण्याऐवजीं वर्ण्य व्यक्तीच्या अंतःकरणांतील निरनिराळे भाव योग्य रीतीनें प्रकट व्हावे अशी योजना केली आहे. अर्थात्‌च कथानकांतील कांहीं दुवे सांधण्याचें काम वाचकांवरच सोपविलेलें आहे; पण वाचकांच्या कल्पनेकरितां अर्धवट सोडलेले हे दुवेहि अशा रीतीनें एकत्र आणलेले आहेत कीं, त्यांतील सुटलेलें कथानक शब्द सोडलेल्या धड्याप्रमाणें चटकन् उमगून यावें! यांतील भावगीतें एकैकशः सुद्धां स्वतंत्रप्राय वाटावींत अशीच त्यांची मांडणी केलेली आहे. पृथक् रीतीनेंहि प्रत्येक भावगीत कथाभागाच्या दृष्टीनें पूर्ण झाल्यासारखें दिसतें. अशी सजावट करण्याचें कार्य खरोखरच अवघड आहे. पण रा. यशवंतांच्या हातून हेंहि कार्य यशस्वी रीतीनें पार पडलें आहे. हृदयंगम भावना, अंतःकरणाला भिडतील अशा कल्पना आणि मनाला प्रसन्नता आणणारे अलंकारविशेष प्रस्तुतच्या काव्यांत जागजागीं पहावयास सांपडतात. काव्याला या तीनहि गोष्टी अत्यावश्यक असतात आणि त्यांच्या प्रकर्षापकर्षावरच काव्याची रसपूर्णता अवलंबून असते. कवि यशवंत यांनीं काव्यकलेचीं हीं तिन्हीं साधनें मोठ्या सफाईनें हस्तगत केलेलीं आहेत. कवि या नात्यानें ते आज बारा वर्षें जनतेपुढें आहेत. एवढ्या अवधींत त्यांनीं जी लोकप्रियता संपादन केली आहे

तीवरून त्यांनीं यासंबंधांत किती कसोशीनें प्रयत्न केले असतील याची कल्पना होण्यासारखी आहे. त्यांचें अंतःकरण संस्कारसुलभ असल्यामुळें दीन आणि आर्त जनांच्या करुणास्पद अवस्था त्यांच्या मनावर परिणामकारक रीतीनें आपली पकड बसवूं शकतात. त्यांच्या शब्दयोजनेंत पांडित्याचा प्रकर्ष नसला तरी मनाचा मोकळेपणा प्रतिबिंबित झालेला पहावयास मिळतो आणि कोण-त्याहि प्रकारची ओढाताण न करतां आपले अलंकारविशेष शक्य तितके खुल-वून दाखविण्याचें चातुर्य त्यांचें ठिकाणीं मूलतः आणि कांहीं अंशीं सरावानें बाणलेलें असल्यामुळें त्यांच्या काव्यांत हृदयंगमता उत्पन्न झालेली आहे! त्यांचे वंदिशाळा हें काव्य कथनात्मक आहे. त्या काव्यावरूनच त्यांच्या अंगीं वसत असलेले उपर्युक्त गुणविशेष वाचकांच्या प्रत्ययाला आले होते. प्रस्तुतच्या जयमङ्गलेनें त्यांनीं आजवर मिळविलेल्या कीर्तींत उत्कृष्ट प्रकारची भर घातलेली आहे आणि ही गोष्ट स्वतः यशवंतांना जितकी भूषणावह आहे तितकीच ती महाराष्ट्रकाव्यशारदेलाहि गौरवास्पद आहे.

तुझ्या मुखीं संगीताची दिव्यता दुणावे ।
ओठ नेत्र हलती, घेई मान हेलकावे ॥
डौलदार बैठक बघुनी कोण ना सुखावे ? ।
आणि तुला स्फुरणहि माझ्या चढे रसिकतेनें ! ॥

या ओळी त्यांच्या सफाईदार रचनेची कल्पना आणून देण्यास समर्थ आहेत. अशा प्रकारचीं स्वाभाविक आणि मनोरंजक वर्णनें या काव्यांतील प्रायः सर्वच भावगीतांतून आढळल्याशिवाय राहात नाहींत. काव्यांतील अर्थ, बिनतोड शब्द-योजनेच्या द्वारें खुलवून सांगण्याचें यशवंतांचें कौशल्य साधारणतः कोठल्याहि उताऱ्यावरून प्रत्ययास येण्यासारखें आहे. तरी पण

नाजुकतेचा मृदुल गालिचा । नाच तयावर आरोग्याचा ।
तांबुस कांतिमया लहरींचा । लाजवितेस उषा–अरुणा ! ॥
तुझी आणि माझी शिदोरी कालवुनी येथें ।
कवळ मुखीं घेऊं देऊं ये एकमेकांतें ॥

आहे. यशवंतांच्या प्रस्तुतच्या काव्याचें स्वरूप इंग्रजीमधील Dramatic Monologues ( एकपात्रविशेष संवाद ) सारखें आहे. त्यामुळें नायिकेच्या अंतःकरणाचें निदर्शन नायकाच्या मुखानें करण्याची अवघड कामगिरी यशवंतांना करावी लागली आहे. नायिका प्रत्यक्ष कोठेंहि न दाखवितां तिचें वर्णन नायकाच्या तोंडून करण्यांत यशवंतांनीं पुष्कळ ठिकाणीं मार्मिकपणा दाखविला आहे. अशा प्रकारचे Dramatic Monologues इंग्रजी भाषेंत ब्राउनिंग कवीनें मोठ्या यशस्वीपणें लिहिले आहेत. बोलणारी व्यक्ति वस्तुतः, एकच असूनही तिच्या-भोंवतीं आणखी एक दोन व्यक्ति वावरत असाव्यात, आणि त्या सर्वांचा मिळून संवाद चाललेला असावा, असा वाचकांना आभास करून देण्यांत Dramatic Monologues चें प्राणभूत वैशिष्ट्य असतें. यशवंतांनीं आपल्या जय-मङ्गलेंत हाच मार्ग स्वीकारला असून त्यांत त्यांना चांगलें यश संपादन करतां आलें आहे.

त्या हिमाङ्गिच्या भुजा । बिलगल्या गळ्यास ज्या ।
काय मृत्युचें तयास भिववितील पाश ते ?

किंवा

ही मला न शिक्षा तुझ्याच दुहितेप्रती ?
इतुकेंहि केंवि उमगाया
असमर्थ तुझी ही मती ?

त्याचप्रमाणें

मजवरती ज्यांनीं प्रेमसुधा वर्षिली
त्यांतुनी आसवें आतां
असतिल पडत भूतलीं!
मज सन्मुख वदले स्फुरुनि भाव जे मुके
असतील अतां शोकानें
थरथरत अधर ते भुके.

वगैरे कल्पना एकपात्रविशेष संवादाला अनुकूल असून त्यांनीं अप्रत्यक्षपणें केलेलें नायिकेचें वर्णन प्रत्यक्ष वर्णनापेक्षांहि अधिक भावनायुक्त आणि आक-

षेक ठरण्यासारखें आहे. वरील कल्पना बिल्हणाच्या तोंडीच्या असून त्या त्याच्या काव्यांतील इतर कल्पनांत सामावून जातील इतक्या सरस आहेत; पण याच कल्पनांना अधिक उठाव येण्यास मूळांतील तत्सदृश कल्पनांचें वैशिष्ट्य प्रस्तुतच्या काव्यांत यशवंतांना साधतां आलें असतें, तर जयमङ्गला काव्याच्या सरसतेंत पुष्कळ भर पडली असती. बिल्हणाच्या काव्यांतील मूळ कल्पना या काव्यांत पुनरावृत्त झाल्या असत्या तरी चालण्यासारखें होतें. मूळ चौरपंचाशिकें-तील कित्येक श्लोक हृदयंगम कल्पनांनीं नटलेले आहेत. त्यांतील कांहीं श्लोक प्रस्तुत ठिकाणीं उद्धृत केल्यास वाचकांना बिल्हणाच्या काव्यशक्तीची ओळख पटेल आणि यशवंतासारखा आधुनिक कालांतील अग्रेसर कवि त्याच्या कथा-नकाची मांडणी करण्यास लाभल्यानें त्याचें स्वरूप कसें सरस झालें आहे याचीही कल्पना येईल.

अद्यापि तामविगणय्य कृतापराधम् । मां पादमूलपतितं सहसा चलन्तीम् ।
वस्त्रांचलं मम करान्निजमाक्षिपन्तीम् । मामेति रोषपरुषं ब्रुवतीं स्मरामि ॥ १ ॥

आपल्या हातून झालेल्या अपराधाची तिनें क्षमा करावी म्हणून तो तिच्या पायां पडला. त्याकडे दुर्लक्ष करून तिनें आपल्या वस्त्राचा पदर त्याच्या हातां-तून सोडविला, व " असें करणें चांगलें नाहीं," अशी रागानें त्याची निर्भर्त्सना करून ती तेथून निघून गेली. हा पूर्वी एकदां घडलेला प्रसंग त्याच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभा राहिला !

अद्यापि तां रहसि दर्पणमीक्षमाणां । संक्रांतमत्प्रतिनिधिं मयि पृष्ठलीने ।
पश्यामि वेपथुमतींच ससंभ्रमां च । लज्जाकुलां सदयितांच सविभ्रमांच ॥ २ ॥

आपल्याजवळ कोणी नाहीं अशा समजुतीनें एकदां राजकन्या आरशांत पाहात होती. तेथें मागेंच लपून बसलेल्या आपल्या प्रणयसर्वस्वाचें म्हणजे तिच्या शिक्ष-काचें प्रतिबिंब तिला आरशांत दिसलें. त्याबरोबर तिच्या अंगाला कंप सुटला; तिची लाजेनें अगदीं तारांबळ उडून गेली. याप्रसंगीं तिचें सौंदर्य त्याला अर्थातच विशेष खुलून दिसूं लागलें.

अद्यापि तां मयि कपाटसमीपलीने । मन्मार्गयुक्तदृशमाननदत्तहस्ताम् ।
मद्गोत्रचिन्हितपदं मृदुकाकलीभिः । किंचिच्च गातुमनसां मनसा स्मरामि ॥३॥

एकदां जवळच्याच दाराआड तिला न दिसेल अशा रीतीनें तो उभा होता. हातावर आपलें मुख टेकून राजकन्या त्याची मार्गप्रतीक्षा करीत होती व तोंडानें त्याच्यावरच केलेलें एक पद्य मधुर स्वरांत गुणगुणत होती. हे प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहात आहोंत असा त्याला भास होऊं लागला.

अद्यापि तां भुजलतार्पितकण्ठपाशां । वक्षःस्थलं मम पिधाय पयोधराभ्याम् ।
ईशन्निमीलितसलीलविलोचनान्ताम् । पश्यामि मद्वदनमुक्तमदं पिबन्तीम् ॥ ४ ॥

त्याच्या गळ्याभोंवतीं तिच्या बाहुपाशाचा विळखा पडलेला आहे आणि प्रणयप्रभावानें तिची अर्धवट झांकलेली दृष्टि त्याच्याच मुखाकडे एकाग्रतेनें लागलेली आहे, हाही एकदां अनुभवलेला प्रसंग आठवून त्याचें हृदय सद्गदित झालें !

अद्यापि मे वरतनोर्मधुराणि तस्याः । यान्यर्थवन्ति न च यानि निरर्थकाणि ।
निद्रानिर्मीलितदृशो मदमन्थरायाः । तान्यक्षराणि हृदये किमपि ध्वनन्ति ॥ ५ ॥

प्रणयपीडेनें गात्रांना जडत्व आलें, अशाच स्थितींत ती निद्रावश झाली. अशा निद्रित स्थितींत ज्यांना पूर्ण अर्थही नाहीं व जे अगदीं निरर्थकही नव्हते असे तिच्या तोंडून बाहेर पडलेले शब्द त्यानें ऐकले. या प्रसंगाचें स्मरण होऊन ते शब्द आतांही त्याच्या कानांस ऐकूं येऊं लागले !

अद्यापि तन्मनसि संप्रति वर्तते मे । रात्रौ मयि क्षुतवति क्षितिपालपुत्र्या ।
जीवेति मंगलवचः परिहृत्य कोपात् । कर्णे कृतं कनकपत्रमनालपन्त्या ॥ ६ ॥

रात्रीं त्याला एकदां शिंक आली असतां "शतं जीव" हे शब्द ( शिंकेमुळें उत्पन्न झालेल्या ? ) क्रोधामुळें तिच्या तोंडून निघाले नाहींत. तरी तिनें आपला कर्णालंकार काढून त्याच्या कानांत ( अरिष्टशमनार्थ ) घातला हें दृश्यही आपण प्रत्यक्ष पहात आहों कीं काय असा त्याला भास झाला.

अद्यापि तां प्रणयिनीं मृगशावकाक्षीं । पीयूषवर्णकुचकुम्भयुगं वहन्ती ।
पश्याम्यहं यदि पुनर्दिवसावसाने । स्वर्गापवर्गवरराज्यसुखं त्यजामि ॥ ७ ॥

अस्तमानाच्या वेळीं ती मृगाक्षी माझ्या दृष्टीस पडेल तर स्वर्ग, मोक्ष किंवा साम्राज्य यांचें सुखही मी झिडकारून देईन, ही जी त्याची नेहमींची भावना ती याही वेळीं प्रबल झाली !

राजकन्येशीं प्रणयवृत्तीनें वागल्याबद्दल तिच्या शिक्षकाला राजानें सुळावर चढण्याची शिक्षा फर्माविली. ती शिक्षा अमलांत येण्याचा काळ समीप येऊन ठेपला तरी सुद्धां राजकन्येच्या सहवासांत घडून आलेल्या एकेका प्रणयप्रसंगाचें त्याला स्मरण होऊन तो त्यांतच तल्लीन होऊन गेला! हे प्रसंग आपण पुनः अनुभवीत आहों, अशा प्रकारची त्याची तन्मय वृत्ति झालेली दिसून आली. देहान्तशासनाचा काळ समीप आला याचेंहि त्याला जणूं काय भान राहिलें नाहीं! ही त्याची प्रेमतद्रूप झालेली स्थिति बिल्हणानें वरील श्लोकांत वर्णन केली आहे.

बिल्हणाच्या चौरपंचाशिका या सामान्यतः दुर्मिळ असलेल्या काव्यांतील कांहीं श्लोकांचा वर जो आशय दिला आहे त्यावरून राजकन्या व तिचा ललित-कलेंतील शिक्षक यांच्यामधील प्रणयभावना किती उत्कट स्वरूपाची होती हें दिसून येईल. बिल्हणानें आपल्या काव्यांत ज्या शिक्षकाची ही स्थिति वर्णन केली आहे, तो शिक्षक म्हणजे स्वतः बिल्हणच होय, असा सार्वत्रिक समज आहे. पण तो बरोबर दिसत नाहीं. बिल्हणाची आपल्या काव्याबद्दलची प्रवृत्ति इतकी वस्तुनिष्ठ नसून पुष्कळअंशीं कल्पनानिष्ठ असावी अशी एकंदर काव्याच्या रोखावरून स्थिति असल्याचा भास होतो. बिल्हणाच्या मूळ काव्यांतील कथानकाचा फक्त धागा घेऊनच यशवंतांनीं केलेली जयमङ्गलेची सजावट आकर्षक झालेली आहे. भावनापरिपोष, काव्यकल्पना आणि अलंकारयोजना या तिन्ही दृष्टींनीं प्रस्तुतचें काव्य श्रेष्ठ दर्जाचें झालें असून मराठी वाचकांचें त्या काव्यानें उत्कृष्ट प्रकारचें मनोरंजन होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाट्य-गीताला पोषक अशा प्रकारची यशवंतांना समावेशक मनोरचना लाभल्यामुळें त्रुटित भावना, वस्तूंच्या किंवा व्यक्तींच्या अंतरंगांत शिरून शोधून काढणें आणि त्यांचा चतुरपणानें आविष्कार करणें, हें जें त्यांच्या काव्याचें वैशिष्ट्य ठरूं पाहात आहे, तें या जयमङ्गलेनें अधिक प्रभावी पण स्वाभाविक बनविलें आहे.

---